ई/८५

श्री.

कृष्णाजी शामराव विरचित

# भाऊसाहेबांची बखर.

ही साहा प्रतींवरून शुद्ध करून अर्थनिर्णायक आणि अवांतर
माहितीच्या विपुल टिपांसह

**कै. रा. ब. काशिनाथ नारायण साने, बी. ए.**

यांनीं

संपादिली.

(26)

"हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्"
भगवद्गीता.

पांचवी आवृत्ति.

[ कॉपिराइट वगैरे सर्व हक्क प्रकाशकांनीं आपणांकडे
ठेविले आहेत. ]

श्रीमन्नृपशालिवाहन शके १८५४.

THE

CHRONICLE OF BHAU SAHEB.

OR

AN ACCOUNT OF THE MARA'THA' CAMPAIGNS
FROM 1754 TO 1761.

EDITED WITH
CRITICAL AND EXPLANATORY NOTES
BY

**LATE R. B. K. N. SANE, B.A.**

"If killed in battle, thou shalt secure heaven;
If victorious, thou shalt enjoy the earth."
*Bhagavat-gītā.*

( Right of translation and other rights reserved. )

1932.

१४५६

श्री.

कृष्णाजी शामराव विरचित

# भाऊसाहेबांची बखर.

ही साहा प्रतींवरून शुद्ध करून अर्थनिर्णायक विचिकित्सक आणि अवांतर माहितीच्या विपुल टिपांसह

**कै. रा. ब. काशिनाथ नारायण साने, बी. ए.**

यांनीं

संपादिली.

" हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् "

भगवद्गीता.

पांचवी आवृत्ती.

[ कॉपीराईट वगैरे सर्व हक्क प्रकाशकांनीं आपणांकडे ठेविले आहेत. ]

श्रीमन्नृपशालिवाहन शके १८५४.

THE

## CHRONICLE OF BHÁU SÁHEB.

OR

AN ACCOUNT OF THE MARA'THA' CAMPAIGNS FROM 1754 TO 1761.

EDITED WITH CRITICAL AND EXPLANATORY NOTES BY

**LATE R. B. K. N. SANE, B. A.**

" If killed in battle, thou shalt secure heaven ;
If victorious, thou shalt enjoy the earth. "

Bhagavat-gitá.

( Right of translation and other rights reserved. )

1932

श्री.

महाराष्ट्राच्या भाषेचा व इतिहासाचा आस्थापूर्वक अभ्यास करूं पाहणाऱ्या सज्जनांस हा ग्रंथ प्रेमपूर्वक अर्पण करितों.

ग्रंथ-प्रकाशक.

---

RESPECTFULLY OFFERED TO THE STUDENT OF THE LANGUAGE AND HISTORY OF THE MARÁTHÁS.

**THE EDITOR.**

पुणें, पेठ भांबुर्डा, घ. नं. ९३६।२ येथें आर्यभूषण छापखान्यांत श्री. **अनंत विनायक पटवर्धन** यांनीं छापिलें व श्री. **विश्वनाथ सदाशिव साने** यांनीं साने वाडा, कल्याण येथें प्रसिद्ध केलें.

१४५६

॥ श्रीगणेशाय नमः ॥

# पांचव्या आवृत्तीसंबंधीं दोन शब्द.

ह्या पांचव्या आवृत्तींत पानपतास दोन्ही सैन्यांची गांठ पडण्यापूर्वी झालेल्या त्यांच्या हालचाली व नाना फडणीसांचा युद्धोत्तर दक्षिणेंत परत येण्याचा मार्ग दाखविणारा एक नकाशा व उभय सैन्यांचे पानपतावर तळ कोठें होते हें काशिराजाच्या मतें दाखविणारा दुसरा नकाशा असे दोन नकाशे जोडले आहेत. एवढाच फरक प्रस्तुत आवृत्तींत केला आहे.

**प्रकाशक.**

# ग्रंथारंभींचे चार शब्द.

१. भाऊसाहेबांच्या बखरीची ही नवीन आवृत्ती होय. हिचें मूळ बहुधा इसवी सन १९०० मधील तिसऱ्या आवृत्ती प्रमाणेंच आहे.

२. मात्र पुणें व तुंगार प्रती पुन्हा वाचून व अलीकडे उपलब्ध झालेल्या प्रतींशीं त्या रुजू घेऊन मला जे शब्दपाठ आणि क्वचित वाक्यपाठ बरे वाटले व ज्या पाठांवरून अर्थबोध अधिक स्पष्ट व जोरदार होईल असें भासलें, ते पाठ मूळांत दाखल केले आहेत. इतर पाठभेद टिपांत दिले आहेत.

३. दुसरा फरक या नवीन आवृत्तींत केलेला दिसेल तो हा:-मागील आवृत्तींत विषयानुरोधानें परिच्छेद म्ह० कलमें पाडिलीं होतींच; त्या कलमांना आतां 'अंक' दिले आहेत. याचा हेतू असा होता कीं टिपा पृष्ठाच्या तळीं न देतां ग्रंथाच्या शेवटीं परिच्छेदाचा अंक म्हणजे आंकडा देऊन तेथें याव्या. पण तसें करणें कांहीं कारणांमुळें सयुक्तिक दिसेना, म्हणून तो विचार रद्द करून टिपा पूर्वी प्रमाणेंच पृष्ठा पृष्ठाच्या खालींच देण्याचा क्रम कायम केला. मात्र कलमांस आंकडे दिले ते तसेच ठेविले.

४. अश्लील शब्द आणि वाक्यें दोन तीन ठिकाणीं मूळ ग्रंथाच्या मागील आवृत्तींत जशींच्या तशींच ठेविलीं होतीं, तीं काढून टाकावीं अशा सूचना कांहीं मित्रांकडून आल्यावरून तीं काढून टाकून तेथें * * * अशा किंवा × अशा फुल्या मारिल्या आहेत. अशा स्थळीं मूळांतील भाषा जरा जोरदार होती खरी, तरी तीं अश्लीलें काढून टाकल्यामुळें अर्थहानी बिलकूल होत नाहीं.

५. आणखी फेरफार केला आहे तो शुद्धलेखना संबंधें होय.

(१) मूळ मोडी बखरींत 'जाला' 'जाहाला' 'जालें' अशीं रूपें आहेत, तीं पूर्वींच्या आवृत्तींत हल्लींच्या वहिवाटीस अनुसरून 'झाला' 'झाली' 'झालें' अशीं लिहिलीं होतीं. तीं आतां सर्वत्र मूळ ग्रंथाप्रमाणेंच 'जाला' 'जाहाला' अशींच ठेविलीं आहेत. व्युत्पत्तीवरून पाहतां तींच अधिक शुद्ध होत. 'जाला' हें अगदीं शुद्ध रूप असून 'जा' च्या पुढें 'हा' अक्षर मराठी रिवाजाप्रमाणें उच्चाराला जोर येण्या-

साठीं मध्येंच घुसडलेलें आहे. साहा, साहाण, लाहान, साहान, जाहागीर, इंद्रप्रहस्थ, वाहाय वगैरे शब्दांतही तसेंच.

(२) 'राहा' 'पाहा' 'वाहा' इ० हा-कारान्त धातूंचीं रूपें आज्ञार्थी आणि विध्यर्थी यांत दोन्ही अक्षरें दीर्घ लिहिलीं आहेत. मूळांत तीं तशींच आहेत आणि व्युत्पत्तीच्या दृष्टीनेंही तींच शुद्ध होत. पाहावें, राहा इ०.

(३) तर आणि तरी या दोन अव्ययांच्या अर्थांमध्यें फरक आहे. 'तर' संकेत बोधक आहे व 'तरी' हें विरोध, प्रतिरोध दर्शवितें—बखरी व इतर ऐतिहासिक कागद मोडीमध्यें लिहिलेले असतात, त्यांत 'तर' च्या ऐवजीं बहुधा 'तरी' लिहितात. हें संकेतदर्शक 'तरी' व विरोधदर्शक 'तरी' यांचा भेद मोडी लिपींत लेखक करीत नाहींत. पण मोडीचें बालबोधीकरण करतांना हा भेद दर्शविणें जरूर आहे. या करितां जेथें संकेताचा बोध होतो तेथें 'तरि' असें रूप लिहिलें आहे. जेथें विरोध, प्रतिरोध अशा अर्थी हें अव्यय योजितात तेथें 'तरी' हें रूप कायम ठेविलें आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, 'तर' बद्दल 'तरि' 'तथापि' बद्दल 'तरी' याप्रमाणें या दोन अव्ययांच्या मध्यें भेद मजकडून प्रकाशित झालेल्या सर्व बखरींत व ऐतिहासिक कागदपत्रांत मी करीत आलों आहें. पण आज त्याचा हेतू काय हें स्पष्ट करीत आहें. याचीं उदाहरणें या बखरीचें पृष्ठ ३ व पुढें पुष्कळ ठिकाणीं सांपडतील.

(४) दुसरा एक फरक हा नजरेस येईल कीं, ओळीच्या शेवटील शब्दाचा पदच्छेद भलताच करूं न देतां योग्य असाच करण्याचा यत्न केला आहे. त्यामुळें 'भाऊसा-हेबांस' 'डेरि- यापुढें,' 'संभा-ळावयास' 'मात्राग-मनीनें' असे वेडगळ पदच्छेद न येऊं देतां 'भाऊ-साहेबांस' 'डेरिया-पुढें' 'संभाळा-वयास'. 'मात्रा-गमनीनें' असे योग्य पदच्छेद देण्याचा यत्न केला आहे. असा पदच्छेद करण्याचा क्रम प्रथम सरकारी क्रमिक पुस्तकांत मींच सुरू केला. त्याचें अनुकरण ह्या आवृत्तीच्या मूळा-मध्यें केलेलें सांपडेल.

(५) ब्रह्म, ब्राह्मण इत्यादि संस्कृत शब्दांत 'ह्म' कायम ठेवून 'म्हणजे' 'म्हणून' 'म्हणाला' वगैरे मराठी शब्दांत 'ह्म' येऊं न देतां तेथें 'म्ह' कायम ठेविला आहे. या 'ह्म' व 'म्ह' यांच्यांत भेद न करितां 'ब्राह्मण' 'ब्रम्हार्पण' 'ह्मातारा' 'ह्मैस' 'ह्मटलें' अशीं अशुद्ध रूपें किती तरी पुस्तकांत सांपडतील.

(६) शब्द संस्कृत असोत वा अरबी, फारसी वा देशी असोत, त्यांच्या अंतीं इ, उ, स्वर ऱ्हस्व असले तरी प्राकृत व मराठी रिवाजा प्रमाणें ते सर्वत्र दीर्घ लिहिले आहेत.

(७) अकारान्त शब्दांचे उपान्त्य स्वर इ उ असल्यास ते दीर्घ करावे; पण हा नियम सर्वत्र अमलांत न आणतां विकल्पानें आणला आहे. पुढें कदाचित ह्या ग्रंथाची पुनरावृत्ती माझ्या हातून निघाल्यास त्यांत तो सर्वत्र आणावयाचा मनादय आहे.

(८) संस्कृतांत किंवा इतर भाषांत व्यंजनान्त शब्द असतात, तसे प्राकृतांत व मराठींत नाहींत. या करितां 'भगवान्' विद्वान्' असे शब्द अकारान्त लिहिले

आहेत. अशा प्रकारेंच कै॰ सदाशिव काशिनाथ छत्रे, वो. शा॰ सं॰ रा. कृष्णशास्त्री भाटवडेकर व श्रीकृष्णशास्त्री तळेकर वगैरे जुनी पंडितमंडळी आपल्या ग्रंथांत लिहीत किंवा इतरांनीं लिहिलेलें मंजूर करीत.

६. अरबी व फारसी शब्द किंवा त्यांचीं अपभ्रष्ट रूपें ह्या ग्रंथांत जागोजाग येतात. अशा शब्दांचा वर्णानुक्रमानें एक लघु-कोश ( Glossary ) ग्रंथाच्या शेवटीं जोडला आहे, तो अनेक दृष्टींनीं उपयोगी होईल. त्या लघुकोशाचें श्रेय प्रो॰ माधव त्रिं. पटवर्धन, एम ए.(पर्शियन) फर्ग्युसन कालेज, यांस दिलें पाहिजे. प्रो॰ वासुदेव गोविंद मायदेव, एम्. ए. (मराठी) महिलापाठशाळा हिंगणें बुद्रुक, यांच्या सूचनेवरून तो माधवराव पटवर्धन यांनीं तयार केला. त्यांत अरबी फारसी शब्दांचा मूळ उच्चार मराठींत देऊन त्यांचा मूळ अर्थ व त्यावरून मराठींत झालेला अर्थ असे दिले आहेत. शिवाय माझ्या सूचनेवरून अरबी व फारसी शब्दांचे अक्षरन्यास ( Spellings ) त्या लिपीनें मराठी उच्चारांपुढेंच दिले आहेत. हा लघुकोश एक नवीन टूम होय. त्याबद्दल रा. रा. मा. त्र्यंबक पटवर्धन व वासुदेवराव मायदेव या उभयतांचा मी बहूत ऋणी आहें.

त्याप्रमाणेंच रा. रा. चिंतामण विनायक वैद्य यांनीं पुष्कळ श्रम घेऊन व पाणिपत गांव स्वतः पाहून मराठे व दुराणी यांच्या गोटांचा व शेवटल्या लढाईंत रणांगणीं दोही पक्षांकडील सरदार कसकसे उभे होते त्याचा नकाशा आपल्या ‘ दुर्दैवी रंगू ’ ह्या ऐतिहासिक कादंबरींत दिला आहे, तो उतरून घेण्याची परवानगी मला मोठ्या आनंदानें दिली त्याबद्दल त्यांचाही मी फार ऋणी आहें.

७. इतिहासासंबंधें व स्थलांसंबंधें या बखरींत माहिती चांगली आहेच. शेरीज या बखरीची भाषाही मनोवेधक आहे. ह्या दोन्हीं गोष्टींवरून ही बखर लोकांस प्रिय झाली आहे. न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे हे ह्या बखरीची योग्यता, दोन्ही दृष्टींनीं, इतर बखरींच्या पेक्षां अधीक समजत. राजमान्य राजश्री चिंतामणराव वैद्य यांनीं आपल्या “ दुर्दैवी रंगू ” ह्या सुंदर ऐतिहासिक कादंबरीचा ऐतिहासिक भाग बहुतेक याच बखरींवरून घेतला आहे. आणि अलीकडे विश्वविद्यालयांत बी. ए., एम्. ए, च्या अभ्यास-क्रमा मध्यें ही बखर अन्तर्भूत केली आहे. तेव्हां तिच्या भाषेच्या चांगुलपणाविषयीं अधीक लिहिणें नको. पूर्वी प्रमाणें ती लोकांस आतांही प्रिय होवो म्हणजे झालें. मात्र ह्या ग्रंथांत भाषेचा मोठा दोष आढळेल तो हा कीं ठिकठिकाणीं तृतीयान्त कर्ता असा वाक्यास आरंभ करून तें वाक्य कर्तरी प्रयोगांत संपविलें आहे! परंतु त्या काळीं मराठी व्याकरणाचा गंधही लोकांस नव्हता, ही गोष्ट ध्यानांत वागविली म्हणजे ह्या कारकुनी किंवा दरबारी ग्रंथकारांस कोणी दोष देणार नाहीं.

८. जुन्या बखरी कोणीं कधीं लिहिल्या वगैरे माहिती मिळावी तशी मिळत नाहीं. ज्यांच्या पृच्छेवरून हे वृत्तांत लिहिले व ज्यांनीं ते लिहिले, ते पृच्छक आणि निवेदक

खरोखरी विद्यमान होते किंवा काल्पनिक होते तें कळण्यासही असावें तसें साधन नाहीं. बहुधा ते काल्पनिक असावे असें मला वाटतें. सांप्रत उपलब्ध झालेल्या धोपेश्वर व तुंगार प्रतींचा आरंभ पाहावा. त्यांत पृच्छक आणि कथनक यांच्या जोड्या भिन्न भिन्न आहेत. सारांश पौराणिक कथांच्या बखरीमध्यें जसे शौनकादि ऋषी प्रश्न करतात आणि त्यांस सूत सांगतो; किंवा राजा जनमेजय आपल्या पूर्वजांच्या चरित्राविषयीं प्रश्न करतो आणि वैशंपायन ऋषी ज्याप्रमाणें भारतकथा सांगतो; त्याप्रमाणें बहुतेक सर्व बखरींचा आरंभ असतो. एकानें पत्रीं पृच्छा करावी आणि दुसऱ्यानें पत्ररूपानेंच सर्व हकिकत लिहावी असा क्रम असतो; मात्र फरक इतकाच कीं मध्यंतरीं पृच्छक आणि कथनक यांच्या नांवें अमुक उवाच तमुक उवाच असें जसें पुराणांत किंवा भारतांत किंवा भागवतांत स्थळोस्थळीं दृष्टीस पडतें, तसें ह्या बखरींत नसतें. शेवटीं मात्र "आपण विचारिलें तें वर्तमान येणेंप्रमाणें निवेदन केलें आहे" अशा प्रकारचा शेरा मारून बखरकार आपलें पत्ररूपी वृत्त संपवितो. सभासदाच्या शिव छत्रपतीच्या चरित्रांत मात्र पृच्छक राजाराम महाराज व वृत्तांत सांगणारा कृष्णाजी अनंत सभासद ही पृच्छक-कथनकांची जोडी काल्पनिक नसून खरोखरीची होती. सदर्हूप्रमाणें शिव छत्रपतींचें सप्तप्रकरणात्मक चरित्र ह्या ग्रंथाचीही अशीच गोष्ट आहे. धाकटे शाहू महाराज विचारणार व चिटणीस मल्हार रामराव सांगणार.

भाऊसाहेबांची बखर लिहिणारा कोणीही असो, तो शिंद्यांच्या पदरचा असून मोठा शोधक बुद्धीचा आणि बहुश्रुत पुरुष असला पाहिजे अशा विषयीं अंतःप्रमाणें ग्रंथांत पदोपदीं सांपडतील. होळकराविषयीं त्याची प्रथम तरी वक्र-दृष्टी होती अशा-विषयींही अंतःप्रमाणें पुष्कळ ठिकाणीं ह्या बखरींत विखुरलेलीं आहेत. एकंदरींत शिंद्यांच्या घराण्यांतील पुरुषांच्या चांगुलपणाकडे त्याचा कल झुकता आहे; किंबहुना तो शिंद्यांचा पक्षपाती भासतो, असें म्हटलें तरी चालेल.

९. आतां ह्या बखरींत वृत्तांत कोठपासून कोठपर्यंत आहे तें थोडक्यांत येथें सांगतों. श्री० रघुनाथराव यांनीं इ० स० १७५३।५४ सालीं हिंदुस्थानांत स्वारी केली तींत सुरजमल्ल जाट यांस कुंभेरीच्या किल्ल्यांत कोंडिलें हा ह्या ग्रंथाचा आरंभ असून, जयाप्पा शिंदे यांची मारवाडांतील स्वारी, दिल्लीच्या पादशाहानें व त्याच्या जनानखान्यांतील स्त्रियांनीं नजीब उद्दवला याच्या मार्फत अबदालीशीं मदतीचें संधान लावलें तो प्रकार, नजीबखानाच्या हुलकावण्यांत शिंद्यांची फसगत, अबदालीची स्वारी, शिंदे होळकर यांचा मोड, उदगीरची मोहीम व पुढें श्री० भाऊसाहेब यांची अबदालीवर स्वारी व कुंजपुऱ्याचा विध्वंस केल्यावर पाणिपत येथील युद्धें अशीं प्रकरणें अनुक्रमें वर्णन करून, श्री० नानासाहेब पेशवे यांच्या मृत्यूपर्यंत वृत्त आणून थोरले माधवरावांस पेशवाईचीं वस्त्रें श्री० महाराजांकडून देववून ही बखर संपविली आहे.

याजवरून महाराष्ट्रांतील सर्व कुलंगडीं नीटपणें उलगडून नानासाहेब पेशवे मोकळे झाल्यावर व बादशाही सनदेनें सर्व प्रांतांचा कारभार करण्याबद्दल अधिकार

मिळाल्यावर म्हणजे इ० स० १७५३।१७५४ पासून इ० स० १७६१ पर्यंत ७।८ वर्षांत--म्हणजे ज्या काळीं हिंदुस्थानांत व दक्षिणेंत मराठे लोकांचा जिकडे तिकडे दरारा बसून त्यांच्या उत्कर्षाची पराकाष्ठा होऊन शेवटीं अपकर्ष झाला; त्या काळीं —ह्या मराठे लोकांनीं राज्यप्रकरणीं ज्या ज्या मोठमोठ्या उलाढाली केल्या, त्यांची हकिकत ह्या बखरींत दिली आहे, असें सहज ध्यानांत येईल.

१० वरील कलमावरून ह्या ग्रंथास "शालिवाहन शके १६७५।७६ पासून शके १६८३ पर्यंत हिंदुस्थानांत व दक्षिणेंत मराठ्यांनीं ज्या स्वाऱ्या केल्या त्या स्वाऱ्यांची बखर" असें कांहीं तरी नांव देणें योग्य दिसलें. मी तर "पाणिपतची बखर," असेंच नांव देणार होतों. पण पुणें येथील प्रतीच्या १२७ व्या बंदाच्या डोकीवर "बखर भाऊसाहेबांची" असें लिहिलेलें आहे. खेरीज शेवटील प्रसंगाचा अतिनिकट संबंध श्री० सदाशिवराव भाऊ यांच्या नांवाशींच आहे. अशा करितां 'भाऊसाहेबांची बखर,' हेंच या ग्रंथाचें नांव कायम करून मी तो प्रसिद्ध करूं लागलों.

११. रा. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचा खंड १ यांत वाईकर एरंडे यांच्या तळघरांत सांपडलेलीं पत्रें छापिलीं त्यांवरून व का० इ० संग्रहांतील 'पत्रें वगैरे' या भागांतून त्यांनीं उतारे घेतले आहेत त्यांवरून आणि खुद्द त्यांच्या विस्तृत विवेचनावरून सदाशिवराव भाऊंच्या स्वभावाचा आणि कर्तृत्वाचा व त्यांच्या हिंदुस्थानांतील मोहिमेचा उलगडा चांगला होतो. राजवाड्यांचा हा पहिला खंड वाचकांनीं ह्या बखरीबरोबर मुद्दाम वाचावा अशी माझी शिफारस आहे. मात्र गोविंदपंत बुंदेला, तो इतका गैरइतबाराचा कामगार असतां, त्यावर सर्वस्वीं अवलंबून भाऊ कां राहिले; दुसरा सरदार कुंजपुऱ्याच्या पलीकडील यमुनेच्या पाणवठ्यावरून अंतर्वेदींत कां पाठविला नाहीं, हें एक गूढ आहे. तो सरदार वरतून व बुंदेला खालतून असे अंतर्वेदींत शिरले असते तर दुराणीची 'रस्त' बंद झाली असती. त्याप्रमाणेंच दुसरी गोष्ट अशी कीं, भाऊसाहेब पाणपतावर व नारो शंकर दिल्लीस अशा दोन शहांमध्यें दुराणी सांपडला होता ही गोष्ट मराठ्यांस बहुत अनुकूल होती. असें असतां पाणपतावरील मराठे दुराणीवर हल्ले करीत, त्याचा मोडही करीत. पण नारो शंकर यानें दिल्लीहून दुराणीवर हल्ले किंवा गनिमी कावे कां न केले, हात पाय कां न हालविले, हेंही मोठें गूढच होय. त्याला पाणिपताहून मदत आधींच गेली असती तर दोन शहांमध्यें अबदालीप्रभृतीचें चित्त भांबावून गेलें असतें व त्यांस दोन्हीकडून होणारे हल्ले सांभाळतां सांभाळतां नाकीं नऊं आले असते. पुढें मागें आणखी पत्रव्यवहार किंवा हकिकती सांपडल्या तर ह्या दोन गोष्टींचा उलगडा होण्याचा संभव आहे.

१२. आतां मला या ग्रंथाच्या ज्या प्रती उपलब्ध झाल्या त्यांविषयीं लिहूं:— माजी काव्येतिहास-संग्रह मासिक पुस्तकांत प्रथमतः ही बखर 'धोपेश्वर' व

'पुणें' प्रतींवरून प्रसिद्ध करूं लागल्यापासून आणखी प्रती उपलब्ध झाल्या. पहिल्या दोन व पुढें उपलब्ध झालेल्या अशा सर्व प्रतींची हकिकत देणें इष्ट आहे.

या सर्व प्रतींची मूळ प्रत बहुधा पुण्यास असावी असें बळकट अनुमान होतें. तेथून त्या मूळ प्रतीच्या नकला **धो**पेश्वर येथील प्रत व **पुणें** येथें बाजारांत सांपडलेली **पुणें** प्रत आणि **तुं**गार प्रत आणि **सा**तारा येथील आणि **गणे**शवाडी **येथील** प्रती ह्या सर्व मूळ प्रतीच्या प्रथम प्रथम केलेल्या नकला असाव्या असा अदमास आहे. बाकी सर्व ह्या नकलांच्या प्रति नकला होत. ही पुण्याची मूळ अस्सल प्रत कधीं कोणास सांपडेल ती सांपडो.

( १. ) **धो**पेश्वर प्रतः—ही रत्नागिरी येथें एका जुनाट व टाकाऊ दप्तरांत मला मिळाली. ती नक्कल करणारानें खर्डे–वजा लिहिली आहे. खेरीज ज्या मूळप्रतीवरून त्यानें ही उतरली ती मूळप्रत त्यास नीट लागली असेंही नाहीं. अर्थात् पुष्कळ ठिकाणीं ही प्रत मला दुर्बोध झाली. तिच्या मूळ प्रतीचा शोध करितां ती **रा**जापुराजवळ **धो**पेश्वरीं रा० **कृष्णा**जीपंत **नि**फाडकर यांजपाशीं आहे असें मला कळलें. पुढें मीं मागितल्यावरून त्यांनीं ती मला देण्याचें कबूलही केलें. पण त्यांजकडून ती प्रत न आल्यामुळें मिळालेली नक्कल पहिल्यानें एकीकडे ठेवून द्यावी लागली.

मिळालेली नक्कल अवलपासून अखेरपर्यंत सबंध आहे. ती उभ्या फ्रेंच बंदावर एका बाजूनें लिहीत लिहीत १०९ बंदांपर्यंत नेली आहे व नंतर १०९ व्या बंदांपासून पाठीवर लिहीत लिहीत २९ व्या बंदाच्या पाठीवर संपविली आहे. **विष्णू बा**पूजी **नि**फाडकर, **धो**पेश्वरकर, रा० **कृ**ष्णाजीपंत यांचे बंधू, यांनीं शके १७८१ सिद्धार्थीनाम संवत्सरीं ही नकल केली. हिची मूळ प्रत **धो**पेश्वरीं होती म्हणून हीस '**धो**पेश्वरी प्रत' असें म्हणूं.

अलीकडे रा० रा० **लक्ष्मणराव पां**गारकर यांस ही कृष्णाजीपंताकडील मूळप्रत मिळाली होती. परंतु पुण्यास आल्यावर त्यांजकडून ती दुर्दैवानें गहाळ झाली, सांपडत नाहीं, असें ते म्हणतात. पुणें येथें गहाळ झाली असल्यास ती पुण्यासच कोठें तरी पडून राहिली असावी. पण तिचा शोध लागेल तेव्हां खरा! विष्णू बापूजीनें केलेली नक्कलही माझ्या परिभ्रमणांत कोठें गहाळ झाली न कळे!

( २. ) **पुणें प्रतः**--ही एका **पुणें**कर मित्रानें एका वाण्याच्या दुकानांतून **पा**णिपतची बखर म्हणून सोडवून मला दिली. ती वाचून पाहतां **धो**पेश्वराच्या प्रतीशीं मिळूं लागली. ही **पुणें**प्रत सुवाच्य अक्षरांनीं जुनरी खर्ची कागदाच्या बंदांवर एका बाजूनें २०५ बंदांवर लिहिली होती. पैकीं पहिले दोन व शेवटील एक असे तीन बंद गहाळ झालेले आहेत. त्यामुळें ही प्रत कोठें, कोणी व केव्हां लिहिली वगैरे मागमूस लावावयाचा तो लावतां येत नाहीं. तरी ही प्रत बरीच जुनी असावी असें तिच्या अक्षरावरून व कागदावरून दिसतें. असो, ही प्रत मिळाल्यामुळें **धो**पेश्वरप्रत,

तिच्या दुर्बोधत्वास्तव, अगदीं बांधून ठेवावी लागली होती, ती हिच्या साहाय्यानें पुष्कळ सुबोध झाली हा मोठा लाभ झाला. हिच्या प्रत्येक बंदाची लांबी सुमारें २२ इंच, रुंदी ५। इंच आहे. अक्षर जुन्या चालीचें, वाटोळें असून चांगलें वळणदार आहे. ही ' **पुणें**प्रत ' मजपाशीं आहे.

( ३. ) **सातारा** प्रतः— ही प्रत **सा**तारा येथील प्रतीची नक्कल स्वतः करून वे० **कृ**ष्णाजी **वि**ष्णू **आ**चार्य यांनीं पाठविली. तिच्या मूळाचा शोध मला लागला नाहीं. तें मूळ **सा**तान्यास पडून राहिलें असावें. ही **आ**चार्यांची नक्कलही मजपासून गहाळ झाली, ती आतां सांपडत नाहीं.

( ४. ) **तुंगार** प्रतः- ही प्रत मला **वि**विध-ज्ञान-**वि**स्तारकर्ते यांजकडून मिळाली. **तुं**गार हें ठिकाण **व**सई तालुक्यांत आहे. ही सायंत आहे. **तुं**गार येथील कुळकर्णी **रा**घोबा **म**ल्हार यांची ही प्रत होय. ही **पु**ण्यास शके*१७१२ विरोधीकृतनाम संवत्सरे सालीं लिहिली. अर्थात् **स**वाई **मा**धवरावाच्या कारकीर्दींत **रा**घो **म**ल्हारानें **पु**णें येथें ती करविली. तिचें अक्षर ठोसर, वळणदार असें आहे. ही प्रत करणारानें चिकट-चंदावर लिहिण्यास सुरुवात केली आहे आणि हा लांबलचक चिकटबंद उलटून त्याच्या पाठीमागें लिहीत लिहीत जेथें **ज**यापा **शिं**दे मारेकऱ्यांनीं मारल्याचें वृत्त **म**ल्हारराव **हो**ळकर यांस समजलें असा मजकूर आला आहे, तेथें ती संपविली आहे. बंदाचा कागद घोटीव असून चिकट बंदाची रुंदी ५$\frac{७}{८}$ इंच आहे. बंद निरनिराळे नसल्यामुळें व चिकटबंदांवर आंकडे नसल्यानें अमुक चंद या चिकटबंदांत समाविष्ट झाले आहेत असें सांगतां येणें कठीण आहे. या **तुं**गार प्रतीचा आरंभ व शेवट येणेंप्रमाणें आहेत.

### आरंभ.

" राजश्रिया विराजित रा० रा० **गणे**शपंत† स्वामींचे सेवेशीं, पोष्य **चिं**तामण† **गो**विंद कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती, उपरी येथील कुशल तागाईत पौष वद्य १२ मुकाम **दि**ल्ली **इं**द्रप्रहस्त § जाणोन यथास्थित वर्तमान असे. विशेष. आपण कृपा करून पत्र पाठविलें, लिहिला मजकूर विदित जाला. पत्रीं आज्ञा जाली कीं, हिंदुस्थानांतील आदिअंतीं वर्तमान दक्षणदेशीं हिंदुपद **शा**हूछत्रपती यांचा प्रधान मुख्य आदिकरून सवालक्ष फौजेनिशिंही **भाऊ**शाई गर्दी होऊन प्यादेमात कैशी जाली हें सविस्तर वर्तमान लिहावयास आज्ञा केली. ऐशियासः—" शेवटः—

" याजप्रमाणें वर्तमान जालें, **न**जीबखान प्यादा होता तो फर्जी जाहाला. त्यानें प्यादे-मात केली. याचप्रमाणें जाली हकिकत सेवेशीं लिहिली असे. बहूत काय.

---

* १७१२ ऐवजीं १७१३ असावें; कारण विरोधकृत संवत्सर शके १७१३ मध्यें येतो. खेरीज इसन्ने तिस्सैन मया व अल्लफ हा सुरू सन दिला आहे त्यावरूनही शके १७१३ हेंच वर्ष येतें.

† हे पृच्छक आणि कथनक ' धोपेश्वर ' प्रतीच्याहून भिन्न आहेत.

§ ' इंद्रप्रस्थ ' याचें असेंच रूप दोन्हीं प्रतींत आहे. ' ह ' हा जोरदार उच्चारासाठीं.

लिहिणें लोभ कीजे हे विनंती. हे बखर राजश्री राघो मल्हार कुळकर्णी तर्फ तुंगार, तळप्रांत कर्नाळा तालुके वसई कर (!) यांची बखर असे. दर जागा पुणें येथें समाप्त केली. हस्ताक्षर मल्हार गोविंद पानसरे कसबे इंदापूर सन १२०१* सु॥ इसने तिसैन मया व अलफ शके १७१२* विरोधकृत नाम संवत्सरे मित्ती मार्गशीर्ष वद्य सप्तमी छ २० माहे रबिलाखर."

तुंगार प्रतींत मराठे ऐवजीं 'म्हराठे' भुईऐवजीं 'भोई' रानबद्दल 'राण' इ० विशेष आढळतात. ही तुं० प्रत मजजवळ आहे.

(५.) **सांगली प्रतः**— आमचे मित्र राजश्री दत्तो वामन पोतदार यांस सांगली येथें या बखरीची एक प्रत उपलब्ध झाली ती त्यांनीं भारत इतिहास संशोधक मंडळाच्या दफ्तरांत ठेविली आहे. ती त्यांनीं कृपा करून मला दिली. पण वाटलें होतें तितका उपयोग या प्रतीचा झाला नाहीं. तिचा पहिला व शेवटला बंद हे नाहींतसे झाले असून कोणी तरी इतिहासभक्तानें त्यांच्या बदला आपणच कांहीं मजकूर लिहून बखरीस आरंभ केला आहे व त्याप्रमाणें तिची समाप्तीही अशा प्रकारचीच केली आहे. कागद व अक्षर हीं दोन्हीं भिन्न भिन्न आहेत. मूळ बंद खर्ची कागदाचे असून प्रत्येक बंदाची लांबी सुमारें २१। इंच व रुंदी सुमारें ७। इंच आहे. अक्षर दोन प्रकारचें आहे पण तेंही चांगलें वळणदार नाहीं आणि ज्या प्रतीवरून ही नक्कल केली तिचें मोडी नक्कलकारास जागोजाग न लागल्यामुळें त्याला बरे वाटले ते पाठ त्यानें लिहिले आहेत. हिचे एकंदर बंद १८२ होते, त्यांतील पहिला व शेवटचा नष्ट झाले असल्यामुळें त्याऐवजीं वरील इतिहासभक्तानें आपल्या मतें जे बंद लिहिले ते दाखल करूं म्हणजे मी काय म्हणतों तें ध्यानीं येईल. इतर ठिकाणीं पाठभेद नजरेस आले ते स्थळींच्यास्थळीं दिले आहेत. पहिला व १८२ वा बंद गहाळ झाले असून त्यांबद्दल निराळ्या प्रकारच्या कागदांवर नक्कल करणारानें प्रश्नोत्तररूपाची नेहमींची वहिवाट सोडून त्याला बरें वाटलें त्याप्रमाणें आरंभ केला आहे व शेवटही बहुतेक तसाच आहे. ही दक्षिण महाराष्ट्रांतील प्रत नकलेवरून नक्कल करतां करतां तिसऱ्यानें किंवा चवथ्यानें केलेली नक्कल राजश्री पोतदार यांस उपलब्ध झाली. प्रथमतः राजश्री सुरनीस यांनीं नक्कल केली तिचें मूळ दक्षिण महाराष्ट्रांत कोठें तरी असलें पाहिजे. ही सांगली प्रत परत भा० इ० संशोधक मंडळांत प्रविष्ट केली. तिचा आरंभ "श्रीगजानन प्रसन्न. इतिहास लिहिण्यास प्रारंभ करितों. श्रीमंत पेशवे यांणीं राज्य केल्यापैकीं कांहीं वर्षांचा इतिहास लिहितों. छत्रपती राजा शाहूनें मरण-

---

* ह्या वर्षीं म्हणजे सवाई माधवरावांच्या कारकीर्दींत या राघो मल्हारानें ही प्रत पुण्यास करविली. यावरून ही बखर लढाई झाल्यावर लौकरच लिहिली असावी असें जें अनुमान, त्यास पुष्टी येते. तसेंच मराठ्यांविषयीं बखर रचणारानें कमीपणा अंगीकारून जें इतकें लिहिलें आहे तें ह्या मोहिमेंत झालेला त्यांचा पराभव व नुकसान हीं त्याच्या अंतःकरणांत ताजीं होतीं म्हणून लिहिलें असावें, हें अनुमानही वरील अनुमानास पुष्टी आणितें.

समयीं राजश्री बाळाजी*विश्वनाथ यास प्रधानकी पूर्वीच दिल्ही होती. आणि त्याचे मस्तकीं हात ठेवून तुम्हीं माझे पश्चात पृथ्वीचें राज्य धर्मानें करावें म्हणोन सांगोन शिक्के मोर्तब व कटार दिल्हीं, आणि आपण परधामास गेले. नंतर छत्रपतीचे आशीर्वादें दिवसेंदिवस अधिकच प्रताप वाढत चालला. त्याचे वंशिकांपैकीं श्रीमंत रघुनाथराव दादासाहेब हे हिंदुस्थानचे मोहिमेस तमाम फौज सुद्धां पुण्याहून निघोन कुंभारीचे रोखें चालले, तों श्रीमंतांपासीं जाटाचा वकील रूपराम होता, त्यांणीं निरोप घेऊन सुरजमल जाट यास सांगितलें कीं पेशवे यांजपाशीं चाळीस लक्ष रुपये खंडणी देतों, म्हणोन बोललों, परंतु ते ऐकत नाहींत. एक कोट रुपये खंडणी मागतात म्हणोन ऐकतांच सुरजमल जाट हा शूर फार व द्रव्य फार व फौजही फार व भरतपूर व रामगड हे किल्लेही अजिंक्य; त्यांचा बंदोबस्त करून आपण कुंभारींत जमावासुद्धां बळ बांधून राहिला आणि दादासाहेब यांस उत्तर सांगितलें कीं, चाळीस लक्ष रुपये देतों ते घ्यावे, नाहीं तर युद्धास सिद्धच आहों. म्हणोन पांच गोळ्या व कांहीं दारू पाठवून दिल्ही. तेव्हां रघुनाथराव दादासाहेब यांस परम विषाद येऊन कुंभारीस मोर्चे लाविले. चौंकडे मोर्चेबंदीस फौज वांटोन मोर्चे कायम केले. परस्परें युद्धास प्रारंभ जाहला. तोफा व हस्तनाला व सुतारनाला, व जंजाळा व बाणांचा मार होऊं लागला. अशी पंधरा दिवस लढाई जाहली. " हिचा शेवट असाः—

" नानासाहेब व भाऊसाहेब अवतारी पुरुष. उभयतां बंधूंची प्रीति व सख्यत्व राम-लक्ष्मणाप्रमाणें उभयतांचें होतें तें [ न ] भूतोनभविष्यति असें. मागें बाजीरावसाहेब निधान पावलेवर साहा महिन्यांनीं चिमाजी आपा गेले; त्या प्रमाणें साहा महिन्याचे आंत राजेश्री भाऊसाहेब व नानासाहेब गेले. अशी हकीकत जाहली. आणि त्या कारकीर्दीची येवढ्याच स्वारीची मोहिम कोणीं बखर लिहून ठेविली होती. त्याच प्रतीवरून गोपाळराव सुरनीस यांनीं प्रत लिहून आपले घरीं ठेविली आहे. त्यावरून कारणावाचून अधिक मजकूर असेल तो गाळून व कमी पडला तेथें कांहीं अक्षरें घालून इतिहास न शोधितां ई [ ही ] बखर मुलांस वाचणेकरितां बाळाजी अनंत कानिटकर याणें लिहून घेतली आहे. ही बखर लिहून जाहली मिती फाल्गुन शुद्ध १ शके १७८७ रोज शनवार युवनाम संवत्सरे. त्याजवरून हरी गोपाळ देशपांडे राहणार उगार‡ प्रांत रायबाग यांनीं कानिटकर यांच्या प्रतीवरून घेतली आहे. मिती फाल्गुन शुद्ध ९, शके १८२९.

( ६. ) **कल्याण** प्रतः-- श्रीमंत राजश्री परशुराम रामचंद्र उर्फ बापूसाहेब मेघश्याम यांच्या कडून ही प्रत मिळाली. ही फार जुनी नसून अलीकडेच केलेली दिसते. ती पातळशा फ्रेंच बंदावर पाठपोट लिहिलेली आहे. हिचे बंद ६५ होते. त्या प्रत्येकाची लांबी सुमारे १६ इंच व रुंदी सुमारे ६ इंच आहे. लिहिणाराचें अक्षर बारीक,

---

* ' बाळाजी बाजीराव ' असें असलें पाहिजे.

‡ सांगली संस्थानांत एक उगार आहे. लोकमान्य ता० २।७।२२.

अलीकडल्या वळणाचें, पण सुवाच्य असें आहे. तिच्या ६५ बंदांपैकीं पहिले दोन बंद हरवले आहेत. तीन व चार बंदांचीं अर्धेंच आहेत व १० वा बंद व ६५ वा हे दोन्ही गहाळ झाले आहेत. अर्थात् ही नक्कल कोणत्या प्रतीवरून केली हें कळण्यास मार्ग नाहीं, परंतु सांगली प्रतीचा आणि या कल्याण प्रतीचा मेळ बऱ्याच ठिकाणीं पडतो. हींत कांहीं ठिकाणीं मजकूर अधिक व निराळा आहे. सांगली प्रतींत नक्कल-कारांनीं जसें जुन्या भाषेचें अलीकडील भाषेंत रूपांतर केलें आहे, तसेंच ह्या प्रतींतही आधुनिकीकरण झालें आहे. या प्रतींतून संबंध जोडणारे शब्द किंवा वाक्यें जागोजागीं घेऊन ही आवृत्ती सुसंबद्ध होईल असें केलें आहे. संबंध कळण्यासाठीं चौकटीच्या कंसांत जे शब्द पूर्वीच्या आवृत्तींत घालावे लागले होते ते कंस आतां बहुतेक काढून टाकले आहेत. कारण चौकटीच्या कंसांची आता जरूर राहिली नाहीं. पहिला व शेवटचा विशेषतः शेवटचा बंद नष्ट झाल्यामुळें ही नक्कल कोणीं, कोठें, कधीं केली हें सांगतां येत नाहीं. इतकें लिहून झाल्यावर श्रीमंत बापूसाहेब व त्यांचे तीर्थरूप राजमान्य राजश्री आपाराव सुरनीस, वस्ती कल्याण, यांस विचारितां त्यांनीं सांगितलें कीं राजश्री गोपाळराव परशुराम जोशी सुरनीस या गृहस्थानें गणेशवाडी मुकामीं सुमारें ५०।५५ वर्षांपूर्वी ही नकल केली. एवंच गोपाळराव सुरनिसांनीं प्रत लिहून ठेविली तिचें मूळ गणेशवाडी, नजीक कुरूंदवाड, येथें अगर आसपास कोठें तरी सांपडेल—सुरनिसांनीं केलेली प्रत या कल्याण व सांगली प्रतींचें मूळ होय. ती दक्षिण महाराष्ट्रांतील मूळ प्रत कोणी शोधकांनीं ठायीं पाडल्यास पुढें तिचा उपयोग होईल. ही कल्याण प्रत श्री० बापूसाहेब मेघश्याम यांची त्यांजकडे परत केली.

१३. मे, जून सन १९२१ सालीं ही आवृत्ती काढण्याचें ठरलें तेव्हां कागद व छपाईची मजुरी अत्यंत महाग असल्यामुळें खर्च फार आला. नकाशा व लघुकोश हेही किंमत वाढविण्यास कारण झाले. याकरितां माझी इच्छा नसतां किंमत १८१४ ठेवावी लागली. ही नाइलाजाची गोष्ट होय.

१४. असो. हे 'चार शब्द' वाढतां वाढतां बरेच वाढले. ते संपविण्याची वेळ आतां येऊन पोंचली आहे. तरी रा० रा० शिवराम रामचंद्र बिवलकर असिस्टंट मास्तर, शाळा नं० १ कल्याण व इतर छोटी मंडळी यांनीं कॉपी तयार करणें, प्रुफें तपासणें, प्रती रुजू घेणें वगैरे कामांत जी मला मदत केली तिजबद्दल त्यांचे येथें आभार मानणें अवश्यक आहे. हीं कामें मला एकट्याला त्यांच्या साहाय्याशिवाय करतां आलीं नसतीं.

१५. त्याचप्रमाणें आर्यभूषण छापखान्याचे व्यवस्थापक यांनीं बखरीचें काम फार जिकिरीचें व घासाघिसीचें असतां, तें धिमेपणानें चांगलें पार पाडलें ह्याबद्दल त्यांचे मजवर मोठे आभार आहेत हें येथें नमूद केल्याशिवाय माझ्यानें राहवत नाहीं.

कल्याण, ता० २४ माहे मे सन १९२२.

**काशिनाथ नारायण साने.**

# अनुक्रमणिका.


| परिच्छेद (कलम) | विषय |
|---|---|
| १. | विषयावतरण |
| १. | 'व्याघ्राचा फर्जी' आणि 'व्यादेमात.' |
| २–११. | दादांची हिंदुस्थानांत स्वारी —कुंभेरीचा वेढा. |
| ५. | खंडेराव होळकराचा मृत्यू–मल्हाररावाची प्रतिज्ञा. सुरजमल्ल जाट, रूपराम व हणमया यांची मसलत. |
| ७–८. | शिंदे जाटांचे 'पगडी भाई'–होळकरांचा विषाद. |
| ९. | दादासाहेब संकटांत. |
| १०. | मारवाडावरची मसलत. |
| ११. | जाटाशीं तह. |
| १२. | शिंदे मारवाडांत— सरदारांची सभा. |
| १३. | मेडत्याची लढाई. |
| १४–२१. | नागूरचा वेढा. |
| १५. | विजेसिंगाचें संकट–मल्हाररावाचा उपदेश–'मोंगलाई मसलत.' |
| १७–१९. | जयापाचा वध व मारवाड्यांचा हल्ला– जयापाचें प्रसंगावधान. |
| १९. | दत्ताजीची उठावणी–जयशोक. |
| २०. | पेशव्यांचा 'अर्जुन' गेला–शिंयांस समाधान पत्रें. |
| २१. | मारवाड्याशीं तह. |
| २२. | 'अजगरका दाता राम'–शिंयांचें देशीं आगमन. |
| २३. | पेशवे स्वतां येऊन शिंयांचें समाधान करतात. |
| २४. | सुभ्याचे शिक्के जनकोजीस–सावनूरची मोहीम– दादांची हिंदुस्थानांत रवानगी. |
| २५. | हिंदुस्थानांतील वर्तमान–मलकाजमानी व नजीबखान रोहिला. |
| २६. | मागील हकिकत– 'दख्खनी बंदर'– नादिरशाहा. |
| २७. | नजीबखान मार्फत अबदालीशीं राजकारण. |
| २७–३०. | अबदालीची दिल्लीवर चाल. |
| २८. | नजीबखान 'मात्रा गमनी.' |
| ३०. | अबदाली दिल्लींत–कत्तल. |
| ३१. | अंताजीपंताचा मोड. |
| ३१–३६. | क्षेत्रांचा विध्वंस– गाजुदीखान आगऱ्यास पळतो– आगऱ्याचा किल्ला–किल्लेदाराची हिंमत– अबदालीची धमकी. |
| ३७–४०. | अबदाली परत जातो– दादांची पुढें चाल. |
| ४०–४१. | दादा दिल्ली सर करून लाहुरास जातात. |

| परिच्छेद (कलम) | विषय. |
|---|---|
| ४१. | दादा अटक येथें. |
| ४२. | पेशव्यांचा सलाबतजंगाशीं बिघाड. |
| ४३. | शिंद्यांची मर्दुमकी– दत्ताजीची तारीफ. |
| ४४–४५. | जनकोजीची हिंदुस्थानांत रवानगी–जनकोजी उदेपुरीं. |
| ४६–४८. | जनकोजीची दादांशीं भेट–मल्हाररावाशीं भेट. |
| ४८–५०. | शिंद्यास मल्हाररावाचा उपदेश–शिंदे दिल्लीस. |
| ५०–५१. | दिल्लींतील जुन्या तोफा. |
| ५१–५२. | शिंदे पंजाबांत– बुंदेल्याचें वर्तन–दत्ताजी मोहग्रस्त. |
| ५२. | शिंद्यांचें नजीबखानाशीं बोलणें व त्याचें कपट. |
| ५३–५४. | नजीबखानाची गुप्त मसलत. |
| ५५. | नजीबखान शुक्रतालीं–त्याच्या कपटाचें परिस्फोटन. |
| ५६–५७. | शुक्रतालावर शिंद्यांचा हल्ला. |
| ५७–५८. | सहस्रचंडीचा होम–गिलच्यांची पंजाबावर चाल–साबाजी शिंद्याचा पळ. |
| ५९–६०. | भागीरथीपलीकडे जाण्याचा शिंद्यांचा यत्न. |
| ६१–६२. | रोहिल्यांच्या खजिन्यावर हल्ला–बुंदेल्यांची कसुरी. |
| ६३. | सुजाउद्दौल्याचें कपट. |
| ६४. | सुजास न भेटावें असा दत्ताजीस बोध–सुजाच्या जन्माची कथा. |
| ६५–६७. | ‘ मोंगलाई मसलतीची ’ उघडीक. |
| ६८. | मराठे सरदारांची सभा–दुराणी पहाडांत जातो. |
| ६९. | शिंद्यांची तयारी–पंजाबचीं घायाळें. |
| ७०–७२. | शिंद्याच्या हारोळीचा दुर्दशा–शिरांचा कलवड–शिंदे परत दिल्लीस. |
| ७३–७५. | कबिले दूर पाठवितात–संक्रांतीची भोगी– दुराणी यमुनाकांठीं येतो. |
| ७४–७८. | मराठे दिल्लीजवळचे घाट धरितात–दिल्लीची लढाई–दत्ताजी युद्धास रुजू. |
| ७६–७७. | बुंदेले रानभरी– मालोजी शिंदे गैबत– जनकोजीस जखम. |
| ७७. | दत्ताजीचा हल्ला– दत्ताजी विद्ध– ‘ बचेंगे-तो और बी लढेंगे’ दत्ताजीचा शिरच्छेद. |
| ७८–८०. | मराठ्यांची पिछेहट–पळ. |
| ८१. | नजीबखान दुराणीस दत्ताजीचें शिर नजर करतो. |
| ८२–८३. | दत्ताजीच्या देहाचें सार्थक–शिंद्यांच्या लष्कराचा पळ–बायांचें हिमतीचें वर्तन. |
| ८४. | होळकर येतात. |
| ८५. | शिंद्यांची व होळकरांची भेट– शोक. |
| ८६–८७. | सड्या फौजा– गनिमी–कावा– शिकंदऱ्याची लूट. |

| परिच्छेद ( कलम ) | विषय. |
|---|---|
| ८८. | होळकरांच्या फौजेचा दुराणीशीं मुकाबला–होळकरांचा मोड. |
| ८९. | तांदुळज्याची ( उदगीरची ) लढाई–फत्ते–हिंदुस्थानांतील पराजयाचें वर्तमान. |
| ९०–९१. | हिंदुस्थानांत कोणीं जावें ह्याची विचारणा. |
| ९०. | नाना—दादा—भाऊ—गोपिकाबाई. |
| ९२–९५. | भाऊंचा हिंदुस्थानांत जाण्याचा निश्चय–रागरंग. |
| ९६–९९. | भाऊंची हिंदुस्थानांत मोहीम–होळकराचीं पत्रें–त्यांची हेटाळणी. |
| १००–०१ | मुचकुंदतीर्थ–शिंदे होळकर भाऊंस भेटतात. |
| १०२–०३. | दिल्ली हस्तगत–जाट येतो–बादशाही छताचा विध्वंस. |
| १०४–०६. | सुरजमल्लजाट नाखूष होऊन फुटून जातो. |
| १०७. | कुंजपुऱ्यावर हल्ला–फत्ते–कुतुबशाहाचा पाडाव. |
| १०८–१०. | कुतुबशाहाचा शिरच्छेद–दुराणी यमुना उतरतो. |
| १११–१२. | मराठे दिल्लीकडे परततात–बातमीस्वारांची दुर्दशा–पाणिपतावर तळ. |
| ११३–१४. | विश्वासरायाचें नानांस पत्र–दुराणीचा गोविंद पंतावर हल्ला–त्याचा शिरच्छेद. |
| ११५. | पैशाची व अन्नाची टंचाई. |
| ११६–१७. | मराठी खजीना दुराणीच्या हातीं पडतो–शिंदे व मेहेंदळे यांचा कलह. |
| ११८–१९. | शिंद्यांचें दुराणीशीं युद्ध–शिंद्यांचा जय. |
| १२०–२२. | बुंदेल्यांचें शीर–मेहेंदळ्यांचा दुराणीवर हल्ला. |
| १२२–२३. | मेहेंदळे पडतात–खंडेराव निंबाळकर–लक्ष्मीबाई सती. |
| १२४–२५. | मराठे सरदारांची सभा–गोल बांधून परत दिल्लीस जाण्याचा बेत–इभ्राहिमखान गारदी यास वचन–पौष शु॥ ८ शके १६८२. |
| १२५–३७. | पानिपत येथील घोर संग्राम–तारीख १४ जानुवारी सन १७६१ इसवी. |
| १२६. | मराठी सेनेचा व्यूह. |
| १२७. | दुराणीची तयारी व सल्ला करण्याचें बोलणें. |
| १२८–२९. | विश्वासरायाचें पतन–भाऊंची उठावणी–दुराणीचा पळ–विंचूरकर यांचे गिलचे व त्यांचा गोंधळ. |
| १३०. | पार्वतीबाईचा शोक. |
| १३१. | इभ्राहिमखानाचा पराक्रम. पवार यांचें मुंड–मोचन. |
| १३२–३४. | इभ्राहिमखान जखमी–पाडाव–भाऊंचें धैर्य व पराक्रम. |

| परिच्छेद (कलम) | विषय. |
|---|---|
| १३४. | तुकोजी शिंदे यांचा उपदेश-भाऊंचें निदानचें उत्तर-भाऊंचें अतिरथित्व. |
| १३५. | मल्हारराव होळकर लढाईतून निघतात. |
| १३६-४१. | पार्वतीबाईंची अवस्था-मराठ्यांचा पळ-कत्तल-पराभव कां झाला ! |
| १४२-४४. | पळ-कत्तल-जानू भिंताड्या-पळ दिल्लीस. |
| १४५-४७. | पळ दिल्लीस-नारोशंकरांची धांदल-जाटाचे उपकार-इब्राहिमखानाचा शेवट. |
| १४८-४९. | नानासाहेब नर्मदा पार होतात-पराभवाचें वर्तमान-नानासाहेबांचा शोक-शेवट. |
| १५०-५२. | नाना व भाऊ यांचा भाऊपणा-माधवरावांस वस्त्रें-बोवा मूळपदावर येतात. ग्रंथ समाप्ती. |

२. नकाशे.

१. लघुकोश.

# भाऊसाहेबांची बखर.

## श्रीगजानन.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री व्यंकापा नाईक दिंडोरे*
कसबा वेळापूर स्वामींचे सेवेशीं:—

पोष्य कृष्णाजी शामराव मुक्काम दिली इंद्रप्रहस्थ. कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना ऐसी जे. स्वामींनीं कृपा करून पत्र पाठविलें तेथ आज्ञा केली कीं, हिंदुस्थानांतील आद्यंत वर्तमान, प्याद्याचा फर्जी नजीबखान रोहिला होऊन दक्षिण देशीं हिंदुपद श्री राजा शाहू छत्रपती यांचा मुख्य प्रधान आदि करून सवा लक्ष फौजेनिशीं भाऊंगर्दी होऊन प्यादेमात कशी झाली, हें सविस्तर ल्याहावें म्हणोन आज्ञा. ऐशियास, महाराज [ यांनीं ] राजश्री

---

* हे पंढरपूरचे बडे सावकार. बखर लिहिणारा कृष्णाजी हा त्यांचा दिल्ली येथील गुमास्ता, असें कृ० वि० आचार्य यांचें म्हणणें आहे. 'दिलनूरकर' व 'वालापूर' असें एका प्रतींत दिसतें. तुंगार प्रतींत गणेशपंत यांस चिंतामण गोविंद हा दिल्लीं 'इंद्रप्रहस्था' हूनच लिहितो. हे इसम कोण होते तें समजत नाहीं.

१. प्यादा फर्जी ( वजीर ), प्यादेमात ह्या शब्दांनीं साधलेला अलंकार बुद्बिळें खेळणारांस सहज समजेल.

२. नजीब उद्धवला हा एक रोहिला सरदार होता. तो 'प्याद्याचा फर्जी' कसा झाला हें पुढें स्पष्ट होईलच. हा इ० स० १७७० चे सुमारास मृत्यू पावला. सन इ.१७५४।५५ पासून तों १७७० पर्यंत तो दिल्लीच्या दरबारीं प्रमुख उमरावांत मोडत असे.

रोहिले लोकांची उत्पत्ती अशी. एका अफगाणानें एका अहीर जातीच्या मुलास दत्तक घेऊन त्याचें नांव अली महंमदखान रोहिला असें ठेविलें. हा अली महंमदखान रोहिला पुढें मुरादाबाद येथील अधिकाऱ्याचे नौकरीस अफगाणस्वारांचें पथक घेऊन राहिला. नंतर त्यानें जास्ती सरकार दस्त देण्याचा बहाणा करून बराच मुलूख आपणाकडे घेतला. पुढें महंमदशाहाच्या कारकीर्दींत त्यानें बंड करून पातशाही फौजेस दाद न देतां तो मुलूख बळकाविला व त्या मुलुखाच्या जहागिरीच्या सनदा पातशाहापासून मिळविल्या (१७७१). ह्या अली महंमद रोहिल्यावरून त्याच्या हाताखालच्या अफगाण लोकांस 'रोहिले' हें नांव पडलें. ह्यांचा मुलूख रोहिलखंड, भागीरथी व रामगंगा ह्यांमधील प्रदेशांत मोडतो.

३. 'भाऊंशीं गर्दी' किंवा 'भाऊंशीं गर्द' असें कांहीं प्रतींत आहे.

बाळाजी पंडित प्रधान यांचे मस्तकीं हात ठेविला, कीं, “तुम्हीं माझें पश्चात स्वधर्मन्यायें समुद्रवलयांकित पृथ्वी आक्रमून प्रतापें राज्य चालवावें.” म्हणोन शिक्केकटार दिली.

२. सत्पुरुषाचे आशीर्वादेंकरून दिवसेंदिवस बिजेच्या चंद्राप्रमाणें चढते कळें राज्य करीत असतां, पुढें विनाशकाळें येणार भवितव्य आलें. तेव्हां वानरी तेलाचा[४] जैसा प्रकार तैसा प्रकार घडला. गृहकलह लागण्यास कारण जाहालें कीं, राजश्री रघुनाथराव दादासाहेब, प्रथम स्वारी,[५] हिंदुस्थानाचे मोहिमेस पाठविले. त्यांसमागमें राजश्री मल्हारराव होळकर व जयाजी शिंदे व विठ्ठल शिवदेव व अंताजी माणकेश्वर व गोविंदपंत बुंदेले व यशवंतराव पवार वगैरे मोठमोठे उमराव, लहान थोर सरदार, पाऊण लक्ष फौजेनिशीं हिंदुस्थानांत रवाना केले. ते मजल दर मजल निघोन नर्मदापार जाहाले. माळवे व सोंदे-वाडा व खेचीवाडा, बुंदी, कोट व राजगड व पाटण व उदेपूर व जैनगर व नरवार व ग्वालेरी व झांशी व कालपी अशा खंडण्या घेत ढवळपूरचे माथां चमेलीपार जाहाले. तों पुढें सुरजमल्ल जाटांचा[६] मुलूख लागला. ते समयीं सुरज-

४. वानरी तेलाचा प्रकार. वानरी तेल=सत्यानास, फडशा, ह्या अर्थी.

५. इ० स० १७५३ सालीं.

६. जाटलोक मुलतान प्रांतांतून दिल्ली-कडील मुलखांत आले व तेथें वसाहत करून राहिले. त्यांचा धंदा शेतकीचा होता. पुढें औरंगजेब पातशाहा मृत्यू पावल्या-नंतर त्याच्या मुलांमध्यें आपआसांत लढाई सुरू झाली, त्या संधींत जाट लोकांनीं आपला मुख्य जो चूडामणी त्याच्या सल्ल्यानें आपल्या गांवांस किल्ले बांधिले व लुटालूट करून आपल्यास ‘कजाक’ असें नांव पाडून घेतलें. पुढें दिल्लीचे कार-भारी सय्यद यांच्या आज्ञेवरून जयपूरचा सवाई जयसिंग याणें त्यांजवर हल्ला केला. परंतु जाटांनीं मोठा नेट धरून आपल्या किल्ल्यांत आपला मोठ्या कुशलतेनें बचाव केला व जयसिंगाचें कांहीं चालूं दिलें नाहीं. पुढें चूडामणीचा भाऊ बदनसिंग हा आपणांस चूडामणीनें कैदेंत ठेविलें होतें या त्वेषानें जयसिंगास सामील झाला आणि पुन्हां लढाई जाटांशीं करावी म्हणून जयसिंगाचें मन त्यानें वळविलें. या वेळीं चूडामणी व त्याचा मुलगा यांस पळून आपला बचाव करावा लागला. पुढें जय-सिंगानें डीग मुक्कामीं बदनसिंगास राज्या-भिषेक केला. बदनसिंगास मुलें पुष्कळ होतीं. पैकीं वडील सुरजमल्ल यास त्याणें आपलें राज्य दिलें. पुढें १७६४ मध्यें सुरजमल्लानें दिल्लीपर्यंत स्वारी केली. तेव्हां एके दिवशीं शिकारीस गेला असतां तो बलूची घोडेस्वारांच्या टोळीच्या दृष्टीस पडला. ह्या स्वारांनीं त्यास तेथें मारिलें. कर्नल टॉड, राजस्थान

मल्ल जाट याजकडील वकील रूपराम *कटारी येऊन राजश्री रघुनाथराव दादासाहेब यांसि भेटले आणि खंडणीचा मजकूर बोलूं लागले. तों दादासाहेब यांची दृष्टी थोर जाहाली. जिवामाफक खंडणी घेईनात. क्रोड रुपये एक खंडणी मागों लागले. वकील याचें बोलणें निदान चाळीस लक्ष रुपयेपर्यंत जाहालें. तें दादासाहेब यांणीं न ऐकतां कूच करून कुंभेरीचे७ रोखें चालिले.

३. मग रूपराम *कटारी याणें सुरजमल्ल जाट यास वर्तमान येऊन सांगितलें कीं, "पेशवे ऐकत नाहींत; एक क्रोड रुपये खंडणी मागतात." तेव्हां सुरजमल्ल जाट तोही द्रव्यबळें, फौजबळें, चांगला सामर्थ्यवान होता. वरकड किल्ले भरतपूर व डीग व रामगड केवळ दुर्ग असाध्य, यांचा बंदोबस्त करून आपण खांसा कुंभेरींत बळ बांधोन राहिला. आणि राजश्री दादासाहेब यांस उत्तर‡ सांगोन पाठविलें कीं, "चाळीस लक्ष रुपये देतों ते घेण्यांत यावे. नाहीं तरि युद्धास उभें राहावें." म्हणोन पांच गोळे व दारू पाठविली.

४. त्या समयीं राजश्री रघुनाथदादा यांस विषाद येऊन कुंभेरीचे मोर्चे लाविले. तमाम जिकडील तिकडे मोर्चेबंदी वांटून दिली. मोर्चे काईम जाहाले. परस्परें तोफा व हस्तनाला व सुतरनाला व जेजाला [यांचे व] बंदुकीचे व बाणांचे मार होऊं लागले. असें करितां आठ पंधरा दिवस झाले. यांनीं§ तों आपले भरावर गेले. तों दुर्ग असाध्य, सलाबंत. मोर्चे चालवून सुरुंग लावावे तरि रान रेतीचें. सुरुंगास यत्न नाहीं. तोफ नीच धरली तर गोळा रेतींत जातो. वर धरली तरि गोळा कुंभेरीचे पार होऊन यांजकडीलच दुसरे मोर्च्यां-

---

*'चौधरी' असें धोपेश्वर प्रतींत आहे. परंतु इतर प्रतींत 'कटारी' असेंच सर्वत्र लिहिलें आहे.

७. 'कुंभारी' सांगली प्रत.

‡'उत्तर' येथून पुणें प्रतीच्या तिसऱ्या बंदास आरंभ. पहिले २ बंद गाहाळ.

८. कुंभेरी भरतपूरच्या वायव्येस आहे. ह्या कुंभेरीच्या वेढ्याबद्दल इंग्रजी ग्रंथांत कोठें फारसें लिहिलेलें आढळत नाहीं. जाटांच्या प्रसिद्ध किल्ल्यांचीं नांवें दिलीं आहेत त्यांत कुंभेरीचें नांवही कोठें आढळत नाहीं. 'कुंभारी' असें सांगली प्रतींत सर्वत्र आहे."भरतपुरास मराठे ग्याजुउद्दीन यांनीं १७५४ सालीं वेढा घातला. पण सुरजमल्ल याणें या किल्ल्याचा बंदोबस्त मोठ्या चतुराईनें ठेवून त्यांस दाद दिली नाहीं. शेवटीं फार जेरीस आल्यावर त्यानें ७ लक्ष रुपये देऊं करून मराठ्यांशीं सल्ला केला." असें ग्रांटडफ म्हणतात. या वेळीं मराठे सरदार शिंदे व होळकर हेच फक्त होते असेंही त्यांचें म्हणणें आहे.

§ 'यांनीं' असा पुणें व तुंगार प्रतींचा पाठ आहे तेथें 'दादासाहेब' असें असतें तर बरें झालें असतें.

९. सलाबत=सलामत=सुरक्षित.

तील मनुष्यें जायां होतात. असें संकट प्राप्त जाहालें. मोहोरा इरेस पडलीं[10]. आंतून कोणी सल्लयास येईनात. असा समग्र दीड महिना जाहाला.

५. तों एके दिवशीं राजश्री मल्हारराव होळकर यांचा पुत्र, खंडेराव होळकर, केवळ बेहोष* होता; त्याची आयुष्यमर्यादा सरली. म्हणोन त्यास मुंगीस पक्ष फुटतात तैसा प्रकार जाहाला. भोजन करून मोर्चियांत निशाणापाशीं आला. तों एकाएकींच प्रळय-वीज पडते तैसें होऊन, जेजालेची गोळी अकस्मात लागून मोर्च्यांत ठार जाहाला. शुभ्रवर्ण चक्षू होऊन गतप्राण जाहाला. हें वर्तमान मल्हारराव यास कळतांच घाबरा जाहाला. त्यास पुत्र तेवढाच, केवळ पढियंतों[11] होता. त्याची गती अशी जाहाली हें जाणोन मल्हारराव यास असें जाहालें कीं, पर्वत मस्तकीं कोसळतो किंवा अंगावर विद्युल्लता पडते तैसे होऊन देहभान विसरला. तेव्हां राजश्री रघुनाथराव व आणखी लहान थोर सरदार येऊन, ब्रह्मज्ञान व कांहीं हिमतीच्या गोष्टी सांगोन, क्षणभर शांत करून, मोर्च्यांतून शव आणून त्यास यथाविधी दहन सार्थक केलें. तेरा दिवस उत्तरकार्य होऊन दानधर्महीं चांगला जाहाला. पुत्र-शोकाचा विषाद मल्हारराव यास येऊन प्रतिज्ञा करितां जाहाला कीं, "सुरजमल्ल याचा शिरच्छेद करीन व कुंभेरीची माती यमुनेंत टाकीन, तरि जन्मास आल्याचें सार्थक. नाहीं तर प्राणत्याग करीन." म्हणून दातानें ओठ चावून दुराग्रहास प्रवर्तला.

६. हें वर्तमान वकील याणें सुरजमल्ल जाट यास श्रुत केलें कीं, "मल्हारराव याचा एकुलता एक पुत्र होता तो निधन पावला. त्या विषादेंकरून शपतपूर्वक प्रतिज्ञा केली कीं, जाटाचा वंश निर्मूळ करीन, कुंभेरी खाणून यमुनेंत टाकीन. तरिच बापाचे पोटीं जन्म घेतला." असें वकिलाचे मुखें वर्तमान ऐकतांच त्यासही मल्हारराव याची मर्जी[12] ठावकीच होती कीं, "मल्हारराव जें बोलेल तें करील, यांत संदेह नाहीं." [जाटानें विचार केला] "तीन महिने जाहाले. लढाई होतच आहे. आतां आम्हांस हिंदुस्थानांत आश्रय कोणाचा नाहीं. आम्हीं कोणाचे बळावर हिंमत बांधावी ? आतां गनीम[13] मागतील ते

---

१०. इरेस पडणें=अभिमानीं गुंतणें, अबरूखातर कोणतेंही एक कृत्य नेटानें करणें.

*. बे-होष=वेडसर, बे=अकल.

११. पढियंता=(प्रेयांस्) प्रिय, लाडका.

१२. मर्जी=स्वभाव.

१३. गनीम=राजाचा शत्रू. सर्व लोकांचा शत्रू. मराठे लोकांस हिंदुस्थानीं सर्व प्रांतींचे लोक 'गनीम' म्हणूं लागले होते, यावरून तेथें त्यांचा दरारा किती बसला होता हें ध्यानांत येईल. दुसऱ्या प्रांतांतील लोक त्यांस गनीम म्हणोत पण स्वतः मराठे लोकही आपणास 'गनीम' हें नांव घेण्यांत प्रतिष्ठा मानीत, असें पुढील मजकुरावरून कळून येईल.

रुपये द्यावे किंवा बायका मुलें यांची शाकां[१४] करून चालून घेऊन मरावें. याचा मजकूर[१५] काय करावा ? गांवांतील सरंजाम दाणा, तूप व मीठ व तंबाकू व दारूगोळी सरली, यास यत्न काय करावा ?" म्हणोन लहान थोर सरदार व रूपराम कटारी[१६] बाहेरील [बोलाविले] व राणीवसांतील हणसया[१७] म्हणोन त्याची ज्येष्ठ स्त्री परम चतुर व सुशील होती. रूपराम व ती स्त्री एकत्र होऊन मनसुबा केला कीं, "गोष्ट तो साधेना, मसलत सुचेना, प्राणांताचा समय गुदरला." असें म्हणतांच हणसया हिणें जाबसाल केला कीं, "यास यत्न एक आहे. दुसरी यत्नास दृष्ट पोंचत नाहीं. राजश्री जयाजी शिंदे यांचा आणि तुमचा स्नेह आहे. तेही सत्क्रियावान एकवचनी आहेत. त्यांस साध्य केलियास तुमचा तरणोपाय आहे. नाहीं तरि दुसरा विचार मनसबियांत येत नाहीं."

७. हें ऐकून मसलत सर्वांचे ध्यानांत[१८] आली. हाच निश्चय करून रूपराम कटारी याचा पुत्र तेजीराम याजसमागमें पत्र व सुरजमल्ल याचे शीरची पगडी असे रात्रौ [ पाठविला तो ] राजश्री जयाजी शिंदे यांचे डेरियास येऊन, केवळ आजिज[१९] होऊन बोलला कीं, "आजचे समयीं तुम्ही वडील बंधू आणि मी धाकटा बंधू आहें. कळेल त्या रीतीनें बचाव करावा." म्हणोन वकिलानें समागमें जाटाचे शीरची पगडी आणिली होती ती शिंदे यांचे डोकीस घातली आणि त्यांची पगडी आपणापाशीं घेतली. उत्तर केलें कीं, "बहादरकी शरम पार पींडावे."[२०] असें ऐकून जयाजी शिंदे यांसि निर्वाण समय भासला आणि चित्तांत विचार केला कीं, "याचा पक्ष धरावा तरि स्वामिद्रोह पदरीं पडतो आणि न धरावा तर मित्रद्रोह पडतो. एकीकडून आड व एकीकडून विहीर; दुतर्फा मरण सारखें. हिंदुस्थानांतील स्वधर्म कीं, पगडीभाई जाहाल्यावर पोटचें द्यावें पण पाठीचें देऊं नये; त्यास रक्षावें. इकडून ऐसा प्रकार. आणि हाच पक्ष धरावा

---

१४. 'पुणें' प्रतीचा पाठ 'यांची शंका करून' असा आहे. 'शाका करणें' =जिवें मारणें, तुकडे करणें. 'यांचा त्याग करून' पाठांतर.

१५. मजकूर=तजवीज, बेत, विचार.

१६. हा कटारी 'कोठारी' तर नव्हे! सर्व प्रतींत 'कटारी' किंवा 'कठारी' असें आहे.

१७. हणसया=अनसया. मारवाडी व जाट लोकांत 'अ' वगैरे स्वरांचा उच्चार नीट करतां येत नाहीं. 'अ' च्या ठिकाणीं 'ह' व 'आ' च्या ठिकाणीं 'हा' असे उच्चार करतात. हाप्पा=आप्पा.

१८. ध्यानांत आली=पसंत पडली.

१९. आजिज, आजिद=दीन, लाचार.

२०. शूराची अबरू राखावी. 'आम्हांस जीवदान दिलें पाहिजे' सां० प्रत.

तरि सेवाचोर [ होतों. ] दोनीही संकटें." यांतून सबळ निर्बळ पक्ष कोणता म्हणोन चौघे मातबर जिव्हाळियाचे मुत्सद्दी होते त्यास विचारणा केली. चौघांनीं सबळ निर्बळ पक्ष जाणोन, "शरण आलियाचा अंगीकार करावा, शरण येईल त्यास मरण चिंतूं नये, ऐसें धर्मशास्त्रीं वाक्य प्रमाण सबळपक्षीं होतच आहे," असें सांगितलें. हें ऐकून पुढील होणार भवितव्य. गृहकलह–मधाचें बोट–लागावयास कारण हेंच जाहालें. जयाजी शिंदे केवळ साभिमानी, हाच अंगीकार करून आपली पगडी व बेलभंडार व अभयपत्र अंतस्थें[२१] पाठविलें. सुरजमल्ल जाट यास याप्रमाणें वर्तमान कळतांच पुनर्जन्म [जाहाला] असें भासलें. दुप्पट हिंमत चढली.

८. हें वर्तमान कानोपकानीं मल्हारराव यांणीं ऐकून, परम विषाद येऊन रघुनाथराव दादा यांस एकांतीं सुचविलें कीं, "आमचे अस्तनींतच[२२] अग्न आणि जाट हस्तगत कैसा होतो ? जाट व शिंदे पगडीभाई जाहाले. आतां जाट साध्य कैसा होतो ?" म्हणोन चिढावून[२३] आपले डेरियास गेले. रघुनाथराव आणि सखारामबापू यांणीं मसलत केली कीं, "शिंदे केवळ एकनिष्ठ भीम, अर्जुन नानासाहेबीं ध्यानास आणिले, ऐसें असतां त्याजकडून हा प्रसंग घडला. यास उपाय काय करावा ? यास मसलत कोणती ?" सखारामबापू केवळ निधडे[२४] मनसबेबाज यांणीं उत्तर केलें, "शिंदे यांजकडून अशी गोष्ट घडावयाची नाहीं. घडली असालियास साहेबाचें अनहित करणार नाहींत. ही खातरजमा असों द्यावी. मल्हारराव यांणीं पुत्राच्या कटाक्षें हे अदावळ[२५] घातली आहे. परंतु शरिराचे[२६] दोन्ही हात आहेत, यांतील कोणता तोडावा ? आतां उभयतांचें एकीकडे ठेवून शिंदे यांचे हातून कळेल तैसा सल्ला करून घ्यावा. याशिवाय दुसरा अर्थ नाहीं." म्हणोन तोच मनसबा निश्चयांत आणिला.

९. तों सुराजमल्ल जाट यास दम पुरेनासा जाहाला. जयाजी शिंदे यांसि सांगोन पाठविलें कीं, "अजुनी निर्वाण कोठवर पाहाल ? सल्ला करणें अथवा हल्ला करून मारून टाकणें." ऐसें उत्तर येतांच जयाजी शिंदे यांणीं आपले

---

२१. 'जाटास' सां० प्रत.

२२, 'खिशांतच' सां० प्रत.

२३. 'चढावून' पाठांतर.

२४. निधडे=पुरे, समर्थ.

२५. अदावळ=खोटा आरोप. 'अदावत घेतली' पाठभेद.

२६. 'होळकर व शिंदे हे शरिराचे' सां० प्रत.

कारभारी बोलावून मनसबा केला कीं, "जाट तो जेरीस आला. आतां या निमित्तें खावंदाची बेमर्जी जाहाली तरी पुरवली; परंतु जाबसाल करितां उत्तम आहे." म्हणोन सिद्ध होऊन कचेरीस गेले. राजश्री दादासाहेब यांसि जाबसाल केला कीं, "दादासाहेब, आम्ही धनियाचे बारगीर; निमकहराम नहों. ऐसें असतां आम्ही जो जाबसाल सांगतों तो खावंदाचे मर्जीस येत नाहीं. आजिचे समयीं जाटापाशीं खंडणी घेऊन पुढें मसलत फत्ते करावी. एक जागां राहिल्यास पदरीं फौज *भारी. निभावणी होणें कठीण." असें बोलिल्यावरि राजश्री दादासाहेब यांसि परम संकट प्राप्त जाहालें. सल्ला करावा तरि मल्हारराव हातचा जातो, सल्ला न करावा तरि मसलतीस धक्का बसतो. यास यत्न काय करावा? जयाजी शिंदे यांस उत्तर केलें कीं, "प्रस्तुत तुम्हीं डेरियास जावें. याचा निश्चय करून तुम्हांस काय तो मनसबा सांगोन पाठवितों." म्हणोन डेरियास लावून दिले. मोठे संकटीं पडले. मोर्चियांतून दाणा, दारूगोळी आंत प्रविष्ट होऊं लागली.

१०. असे थोडे दिवस गुदरले तों मारवाड प्रांतीं अबेसिंग व ढोंकळसिंग हाडे दोघे भाऊ होते. वडील भाऊ अबेसिंग याचा पुत्र रामसिंग. व ढोंकळसिंग याचा पुत्र बिजेसिंग, असे दोघे. त्यांत वडील रामसिंग केवळ अमली, बेहाष

---

२७. जाबसाल=बोलणें, उत्तर, विनंती.

२८. बारगीर=यजमानानें दिलेल्या घोड्यावर बसणारा घोडेस्वार ( शिलेदार याच्या उलट )

२९. पुढें मसलत इ०=दुसऱ्या मुलखांतील खंडण्या घेणें त्या घ्याव्या.

*'फौजभारी' येथून कल्याण प्रत उपलब्ध जाहाली आहे.

३०. मारवाडचा राजा अजितसिंग यास अभयसिंग व बख्तसिंग असे दोन पुत्र.पैकीं अभयसिंग हा जोधपूरच्या गादीवर १७२५ सालीं बसला व त्याणें १७५० पर्यंत राज्य केलें. ज्याणें पिलाजी गायकवाड यास मारेकरी घालून १७३२ मध्यें मारिलें तो हाच. ह्याच्या मरणानंतर त्याचा मुलगा रामसिंग हा गादीवर बसावयाचा, पण त्याच्या दुर्वर्तनामुळें त्याचा चुलता जो बख्तसिंग यास गादी मिळाली व रामसिंगास आपले दिवस जयपूर येथें काढावे लागले. पुढें बख्तसिंग यास अजमिराजवळ विषप्रयोग होऊन तो १७५३ सालीं मरण पावला. तेव्हां ती संधी चांगली आहे असें पाहून, आपल्या चुलत्याचा मुलगा जो बिजेसिंग त्याजपासून, राज्य आपण परत हिसकावून घ्यावें असा बेत रामसिंग यानें केला.

कर्नल टॉड म्हणतात ढोंकळ (=नाशकर्ता, संहारकर्ता.) हें नांव अभयसिंगास मोंगलांनीं त्याच्या विलक्षण पराक्रमावरून व इभ्रतीवरून दिलें होतें. 'ढोकळसिंग' बद्दल 'बख्तसिंग' असें असावें कारण अभयसिंगाचेंच नांव ढोकळसिंग असें होतें.

ऐसें जाणोन बिजेसिंग यानें राज्यलोभें त्यास धुडावून[३१] अगदीं संस्थानें नागूर व भिकानेर व मेडतें व झालूर[३२] अशीं भारी संस्थानें हस्तगत केलीं. रामसिंग यास एक अजमेर मात्र राहावयास स्थल होतें. त्यासही [कोणत्या तरी] निमित्तें उपद्रव नित्य, असें जाणोन त्याजकडील चेतराम[३३] वकील होता त्यास बोलावून विचार केला कीं, "आतां वैरियानें अगदीं राज्यमदें लोभास गुंतोन आम्हांस निर्माल्यवत ठेविलें. असें जगावें याहून प्राणत्याग अथवा देशत्याग करावा, हें उत्तम. दोहींतून एक अर्थ करावा." तेव्हां चेतराम यानें उत्तर केलें कीं, "महाराजांची[३४] हांडी उतरावी, आणि आपली हांडी चढवावी. प्राणत्याग स्त्रीजातीनें करावा आणि देशत्याग ब्राह्मण संन्यासी यांनीं करावा. तुम्ही संस्थानीं राजपुत्र, त्यांत हटेले हाडे[३५] रजपूत. 'हिंमद मर्दां मदत खुदा;' मारतां मारतां मरावें. परंतु केवळ आजिज होऊं नये. तुम्हांस मसलत करणें तरि मसलत एक मात्र आहे. दक्षण देशांतील गनिमांची प्रबलता जाहाली आहे. त्यास निमें राज्य द्यावें आणि आपलें [कार्य] साध्य[३६] करून घ्यावें. त्यास प्रस्तूत गनिमाची फौज कुंभेरीस लागली आहे. होळकरांचे हातून कार्य करून घ्यावें तरि ते बिजेसिंगाचे स्नेही होत. आतां नेकजात[३७] एक जयाजी शिंदे मात्र आहेत. त्यांस पगडीभाई करून त्यांचे हातोन कार्य करोन घ्यावें." म्हणोन मनसबा खचीत करून, इमान प्रमाण, बेलभंडार, व शिरींची पगडी चेतराम याजसमागमें जयाजी शिंदे यांजकडे पाठविली[३८]. तो कुंभेरीस येऊन, शिंदे यांस भेटून

---

३१. 'बुडवन' कल्याण प्रत.

३२. 'जासूर' क० प्रत.

३३. 'चैतराम' 'चोतराम' पाठांतरें.

३४. हांडी उतरावी इ०=त्याचें एकीकडे ठेवून आपलें कार्य साधून घ्यावें. 'आपली हांडी ताजी करावी' पाठांतर. 'महाराची' असें कांहीं प्रतींत आहे पण तो हस्तदोष दिसतो.

३५. 'हाडाचे' पाठांतर.

३६. 'आपलें साह्य' पाठांतर.

३७. नेकजात=प्रतिज्ञा पाळणारा, सत्यसंध.

३८. ज्या वेळीं रामसिंग जयपुरास पळून गेला (१७५०) त्यावेळीं त्याचा उपाध्या जगु हा बख्तसिंगाच्या आदरसत्कारास न जुमानतां आपला धनी जो रामसिंग याजबरोबर गेला. पुढें ह्यासच उज्जनी येथें मराठ्यांशीं सल्ला करण्यास पाठविलें. त्याणें जाऊन महादजी पाटील यांस आणिलें. पण बख्तसिंगाचा जोर पाहून महादजी त्या वेळीं परत गेले. क० टॉड.

तेव्हांपासून १०५३ पयत रामसिंगाचें सूत शिंयाकडे होतेंच असें दिसतें. ह्या वर्षी आपला चुलता मेला असें पाहून रामसिंगानें मराठ्यांस कोटयाहून आणिलें व जयपूरकर माधवसिंग यांच्याशींही तह केला.

येथील कच्चा पक्का वृत्तांत सर्व निवेदन केला. आणि राजियाचे डोईची पगडी जयाजी शिंदे यांचे डोईस घातली आणि त्यांची पगडी आपणापाशीं घेतली. ‡ खुरनीस करून जाबसाल केला कीं, "आम्ही रोड दुर्बळ, म्हणोन तुम्हांस शरण आलों. आतां मान-अभिमानाचे धनी तुम्ही आहां." म्हणोन उत्तर केलें.

११. तों जयाजी शिंदे यांनीं आधींच असाध्य[३९] अंगीकार केला [होता] त्यांत हें बोलणें दुसरें आलें. फार उत्तम आहे म्हणून तेच समयीं राजश्री रघुनाथराव दादा यांचे कचेरीस जाऊन उत्तर केलें कीं, "तुम्ही थोर खावंद आहां. आपण या स्थळीं राहून जाटाचें पारिपत्य करावें. आम्हांस आज्ञा द्यावी. आम्ही मारवाड प्रांतीं जाऊन मसलत फत्ते करितों. सर्वांनीं एक जागां राहून मसलत बुडवावी हें ठीक नाहीं. पदरीं फौज भारी, यांस काय द्यावें? धणियांनीं खुषी-रंजावंदीनें[४०] निरोप दिला तर उत्तम आहे; नाहीं तर आपणास साफ राहतां पुरवत नाहीं." म्हणोन डेरियास येऊन फत्ते-नगारचीस आज्ञा केली कीं, "कुचाची नौबद सुरू करणें." म्हणतांच नगारचीनें नगारा केला. तमाम मोर्चे उठवून गोटांत आणिले. हें वर्तमान ऐकून राजश्री रघुनाथराव दादा यांनीं राजश्री मल्हारराव यांस बोलावून सांगितलें कीं, "शिंदे तो कूच करून चालिले. तुम्ही वडील आहां. आम्हांस मनसबा कोणता देतां?" हें ऐकतांच मल्हाराव याचे तळव्याची आग मस्तकास जाऊन क्षणभर दंग जाला. चित्तांत पुरता विचार केला कीं, केवळ आपणच दुराग्रह करावा, तरि अवधी नामोहरमी[४१] आपणाकडे येईल. तत्रापी न ऐकावें तरि 'इदंच नास्ति परं न लभ्यते' दोहींसही नाडावें यांत रीत राहात नाहीं. अस्तु जाट कोठें जात नाहीं. आजिचे समयीं कालहरण[४२] करितां उत्तम आहे." म्हणोन मनसबा योजून दादा-साहेब यांस उत्तर केलें कीं, "तुम्ही खावंद आहां ज्यांत धन्याची मर्जी राजी त्यास आम्ही राजी." असें म्हणतांच पडल्या फळाची आज्ञा घेऊन[४३] जयाजी शिंदे यांचे डेरियास आले. त्यांचें समाधान करून, त्यांस राहाऊन घेऊन त्यांचे

---

‡ खुरनीस, कुरनीस = कोरनिशात= लवून, नम्रपणें केलेला सलाम, रामराम.

३९. 'शिंदे यांस आधींच असाह्य होते.' तुं० प्रत. 'शिंदे यांस आधींच असाध्य अंगीकार केला आणि ' पु० प्रत.

४०. रजावंदीनें, रजामंदीनें=मर्जीनें.

४१. नामोहरमी=पराभव, अपेश.

४२. कालहरण=वेळ काढणें.

४३. 'होऊन' धो० प्रत.

होतानें जाटाचा सल्ला करून, साठ लक्ष रुपये खंडणी घेऊन राजश्री रघुनाथ-राव देशास आले. मल्हारराव माळवे प्रांतीं इंदुरास येऊन छावणीस राहिले[४४] शिंदे यांणीं कूच करून दरकूच मारवाड प्रांतावर चाल[४५] केली.

१२. हें वर्तमान बिजेसिंग यानें ऐकून, आपली फौज जमा करून नागूर सोडून चार कोस येऊन राहिला. समागमें पंधरा हजार फौज व दाहा हजार पायदळ व पन्नास तोफा व पंचवीस गंजिफियांच्या[४६] गाड्या व शंभर उंट बाणांच्या केंच्या, पांच सातशें उंटांवर सुतरनाले, व जेजाला, बरकंदाज[असे]युद्धास सिद्ध जाले. ते राठोड रजपूत हाडे, परम हाटेले, त्यांचे ध्यानांत गनिमाची फौज नाहीं[४७]. हें वर्तमान जयाजी शिंदे यांणीं ऐकून तमाम उमराव यांस बोलावून विचार केला कीं, "मारवाडी हाटेले रजपूत महापराक्रमी, शिरच्छेद जाला तरी कबंध नाचतें. त्यांचे मर्दुमकीची शर्थ तो या प्रकारची. त्यांणीं आपले हिमतीनें कंदाहारचा पातशाहा दुराणी गिलचा याची पगडी व घोड्याची दुमची सोडविली ते मर्यादा अजुनी चालते. गिलच्यास पगडी नाहीं व घोड्यास दुमची[४८] नाहीं. आणि त्यांजपाशीं आगही भारी. आम्हांकडील अधींच गनीम यांचे कच्चे दील, गोडहत्यारी निसवले[४९] तरि, झाडास बांधले तरी

---

४४. असा कुंभेरीचे वेढ्याचा इतिहास असतां ग्रांट डफ ह्यांचें म्हणणें पुष्कळ निराळें पडतें. कुंभेरीच्या वेढ्याचें साल १७५४।५५ असें दिलें आहे तेंही बरोबर नाहीं, असें टॉड् यांचा ग्रंथ, ही बखर व मेजर वॉट्सन यांणीं लिहिलेला गुजराथेचा इतिहास हीं ताडून पाहिलीं असतां समजेल. या वेढ्याचें वर्ष १७५३।५४ हें होय.

४५. शिंदे कोट्याहून जयपुरास गेले, तेथें रामसिंग होता. रामसिंग व शिंदे यांजमध्यें झालेल्या तहपत्रास 'हळदी' किंवा 'बलपत्र' असें म्हणतात. ह्या बलपत्रावर ज्या मराठ्या सरदारांनीं सह्या केल्या त्यांचीं नांवें: जनकोजी शिंदे, संताजी बोले, दत्तो पाटील, राणू बोरटे, अंतो जशवंतराव, कान्होजी जाधव, जिवाजी जाधव, जिवाजी पवार, पिलाजी, सटवाजी, मालोजी शिंदे, तात्या चिंतो, रावोजी पाग्या, घोसाळ्या जाधव, मुल्लायार अल्ली, फिरोजखान. क० टॉड्.

४६. गंजिफियाच्या=दारूगोळ्याच्या.

४७. 'त्यांना तृणवत वाटली' सांगली प्रत.

४८. दुमची=खोगीर पडूं नये म्हणून घोड्याच्या शेंपटीखालून बंद घेतात तो. 'लेंडी' सां० प्रत.

हें लिहिणें मारवाडचा राजा एकदां औरंगजेबानें अफगाणिस्थानांत पाठविला होता त्याच्या पराक्रमास उद्देशून असावें.

४९. आम्हांकडील आधींच गनीम यांचे कच्चे दील त्यांत गाड [गो] हात्यारी निटावले तर' इ० तं० प्रत. यांत हस्त-दोषानें 'गा' वर मात्रा देणेची राहिलीं

झाड घेऊन जातील. आणि आम्ही तो प्रतिज्ञापूर्वक राजश्री रघुनाथराव दादा यांजपासोन निघालों आणि जन्मादारभ्य मल्हारराव याचे जुगांतून निघालों एक जागां होतों तेव्हां यशअपेश आलें तरी त्याचा खेद नव्हता. आतां अपेश आलें तरि पुनः त्यास तोंड तरी कसें दाखवावें? प्राणत्याग किंवा देश-त्याग करावा. दोही अर्थांतून एकाचा अंगीकार करावा." हें ऐकून दत्ताजी शिंदे भीम-बहादर व आणखी लहान थोर सरदार यांणीं हिंमत दिली कीं "पुण्यप्रताप श्रीमंत नानासाहेब यांचे पदरीं आहे. आणि तुम्ही एकनिष्ठ सेवा करीत आहां. ईश्वर यश देईल. आम्ही तेथून रामसिंग याचा अंगीकार करून आलों आणि बिजेसिंग युद्धास आला म्हणोन नामोहरम व्हावें तरि ‡जालेपणाचें सार्थक काय? नामर्दुमीची जघन्यता* होईल. युद्ध करावें. यांत यशअपेश शूराचा वांटा. याची क्षिती काय?" युद्ध करावें असा निश्चय ठरला.

१३ [असो.] त्यांस व यांस दाहा कोशांची तफांवत होती. यांणीं स्नानें करून, तमाम एकामेकांस निरवानिरव करून, तमाम अंगांत चिल-खतें व बक्तरें घालून जिरेटोप पेट्या[५२] बांधून, दारूगोळी लोकांस वांटून, तंगबार करून[५३], मुहूर्तें सिद्ध होऊन चालिले. मार्गीं शकूनही चांगले जाले. तेव्हां अधिकच हिंमत येऊं लागली. तीस हजार फौज होती. त्यांची निवड

---

आहे. 'निटावले' याचा अर्थ बरोबर लागत नाहीं. 'गोडे ह यारी' पु० प्रत. 'गाड वक्तसरी निटावले तरी' साताराप्रत. येथेंही 'गा' वरील मात्रा गाळलेली दिसते व 'हात्यारी' बद्दल 'बक्तरी' हें नक्कल करणाऱ्याच्या गैरसमजुतीचें फळ दिसतें. आम्हांकडील 'गोडी फौज' असें सां० प्रत म्हणते. 'गोडया हत्याराचे निसवले' क० प्रत. 'गोडहत्यारी = तल-वार, भाला या शस्त्रांनींच लढणारे, बंदुका, तोफा यांनीं दुरून छपून लढणारे नव्हत. निसवले=कचरले. मागें सरले.

५०. "जन्मांतर ज्या ... जुरतीनें" धो० प्रत. "जन्मांतर ज्या ... जुगतीनें पु० प्रत. वरील तुं० प्रतीचा पाठ आहे. 'मल्हाररावाची व आमची आजपर्यंत जूट होती, आम्ही स्वारी करण्यास एकत्र जात होता, पण आजच एकटे निराळे इकडे ह्या मोहिमेवर आलों' असा भाव. जुरतीनें= इरेनें, ईर्ष्येनें. जूग, (युग्म)=जोडी.

‡जाले-पणाचें = जन्मास आल्याचें.

*जघन्यता=दुर्लौकिक.

५१. 'कोशांचा छाटा होता.' सां० प्रत.

५२. बफतर=लहान लोखंडी कडयांचें चिलखत. जिरे टोप=शिरस्त्राण. पेटी=शिर-स्त्राणापासन तों नाकापर्यंत शरीरभागाच्या संरक्षणार्थ लोहादिकाची पट्टी बांधितात ती.

५३. तंगबार=आंवळून तय्यार.

करून दोन भाग केले. एकीकडे दत्ताजी शिंदे जाले. आणि एकीकडे जयाजी शिंदे जाले. दोन्हीं सैन्यांच्या गांठी पडल्या. बिजेसिंग याणें तमाम आपले फौजेंत ताकीद करून, बमय-सामांन[५४] सिद्ध जाले; भोंवता रिसाला तोफा वगैरे तयार जाले. जोंपर्यंत आंगाशीं आंग लागलें नव्हतें. तों तोफांचे मार व हस्तनाले व सुतरनाले व जेजाला व रेकले व गंजिफियाच्या गाड्या व बरखंदाज अशी एकदांच सरबत्ती जाली. बाणांचा वर्षाव मेघांप्रमाणें[५५] जाला. मोठा कडाखा जाला. धुराची व धुळीची धुंदी[५६] जाली; कोणाचें तोंड कोणाचे दृष्टीस पडेनासें जालें. यंत्रांच्या धडाकियाखालीं घोडे मनुष्यें बधिर जालीं. क्षणभर अशी गर्दी होऊन दोहींकडून हर ! हर ! म्हणोन एकदांच घोडे घातले. दोहींकडून घोडियांचीं तोंडें आंत शिरलीं. ते समयींचा*कडाखा तेथील अनुभविक असतील त्यांस ठाऊक असेल. ऐशी आग जाली. ‡नंतर आगीचा मार राहून तरवारीची खणाखणी ‡जाली. त्यांत ते अधींच रजपूत, त्यांत मारवाडी हाडें; त्यांचें मर्दुमीचें नवल नाहीं. परंतु मराठियांनीं फार शर्थ केली. ऐसें युद्ध गनिमांत कोणीं केलें नाहीं. मल्हारराव यांचे इरेनें दांतानिसकीस येऊन मोठमोठे खेतांत[५८] येऊन जिवाअधिक केली. मोठा प्रळय जाहाला. न भूतो न भविष्यति. पांच सातशें भले, चांगले लोक गनिमाकडील ठार जाले. जखमी घायाळ दोन अडीचशें मनुष्यें जालीं. पांच सातशें घोडींही पडलीं. मारवाडियाकडील दोन अडीच हजार मनुष्य ठार जालीं. तोफा व रिसाला कांहीं पाडाव केला. ऐसा प्रळय जाला. परंतु धन्य ! रजपूताची माय रजपुतासच व्याली ! असें गनिमास होतें तरि धुरोळा दृष्टी पडूं न देते. त्यांत गनीम यांचा उत्कर्ष. चढती सद्दी. नाहीं तरि मारवाडियांस तंबी पोहोंचवावी असें नव्हतें. त्यांतही हाटेले रजपूत, जैसा मोटेचा बैल सरतो तैसे मार खातच खेती[५९] सोडून, आपले मुर्दे संभाळोन, दोन कोस माघारे निघाले. शिंदे यांणीं ती जागा फत्ते करून

---

५४. बमय-सामान=सामानसुद्धां. 'सरंजामसुद्धां' क० प्रत.

५५. 'मेघकाळाप्रमाणें' पु० प्रत. 'मेघवृष्टीप्रमाणें' क० प्रत.

५६. 'झुंजांत एकच गर्दी धुराची होऊन धुंदी झाली' क० प्रत.

*'ते समयींचें लाघव.' घो० व क० प्रती.

‡ ‡येथें "अग्नीचा वर्षाव जाहल्यानंतर उल्हाटयंत्रें बंद होऊन तरवारेची हातघाई चालली" असा क० प्रतीचा पाठ आहे.

५८. खेतांत येणें=रणांत पडणें. दांतनिसकीस येऊन=दांतांवर दांत आवेशानें घासून.

५९. खेती=रण, रणभूमी.

साहाजनें[६०] वाजवीत खेतीवर उभे राहिले. आणि आपले भले लोकांचे मुर्दे जमा करून [त्यांस] अन्न-प्रसाद दिला. घायाळांच्या जखमा बांधोन परम खुशाली केली. तो आनंद पत्रीं लिहून कळवावा तो काय? तेथें असतील ते अनुभविक जाणतील. शिंदे यांस असें जालें कीं, मल्हारराव याजपासून निघालि[६१]यास ईश्वरें अबरू राखिली. जन्माचें सार्थक जालें. म्हणोन रात्रौ तेथें मुकाम केला. रात्रौ भोंवताले छबिन्यास[६२] राऊत उभे केले. मारवाडी यांस वेढावयास[६३] अवसान राहिलें नाहीं. त्यांची फौज शिकस्त जाली. हिंदुस्थानांतील स्वधर्म कीं, फौज मोडली तरि दोन चार गांवें पळावें लागत नाहीं. खेती म्हणजे रण सोडून गोळीची खास्त[६४] निघाले तरि नामोहरम जाले. मारवाडी यांनीं अपजय जाणून रात्रौ नागुरांत पोंचले. [ज्या] मारवाडियांस समोरच जखमा होत्या त्यांच्या स्त्रियांनीं काया कुरवंडी करून जयजयकार केला. ज्यांस पाठीवर जखमा होत्या त्यांच्या स्त्रियांनीं पतींचे त्याग[६५] केले. मारवाड प्रांतीं दस्तूर[६६] हाच कीं सं[६७]मूर घाव घेतला तरि उत्तम, नाहीं तरि पुरुषांचें स्त्रियांनीं मुखावलोकन करूं नये. रजपूत स्त्रियांची हिंमत या रितीची, तेथें पुरुषांची शिफारस कोठवर लि[६८]हावी?

---

६०. साहाजनें=शाहादानें=सैदोन, मोठे नगारे.

६१. निघालियास = निघालों त्या सारखी. 'निघोन आलों त्याप्रमाणें सांगली प्रत.

६२. छबीना= पहारा. राऊत=स्वार.

६३. शिंदे यांना. "रजपूत यांस पुन्हा शिंदे यांजवर चालून जाण्याची उमेद राहिली नाहीं" सांगली व कल्याण प्रती

६४. खास्त=टप्पा.

६५. रजपूत लोकांस स्पार्टन लोकांची उपमा देतात ती किती योग्य आहे हें ह्या त्यांच्या एका 'गनिमाच्या' लिहिण्यावरून स्पष्ट होतें.

६६. दस्तूर=चाल,

६७. 'सन्मुख' क० प्रत.

६८. रजपुतांचे कैवारी जे कर्नल टॉड त्यांचा लेख वरील वर्णनाशीं ताडून पाहावा. ते म्हणतातः—

(अ) पुष्कर सरोवरावर रामसिंग व मराठे यांच्या फौजा उतरल्यावर मरू देशाची गादी खालीं करून देण्याविषयीं बिजेसिंगास त्यांणीं पत्र लिहिलें. तें अर्थात मान्य न होऊन त्याणें युद्धाची सिद्धता केली. पत्र वाचून दाखवितांच सर्व राठोर सरदार रागानें ओरडले "कोण हा 'हाप्पा'? (=आपा शिंदे.) आम्ही त्यास भीत नाहीं, आकाश कोसळून पडूं लागल्यासही आपलीं मस्तकें तें धारण करण्यास पुढें करून आम्ही आपल्या राजास बचावूं!"

१४.अस्तु.राजा शाहूच्या पुण्यप्रतापाचा फलादेश.एक दोन रोज दम खाऊन हुशार होऊन नागुराभंवताले उतरले. शहर थोर. तीस हजार गनीम, आणखी

---

(आ) लढाई मोठी हातघाईची झाली. बिजेसिंगास जयसिद्धी होण्याचा काल येऊन ठेपला व आपाचें धैर्य गळून तो माघाराही परतणार होता; इतक्यांत दोन गोष्टी अकस्मात घडून आल्या. त्यामुळें बिजेसिंगाचे हातीं आलेला जय त्यास मिळाला नाहीं. त्या गोष्टी ह्याः–राठोर लोकांची शिलेपोस केलेली पांच हजारांची तुकडी जय संपादून परत येत असतां ती शत्रूकडील आहे असें समजून त्यांवर बिजेसिंगाच्या लोकांनींच गोळ्यांचा वर्षाव केला. तेणेंकरून ती टोळीच्या टोळी बहुतेक खलास झाली. हा मोठा अपशकुन समजून रजपूत पुनः पुढें पाय टाकीनात. दुसरी गोष्ट अशीः–रूपनगरचा संस्थानी सरदारसिंग हा पदच्युत झाला होता. म्हणून रामसिंगाप्रमाणें तो आपा शिंद्याकडे आला. ह्या लढाईत आपानें त्यास सांगितलें "रामसिंगाप्रमाणें तुझी ही ग्रहदशा प्रतिकूल म्हणून जय येत नाहीं. तर आतां काय करावें !" तेव्हां सरदारसिंगानें हळूच आपला एक माणूस पाठलाग करीत आलेल्या बिजेसिंगाच्या टोळींत पाठविला. तो त्या टोळींत शिरून, आपण त्यांपैकींच एक आहों असें दाखवून टोळीच्या सरदारास म्हणाला "आतां आपण काय म्हणून भांडावें ! तिकडे बिजेसिंग तर गोळी लागून ठार झाला." ही बातमी सर्व लोकांत पसरून तिचे खरेपणाविषयीं शोध न करितां रजपूत पळूं लागले व बिजेसिंगास सर्वेच मागें जावें लागलें.

(इ) बिजेसिंगाकडे दोन लाख लोकांचें प्रभुत्व असतां त्यास एका जाट शेतकऱ्याच्या खटाऱ्यांत बसून पळावें लागलें.

(ई) लालसिंग व रायसिंग हे त्याच्या पडलेल्या सरदारांतील मुख्य होते.

(उ) ह्या युद्धांत रजपुतांनीं जसा पराक्रम केला त्याप्रमाणें दक्षणी लोकांनींही आपली तरवार गाजविली असें भाट लोक वर्णन करितात. त्यांचें एक पद्य असें आहेः–

"याद घणा दिन आवशी, हापा वाला हेल। भागा तीनो भूपती, माल खजाना मेल ॥"

"आप्पाच्या वेळेची लोकांस पुष्कळ दिवस आठवण राहील. त्यावेळीं तीन भूपती आपलें सामानसुमान व जडजवाहीर टाकून पळून गेले." हे तीन भूपती मारवाड, बिकानीर व किशनगड येथील राजे होत. हे सर्व ह्या लढाईत होतेच.

(ऊ) लढाई दोन दिवस झाली. पहिले दिवशीं तोफांनींच लढले, दुसरा दिवसही असाच लढण्यांत गेला. त्या दिवशीं पांच हजारांची टोळी नाहींशी झाल्यावर पुढें काय करावें म्हणून सर्व सरदारांची मसलत बिजेसिंगानें विचारली. त्यांत बिकानेरच्या राजानें मागें फिरण्याची सल्ला दिली. दुसरे सरदारही गुळमुळीतच होते. तो गुळमुळीतपणा फौजेंत पसरला व बिकानेरचा राजा प्रथम निघून गेला. इतक्यांत मराठे व रायसिंग हे मारवाड्यांवर तुटून पडले. मग काय विचारावें ! जो उठला तो पळूं लागला सर्व तोफा मराठ्यांचे हातीं लागल्या.

त्या प्रांतांतील रामसिंग वगैरे राजे रजवाडे दहा हजार होते. परंतु शहरास वेढा पडेना, लष्कर एक बाजूस राहिलें. सबब जागोजाग मोर्चे दिले. तमाम मोर्चे कायम जाले. परंतु रान केवळ रेतीचें. सुरुंगाचा तो यत्न नाहीं. असें पाहून युक्तीनें कळाशीनें मोर्चेबंदी केली.[६९] परस्परें तोफांचा वगैरे रसालियांचा[७०] भडिमार होऊं लागला. असे सात आठ महिने जाहाले. यावर जयाजी शिंदे यांणीं मनसबा केला कीं, "दुर्ग तो असाध्य, आणि एक जागां अवघी फौज राहालिया पृथ्वी-दिग्विजय[७१] होणार नाहीं." म्हणून रामसिंग व आपला पुत्र जनकोजी शिंदे यांजसमागमें दहा हजार फौज देऊन मेडतियासि रवाना केले. मेडतियासि मोर्चे लाऊन राहिले. असे बारा महिने पूर्ण जाले. मारवाडी दमास[७२] येईनात. यांसि तो मोहरा इरेस पडला तैसें जाहालें.

१५. [ इकडे ] नागुरांत बिजेसिंग यानें विचार केला कीं, "मल्हारराव यांचे इभ्रतीवर[७३] आम्हीं हा अंगीकार केला. परंतु कागदीं पत्रीं मात्र समाधान करितात. आम्हीं दम कोठवर धरावा? एक वर्ष जाहालें. पांच मनुष्यांची कुमक नाहीं." तेव्हां आपले वकिलांसमागमें पत्र मल्हारराव यांस देऊन पाठविलें कीं, "पादशाही उमराव अथवा भुमे[७४] रजवाडे यांचे भरंवशावर आम्हीं हिंमत केली नाहीं. तुम्हीं भरंवसा दिला म्हणोन आम्हीं या गोष्टीचा अंगीकार केला. आतां आमची गत काय?" म्हणोन मल्हारराव यांस वर्तमान सांगतांच मल्हारराव यांणीं उत्तर केलें कीं, "शिंदे व आम्ही एका खावंदाचे चाकर. तेव्हां उघड तुमची कुमक आम्हांस करतां येत नाहीं. परस्परें या *रानांतील उमराव व रजवाडे यांस पत्रें देऊन तुमची कुमक करवितों." म्हणोन तमाम पत्रें माधवसिंग जयनगरकर व शिवसिंग राणे शिसोदे उदेपूरकर व उमेदसिंग बुंदीकर व मारवाडी भीमसिंग आणखी बहूत छोटे मोठे सरदार यांस साहित्य[७५]-पत्रें दिलीं.

---

६९. 'असो. कळाशी करून' सातारा प्रत.

'ऐसा ल लु बु डी (!) करून' पु० प्रत.

७०. रसालियाचा=यंत्रसामग्रीचा.

७१. ह्या काळीं मराठे सरदारांस भरतखंडाचें सार्वभौमत्व संपादण्याची जी मोठी आकांक्षा उत्पन्न झाली होती म्हणून म्हणतात, तिचें व्यंजक हें वाक्य होय.

७२. 'हयास' क० प्रत.

७३. 'भिस्तीवर' सां० व क० प्रती.

७४. भुमे=त्या देशीं पुष्कळ वर्षें वसती करीत आलेले; स्थानिक.

* रान=मुलूख, प्रदेश.

७५. साहित्यपत्रें=मदत करण्याविषयीं पत्रें.

आणि वकिलांस हिंमत देऊन सांगितलें कीं, "तुम्हीं ठांसून राहावें[७६] म्हणजे त्यांच्यानें रोमहर्षण[७७] होत नाहीं. असें करितां तुम्हांस कोणी मदत न करी, तरि कांहीं मोंगलाई मसलत करून तुम्हीं यश संपादावें." असें सांगोन वकील बिजेसिंग याजकडे रवाना[७८] केले. भुमे रजवाडे यांस पत्रें प्रविष्ट केलीं. तों मारवाडी यांचें पारिपत्य जाहालें येणें करून सर्वत्रांची छाती फाटोन[७९] गेली. कोणी कुमक करीनात.

१६. असे चवदा महिने जाहाले. लष्करांत धारण* इस्तकबील पासून सात शेर आठ शेर व वैरण चोवीस पंचवीस पुंलें[८०]; अशी महागाई. परंतु सरदार केवळ कुबेर. रोजमुरा व अजबाबें[८१] पाहून खर्चीं पावती केली. लोक आराम राखिले. धारणेची महागाई आहे असें कोणास सुचों दिलें नाहीं. फौजेंत एक मनुष्य बेदील नाहीं. असे तमाम लोक एकदील. अवघियांची वोढ[८२] कीं बिजेसिंग याचें पारिपत्य करावें. या प्रकारचें गनिमाचें मानस [होतें.]

१७. तिकडे नागुरांत बिजेसिंग याणें आपले उमराव बोलावून मसलत केली कीं, "आतां आमची कोणी कुमक करीत नाहींत. मल्हारराव यांणीं इरेस घातलें, परंतु त्यांच्यानें उघड साहित्य होत नाहीं. समग्र सवा वर्ष जाहालें. आम्हीं आतां कोंडून कोठवर राहावें? महागाई बहूत आणि गनीमही शह सोडून जात नाहीं हा पूर्ण भरंवसा कळोन आला. आतां मोंगलाई मसलतीनें होईल तें करावें.[८३]" म्हणोन तिघे मारेकरी सिद्ध केले. धन्य ते रजपूत! सतीचें वाण घ्यावें तसे तयार जाहाले. त्यांणीं आपला जीव मुठींत धरिला. मग त्याणें त्यांस

---

७६. 'ठांसून राखावें' पु० प्रत. 'रोखून राखाव' तुं० प्रत.

७७. 'रोमांच वांकडें होणार नाहीं.' क० प्रत.

७८. मल्हाररावाकडे मदत मागण्याकरितां बिजेसिंगानें वकील पाठविले असें टॉड यांचे ग्रंथांत कोठें आढळत नाहीं. फक्त जयपूरचा माधवसिंग याजकडे खुद्द बिजेसिंग, घेरा देणारांची नजर चुकावून, गेला होता व तेथें त्याच्या एका ठाकूराच्या स्वामिभक्तीच्या व धैर्याच्या योगानें त्याचा प्राण वांचला असें ते म्हणतात.

७९. 'फुटोन' पु० व तुं० प्रती.

*इस्तकबील=अमक्या दिवसापासून; प्रथम दिवसापासून.

८०. 'पेंढ्या' सां० प्रत.

८१. अजबाब=सामान, घोडीं मनुष्यें इत्यादी. "आद्याहून जास्ती पावती केली." पाठांतर.

८२. वोढ=इच्छा, उत्कंठा.

८३. या पुढें कल्याणप्रत म्हणते "मोगलाई मसलत म्हणजे दगाफटका होईल तें करावें."

काय देऊं केलें तें न[८४]कळे, अस्तु. मारेकरी चार घटका रात्रीस बाहेर लावून दिले आणि आंत आपले फौजेंत ताकीद करून सिद्ध होऊन उभे राहिले.

१८. नंतर मारेकरी लष्करांत येऊन पोहोंचले. तों चार घटका दिवस आला. देवाचे डेऱ्यापुढें स्नानास जयाजी शिंदे गेले. तों नजीक घोड्यांची पागा होती. मारेकरी केवळ कंगाल, भिकारी यांचा वेष घेऊन, आंगावर जीर्ण वस्त्र व गुप्त सुऱ्या असे, घोड्यापुढें दाणे वेंचीत होते. तों जयाजी शिंदे यांणीं स्नान करून चौरंगावर उभे राहिले. खिसमतगार हांडीं[८५] बासन संभाळावयास गुंतले. अबदागिऱ्या मात्र डोईवर छाया धरून उभा होता. जयाजी शिंदे यांस संवय अशी होती कीं, स्नानानंतर मुखावर धोतर घेऊन क्षणभर डोळे चोळीत राहावें. तों जसा राजा नळाचे द्वारीं कली वृषभाचें रूप धरून तिष्ठत होता, तैसेच मारेकरी जपून होते. इतक्यांत संधी सांपडतांच मारेकरी यांणीं उठोन एकाएकींच दोहींकडून कुशीस सुऱ्यांचा मार केला. काम कारगर[८६] होतांच जयाजी शिंदे चौरंगावरून जमीनीवर आले. तेव्हां नजीक अबदागिऱ्या शरिरानें धष्टपुष्ट होता, त्याणें कव घालून एक धरिला. तों डेरियापुढें व पागेंत गडबड जाहाली. जिकडे तिकडे मारा ! मारा ! असें होऊन ससेहोलपट होऊन एक ठार जाहाला. एक धरिला तो मारिला[८७]. एक अशा अरिष्टांतून प्राण घेऊन नागुरांत पोहोंचला[८८]. मागें दत्ताजी शिंदे यांणीं वर्तमान ऐकून धांवत बंधूजवळ आले. त्याची अवस्था पाहून त्यांणीं केवळ धाय मोकलिली.

---

८४. "तिघे मारवाडी यांस बक्षिसें वगैरे देऊन सिद्ध केलें. त्यांनीं लोभावर नजर देऊन, जिवाची आशा सोडून, सतीचें वाण घेऊन, सिद्ध होऊन बाहेर, पडले." कल्याण प्रत. त्यांस बिजेसिंगानें वंशपरंपरेनें गांव इनाम देऊं केले, असें क० **टॉड** म्हणतात.

८५. 'हांडा बासन घेऊन कोठीकडे ठेवावयास गेला' क० प्रत. "खिसमतगार घोडा घेऊन कोठीकडे गेला" सां० प्रत 'आदर पाठांतर.'

८६. काम कारगर होतांच=वार लागूं होतांच.

८७. हें वाक्य क० प्रतींत मात्र आढळतें.

८८. नागुरांत गेल्यावर त्याचें मुखावलोकन बिजेसिंग करीना असें म्हणतात.

नागुरच्या वेढ्यांत जयापा एकदां आजारी असतां त्याजकडे बिजेसिंगानें खुद्द आपला वैद्य पाठविला व त्याच्या उपचारानें आपास गुण आला ! असा उदारपणा ( शिव्हलरी ) हिंदी लोकांत असे. भारती युद्धाच्या आरंभींच भीष्माचार्यांनीं युद्धाचे नियम सांगितले आहेत ते पाहावे.

घायाळ उचलोन डेऱ्यापुढें आणिला. तों तिकडे मारेकरी गांवांत पोहोंचतांच बिजेसिंग सिद्धच होता. तमाम सरदार यांस बोलावून सांगितलें कीं, "यार हो! आतां गनीम आहेत ते काय? 'मुरगी मारी बचडे दाणादाण' तैसी गत होईल." म्हणून बहूत संतोष मानून फौजेनिशीं युद्धास निघाला. तों आधींच हे गडबडोन तमाम मोर्चे उठवून [यांणीं] गोटांत आणिलेच होते. बिजेसिंग याची फौज बाहेर आलियावर लष्करांत ऐशी गडबड जाहाली कीं पृथ्वीप्रलय होतो तैसा विचार जाहाला. तों जयाजी शिंदे मोठे हिंमतीचे सरदार. डोळे उघडोन पाहिलें तों जवळ बंधू दत्ताजी शिंदे केवळ धाय मोकलून शोक करितां देखिला. गडबड ऐकोन हस्तसंकेतें भावास हिंमत देऊन बोलतां जाहाला कीं, "वैरी युद्धास आला आणि तूं रांडे सारिखा रडतोस! हें क्षत्रधर्मास उचित नाहीं. आतां मजला कांहीं होत नाहीं. तुम्हीं शत्रुपराभव करावा."

१९. असें ऐकतांच दत्ताजी शिंदे यांणीं नगारा करून, फौज घेऊन युद्धास गेले. दोहीं सैन्यांच्या गांठी पडल्या. मोठें तुंबळ युद्ध पूर्ववत प्रमाणें जाहालें. मागती दत्ताजी शिंदे यांणीं शिलेजोरीं[89]निशीं मारवाडी मागें सारोन गांवांत घातले. दोन तीनशें[90] मनुष्यें ठार जाहालीं. तैशींच घोडींही पडलीं. घोडे मनुष्यें बहुतकरून[91] घायाळ जाहालीं. मोर्च्यापाशीं येऊन मागती जेथील तेथें मोर्चे कायम करून, शाहाजणें वाजवीत ढालेपाशीं[92] आले. तों मागें जयाजी शिंदे यांचा प्राण निघोन गेला. दत्ताजी शिंदे यांणीं वर्तमान ऐकून घोडियावरून खालीं घालून घेतलें. अतिशय शोक करिता जाहाला. "आपासाहेब! आम्हांस कोणाचे हातीं निरवून गेलां? आतां आपासाहेबांसारिखा भाऊ कोठें दृष्टीस पडेल? 'सभाग्य साधून जाय निधी आणि अभाग्य मागें मृत्तिका* शोधी' तैसी आमची गत जाहाली. आमचे छत्र, केवळ मायबाप गेले!" तो शोक पत्रीं कोठवर लिहून कळवावा? त्याचें आंतडें त्यास साक्ष देतें. तेव्हां राजश्री रामाजीपंत[93] भाऊ दिवाण व आणखी लहान थोर सरदार मिळौन बहूत प्रकारें शांतवन केलें कीं, "हा मृत्युलोक आहे. आला प्राणी राहात नाहीं. परंतु इहलोकीं कीर्ती करून परलोक—साधन करावयाचें हेंच दुर्लभ. अस्तु. जयाजी

---

८९. 'शिरजोरा करून' क० प्रत.

९०. 'शें' ऐवजी 'शेहें' असें क० प्रत सर्वत्र लिहिते.

९१. 'बहूत' क० प्रत.

९२. ढाल= निशाण.

* मुक्तेश्वरकृत वनपर्व १२–१५.

९३. रामाजी अनंत दाभोळकर. यांचे वंशज अकोळनेर येथें आहेत.

जयाजी शिंदे – पुत्र – जनकोजी
भाऊ दत्ताजी शिंदे



बाबा काय घेऊन गेले? दुनिया, दौलत, खजीना, मुलूख, हत्ती, घोडे, पाहिजे तितकी संपदा, ठेवून गेले. आतां त्यांचे पुत्र जनकोजी बाबा आहेत. त्यांस वडीलपणाचें महत्त्व देऊन आपण युवराज्य चालवांवें. पहिले पेक्षां अधिकोत्तर करून दाखवावें. आतां शोक करणें उचित नाहीं. शत्रू जवळ. हिंमत सोडिली म्हणतील." ऐसें शांतवन करून जयाजी शिंदे यांस चंदन काष्टें व बेलकाष्टें व तुळसी काष्टें करून देह सार्थकें केलें. ते वेळेस जनकोजी शिंदे जवळ नव्हते. त्यांणींही तेच दिवशीं मेडतें[१६] सर केलें होतें. त्यांस वर्तमान कळतांच तेही त्वरेनें येऊन पोहोंचले. उभयतां चुलते पुतणे एकत्र जाहाल्यावर तो शोक 'न भूतो न भविष्यति' या प्रकारें जाहाला. असो. गत गोष्टीस यत्न नाहीं,असा सारासार विचार करून विवेक केला. यथाविधी तेरा दिवस उत्तरक्रिया पूर्ण जाहाली, आधींच शिंदे केवळ रणशूर, दानशूर;[त्यांनीं] दानधर्म बहूत प्रकारें केला.

२०. हें वर्तमान तमाम भुमे रजवाडे यांस कळलें. इंदुरास मल्हारराव यांणीं ऐकोन बाह्यार्थ श्रमी जाहाले कीं, "आमचें जुग विसकटतांच नरदें ठार मेली. बाहेर-लापिका या प्रकारें बोलून श्रमी जाहाले. अंतरलापिका ज्याची ते जाणत असतील." हें वर्तमान पुण्यास नानासाहेब व भाऊसाहेब यांस कळतांच बहुत श्रमी जाहाले. "आमचा अर्जुन आज गेला. एक बाजू खचली," म्हणोन बहूत कष्टी जाहाले. "असो. जनकोजी शिंदे त्यांचे पुत्र आहेत. त्यांस सवाई जयाजी करून दाखवूं, चिंता काय?" म्हणोन समाधानाचीं पत्रें दत्ताजी शिंदे व जनकोजी शिंदे यांस पाठविलीं. मल्हारराव आपल्या वाफगांवास निघोन गेले.

जोडी सोंगटी

---

१४. 'त्यांस वडीलपणें महत्त्व देऊन आपण हें राज्य चालवावें.' पाठांतर.

१५. आपा व संताजी (हा त्याचा भाऊ नागूरच्या वेढ्यांत पडला) यांच्या छत्र्या मोठ्या सुरेख रितीनें पुष्कर सरोवराचे तीरीं बांधिल्या आहेत. आपाच्या छत्री पुढें पायां पडावयास रजपूतही जातात.

१६. मागें पृष्ठ १५, कलम १४ पाहा.

१७. "आमचें जुग विसकटतांच नरद ठार केली. बाहेर लौकिकीं या प्रकारें बोलून श्रमी जाहाले, अंतर्यामीं ज्याचे ते जाणत." धो० व क० प्रती नरद=सोंगटी (एक) 'आमचें जूग विस्कळीत जाहाले' पाठांतर. जूग (युग्म) =जोडी.

१८. इंदुराहून. वाफगांव खेड तालुक्यांत आहे. (जिल्हा पुणें.)

२१. इकडे नागूरावर पूर्ववत प्रमाणें गोळागोळी होतच होती. असे पूर्ण अठरा महिने जाहाले. एक जागां मेख गाडली होती. बिजेसिंग यास पुरतें समजलें कीं, "जयाजी शिंदे गेले. तरी उणें पडलें नाहीं. आणि आमची कुमक कोणी कांहीं करीत नाहीं. शिंदे पुरते इरेस पडले. पारपत्य आमचें करतील." अशी खातरजमा राखून वकील सल्ह्यास पाठविला. शिंदे यांसही असें जाहालें कीं कोणते रितीनें तरी यश संपादावें आणि निघोन जावें. बाह्यार्थ मात्र [ उमेदीचें ] बोलत होते. मग उभयपक्षीं सल्ला केला. एक कोटी रुपये खंडणी घेऊन नागुरापासून अलीकडे मुलूख अजमीर, मेडतें व बिकानीर ऐशीं ठाणीं रामसिंग यास दिलीं. याप्रमाणें खंडणी व मुलूख घेतला. त्यांत अर्धा मुलूख रामसिंग यास दिला. अर्धा मुलूख आपणाकडे करून, ठाणियांचे बंदोबस्त करून, तेथून कूच करून, मजल दरमजल उज्जनीस आले.

२२. उज्जनीस आलियावरि तमाम शिबंदीचा हिशेब केला. तीन कोटी रुपयांचा मोहिमेचा जमाखर्च जाहाला. झाडून ऐवज माळवे वगैरे प्रांतांतील नेऊन दहा पांच लाख रुपये कर्जवाम जाहालें. खजिन्यांत पैसा राहिला नाहीं. जामदारखाना कुल खालीं जाहाला. आणि शिलेदार लोकांचा हिशेब केला तो तीन सालां हिशेब लोकांस महागाईमुळें झाडून पावला. शेवट कोणाकडे फाजील निघाले. असें जाहाल्यावर शिंदे केवळ सालस, मोम-दील[1], त्यांनीं चित्तांत विचार केला कीं, महागाईमुळें लोकांनीं झाडून रुपये खादले. आम्हां-करितां लोक खराब जाहाले. तीन वर्षें राहून रिक्तहस्तें लोक घरास गेलिया

---

९९. "बाह्यार्थ मात्र युद्धाची उमेद ठेविली होतो." सां० प्रत. "बाह्यार्थ कारण मात्र बोलत कीं, बारा वर्षें लागलीं तरी शह सोडणार नाहीं. 'एक भागली एक उभगली, अशी व्यवस्था उभयतांत जाहाली होती." क० प्रत.

१००. जयापास मारल्यावर त्याचा सूड चांगला घ्यावा असें मराठ्यांच्या मनांत होतें, त्याजबद्दल अजमीर यावें व तीन वर्षांनीं खंडणी व लागतील तेव्हां अमुक लोक कुमकेस यावे असा तह बिजेसिंगाकडून त्यांणीं करून घेतला. राजस्थानाचे मध्यभागीं अजमीर असल्यामुळें तें शहर त्या सर्व मुलखाची किल्ली असें समजलें पाहिजे. ती ही किल्ली मराठ्यांच्या हातीं सांपडल्यापासून त्यांचा अंमल तेथें पूर्ण बसला.

असा तह जाहल्यावर "तुझ्या नशीबीं काय असेल तें तूं प्राप्त करून घे" असें रामसिंगास सांगून मराठे निघून गेले, असें क० टॉड म्हणतात.

१. मोम-दील = मोम्-दील = मेणासारख्या मृदु अंतःकरणाचे.

त्यांचीं मुलेंबाळें बेहुवा देतील. त्यांचे तळतळाट घेऊं नयेत. आतां सरासरी लोकांस झाडून एकसालां रुपये द्यावे." असें निश्चयांत आणिलें, तों पदरीं पैसा राहिला नाहीं[2]. मोठे संकटीं पडले. दिवसा अन्न गोड लागेना व रात्रौ झोंप येईना. केवळ ईश्वरावर तवकल[3] करून होते. तों त्यांची क्रियां[4] शाबूद. 'अजगरका दाता राम.' भाग्य अभाग्य काळपरत्वें येतें जातें, परंतु निश्चयांत मात्र अंतर करूं नये. त्यांत ईश्वर साह्य होतो. जैसी क्रिया धरावी तैसें फळ पावावें. प्रत्यक्षास प्रमाण पाहावें नलगे. शिंदे यांणीं शुद्ध वासना धरिली यांस्तव ईश्वरें तेथें एकाएकीं असें कौतुक केलें कीं, बुंदीचा राजा होता तो मृत्यू पावला. तेव्हां त्याचा दायाद पितृव्य-पुत्र[5] होता तो राज्याभिलाष करावयाचे विचारांत आला. राजांचें[6] मूल नेणतें होतें. तेव्हां राजस्त्रीनें ताबडतोब वकील उज्जनीस शिंदे यांजकडे पाठविला कीं, "तुम्हीं येथवर येऊन, मुलास तक्तीं बसवून टिळा लावावा, तुम्हांस पाऊण कोटी रुपये देतों." असें ऐकतांच, हे आधींच आतूर होते, त्यांस असें जाहालें कीं, दुकाळियास मिष्टान्न मिळतें तसें जाहालें. यांणीं ऐकतां तेच क्षणीं नगारा करून कूच केलें. तेथें जाऊन जबरदस्तीनें त्याचा दायाद होता त्यास कैद करून मुलांस तक्तीं बसविलें[7]. राजाचे स्त्रीनें बोलल्या बरहुकूम पाऊण कोटी रुपये खंडणी व बहुमान हत्ती, घोडे, अमोल्य वस्त्रें, शिरपेंच, मोत्यांचे तुरे, पदकें आणि मुक्ताफळांच्या माळा येणेंप्रमाणें दिलें. तें घेऊन उज्जनीस येऊन पोंचले. तमाम लोकांस हिशेब न करितां[8] एकसालां ऐवज पदरीं घालून निरोप दिला. लोकही खुशाल होऊन आशीर्वाद देते जाहाले.

२३. याप्रमाणें वर्तणूक करून दत्ताजी शिंदे व जनकोजी शिंदे उज्जनीहून चांभारगोंदियास आले. मुलें माणसें यांस भेटते समयीं पुन्हां नवें दुःख जाहालें. असो. सर्वत्रांनीं विवेक करून, जनकोजी शिंदे यांजवर नजर देऊन राहिले. हें वर्तमान नानासाहेब व भाऊसाहेब यांस पुणियास कळतांच शिंदे यांचे समाधानास चांभारगोंदियास आले. भेटून बहुता प्रकारें पोटाशीं धरून सर्वत्र

२. या पुढें "मनु तरि या रितीचा जाहाला" असें वाक्य क० प्रत देते.

३. तवकल, तवक्कुल=ईश्वरावर भरंवसा.

४. क्रिया=सत्कर्म, शुद्ध वासना.

५. "दायादी चुलत भावाचा पुत्र" क० प्रत.

६. 'राजाचा पुत्र अगदीं लहान नेणता होता.' क० प्रत.

७. क० टॉड यांच्या ग्रंथांत ह्यास कोठें आधार नाहीं.

८. 'हिशेबाशिवाय' क० प्रत.

लहानथोरांचें समाधान केलें. सुभ्यांचे[९] शिक्के जनकोजी शिंदे यांचे नांवें करून दिले. समजाविशीस अर्धे मारवाड काबीज केलें होतें तें दरोबस्त त्यांजकडे दिलें. त्यांत कोणाची वांटणी कपर्दिक नाहीं[१०].

**२४.** येणेंप्रमाणें समजाविशी करून श्रीमंत सावनूरचे मोहिमेस[११] गेले. मुरारराव घोरपडे व मुसाफरजंग मिळूनें[१२] सावनूरचा पठाण यास तंबी पोंचवून त्याजपासून खंडणी घेऊन, बंकापुरचा किल्ला आपणाकडे करून देशास आले. तों शिंदे चांभारगोंदियास घरींच होते. मल्हारराव यांणीं घरास येऊन समाधान करावें अशा रदबदल्या घातल्या. परंतु शिंदे यांणीं *मानिलें नाहीं. "आतां त्यांची भेट स्वर्गी" म्हणोन निष्ठुर जाबसाल सांगितला. त्यावरून मल्हारराव आपले जागीं फिके होऊन राहिले[१३]. त्याजवर नानासाहेब यांणीं रघुनाथराव दादा व मल्हारराव होळकर यांस साठ हजार फौजेनिशीं हिंदुस्थानचे मोहिमेस रवानीं केलें[१४].

**२५.** हिंदुस्थानांत असें वर्तमान जाहालें कीं, अलमशाहा बादशाही करीत असतां वजिरी धाकटा गाजुद्दीखान[१५] करीत होता. त्याजपाशीं नजीबखान

---

९. "प्रांताचे व सरंजामाचे व सुभ्याचे शिक्के" क० प्रत.

१०. "त्यांत सरकारची वांटणी किंवा होळकर यांची किमपि कोणाची नाहीं" क० प्रत.

११. ही मोहीम १७५५।५६ सालची.

१२. मिळून=यांसुद्धां. हे दोघे सावनुरच्या नबाबास सामील झाले होते.

* 'मोजिलें' पु० प्रत. वरील पाठ तुं० प्रतीचा.

१३. शिंदे व होळकर यांच्यामध्यें चुरस कुंभेरीच्या वेढ्यांत प्रथम उत्पन्न झाली. ती दिवसेंदिवस वाढत चालली असें मागील, ह्या व पुढें येणाऱ्या मजकुरावरून स्पष्ट होतें. बखर रचणाराचा झोंक एकंदरींत मल्हारराव यास दोष देण्याचा दिसतो. राणोजी शिंदे वारल्यापासून शिंदे–होळकरांचीं मनें साफ नव्हतींच असा इतरत्र दाखला मिळतो.

१४. ही दादांची बडी स्वारी, जींत त्यांनीं लाहोर काबीज करून कृष्णातीरच्या घोड्यांस सिंधुनदाचें पाणी पाजिलें.

१५. गाजीउद्दीन ( चवथा ) याचें नांव मीर शाहाबुद्दीन असें होतें. हा असफजहा निजामउल्मुल्क याचा नातू. निजामाच्या पाठीमागें दिल्लीच्या दरबारचें त्याचें काम त्याचा वडील पुत्र गाजीउद्दीन ( तिसरा ) हा पाहात होता. तोही १७५२ त दक्षिणेंत विषप्रयोग होऊन मृत झाल्यावर त्याचा भाचा मीर शाहाबुद्दीन यास त्याचा दिल्लीकडील सर्व अधिकार प्राप्त झाला.

रोहिला प्यादेपणाची जमादारी करीत होतो[१६], तो दिवसेंदिवस भर घेऊन, घोडे घेऊन, शिलेदारी करूं लागला. शिलेदारी करितां दैवयोगें करून हजार पांचशें लोक बाळगून गाजुदीखान याची कुल अख्त्यारी करूं लागला. सावकारांतही पतपात भारी जाहाली. त्या योगें कुरुक्षेत्रापासून अलीकडे परगणा व अंतर्वेद प्रांत अगदीं ईजारे[१७] करून चार हजार फौज बाळगून जमात बरी चांगलीच करून होता. तों पुढें होणार भवितव्य [ तें झालें. ] आमद[१८]शाहा याची स्त्री[१९] मलका जमानी व तिची कन्या चंदा जमानी अशी लालगडी नजीक लगत यमुनेचे बेटावर शिलिमगड म्हणोन थोर किल्ला आहे–तेथें पाण्यास पूल बांधिला आहे; त्याजवरून दोन्ही किल्ल्यांत जाणे–येणेस वाट आहे;–त्या किल्ल्यांत बादशाहाजादे व त्यांच्या स्त्रिया जितक्या तितक्यांनीं तेथें राहावें, अन्नाच्छादन देतील तितकें घेऊन बंदिवानाप्रमाणें असावें, त्यांत मलका जमानी होती. तिचे पोटापाण्याची बहूत तैंसदी[२०] होती. तिनें आपले जागीं विचार केला कीं, “मी [२१]अहमदशाहा याची [स्त्री] [२२]बादशाहजादी अटके अलीकडील मुलूख देखील† दक्षिणदेश समुद्रवलयांकित पृथ्वीचें स्वामित्व केलें. असें असतां मी अन्नाच्छादनास यजितें[२३] ! हें दुःख कोणापाशीं सांगावें ? अलमशाहा बादशाही करितो त्यास सांगावें तरि तो आम्हांहून बंदिवान. गाजुदीखान वजीर यास सांगावें तरि [तो] गनिमाचा पुत्रे[२४]. वरकड अष्टाधिकारी केवळ निर्माल्यवत. आतां एक मात्र विचार आहे. एक काबिलें[२५] मनुष्य नजीबखान रोहिला

---

१६. मागें पृष्ठ १, टीप २ पाहा. “तो दिवसेंदिवस वजीर याची मर्जी संपादून प्यारींत येत चालला” असें वाक्य क० प्रत येथें देते.

१७. इजारा=मक्ता. ‘इजारा म्हणजे मामलत’ सां० प्रत.

१८. ‘अलमशाहा’ असा कांहीं प्रतींचा पाठ आहे. अलमशाहा ( दुसरा ) हा दिल्लीचा १४ वा मोंगल तक्ताधिपती, याणें १७५४–५९ पर्यंत दिल्लीचें तक्त भोगिलें. हा शेवटीं गाजीउद्दीन याचे मसलतीनें मारला गेला. येथें ‘आमद शाहा’ हा तुंगार प्रतीचा पाठ आहे तो बरोबर दिसतो.

१९. पुढें पृष्ठ २३, टीप २१ पाहा.

२०. ‘तंगचाई’ धो० प्रत.

२१. अहमदशाहा, वरील ‘आमदशाहा’ ( १७४८–५४ ) हा महंमदशाहाचा पुत्र. ज्याणें अबदाली गिलच्यांचा सरहिंदच्या लढाईत ( १७४८ ) पराभव केला तो.

२२. पुढें पृ० २५, टीप ४२ पाहा.

† देखील दक्षिणदेश=दक्षिणदेशासुद्धां

२३. यजित =( अजित ) शरण, महाग.

२४. पुत्र=आज्ञाधारक, त्यांच्या ओंजळीनें पाणी पिणारा. गनीम=मराठे.

२५. काबिल=हुशार, कर्ता.

आहे. तोही गाजुदीखान यांचा[२६] वाढविलेला. परंतु त्यास तरी सांगून पाहावें." म्हणून विचार करून आधीं खोजा गाजुदीखान याजकडे पाठविला. त्याणें संपूर्ण तापत्रय विदित केलें. त्याणें उत्तर केलें कीं, "मजकडे कांहीं गुंता नाहीं, गिर्दनबाजी[२७] गनिमांकडील अंताजी माणकेश्वर आहे त्यास पुसावें." म्हणोन जाब[२८] दिला. तेथून खोजे अंताजी माणकेश्वर याजकडे गेले. त्यासही तसेंच निवेदन केलें. त्याणें उत्तर केलें कीं, "गाजुदीखान याजकडे जाऊन सांगावें." तेव्हां खोजे माघारे येऊन [त्यांणीं सर्व वृत्त] मलकाजमानीस निवेदन केलें. तिणें नेत्रांस पाणी आणून परम खेद करिती जाहाली. तदोत्तर खोजे गुप्तरूपें नजीबखान रोहिल्याकडे पाठवून त्यास आपणाकडे बोलावून नेलें. तो गाजुदीखान याच्या जिव्हाळियांचा[२९] होता. त्यास किल्ल्यांत जाण्या येण्यास कांहीं अटक नव्हती. तो मलकाजमानीकडे जाऊन खुरनिसातें[३०] करून अदबशीर उभा राहिला. आणि अधोमुख करून उत्तर केलें कीं, "मा साहेब ! मे तेरा खानाजाद. गुलामकी क्या तक्षीर ? क्या हुकूम ?" म्हणोन बोलतांच मलकाजमानीस दुःखाचा उभाडा[३१] येऊन अति आक्रोशें हंबरडा फोडून रुदन करूं लागली. आणि नजीबखान यास सांगितलें कीं, "कुलें[३२] बादशाही बुडाली. त्यामुळें बादशाही उमराव जिकडील तिकडे आपापले जागां गनिमास मिळोन, आपली अबरू रक्षून आहेत. आतां तूं रोहिल्याचे तुखमाचा[३३] असलास तर फिरोन बादशाहीस अवसान घालशील. केवळ मुसलमानीस तांबेरा[३४] आला. यामेंणी[३५] बादशाही जाहाली, आतां तूं एक अबरू राखशील ही खातरजमा राखोन तुला मात्र दुःख सांगितलें. हे बादशाही दुसऱ्यास आपले हातून द्यावी, परंतु असें निर्माल्यवत राहाणें उचित नव्हे." असें नजीबखान याणें वर्तमान

---

२६. 'यानें वाढविला. परंतु त्यास तरि' क० प्रत.

२७. गिर्दनबाजी=गिर्द-नवाजी=गस्त करी, शहरचा किल्लेकरी, बंदोबस्त ठेवणारा.

२८. 'टाळा' तुं० प्रत.

२९. जिव्हाळ्याचा = मर्जीतला, मायेचा.

३०. खुरनिसात=कोर्निशात=भुईस हात लावून नम्रतेनें सलाम करतात तो. बखरींतून कोठें 'खुरनीस' कोठें 'कुर्णुसात' असेंही लिहिलें आहे.

३१. उभाडा=उभडा, अनावर.गहिंवर. 'उमाळा' तुं० प्रत.

३२. कुल, कुल्ल=सर्व.

३३. 'कुळांतला,' 'वीर्याचा,' पाठभेद. तुखमाचा (तुखम् = बीज) तुखमाचा=बीजाचा.

३४. तांबेरा=तांम्रा=तांब, गंज.

३५. 'बेमानी' क० प्रत.

ऐकून मागुती खुर्निसात करून अर्ज केला कीं, “ तक्शीर माफ. मैं एक अर्ज करितां हूं. तमाम बादशाही उमराव व रजवाडे अगदीं गमिनाचे आज्ञेंत. बळ कोणाचे भिस्तीवर बांधावें ? आम्ही ज्याचे पदरीं तो केवळ गनिमाचा ठेवणाईत. बादशाहा [ तर ] बंदिवानाप्रमाणें[३६] आहे. आतां तुम्हीं मला आज्ञा केली तरि मजला साहेबीं [३७]सानक-रोटी द्यावी. मी [३८]जो अर्ज करीन त्याप्रमाणें वर्तावें.” तेव्हां तिणें तत्समयीं सानक-रोटी दिली, आणि विचारती जाहाली कीं, “ कामाची [३९]सुरत मजला सांगावी. ”

२६. असें म्हणतांच **नजीबखान रोहिला** बोलता जाहाला कीं,“**महंमदशाहा** बादशाहाचे समयीं वजिरी **सुजाउद्दवला** याचा बाप **मनसूर अली** याजकडे होती.[४०] तो **महंमदशाहा** [४१]हक्क जाल्यावर तुमचे भ्रतार [४२]अहमदशाहा यांस बादशाही जाहाली.[४३]तो केवळ नाकाबिल,*त्याणें **दक्षिण**चा सुभा [४४]मुंढा पातशाहा साडेसहा सुभे दक्षिण खाऊन होता, तो साठ हजार फौजेनिशीं दिल्लीस चाकरीस आला होता. तसेच आणखी दाहा पांच उमरावें दोन लक्ष घोड्यानिशीं दिल्लींत होते. तों पूर्वापार परंपरागत [ चाल कीं ] तमाम उमराव यांणीं जसे खिजमतगार अदबशीर उभें राहातात, तसें त्यांणीं उभें राहावें. त्यांत **किलिजखान नबाब निजामुल्मुलूख**ही होता. तों बादशाहा तक्तीं बसोन फळफळा-

---

३६. ‘बादशाहा तो दिवाणा’ क० प्रत.

३७. सानक रोटी,(सानक=जेवण्याची ताटली,) आणभाक, बेलभंडार ह्या अर्थी.

३८. ‘मी जें करीन त्या प्रमाणें’ पाठांतर.

३९. सुरत=चेहरा, तऱ्हा. प्रकार.

४०. या वाक्याचा संबंध पुढील गोष्टींशीं कांहीं दिसत नाहीं. मनसूर अली =सफदरजंग. हा अयोध्येचा नबाब.

४१. हक्क=मयत.

४२. मागें पृष्ठ २३ टीप २२ पाहा. अलमगीर हा अहमदाचा चुलता. तेव्हां अलमागिराची मुलगी ती अहमदशाहाची स्त्री, असें ज्यास्त संभवतें. मागें ‘अलमशाहाची स्त्री मलका जमानी’ असें कांहीं प्रतींत म्हटलें आहे तें बरोबर नाहीं. ‘तुमचे भ्रतार अहमदशाहा’ असें नजीबखान मलकाजमानीस येथें स्पष्ट म्हणतो.

४३. तो= महंमदशाहा (१७२०-४८)

* ‘ त्याणें , याचा संबंध कोणत्या शब्दाशीं ? पुढें ‘ आला ’ ह्या शब्दाबद्दल ‘ आणिला ’ असें असतें तर संबंध स्पष्ट झाला असता.

४४. ‘मुढा पातशाहा’ सां० प्रत. ‘मुडी पातशहा’ धो० प्रत. ‘मुंढा.’म्हणजे काय ? हा मुंढा पातशाह म्हणजे किलिजखान निजाम उल्मुल्क असें पुढीलमजकुरावरून दिसतें.

४५. एथें क० प्रतीचा नववा बंद संपला. १० वा बंद गाहाळ झाला आहे.

वळ हर जिन्नस पुढें असल्यास जिकडे पाहावें, त्याजपुढें असेल, त्याणें कुर्नुसात करीत पुढें येऊन हात पसरावे. त्याणें काय जिन्नस असेल तो कृपा करून द्यावा. अशी चाल होती तसेंच किलिजखान याचे तोंडाकडे पाहिलें. तो कुर्नुसात करीत पुढें आला. तों पातशाहांनीं हात आखडून विनोद केला कीं, "यार हो! दखनी बंदर या* नाचता क्यौं देखो!!" असें पांच सात वेळां केलें. तेव्हां किलिजखान यास विषाद आला. तळव्याची आग मस्तकास जाऊन बोलला कीं, "निशा अकताला हुकमत परवार दिगेरे[४६]! आजपासून साहा महिन्यांत पादशाहा आदि करून कुल दिल्लीस बंदरका बिकार दिखलावूं तरच मिशी बाळगूं!" म्हणोन प्रतिज्ञा केली. पादशाहा बेहोष, त्यानें सारासार विचार ध्यानांत राखावा ते न करितां बेफाम राहिला. किलिजखान याणें रूमचा पातशाहा नादरशाहा याजकडे सूत्र लावून त्याची चढाई दिल्लीवर करविली. रूमचे पातशाई खालीं दिल्लीची पातशाई; तीन लक्ष फौज दिल्लीपत-पातशाहा व पांच लक्ष फौज रूमचा पातशाहा. याहून.[तो] जबरदस्त पातशाहा, त्याणें दोन लक्ष फौजेनिशीं मजल दरमजल अटक उतरून, लाहूरच्या सुभ्यास तंबी पोचवून, शतद्रू[४७] नदी उतरून आलीकडे आला. हें वर्तमान [४८]महंमदशाहास कळतांच त्यांणीं तमाम उमराव, वजीर यांस ताकीद करून फौज सिद्ध करून पुढें रवाना केले. दक्षिणची फौज भारी म्हणोन किलिज-खान यास मात्र जवळ ठेवून घेतलें. पुढें मनसूर[४९] अली व जयसिंग राजाचा पुत्र व मारवाडी राठोड व छत्रसाल जाट व[५०] सुरजमल्ल जाट याचा बाप अकबरखान बलोचे व सादलखान बादलखान असे सरदार बहूत दीड लक्ष फौजेनिशीं पुढें सडे रवाना केले. झाडून पातशाही रिसाला चारशें तोफा व दोनशें गंजिफियाच्या गाड्या व हस्तनाले व सुतरनाले व जेजाला व रेकले व

---

* 'दखनी बंदर नाचता क्या देखो' पु० प्रत.

४६. हें पूर्ण वाक्य असें. इनइशा हाखूनाला हुकमत परवर दिगार की है = ईश्वराची इच्छा असल्यास त्याचीच आज्ञा प्रमाण.

४७. शतद्रू, शतद्रु=सतलज

४८. 'अहमदशाहास' असा पाठ कांहीं बखरींचा आहे तो बरोबर नाहीं. 'महंमद-शाहा' हा पाठ सांगली प्रतीचा होय.

४९. मनसूर अली=ह्या वेळेस सादत-खान जिवंत होता. त्यासच चुकून मन-सूरअली असें म्हटलें आहे. सादत-खानाचा पुतण्या सफदरजंग यास मनसूर अली म्हणत असत.

५०. 'व' तुंगार प्रतींत नाहीं.

बंदुका व बाणांच्या कैंच्या, असा कुल दारूखाना किलिजखान याजसमागमें देऊन पानपत कर्णोल पावेतों मागों[५१]हून रवाना केलें; तों पुढील फौजेची [ इराणीशीं ] गांठ पडली. तों नादिरशाहाची फौज बेमुबलग व जु[५२]रतही भारी. त्यांपुढें यांस टिकाव होईना. यांणीं मोंगलाई मसलत करून, पाठीवर फौज घेऊन दिल्लीकडे येते जाहाले. किलिजखान यास इशारत केली कीं, “आम्ही नादिरशाहास घोळवीत घोळवीत तुम्हांवर घेऊन येतों, तुम्हीं रिसाल्यांत दारूगोळा घालून सिद्ध असावें; तुम्हांवर येतांच तुम्हीं एकदांच सरबत्ती देऊन मागून हौद्यावर चालून घ्यावें. आम्ही इकडून हौदे चालवितों.” असा मनसबा करून नादिरशाहास वेढून आणिलें. तों किलिजखानाचें व नादिरशाहा याचें सूत्र एकच होतें. नादिरशाहा बेलाशक फौजेचे पाठीवर आला. किलिजखान आधींच जाणून सिद्धच होता. मनसूर अली याजपाशीं आग भारी म्हणोन भडभुंजे अभिधान होतें. तेही आग किलिजखान याजपाशीं राहिली होती. [ तिची ] त्याणें दिल्लीपत पातशाहाची फौज तोंडापुढें येतांच एकदांच सरबत्ती केली. जसे भडभुंजे लाह्या भाजतात तशी गत केली. तोफा व हस्तनाले, जेजाला व रेकले व गंजिफियाच्या गाड्या [ यांचा ] व बाणांचा भडिमार एकदांच जाहाला. फौज भाजून काढली. केवळ धुंदी जाहाली. पांच सात हौदे खालीं जाहाले. आपला रिसाला म्हणोन फौज बेफाम राहिली होती. तों गृहकलह होऊन ‘विनाश-काले विपरीत-बुद्धिः’ जाहाली. गृहकलह लागला म्हणजे विनाशकाळ जाणावा. तशी गती होतांच फौज भाजून काढली. तों नादिरशाहाची फौज येऊन पोंचली. आधींच फौज केवळ भाजून काढलेली, त्याजवर नादिरशाहाकडील उमराव, इराणी,दुराणी, तांम्र[५३]मुखे व शीक आदिकरून यांनीं हौदे चालविले. दिल्लीपत पातशाहाची फौज मारून कुल धुमाधार केली. कांहीं रणांत मेली. कांहीं राहिली ती रानोरान देशत्याग जाहाली. तिणें फिरोन दिल्ली पाहिली नाहीं. नादिरशाहा याची फौज चढत्या घोड्यानिशीं[५४] दिल्लीस पोहोंचली. तों पुढें फौज गेली म्हणोन शहरची बंदोबस्ती न करितां शहरपन्[५५]हा खालींच होता. चढत्या घोड्यानिशीं शहर घेतलें. तों शह-

---

५१. ‘पुढें’ असें कांहीं प्रतींत आहे तें चुकीचें दिसतें.

५२. जुर=आवेश, मर्दुमकी.

५३. ताम्र-मुख=तांबड-तोंडे= मोंगल लोक.

५४. चढत्या घोड्यानिशीं =एकदांही घोड्यावरून न उतरतां; एका धांवेसरसे; थांबल्याशिवाय किंवा दम घेतल्याशिवाय.

५५. शहर-पन्हा=शहरची तटबंदी.

रास कधीं उपद्रव ऐसा ठाऊक नव्हता. केवळ द्वारकेप्रमाणें[५६] दिल्ली नांदत होती. ऐसा शहरचा चिंधीचोळा[५७] केला. इराणी, दुराणी, अर्बुज जात, त्यांणीं कित्येक तरुण स्त्रियांच्या अबरू घेतल्या. शहरची गत या रितीची केली. फौज लालगडी किल्ल्यास लागली. दिल्लीचा किल्ला अपेशी, दोचौ रोजांत हस्तगत जाला. महंमदशाहा[५८] पातशाहास धरून कैद केलें. पादशाही तोशी-खाना* झाडून लुटला. पातशाहाजादीची देखील अबरू राहिली नाहीं. किल्ल्यांतून वस्त्रहरण करून पातशाही तक्त[५९] देखील काढिलें. परंतु तक्तावरील कचेरीस रुप्याचें छत होतें, तेवढें मात्र ठेवून मर्यादा राखिली. अवघे शहरचा विनाश करून पातशाहा कैद करून नादिरशाहा याणें (मजमूचे टिळियावर[६०]) मुकाम करून राहिला. किलिजखान रसाला व तोफा घेऊन मागून आला. बाह्यार्थ कृत्रिम[६१] शिष्टाई करून नादिरशाहास भेटून पातशाहास सोडविलें. नादिरशाही जाहाल्यावर तो आपले रुमाकडे गेला. तों पातशाही उमराव जिकडील तिकडे आपापले ठिकाणीं [जे] गेले ते फिरोन आज दिवसपर्यंत कोणी आले नाहींत. मनसूर अली गंगापार गेला. तो अयोध्येचा सुभा संभाळून तिकडेच राहिला. पुन्हा भागीरथी उतरून अलीकडे आला नाहीं. तेव्हां महंमदशाहा सहजच निर्माल्यवत [जाहाला]. एक किलिजखान मात्र जवळ भारी. तेवेळेस किलिजखान याणें पातशाहास प्रत्युत्तर केलें कीं, "दखनी बंदर किस तऱ्हेसे नाचतीं[६२], है? साहेबांचे खातरेस आले कीं नाहीं?" म्हणोन बोलतांच पातशाहास परम विषाद आला. तों 'जोर थोडा आणि घुस्सा बडा.' काय करतील? किलिजखान याणें वजिरी आपला पुत्र गाजुदीखान होता त्या गाजुदीखानास देऊन बंदोबस्त करून दक्षिणेस आला. याप्रमाणें वर्तणूक जाहाली. हें तुम्हांसही

---

५६. "जशी द्वारका नांदत होती तशी दिल्लींतील प्रजा नांदत होती" असा क० प्रतीचा पाठ आहे 'जशी' पासून तिच्या ११ व्या बंदास प्रारंभ होतो.

५७. चिंधीचोळा=लूट, लुबाडणें, विध्वंस.

५८. बखरींत पुष्कळ ठिकाणीं 'अहंमदशहास' असें आहे. पण तो हस्तदोष किंवा बखर रचणाराच्या गैरमाहितीचें फल होय.

* तोशीखाना=सरकारी खजीना.

५९. हें मयूरावरील तक्त शाहाजहान याणें साडेसहा कोटी रुपये लावून तयार केलें होतें!!

६०. मजमूचे टिळियावर—मुजुमूचा टिळा हा दिल्लीचा एक भाग असावा.

६१. 'कोर रुत्रिम' क० प्रत.

६२. 'दक्षणी बंदर किस तऱ्हासे [तऱ्हेसे?] नाच्या?' क० प्रत.

वर्तमान सर्व माहितच आहे.” म्हणोन नजीबखान रोहिला सविस्तर बोलता जाहाला. “आतां त्या तागाईत पातशाही उमराव गनिमास मिळोन आपली अबरू रक्षून आहेत. त्यांत मनसूर अलीचा पुत्र सुजा उद्दवला यास मात्र वजिरीचे दुःखं[63] आहे. त्याजपाशीं पन्नास साठ हजार फौज व तीनशें तोफा आहेत. तो मात्र लगामीं लागेल. मारवाड प्रांतांतील बिजेसिंग राठोड तो गनिमाशीं मिळता दिसत नाहीं; तोही प्रयत्न केल्या हस्तगत होईल. व माधवसिंग जयनगरकर याचे दोहीं डगरींवर हात आहेत व सुरजमल जाट तो आपला नव्हे. तसेच बुंदेले व आणखी उमराव आपले नव्हेत. परंतु यास आधीं निमित्यास[64] धनी पाहिजे. जर म्यां घेतलें तर मजला आश्रय पाहिजे. आतां उपाय एक आहे कीं, खंदाहारचा पातशाहा अबदुल अली दुराणी एक मातबर आहे. त्याचा पुत्र तैमूरशाहा यास तुमची कन्या चंदाजमानी द्यावी. दिल्लीचा पादशाहा अलमशाहास मारून [पातशाही] तैमूरशाहास[65] द्यावी व वजिरी सुजाउद्दवला यास द्यावी. आणि बक्षीगिरी[66] मजला द्यावी. असा करार होत असल्यास हुकूम जाहल्यास प्रयत्न करीन” म्हणोन बोलून खुर्नीस केली. हें मलका जमानीनें ऐकून मान्य करिती जाहाली. ‘ स्त्रीबुद्धिः प्रलयं गता !’ तिचें यांत काय जातें ?

२७. याप्रमाणें तिचा व त्याचा दारमदार होऊन, नजीबखान ठिकाणास येऊन वकील व पत्रें सुजाउद्दवल्याकडे पाठविलीं. त्याणें पत्रें पाहून, परम खुशाली मानून, वकिलापाशीं सानक-रोटी दिली कीं, “मी सर्वस्वीं तुमचा आहें. हिंमत धराल तर फौज व लागेल तितका पैसा पुरवीन. परंतु वजारत एक वेळ करीन.” म्हणोन पुरता बंदोबस्त करून वकील आला. तसेंच जयनगरकर व हामदखान लंगडा[67] व बिजेसिंग यांजकडील सूत्रें ठीक करून, याणें आपला भाऊ सुलतानखान रोहिला यास अबदालीकडे खंदारास पाठविला कीं, “दिल्लीची पादशाही तुझा पुत्र तैमूरशाहा यास देऊन मलकाजमानीची

---

६३. दुःख वजिरी गेल्याचें. ‘ मुख ’ असें कांहीं प्रतींत आढळतें.

६४. “ परंतु यास (ज्यास ?) आधीं निर्माल त्यास धनी पाहिजे ” सां० प्रत. ‘ यास आधीं एक निमित्य घेतलें पाहिजे. निमित्य घेतलें तरी जरा कांहीं आश्रय पाहिजे ’ क० प्रत.

६५. “तंबूरशहा” असा पुणें प्रतीचा व तुं० प्रतीचा पाठ सर्वत्र आहे.

६६. बक्षीगिरी=सेनाधिपत्य.

६७. ‘ अनुपशहर–कर आमदखान लंगडा ’ क० प्रत.

कन्या चंदाजमानी तैमूरशाहास देईन. दिल्लीचा भेद झाडून मजपाशीं आहे. चढत्या घोड्यानिशीं दिल्लीचा किल्ला हस्तगत करून देईन." म्हणोन भावास खंदारास पाठविलें. हें वर्तमान गाजुदीखान यास रतीमात्र ठाऊक नाहीं. इकडे तो नजीबखान रोहिला केवळ हितशत्रूप्रमाणें गाजुदीखान यास जाबसाल करून, केवळ त्याचे उपक्रमांत राहून, तमाम गारोडी रान भारतो तसा प्रकार [त्यानें] केला. सुलतानखान खंदारास जाऊन पोहोंचला. अबदालीस भेटून येथील वृत्तांत निवेदन केला. तोंही आधींच इकडे यावयास आतूर होता. "वजारत सुजाउद्दवला यास द्यावी, मलकाजमानीची कन्या चंदाजमानी तैमूरशाहास देऊन दिल्लीची पातशाही तैमूरशाहास द्यावी आणि बक्षीगिरी नजीबखान यास द्यावी." येणेंप्रमाणें करार करून ऐशीं हजार फौजेनिशीं दिल्लीवर चाल केली. लाहूर, मुलतान, पंजाब कुल मुलूख काबीज करून व्यास[६८]गंगा व चिनाब व शतद्रू नदी उतरून सरद[६९]देस येऊन मुकाम केला.

२८. ही बातमी पक्की दिल्लीस गाजुदीखान वजीर यास कळली कीं, "दुराणीची दौड निश्चयें दिल्लीवर आली" तेव्हां नजीबखान रोहिला मात्र चार हजार फौजेनिशीं मातबर माणूस वजिराजवळ होता. तसाच गनिमांपैकीं अंताजी माणकेश्वर शहरचे गिर्दनबाजीस पांच हजार फौजेनिशीं होते. ते समयीं गाजुदीखान याचे पातशाही कारभारी नागरमल्ल व बाहादूरखान बलोचे होते [ते] व अंताजी माणकेश्वर व नजीबखान रोहिला असे मिळवून परम [७०]आजिज होऊन मनसुबा पुसता जाला कीं, दुराणीची दौड [७१]भारी. दक्षिणच्या फौजा गनीम कुल झाडून दक्षिणेस गेल्या. एक नजीबखान रोहिला व अंताजीपंत दोघे मात्र मातबर आहेत. तेही झाडून दाहा हजार. यास उपाय काय करावा ?" हें वर्तमान ऐकून अवघे दंग झाले. एकमेकांस राजे कोणी कोणास बोलेनात. असे मुहूर्त-मात्र ब[७२]सले. तों नजीबखान रोहिला, केवळ मात्रागमनी, याणें उठोन खुर्नीस करून अर्ज केला कीं, " मी साहेबांचे पदरीं आहें तों वजिरांनीं कांहीं फिकीर करावी असा अर्थ नाहीं. आतां त्यांशीं युद्ध

---

६८. व्यासगंगा=बियास नदी.

६९. सरद=सरहिंद.

७०. 'आजीद' असा पाठ क० प्रतीचा सर्वत्र आहे.

७१. " बदनजर धरून दिल्लीवर चाल करून येत आहे " असें वाक्य क० प्रत 'भारी' पुढे देते.

७२. 'स्तब्ध राहिले' असें 'बसले' ऐवजीं क० प्रत लिहिते.

करावयास सामर्थ्य नाहीं, [तर] मजला हुकूम करावा. आडवा जाऊन त्यांस भेटून कळेल तैसा साम, दाम, दंड, बुद्धिभेद करून त्यांस दिल्लीस न येतां तेथूनच माघारां फिरोन लावीन." म्हणोन हितशत्रुपणें बोलतांच गाजुदीखान यास वाटलें कीं, नजीबखान केवळ प्राणाचाही प्राण, प्राणाहून परता, याजवर काया कुरवंडी करावी. म्हणोन त्याचें बहुता प्रकारें समाधान करोन, त्यास हत्ती व घोडा व शिरपेंच व मोतियांचा तुरा देऊन त्याची रवानगी केली.

२९. तों अबदुल अली तेथून कुरुक्षेत्रावर आला. तेथील तीर्थविध्वंस करून, ब्राह्मणांचीं [७३]घरें पाडून आठ मुकाम तेथें केले. त्या मुकामीं नजीबखान रोहिला जाऊन पोंचला. ते समयीं अबदुल अली-कडील वजीर व सैमदखान[७४] कत्तलबाज आडवे येऊन बहूत सन्मानें घेऊन गेले. पातशाहाची भेट जाहाली. तेथें सुकौंणूं[७५] सुलतान होता. भेट होतांच दारमदार करून पूर्ववत प्रमाणें त्याची सानक-रोटी यास आली. याणें आपली सानक-रोटी त्यास दिली. [७६] ते समयींच तेथून कूच करून पाणिपत कर्णोल येथें आले. ते समयीं बाहादरखान बलोचे याचा पुत्र बाहादरगडीं होता तो रातोरात दिल्लीस येऊन पोंचला. इकडून नजीबखान सांडणी-स्वारांसमागमें वरचेवर पत्र पाठवी कीं, "वजिरांनीं कांहीं फिकीर न करावी." त्याजवरून हे आपले जागां स्वस्थ होते. बाहादरखान याचा पुत्र येऊन, वजिरास भेटून, तेथील सविस्तर सांगितलें कीं, "नजीबखान त्यांजकडे मिळाला. एक दोहों दिवशीं येऊन पोहोंचतो. तुम्ही त्या मात्रागमनीवर स्वस्थ कसे राहिलां ?"

३०. हें वर्तमान वजिरानें ऐकून बहूत घाबरा जाहाला. "मात्रागमनीनें निमकहरामी केली. यास यत्न काय करावा !" म्हणोन अंताजी माणकेश्वर यांस बोलावून सांगितलें कीं, "तुम्ही शहरची गिर्दनवाजी करावी, मी किल्ला संभाळतों," हें अंताजीपंतांनीं ऐकून साफ उत्तर केलें कीं, "शहर-पन्हा थोर, फौज थोडी. आम्हांस हे हिंमत होत नाहीं." म्हणोन कूच करून बालमँगडावरि[७७] मुकाम केला. तों दुराणीही दुसरे दिवशीं येऊन पोंचले. आधींच शहर

७३. 'आग्रहें' तु० प्रत.

७४. 'समदखान कत्तलवाज' असें तुंगार प्रतींत आहे. 'शहामतखान' पाठभेद.

७५. 'सुका सुलतान' तुंगार प्रत. 'सूत्रधार' सां० प्रत व क० प्रत.

७६. "ते समयीं दिल्लीहून कूच करून अंताजी माणकेश्वर कर्नोळ येथें आले होते" असें वाक्य क० प्रत येथें देते.

७७. 'बलक' किंवा 'बालक' असें तुंगार प्रतींत दिसतें.

खालीं आणि नजीबखान तो केवळ भेद्यां! चढते घोडियांनिशीं शहर घेतलें. तों गिलच्यांची ताकीदं भारी. तो शहरांत दाहा हजार गिलच्यांनीं मारले. केवळ धुंदी जाहाली. शहरचा नाश केला. पूर्वी नादिरशाही जाहाली त्याहून भारी प्रलय जाहाला. तों अबदुल अली दुराणी जुमा मशिदीस येऊन आपला स्वधर्म उजू-तवाजू करीत होता. तों अर्जबेगांनीं अर्ज केला कीं, "शहरांत गर्दी होऊन दुराणीची बहूत कत्तल जाली." तों नजीबखान रोहिला व सैमदखान कत्तलबाज जवळ होता; अबदुल अलीनें त्यांचे तोंडाकडे पाहून जवळ निमचा होता तो अर्धा ओढून जवळ ठेवितांच 'कत्तल' म्हणोन पुकार जाहाला. ते समयीं त्यांची कत्तल काय? पुरुषच मारावा असा अर्थ नाहीं. पुरुष व स्त्री, मुलेंबाळें व गाढव, कुत्रें व गुरूं हाताखालीं सांपडेल त्याची कत्तल करावी. अशी साडेतीन घटकापर्यंत कत्तल जाली. तों अबदुल अलीनें निमाजें करून करांचली ओढून ठेविली होती तीस मेण करून ठेविलें. मेण करितांच 'द्वाही' म्हणोन पुकार *जाला तों गिलच्याची कैद भारी. ताकीद म्हणतांचें मानेवर सुरी ठेविली असली तरी सोडावें. साडेतीन घटकांत अठरा हजार मनुष्यांची कत्तल जाहाली! तो प्रळय काय लिहून कळवावा? याप्रमाणें शहरचा चिंधीचोळा करोन, किल्ल्यास येऊन लागले. दोचौ दिवसांत किल्लाही घेतला. पातशाहा अमलशाहा होता तो केद केला. गाजुदीखान यास धरून कैद केला. त्याची मावळेण व बहीण व त्याच्या कळावंतिणी वगैरे नजीबखान याणें आपले घरांत घातल्या. नजीबखान मात्रागमनी तो या प्रकारचा! मलका-

---

७८. "नजीबखान तो हकहरामी बहूत आहे. तेव्हां जें करणें तें सांभाळून करावें. नाहीं तर त्याजला धरून आणावें अशी ताकीद बादशाहानें केली" सां० व तुंगार प्रती.

७९. ताकीद = कैद, जरब, शिस्त. 'दहशत' क० प्रत.

८०. "तों शाहरांत दाहा पांच हजार गिलचे मारले गेले. केवळ धुंदी जाली." असा तुंगार प्रतीचा पाठ आहे, तो बरोबर दिसतो. शहरकरी यांनीं गिलचे मारिले म्हणून दिल्लीकरांची कतल गिलचांनीं केली असें दिसतें. 'शाहर' असें तुं० प्रत सर्वत्र लिहिते. वरील पाठ पु० वगैरे प्रतींचा होय.

८१. 'सैद महमद कत्तलबाज' असा पाठ क० प्रतीचा सर्वत्र आहे.

८२. "निमाजामा करून" पुणें प्रत.

८३. करांचली=निमचा. देशावर मराठे लोक हा शब्द फार वापरतात.

* 'पुकार जाली' असा स्त्रीलिंगी प्रयोग तुं० प्रत दोन्ही ठिकाणीं करते.

८४. "त्याचे मामास धरिला; वजीर याची बाईल व कळवंतीण वगैरे" क० प्रत.

जमानी इची कन्या चंदाजमानी होती ती तैमूरशाहास दिली. चार रोज तेथें राहून आगरियाचें रोखें चाल केली. समागमें कैदेंत गाजुद्दीखान यासही घेतलें आणि अलमशाहास किल्ल्यांतच कैद करून ठेविलें.

३१. तों अंताजीपंत येऊन पलवॅलावरी राहिले. नजीबखान याणें गाजुद्दीखान याचा शिरच्छेद करावा म्हणोन बहूत आग्रह केला. परंतु ते समयीं अबदुल अलीनें कैदेंत आहे म्हणोन ठेवून राखिलें. अंताजीपंत यांची बातमी पळाल्याची कळतांच सैमदखान कत्तलबाज पंधरा हजार फौजेनिशीं त्याजवर गेला. अंताजी माणकेश्वर यांणीं हिंमत धरून फौजेचा मोकाबला घेतलॅा[८६]. तों यांची[८७] जड काया धाकटे घोडियावर थोर घोडा टाकावा तों धाकटा दबून राहतो, तैसा प्रकार जाला. दोन घटिका मारामारी झाली. तों अंताजीपंतांस साहेनासें जालें. मग अंताजीपंत रेवाडीचे रोखें* निघोन गेले. पांच हजार फौज होती त्यांतून अडीच हजार फौजेची कत्तल जाली. जितके निवडक माणूस तितके ठार जाले. तो खांसा अबदुल अलीचा मुक्काम पलवलावर जाहाला. पुढील आघाडीची फौज होडॅलेवाना [ला?] कडून छाचे सराईवर जाऊन पोंचली. तेथून मथुरा वृंदावन कच्चे सोळा कोस राहिलें. मथुरेंतील ब्राह्मण व बैरागी यांस गनिमाचे फौजेचा इतबार म्हणून बेसावध होते. तों एकाएकीं झाडून दौड येऊन पोंचली. वृंदावनांत आठ हजार बैरागी होते ते हत्यारें धरून मेले. गिलच्यांनीं गोखडींत[९१] दहा पांच बैरागी सत्पुरुष होते तेही बसले

---

८५. पलवल, होडल, रेवडी वगैरे ठिकाणें दिल्लीच्या अलीकडे दक्षिणेस आगऱ्याच्या मार्गावर आहेत.

८६. "गांठ पडोन अंताजी माणकेश्वर यांणी हिंमत धरून लढाई देऊन त्यांचा मोहोरा फिरवून देऊन आपण निघोन रेवाडीचे रोखें[निघाले] दोन घटका मोठी करांचलीची हातघाई जाली" क०प्रत.

८७. म्हणजे गिलच्यांची.

८८. "मारामारी हणाहणी सणासणी जाली तों अंताजीपंतास साहेनासें जालें. मग अंताजीपंत रेवाडीचे रोखे" तुं० व सां० प्रती.

* 'मुक्कामीं' पु० प्रत.

८९ 'होडलेकडोन छऱ्याचे राईस जाऊन राहिली' सां० प्रत. 'होडलेकडून छयार्ते-राईस' तुं० प्र० 'पुढील आघाडीची फौज होडवावरून छारेसराईवर जाऊन पोंचली' धो० प्रत. 'होडेवरून छार्ती सराहीवर जाऊन पोंचली' सां० प्रत व क० प्रत. वरील पाठ पु० प्रतीचा

९० 'साठ' पुणें व सां० प्रती 'सात आठ हजार' क० प्रत.

९१. 'गोपडी' तुं० प्रत. गोखडी= गाई उभ्या राहण्याची जागा, गोठण 'गौघाटावर' सां० प्र०

ठिकाणीं जेबें[१२] केले. दुराणी केवळ निर्दये[१३], त्यांस मनुष्याची परवा नाहीं. तसेंच मथुरेस हजार दीडहजार ब्राह्मण मारिले. तरुण ब्राह्मणी व अन्यत्र जातीच्या स्त्रिया होत्या त्यीं[१४] धरून ठेविल्या. त्यांत कित्येक पतिव्रता स्त्रिया होत्या त्यांणीं जिवावर उदार होऊन यमुनेंत जीव द्यावा म्हणोन डोहांत चालिल्या. तों 'संकटीं ईश्वर सहाय, ' तसें जाहालें. प्रत्यक्षास प्रमाण. डोहांत पाणी भाला-भर असतां बायकांस मांडीभर लागोन नदीपार जाहाल्या. त्यांचे मागें गिलचे घोडे घालावयास गेले ते बुडों लागले! ईश्वरानें कौतुक केलें. ही गोष्ट कोणी मिथ्या मानावी असें नाहीं. बहूत साक्ष आहेत.

३२. या प्रकारें क्षेत्राचा चिंधीचोळा करून गोकुळापलीकडे गोघाट म्हणून [ आहे. ] पूर्वीं देव गाई वनांत चारून त्या घाटावर पाणी पाजावयास आणीत होते म्हणोन 'गोघाट' नांव पडलें. तेथून कच्चे सात कोस आगरियाचा किल्ला होता. यमुनेच्या तीरानें मुकाम दुराणीचा जाहाला होता. गाजुदीखान कैदेंत होता त्याची राउटी नदीचे कडेस होती. भोंवताले रखवालीचे रोहिले सावधच होते. पाणियाचे रोखें पाणी भारी म्हणोन गैरसावध होते. ते समयीं गाजुदीखान यास पाणियांत पोहावयाचा सराव चांगला बहूतच होता. त्यानें राखणदारांची नजर चुकावून रात्रीचे ठायीं डोहांत गेला. पोहत नदीचे तीर सोडून मध्यभागीं कांहीं पोहत कांहीं ठाव घेत असा आगरियास जाऊन पोहोंचला. कडेस निघोन, रात्र चार घटका पाहाटेची राहिली होती, ते समयीं निघोन उघडा बोडका किल्ल्याचे दरवाजियास जाऊन पोंचला. तों जवळ शह लष्करचा भारी म्हणोन किल्लाही सावधच होता. तेव्हां दरवाजियाचे लोकांस हांक मारून सांगितलें कीं, "मी गाजुदीखान ऐशा अरिष्टांतून पार पडून तुमचे पाठीशीं निघावयास आलों आहे. आजिचे समयीं मजला किल्ल्यांत घेऊन जीवदान द्यावें, असें किल्लेदारास सांगावें." हें वर्तमान किल्लेदारास दरवाजेकरी यांणीं सांगतांच किल्लेदारानें मशाला लावून दरवाजियाच्या खिडक्या[१५] उघडून बाहेर आला.

३३. आगरियाचा किल्ला यमुनेच्या तीरीं आहे. एकेकडून यमुनेचा खंदक व एकेकडून खाणून खंदक. दोन्हीं तोंडें यमुनेस मिळवून खंदकांत

---

१२. 'जर्ब' पु० प्र० जेब=ठार. 'जे बा' क० प्रत.

१३. ".दयेची जात त्यांजपाशीं नाहीं. दैत्यच ते! त्यांजला मनुष्य म्हणजे मत्कुणप्राय" अशीं 'निर्दय' शब्दापुढें वाक्यें क० प्रतींत आहेत.

१४. 'बांद धरून नेल्या' तुं० प्रत.

१५. 'दिंड्या' क० प्रत.

पाणी बेमुबलक. दरवाजियापुढें खंदकावरून फळयांवरून जावें यावें. फळ्या काढल्यावर यत्न नाहीं. तो किल्ला केवळ असाध्य. एकांत एक पांच परीघे किल्ल्यास. दर परिघास दोनशें तोफा व शिवाय धाकटीं यंत्रें, अशीं किल्ल्यावर बाराशें तोफा वगैरे [यंत्रें] दारूगोळी वगैरे सरंजाम पोक्त. तो दुर्ग केवळ अवघड. आगरियाप्रमाणें भुईकोट किल्ला कोठें उपमेस नाहीं. ज्या वेळेस अकबरशाहा पातशाहा यांणीं किल्ला बांधिला त्या वेळेस किल्लेदार आंतील सामान–यंत्रधारी व गोलंदाज–ठेविले ते वंशपरंपरा किल्ल्यांत राहात आले. अलीकडे औरंगजेब महाबळी आदिकरून पातशाहा जाले आणि गनिमाचीही प्रबळता जाहाली. पलीकडे अटकेपर्यंत गनिमांनीं मुलूख काबीज केला. परंतु किल्ला कोणास आला नाहीं. सुरजमल्ल जाट फौजे करून मोठा बलिष्ठ आणि गर्वही बहूत होता यास शहरचीं गिर्दनवाजी दिली होती. परंतु त्यासही किल्ला असाध्य. त्याचें वेतन ज्यांनीं आगरियाचे महालाचें स्वामित्व करावें त्यांणीं किल्ल्यांतील पोटापाणियाची बंदोबस्ती करावी. तो किल्ला अकबरशाहा पातशाहा यांणीं कांहीं पृथ्वी–दिग्विजय करून रुपये मिळवून बांधिला, असें नाहीं. त्यास किमया अवलिया फकिरापासून प्राप्त जाहाली होती. त्या किमियाचे द्रव्यें करूनं एवढें असाध्य दुर्ग निर्माण केलें होतें. दारूगोळा यंत्राचें साहित्य याजप्रमाणें कोणत्याही किल्ल्यावर नाहीं.

३४. [ असो ] तेथें गाजुदीखान पोहोंचतांच तो किल्लेदार बाहेर आला. आणि ओळख घेतली. तों गाजुदीखान प्रमाण. जीवदान मागतांच किल्लेदार बोलता जाला कीं, " ज्यापासून आम्हांस किल्ल्याची किल्लेदारी त्यापासून कधीं पारखी मनुष्य येऊं दिलें नाहीं. " असें म्हणतांच गाजुदीखान याणें उत्तर केलें. कीं, " तुमचा आश्रय धरून जीव जगवावयास हृदयीं निश्चय करून एथवर आलों. यमुनेनेंही तारिलें. आतां आपले हातून मारून टाकणें किंवा किल्ल्यांत नेणें. " असें ऐकून किल्लेदार याणें चित्तांत योजना केली कीं, "एक पुरुष किल्ल्यांत आलिया काय होणें ? यासमयीं यास रक्षावें हें उचित" म्हणोन किल्ल्यांत नेला. वस्त्रें देऊन समाधान केलें. मुदारतीनें ठेविलें.

---

९६. 'बेमुबलक' पु० प्रत. 'विपुल' क० प्रत.

९७. 'त्या दादरावरून किल्ल्यास जाण्या येण्यास मार्ग' असें येथें क० प्रत. देते.

९८. 'फळयांच्या' ऐवजीं 'पाट्या' असें तुं० प्रत दोन्ही ठिकाणीं लिहिते. 'तक्ते लांकडाचे ' क० प्रत.

९९. परीघ, परिघ=तट, भिंती.

१००. 'एकशेहें आठ दुर्ग बांधिले' असें वाक्य येथें क० प्रत देते.

१. पारखी=परकी.

३५. तों मागें गाजुदीखान गेला म्हणोन हांक जाली. नजीबखान रोहिला याणें चौकीदारांचा शिरच्छेद केला. गाजुदीखान याचा तपास केला. तों वजीर आगरियाचे किल्लां दाखल जाला हें ऐकून नजीबखान मनगटें चावूं लागला. कूच करून, अबदुल अली यमुनापार आला. आगरियाचे किल्ल्यानजीक मुकाम करून राहिला. पांच गिलचे व पत्रें किल्लेदारास लिहिलीं कीं, "गाजुदीखान यास आमचे हातीं देणें आणि किल्ला खालीं करून देणें. नाहीं तर मी खंदारचा पातशाहा अबदुल अली आहें. किल्ला खाणून यमुनेंत टाकीन आणि तुझा शिरच्छेद करून तुझीं रांडापोरें ढाणेंकास देईन.[२]" म्हणोन रवाना केले. ते किल्ल्यास पोहोंचले. किल्लेदार याणें पत्रें वाचून पाहिलीं. चित्तांत विचार केला कीं, "अबदुल अली पातशाहा शाहाणा म्हणोन ऐकतों.[३] असें असतां असा प्रकार लिहिला. त्यास याचा खावंद नादिरशाहा आला होता त्याणें काय केलें? तो याच्या हातें काय होणें?–तथापि हुषारी केली पाहिजे.[४]" किल्लेदार यानें शाहाणपण केलें कीं, "गिलचांस धुडावूं तरि जी गत दिल्लीची व मथुरेची तीच गत आगरियाची होईल." असें जाणोन दोघे गिलचे दरवाजियांत ठेविले. तिघे माघारे पाठविले कीं, "पातशाहांनीं चार दिवस कृपा करावी. चौं दिवशीं किल्ला खालीं करून देतों. आणि गाजुदीखान वजीर यास हजर करितों." म्हणोन लिहून पाठविलें आणि किल्ल्यांत मोठमोठे लोक कबिले सहित होते व गोरगरीब होते त्यांस सांगितलें कीं, तुम्हीं चार दिवस बाहेर जावें. किल्ल्यांत राहाण्याचें प्रयोजन नाहीं. अशी ताकीद करून धांडोरा पिटवून काढून दिलें. कारणिक लढाऊ लोक मात्र किल्ल्यांत ठेविले. बाकीचा खेळखाना काढिला.

३६. [याप्रमाणें] तमाम शहरांत ताकीद करून शहर चौ रोजांत बेचिराख केलें. आगरियांत कुत्रें राहिलें नाहीं, तेथें मनुष्य कैसें असेल? यावरि किल्लेदार यांणीं ज्या रोखें गिलचा मुक्कामास होता ते बाजूस चारशें तोफा दारूगोळा

---

२. "ढानकास वाढीन" सां० प्रत ढाणक=मांग महार वगैरे.

३. यापुढें "यापत्रावरून सूकरच दिसतो. मस्ती फार असे" असें सांगली प्रतींत आहे.

४. 'हुषारी केली पाहिजे.' या पुढें "किल्लेदार याणें शहरांतील शोध केला कीं शहर निखालस उजाड जालें कीं वस्ती आहे. तो भारधडी झाडून गेली. परंतु वस्तीस मनुष्यें होतीं." इतकाच मजकूर पु० व तुं० प्रतींत आहे. वरील पाठ कल्याण प्रतीचा. भारधडी = जड सामान. 'निवडक लढाऊ लोक मात्र ठेविले' सां० प्रत.

भरून सिद्ध करून [ठेविल्या] आणि अबदुल अलीस एक चिठी लिहिली कीं, "आज आमचा खुशालीचा दिवस आहे. जलदीनें कूच करणें, नाहीं तर तोफांस सिलिक होईल." म्हणोन चिठी लिहिली. एके गिलचास तोफेच्या तोंडीं देऊन उडविला. एक चिठी देऊन पाठविला. हें वर्तमान अबदुल अलीनें व नजीबखान यानें ऐकून, मनगटें चावूंन किल्ल्यावर हल्ला करावा म्हणोन फौज सिद्ध केली. तों किल्लेदार यानें चारशें तोफांची एकदांच सरबत्ती केली. फौजेंत एकदांच चारशें गोळा येऊन पडतांच मोठा प्रलय जाहाला. जलदीनें लष्कर तयार होऊन पळों लागलें. दोन तीन कोस जाऊन दम खाद्ला. तेथेंही पल्लेदार तोफांच्या गोळ्यांपुढें टिकाव होईनासा जाहाला. पांच कोसावर मुक्काम केला. नजीबखान रोहिला यास अबदुल अली [यानें] मसलत विचारली. तेव्हां नजीबखान याणें उत्तर केलें कीं, "आगरियाचा किल्ला भारी. तेथें कोणाचाही यत्न नाहीं. किल्ला मोठा बिकट आहे. फितुरीशिवाय किमपि यावयाचा नाहीं. येथें आम्हांस गुंतणें भलें नव्हे. देशींहून गनिमाची फौज रघुनाथराव व मल्हारराव होळकर नर्मदा आलीकडे आले आहेत. अशी बातमी तहकीक आहे. शहास गुंतणें उत्तम नाहीं."

३७. म्हणोन कूच करून कुंभेरीचे रोखें चाल केली. सुरजमल्ल जाट यास चिठी लिहिली कीं, "क्रोड रुपये खंडणी घेऊन हुजूर भेटीस येणें." म्हणून चिठी आली. सुरजमल्ल जाट याणें रूपराम कटारी यास बोलावून मनसुबा विचारला कीं, "अबदुल अली खंदारचा पातशाहा चालून आला. सामान्य नव्हे. यास जाबसाल काय करावा?" रूपराम कटारी मोठा मनसुबेबाज. यानें उत्तर केलें कीं, "देशींहून गनिमांच्या फौजा नर्मदा उतरून आल्या. यास शहास पडावयास दम निघत नाहीं. मेजवानी म्हणून दहा लक्ष रुपये घेत असल्यास उत्तम, नाहीं तर झुंजास उभें राहावें. तों पावेतों गनीम यांच्या फौजा येऊन पोंहोंचतील." हा मनसुबा सुरजमल्ल जाट याचे ध्यानास आला. अबदुल अलीस चिठी लिहिली कीं, "दहा लक्ष रुपये मेजवानी देतों. हे घेऊन स्नेह राखून जावें. नाहीं तर युद्धास सिद्ध आहों." म्हणोन चिठी येतांच यांणीं

---

५. 'सणाचा आनंदाचा' सां० प्रत.

६. 'सिलक' शिलक=बत्ती देणें. 'शिस्त' सां० प्रत.

७. 'चावून' च्या ऐवजीं क० प्रत सर्वत्र 'चोळून' असा पाठ देते.

८. 'दक्षिणेकडून' सां० प्रत.

९. 'रघुनाथ इ०' मागें पृ० २२, कलम २५, टीप १४ पाहा.

१०. 'सला' पाठांतर.

गनीम यांचे धास्तीवर मान्य केलें. दहा लक्ष रुपये घेऊन परस्परें कागदीं पत्रीं स्नेह संपादून दिल्लीस पोंचले.

३८. [पुढें] सुजाउद्दवला यास आणून वजारत द्यावी, तैमूरशाहास तख्तीं बसवावें. हा मजकूर होता तो राहिला. अबदुल अलीनें चित्तांत विचार केला कीं. "हा नजीबखान मात्रागमनी. ज्याचे येथें वाढला त्याची गत या प्रकारची केली. याचे भरंवशियावर पुत्रास येथें ठेवणें उचित नाहीं." म्हणून अंतरीं मजकूर करून नजीबखान यास समजाविलें कीं, "प्रस्तुत आम्ही खंदारास जातों. पेस्तर सालीं येऊन अवघा बंदोबस्त करितों. तों पावेतों तुम्हीं दिल्लीचा किल्ला राखावा" म्हणोन नजीबखान यास पांच हजार फौजेनिशीं दिल्लींत ठेविला. पातशाहा अलमशाहा यास जिवें मारावें तें न करून, जीवदान देऊन, तसेंच रक्षोन, कूच करून कुरुक्षेत्राकडून सरदेंत सैमदखान कतलबाज दाहा हजार फौजेनिशीं ठेविला. समागमें मलकाजमानी व तिची कन्या चंदाजमानी नेली. तैमूरशाहास वीस हजार फौजेनिशीं लाहुरास ठेवून अबदुल अली खंदारास गेला. मागोन तैमूरशाहाही गनिमाचे धास्तीमुळें निघोन आपले ठिकाणास गेला.

३९. हें[११] वर्तमान राजश्री रघुनाथराव दादा व मल्हारजी होळकर यांणीं ऐकून दबत दबत चालिले होते ते मजल दर मजल चालले. चमेली उतरून आगरियानजीक आले. इकडे अंताजी माणकेश्वर यांनीं दत्ताजी शिंदे यांस पंत्रांवर[१२] पत्रें पाठविलीं कीं, "हिंदुस्थान हातचें गेलें. जलदीनें फौजबंदी करून येऊन पोहोंचावें." त्यावरून शिंदे यांनीं नालबंदीचे दिवस नसतां वैशाखमासीं चाळीस हजार फौजेस नालबंदी[१३] दिली. तयार होऊन जावें तों दिल्लीच्या वकिलांचीं पत्रें आलीं कीं,"दुराणी आपले फौजेसुद्धां निघोन आपले प्रांतीं गेला. राजश्री दादासाहेब यांची फौज चमेलीपार जाहाली. तुम्हीं तूर्त यावयाचें न करावें." म्हणोन पत्र येतांच यांणीं चतुर्मास पर्जन्यकाळ दम खाऊन राहिले.

४०. इकडे राजश्री दादासाहेब यांणीं आगरियानजीक येऊन, सुरजमल्ल जाट यांजपाशीं खंडणी घेऊन, आगरियांत गाजुदीखान होता त्यास काढून आपणापाशीं आणिलें. तेथून मजल दरमजल कूच करून गाजुदीखान यास

---

११. " लाहुरास तंबूरशाहा आहे म्हणोन गलिमानीं ऐकोन " सां० प्रत.

१२. 'पत्रांवर पत्रांचा सूर चेतविला' तुं० प्रत.

१३. नालबंदी=शिलेदारांस चाकरीस ठेवण्याच्या पूर्वी अगर पाठवणीच्या वेळीं कांहीं आगाऊ पैका देतात तो.

घेऊन दिल्लीस पोंचले. शहरचा विनाशकाल. ज्यांनीं यावें त्यानें आधीं वस्त्राहरण करून मग काय तें कर्तृत्व करावें. असा शहरचा सत्यानाश करून किल्ल्यास मोर्चे लाविले. पंधरा दिवस नजीबखान किल्ल्यांतून झुंजला. त्यास पुरतेपणीं उमजलें कीं, “आतां गनीम कांहीं मजला जिवें सोडीत नाहींत. आणि अबदुल अलीचीही कुमक होत नाहीं. आतां आपला बचाव करावा.” म्हणोन अंतस्थ वकील मल्हारराव यांजकडे पाठविला. आणि जाबसाल केला कीं, “मी तुझा धर्मपुत्र[१४] आहे. माझा बचाव करावा. शरण आलिया मरण चिंतूं नये. [हें] समर्थास उचित होय.” असें म्हणतांच मल्हारराव केवळ साभिमानी होता. त्यास ईर[१५] पडली. कीं, “नजीबखान यानें धर्मपुत्र म्हणविलें तेव्हां याचा बचाव करावा.” म्हणोन मल्हारराव राजश्री दादासाहेब यांजकडे जाऊन, बहूत प्रकारें भीड खर्चून, पदर पसरोन, नजीबखानं यास बक्षीस द्यावा मागितलें. दादासाहेब यांचे चित्तांत नजीबखान हा केवळ मात्रगमनी[१६], यास जिवें सोडावें असें नव्हतें. परंतु मल्हारराव यांची भीड भारी, उलगडेनाशी जाली. तेव्हां मान्य करणें प्राप्त जालें. मल्हारराव यांनीं नजीबखान यास किल्ल्यापासून काढून आपणापाशीं ठेविला. अलमशाहास नजीबखान व अबदुल अली यांनीं कैद करून ठेविला होता त्यास मागुती तक्तीं बैसवून, वजिरी गाजुद्दीखान यास देऊन, शहरची गिर्दनवाजी अंताजी माणकेश्वर यास सांगोन, पूर्ववत प्रमाणें बंदोबस्त करून, कुरुक्षेत्रास येऊन पोंचले.

४१. तेथें तीर्थविधी यथापद्धतीनें करून, कांहीं तुळादानें करून, सरदेस जाऊन पोंचले. श्रीमंतांचा काळ उत्कर्ष[१७]. सैमदखान कतलबाज याणें तोंड न दाखवितां पळून[१८] लाहुराकडे जात होता, तो होळकर यांजकडील पेंढारी यांणींच लुटून टाकिला. फौज मजल दर मजल शतद्रू व व्यासगंगा व चिनाब उतरून लाहुरास पोहोंचले. तेथील सुभा संदीपबेग होता. तो दुराणीनें मारून त्याची स्त्री, मूल कैदेंत ठेविली होतीं. तैमूरशाहानें लाहूर सोडून [तो] खंदारास गेला [होता] त्याचीही फौज थोडी बहूत लुटली. लाहूरचा सुभा संदीपबेग याचा पुत्र कैदेंत होता त्यास पांच हजार फौजेनिशीं चाकरीस ठेवून त्याचा दिवाण लक्ष्मी नारायण म्हणोन जातीचा कायस्त होता–बरा

---

१४. ‘धाकटा पुत्र’ सां० व क० प्रती
१५. ‘वीरश्री’ क० प्रत.
१६. ‘मादरचोद’ क० प्रत.
१७. ‘उत्कर्षाचा’ ह्या अर्थी.
१८. ‘गाशा गुंडाळून’ क० प्रत.

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था
१८६ सदाशिव पेठ, बुधवार...

कर्ता मनुष्य होता—त्याचे स्वाधीन लाहूर करून, पंजाब व मुलतान सुद्धां अटकेपर्यंत मुलूख काबीज करून ढाला माघाऱ्या दिल्या. लुटीनें पेंढारी व लष्कर कुबेर जाहालें. रघुनाथराव व मल्हारराव यांनीं मोठें यश संपादिलें. ते सालीं छावणीस तिकडेसच राहिले.

४२. तों देशीं राजश्री नानासाहेब यांचा व बंदेखान अली, निजाम अलीखान यांचा कांहीं बिघाड जाहाला.[19] ते समयीं राजश्री नानासाहेब यांनीं राजश्री जनकोजी शिंदे व दत्ताजी शिंदे यांस नेऊन त्यास सांगितलें कीं, "हिंदुस्थानांत तुम्हीं पराक्रम बहूत केले. मारवाडियासारखे राठोड यांजपासून राज्य सोडविलें, तें आम्ही कानीं मात्र ऐकून तृप्त जाहालों. परंतु आपले दृष्टीनें पाहिलें नाहीं. प्रस्तुत मोंगलांचा व आमचा बिघाड जाहाला आहे, आमची फौज बहुतकरून दादासाहेब यांज समागमें गेली. तुम्हीं फौज अबदुल अलीचे आवईवर ठेविली आहे. प्रस्तुत आम्ही तुमचे जिवावरि बिनघोर आहों. आंवदांची मसलत तुम्हांवर आहे." असें म्हणतांच शिंदे मर्द आणि काबिल मनुष्य, यांनीं मान्य करून जलदीनें सांडणीस्वार पाठवून फौज आणविली. फौजेसुद्धां दसरियाकरितांच नबाब औरंगाबादेसच गांठिला. नबाबाजवळ फौज अगदीं मराठे व्यंकटराव निंबाळकर व जानबा निंबाळकर व गोपाळसिंग राजा खंदारकर व इब्रामखान गारदी;[21] एक जाधवराव निराळा करून तीस हजार फौज होती. तिजवर भोंवतालें[22] गनीम उभे राहात. परंतु मोंगल बाहेर येईना. त्यास मराठियांच्या फितुराचा संशय जाहाला होता. तों मराठियांस ईर ही पडली कीं, "आमचा आभाव[23] नबाबास जाहाला आहे हें उत्तम नव्हे. युद्ध करावें." म्हणोन तमाम मराठे सिद्ध होऊन शहरानजीक बाहेर बागांत उभे राहिले. तों दत्ताजी शिंदे व जनकोजी शिंदे व नानासाहेब यांचा पुत्र खासा विश्वास

---

१९. "नानासाहेब यांची स्वारी पैठणास लग्नाकरितां गेलेली होते [ती]" असें येथें सांगली व क० प्रतींत अधिक वाक्य आहे.

२०. "मारवाड राठोडे म्हणजे बहूत पराक्रमी, लढाईंत पडोन शिरच्छेद जाहाला तरी त्यांचें कबंध रणांत नाचतें. त्या सारख्यांस देखील तम्हीं जेर करून आपली छाप त्यांजवर ठेवून त्या जवळून राज्यहरण करून घेतलें" अशीं वाक्यें क० प्रत येथें देते.

२१. या वेळीं इब्रामखान सलाबतजंगाकडे नौकरीस होता.

२२. 'तीन वार पर्यंत' तुं० प्रत.

२३. अभाव=संशय. हें निजामाकडील मराठे सरदारांचें म्हणणें.

रावें यांनीं फौज सिद्ध करून चालून गेले. नबाब निजाम अली तयार होऊन यांत न मिळतां दुरून तमाशा पाहात उभा राहिला. यांनीं तीन फौजा करून तिन्हींकडून तिघे उठले. जानबा निंबाळकर यांजवर दत्ताजी शिंदे, व व्यंकटराव निंबाळकर यांजवर जनकोजी शिंदे, व वरकड उमराव यांजवर विश्वासराव यांची फौज, असे उठले. व्यंकटराव यांची बहीण जनकोजी शिंदे यांस दिली होती. सोयरे जाहाले तरि एकमेकांचे येथें जेवण्यास जावें. परंतु क्षत्रधर्मांत अंतर करितां येत नाहीं. म्हणोन मराठियांचे गोडहैत्यारींची[२४] मोठी मारामार जाहाली. क्षणभर तरवारीची खणाखणी जाहाली. तों व्यंकटराव यांचे मेहुणे आणि इकडे जनकोजी शिंदे यांचे साडू, राजश्री नागोजी माने म्हसवडकर, यांनीं अवघे फौजेंतोन उठोन जनकोजी शिंदे यांची गांठ घातली. परंतु शिंदे यांजपाशीं करोलांचें[२५] सामान भारी. करोलाकडून मार देवविला. त्यांत नागोजी माने यांस गोळी लागोन ठार पडले. तो गैबींचा[२६] मारा जाहाला. ईश्वरें चित्तांतील हिंमत पुरीं दिली नाहीं. अस्तु. इहलोकीं कीर्ती करून परलोकसाधन केलें. नागोजी माने यांचा मुडदा काढून नेला. त्याजवर सायंकाळही जाहाला. व्यंकटराव यास मेहुणे यांचें परम दुःख जालें. मुलें माणसेंही समागमें होतीं. मायाजाळें सर्वत्रांस परम दुःख जालें. त्यांचें देहसार्थक केलें. नबाब बंदेगान-अली डेरियास येऊन त्यांचे मूल दत्ताजी माने यांचें समाधान केलें. ते वेळीं नबाब यांचे चित्तांतील विकल्प† निघाला.

**४३**. तों[२७] राजश्री रामचंद्र जाधवराव पांच हजार फौजेनिशीं नबाबास मिळावयास ताबडतोब येत असतां तें वर्तमान दत्ताजी शिंदे यांस कळतांच त्यांनीं त्याजवर दहा हजार फौज रवाना केली. फौजेची गांठ पडावी तों रामचंद्र जाधवराव हे शिंदखेडाचा आश्रय करून शिंदखेडांत राहिले. फौजेचे व त्यांचे युद्धप्रसंग नित्य होतच होते. दिवसेंदिवस जाधवराव

---

२४. गोड–हत्यारी=समशेर, भाला इ० शस्त्रांनींच लढणारे; बंदुका तोफा यांनीं दुरून, छपून लढणारे नव्हत, मागें पृष्ठ १० टीप ४९ पाहा. कांहीं प्रतींत 'गाड-हत्यारी' असें आहे. 'गेडे त्यांचे' क० प्रतींत.

२५. करोलाचे–करोल=घोड्यावरील बंदुकवाला शिपायी.

२६. गैबीचा मारा = आडून दिलेला मार, भिंती पाठीमागून केलेला मारा, चोरटा मारा, गोडे हत्यारांचा नव्हे.

† विकल्प स्वतांच्या मराठे सरदारांविषयीं.

२७–२७. येथपासून "मानकरी लोकांचें समाधान करून नांवाजिलें" पर्यंत रामचंद्र जाधवरावाचा वगैरे मजकूर, पुणें, कल्याण व सांगली प्रतींत नाहीं.

पाण्यांचे[२८] तसदीनें जेरीस आला. हें वर्तमान निजाम उल्मुलुख[२९] यांनीं ऐकून भोंवताला तोफांचा आराबा देऊन गोल बांधून बाहेर निघाले. बहूत मोंगल होऊन गेले, परंतु यांजसारिखा काबिल[३०] कोणीच जाहाला नाहीं. तों राजश्री नानासाहेब यांजकडून गोपाळराव व रास्ते व पोवार व आणखी फौज येऊन शिंदे यांसि सामील जाले. मध्यें मोंगल व भोंवताले गनीम वेष्टून हां हूं करीत दोन कोस झुंजत भांडत मजली करून शिंदखेडास दाखल जाले. तों खांसे नाना व भाऊही येऊन पोंहोचले. ते दिवशीं दत्ताजी शिंदे इरेस पडून आपण उडी टाकून करोळ व तोफा व जेजाला व सुतरनाला व हस्तनाला असें ढांसणें[३१] धरून मार दिला. तों मोंगलांचे फौजेचा गोल याजमुळें घोडीं, मनुष्यें पळूं लागलीं. तेसमयीं नबाब बंदेगान अली यांस विषाद येऊन ढांसणावर नीट हौदे चालविले, तेसमयीं दुतर्फा यंत्रांचा कडाखा ऐसा जाहाला कीं, 'न भूतो न भविष्यति.' भडभुंजे लाह्या भाजतात तैशी गत जाली. धुराचे गर्दींत कोणी कोणास दिसेनासें जालें. दत्ताजी शिंदे जसा डुक्कर खळीस येतो तैसे इरेस पडून मारामार केली. तों नबाब केवळ हातघाईस आला. भाऊसाहेब यांचे नेत्र संतोषें[३२] जाहाले. तारीफ केली कीं, "दत्ताजी शिंदे यांचे मर्दुमकीची शर्थ आहे! जसें ऐकण्यांत आलें तसें कर्तव्य करून दाखविलें." असें बोलून मोठें संकटें दत्ताजी शिंदे यांस उखळोन काढिलें. शेंदोनशें खांसे ठार पडले. नबाबासही असें जालें कीं, "गनिमाशीं झुंजें बहूत केलीं, परंतु याप्रमाणें निधडा सरदार मराठियांत नाहीं." म्हणोन त्यानेंही स्तुती करून आपले जागां मुकाम करून राहिले. मानकरी लोकांचे समाधान करून नांवांजिलें. पुढें सलुयाचें सूत्र आरंभिलें. तेव्हां आठ दिवसांत मोंगलाचा व गनिमांचा सल्ला साखरखेडलियाचे[३३] मुकामीं जाला.

४४. नंतर श्रीमंतांनीं राजश्री जनकोजी शिंदे यांस हिंदुस्थानचे मोहिमेस आज्ञा दिली. दत्ताजी शिंदे खांसा चांभारगोंदियास लग्नाकरितां गेले. श्रीमंत निघोन पुणियास गेले. जनकोजी शिंदे चाळीस हजार फौजेनिशीं

---

२८. 'पोटाचे' तुंगार प्रत.

२९. "निजाम उल्मुल्क" बद्दल 'निजाम अली' असावें.

३० 'काविसदार' (कावेदार ?) तुंगार प्रत.

३१. ढासणें, ढासण=तोफांत, जेजालांत दारूगोळा ठांसण्याचें दांडकें.

३२. 'संतुष्ट' या अर्थी.

३३. 'साखर-खंडाळियाचे' सां० प्रत. 'साकर-खंडलियाचे' तुंगार प्रत.

मजल दरमजल हिंदुस्थानांत चालिले. जनकोजी शिंदे यांची उमर तो लहान परंतु पराक्रमास वृद्धाप्रमाणें.[३४] स्वधर्मशील, भक्तिपरायण, नर्मदापार होऊन उज्जनीस दाखल जाले. तेथून पुढें बुंदिवाड्यांत गेले. तों त्या राज्यांत तेथें हरगड म्हणोन होता. तेथें गुमानासिंग म्हणोन गिरोंषा[३५] होता. त्यानें संपूर्ण माळवियांत दहशत लावून गुप्तरूपें खंडण्या घेत होता. त्या गडास एकाएकींच जाऊन पोहोंचले. तो गड उगाच माळासारिखा होता. परंतु भोंवताली झाडीची डांग[३६] भारी होती. तो कांहीं गांवांत सांपडला नाहीं परंतु दोन अडीचशें सामान[३७] व बायका होत्या. तेव्हां जातीचे गिराष, त्यानें रात्रीं मध्यें बायका व भोंवताले गिराषे घालून जरीपटक्याचे निशाणावर चालोन घेतलें. मारामार करीतच मोर्चियांतून पार पडून गेला. तेथें बाळाजी शिंदा म्हणून पाळेक[३८] लेंक होता. नामी सरदार जाला होता. त्यास गोळी लागोन ठार जाला. त्याज समागमें त्याची स्त्री सहगमन गेली.

४५. तेथून पुढें खेचीवाडा व राजगड, पाटण व बुंदी, कोट यांच्या खंडण्या घेऊन जयनगरचे प्रांतांत गेले. तेथील माधवासिंग राजा यानें चार दिवस हिंमत धरून होता. परंतु त्यास झुंजावयास पुरवेना. म्हणून सल्ला करून वीस लक्ष रुपये खंडणी देऊन लाविलें. तेथून पुढें मारवाड प्रांतीं जावें तों उदेपूरकर राणाजीकडील शिवसिंग सिसवदे येऊन जाबसाल केला कीं, " शिवपुरियाचा राजा आमचा चाकर असतां त्यानें घोंटाळा केला. किल्ले व गढिया[३९] बळकावून आम्हांशीं बदलें[४०] होऊन आपले प्रांतांत धामधूम करितो. याकरितां चातुर्मास बरसातकाळ आहे, शिवपूरचे[४१] नजीक छावणी करावी. वीस लक्ष रुपये तुम्हांस देतों. शिवपूर[४२] वगैरे हस्तगत करून द्यावी. " तेव्हां जनकोजी शिंदे यांनीं मनसबा केला कीं, " दत्ताजी शिंदे गांवास देशीं गेले

---

३४. " पोक्त बुद्धि आणि गंभीरता, क्षत्रियधर्मास औदार्यत्व, स्वामिसेवेशीं अतितत्पर, सहनशील, त्यांचे उपमेस कोणीच नाहीं" असें विशेषणात्मक वाक्य कल्याण प्रतींत अधिक दिलें आहे.

३५. गिराषा=डोंगरी लुटारू. 'मवाशी' क० प्रत.

३६. डांग=जंगली, डोंगराळ चढाव.

३७. ' लोक ' सां. प्रत.

३८. पाळक लेंक = पाळलेला मुलगा, घरीं वाढविलेला मुलगा.

३९. 'घावाल व डकाले गडिया ' तुं० प्रत. ;लालगढी आमची ती सां० प्रत.

४०. ' बेबदल ' तुंगार प्रत. ' बेमान ' सां० व क० प्रती.

४१. ' शीपूर ' तुंगार प्रत.

४२. ' शीपूर व ' तुं० प्रत

आहेत ते येत तोंपर्यंत चातुर्मास उगेच एखादे ठिकाणीं राहावें हें उत्तम आहे. ‘एक पंथ दो काज’[43] असें ध्यानांत आणून मान्य केलें. खांसा आपण शिवपुरास मोर्चे लावून शह देऊन राहिले. राणोजी भोइटे सरनोबत, बरे कर्ते मनुष्य होते, त्यांणीं फौजेनिशीं ढेंकोंळे[44] याचे गढीस मोर्चे लाविले होते. तों एकाएकीं मोर्च्यांत राणोजी भोइटे यांस गोळी लागून ठार जाले. हें वर्तमान जनकोजी शिंदे यांनीं ऐकून बहूत कष्टी जाले. तों त्या स्थळीं दिपवाळीही जाली. शिवपूरचे राजास हस्तगत करून उदेपूरकर राणाजीचें व त्याचें ऐक्य करून दिलें. राणाजीचे आज्ञेंत सेवावृत्तीनें राहावें, याप्रमाणें करून आपला कराराप्रमाणें ऐवज घेतला.

४६. तों लाहुराकडून रघुनाथराव दादा मसलतें[45] फत्ते करून देशास जात असतां मार्गी जनकोजी शिंदे यांस भेटावयास आले. तों जनकोजी शिंदे यांस वर्तमान कळतांच फौजेसुद्धां भेटावयास गेले. दादासाहेबही मुकामापासून दोन कोस आडवे आले. उभयतांच्या भेटी जाल्या. जनकोजी शिंदे यांचे डेरियास येऊन एकांतीं जनकोजी शिंदे यांस मनसबा दिला कीं, “तुम्हीं आंवदांची मसलत बुडविली तरी पुरवेल. क्रोड रुपये शिबंदी वाढली तरी देऊं परंतु नजीबखान रोहिला याचें पारिपत्य करून त्यास जिवें न सोडावें. एवढी जोड आम्हांस द्यावी. आम्हींच पारिपत्य केलें असतें, परंतु[46] मल्हारराव यांस त्याचें अगत्य पडलें. त्यांचा धर्मपुत्र म्हणोन त्यांनीं अगत्य धरून आपले तर्फेनें अंतर्वेद प्रांत व कुरुक्षेत्रापासून कुंजपुरा देखील चाळीस लक्षांची मामलत त्याचे स्वाधीन केली. मल्हारराव यास पुत्र बहूत ! माधवसिंग जयनगरकर व बिजेसिंग मारवाडी व आणखी बहूत आहेत. त्यांत हा नजीबखान रोहिलाही पुत्र जाहला आहे ! जितके यांनीं पुत्र म्हणविले त्यांचा फळादेशही भोगीतच आले. परंतु त्यांचा अभिमान जाईना. त्यांचे जितके धर्मपुत्र तितके मात्रागमनी आहेत[47]. आम्हीं त्यास पिसाळलिया कुतरियाची गत

४३. ‘एकपथें दोन कार्जे’ तु० प्रत.

४४. ‘सडकोळ्याचे शहास’ क० प्रत.

४५. ‘स्वारी’ क० प्रत.

४६. परंतु मल्हारराव यांस तो शरण आला याजमुळें त्यांस अभिमान पडोन त्याचा त्यांणीं अंगीकार केला. आम्हाजवळ सक्त भीड खर्चून बक्षीस मागून घेतला. आमचा त्यांचे भिडेपुढें उपाय नाहींसा जाहाला. त्यास तो दुष्ट नफर आहे. मातृस्थानीं लघुशंका करणारा असा मनुष्य आहे. आमची बालंबाल खातरी जाहाली आहे.” असें कल्याण प्रतींत अधिक आहे.

४७. “सर्पास दूध पाजीत असलें तरी त्याचा दुष्ट स्वभाव जाणार नाहीं.” असें एथें सां० प्रतींत अधिक वाक्य आहे.

केली असती. परंतु 'तुपाचे घागरीवर उंदिराचें पिटकुलें बसतें' तैसा प्रकार जाहाला. आतां तुम्हांस पदर पसरून जोड एवढीच मागतों." असें म्हणतांच जनकोजी शिंदे यांनीं तसलीमें करून अर्ज केला कीं, "दादासाहेब आम्ही आपले बारगीर, आज्ञा कराल त्याप्रमाणें वर्तणूक होईल. नजीबखान म्हणजे कोण जिन्नस? याचें पारिपत्य आम्हांकडे लागलें. पण आपण लाहूर, मुलतान, पंजाब देखील अटकेपावेतों मुलूख काबीज केला. आतां आम्हांस मोहिमेस रान कोणतें?" असें म्हणतांच दादासाहेब यांनीं उत्तर केलें कीं, "नजीबखान याचा शिरच्छेद केलिया आम्हांस तुमची सर्व जोड पावली." याप्रकारें तीन वेळां जाबसाल जाहाला. मग परस्परें बहुमान हत्ती, घोडे, जवाहीर देऊन राजश्री रघुनाथराव देशास येण्यास चालते जाले.

४७. आठपंधरा दिवसां मागाहून मल्हारराव त्याच मार्गानें आले. त्यांस यांस बारा कोसांचें अंतर होतें. शिंदे होळकर यांची चित्तशुद्धता नव्हती. तेव्हां मल्हारराव यांनीं गंगाधर* तात्यांस बोलावून आणून विचार केला कीं "शिंदे यांची जन्माची सांगड होती. तों पावेतों ब्राह्मणांसही आमचा वचक होता. व कित्येक कामकाजें केवळ असाध्य तीं साध्य होतीं. आतां आमचें एक मूल, तेंही पिशाच्चवत, आणि आमचें तर वार्धक्य. हर यत्न करून जनकोजी शिंदे यांस भेटून त्यांचे चित्तांतील किल्मिष काढून त्यांचे हातीं मूल द्यावें" असें बोलोन गंगोबा तात्यास जनकोजी शिंदे यांजकडे पाठविलें. गंगोबा तात्या भेटून सविस्तर वर्तमान ममतापुरस्कर केवळ आजिज होऊन जाबसाल केला कीं, "सुभेदार यांचें वृद्धापण आणि तुम्ही सुज्ञ मनुष्य आहां. सुभेदार भेटावयास येतात. तुम्हीं अव्हेर न करावा." म्हणोन बोलतांच जनकोजी शिंदे यांस तिरस्कार आला आणि उत्तर केलें कीं, "त्यांची आमची भेट आतां स्वर्गीं. अझूनही जें तुम्हांस उचित दिसेल तें करावें." तेव्हां गंगोबा तात्या केवळ चांगला गळां पडला. तेव्हां जनकोजी शिंदे यांणीं जाबसालाची तोड केली

---

४८. तुपाची घागर (मल्हारराव) तिजवर पिटकुलें (नजीब) बसलें त्यावर घाव घालावा तर घागर (मल्हारराव) फुटते, असा भाव दिसतो.

४९. तसलीम = तसलिमात, सलाम, वंदन. 'मुजरा' क० प्रत.

*होळकर दिवाण, गंगाधरपंत चंद्रचूड.

५०. 'श्रीमंतासही' सां० प्रत.

५१. 'बाजर' तुंगार प्रत.

५२. एक मूल–नातू. कुंभेरीचे वेढ्यांत पडलेल्या खंडेरावाचा मुलगा मालेराव.

५३. 'मल' 'किल्मिश' पाठांतरें.

५४. आजिज=आजीद. नम्र, दीन.

५५. 'रोष' क० प्रत.

कीं, " वडील दत्ताजी शिंदे प्रसंगीं नाहींत. त्यांचे पश्चात आपणास भेटावयास पुरवत नाहीं. " असें बोलून गंगाधरपंत यांस वाटेस लाविलें.

४८. मल्हारराव यांनीं वर्तमान ऐकून अधिक उणे जाबसाल ध्यानांत न आणून विचार केला कीं, 'मूल आहेत. म्हणून कूच करून शिंदे यांचे लष्करानजीक दोन कोसांवर मुकाम केला. मान, महत्त्व ध्यानांत न आणितां मल्हारराव तयार होऊन जनकोजी शिंदे यांचे डेरियास चालले. हें वर्तमान जनकोजी शिंदे यांनीं ऐकून निश्चय केला कीं, "आतां आडवें जावें हें उचित. नाहीं तर अश्लाघ्यता[५६] येईल." म्हणोन जनकोजी शिंदे तयार होऊन आडवे जाऊन भेटले. त्यांस डेऱ्यास आणोन सत्कार केला. नंतर आठ पंधरा दिवस मल्हारराव यांचे येथें रात्र दिवस राहून चित्तांतील किलाफ[५७] तोडिला. [ होळकरांनीं ] मुलास हातीं देऊन देशास जावयास निरोप मागितला. ते समयीं जनकोजी शिंदे यांनीं अर्ज केला कीं, " सुभेदार, तुम्ही आम्हांस वडील आहां, तुम्ही अटकेपावेतों मुलूख काबीज केला. आम्हांस मोहिमेस रान असुदें[५८] कोणतें ?" तेव्हां मल्हारराव यांनीं उत्तर केलें कीं, "तुम्हांस रान एक आहे. भागीरथीस पूल बांधोन अयोध्येवर जावें. सुजाउद्दौला यास तंबी पोंचवून पाहिजे ते रुपये मिळतील. रान असुदें आहे." जनकोजी शिंदे यांनीं उत्तर केलें कीं, "भागीरथीस पूल बांधणें कसें घडेल ?" तेव्हां मल्हारराव यांनीं सांगितलें कीं, "नजीबखान रोहिला यास हातीं धरून त्याचे हातून हें काम करून घ्यावें." हें वचन ऐकतांच जनकोजी शिंदे यांनीं जाबसाल केला कीं, " नजीबखान रोहिला मात्रागमनी. जन्मस्थानीं लघुशंका[५९] करणार. गाजुदीखान याचे येथें वाढला त्याचें सार्थक केलें ! हें तुम्ही जाणतच आहां. त्यांत कार्यातुर होऊन काळावर नजर द्यावी तरि खावंदांचा द्रोही. त्यांनीं आम्हांस मोहीम नजीबखान याजवरील नेमून दिली आहे, असें असतां हें कर्म केलियास श्रेष्ठ[६०] स्वामिद्रोही व्हावें. त्यांत आम्हांकडे केवळ शिलेदारी कर्म नाहीं. आम्ही सरकारचे पागेचे बारगीर असें आहे. आम्हांकडून हा विचार घडूं नये." असें म्हणतांच मल्हारराव यांनीं उत्तर केलें,

---

५६. ' अश्लाघ्यता = अनौचित्य.

५७. 'किल्मिष दूर करून चित्तशुद्धता करून घेऊन येखलाशी जाहाल्यानंतर त्यांचे हातीं' असें क० प्रतींत अधिक आहे.

५८. असुदें=ताजें; मोकळें.

५९. 'मैथुन करणार' पु० व क० प्रती.

६०. ' भ्रष्ट ' असा एका प्रतीचा पाठ आहे. तेथें ' स्पष्ट ' असें असावें !

कीं, "बाबा, तुमचा[६१] मूल-स्वभाव, अटकेपासून रामेश्वरपर्यंत एकछत्री राज्य जाहालें. हिंदुस्थानांत एक नजीबखान मात्र मूळ[६२] राहिलें आहे. त्याचें पारपत्य केलिया पेशवे अटकेपासून जासुदाहातून पैसा आणवतील. मग तुम्ही आम्ही सहजच निर्माल्यवत जाहलों. मग कोणी पुसणार नाहीं. यास्तव एवढें खूळ[६३] रक्षून जें करणें तें करावें."याजप्रमाणें सांगोन मल्हारराव होळकर यांनीं आपला पाळक*पुत्र तुकोजी होळकर दोन हजार फौजेनिशीं शिंदे यांजपाशीं टाकून, निरोप घेऊन देशास चालिले.

४९. तों [इकडे] दत्ताजी शिंदे गांवीं होते, त्यांनीं लग्न[६४] करून समागमें नारो शंकर चार हजार फौजेनिशीं घेऊन जनकोजी शिंदे यांजकडे चालिले. तों वाटेस रा। दादासाहेब यांची भेट जाहाली. बहूत प्रकारें गौरव करून जनकोजी शिंदे यांस नजीबखान याजविशीं सांगितलें होतें तसेंच पदर पसरून यांसही सांगितलें. दत्ताजी शिंदे यांनीं मान्य करून दादासाहेब निघोन पुण्यास पोंचले. दत्ताजी शिंदे उज्जनीस आले. तों मल्हाररावही उज्जनीस पोंचले. जनकोजी शिंदे यांचें व मल्हारराव यांचें ऐक्य जाहालें, हें दत्ताजी शिंदे यांस पूर्वी सूचना होतीच.मग दत्ताजी शिंदे आडवे जाऊन बहूत सन्मान करून उज्जनीस घेऊन गेले. दोन चार रोज राहून उपचार मेजवान्या जाहाल्या. उपरांतिक दत्ताजी शिंदे यांनीं मल्हारराव यांस प्रश्न केला कीं, "सुभेदार, तुम्ही अटकेपावेतों मुलूख काबीज केला. आतां आम्हांस मोहिमेस असुदें रान कोणतें आहे ?" तेव्हां मल्हारराव यांनीं सांगितलें कीं, "याविशीं सूचना जनकोजी शिंदे यांस सांगितली आहे आणि तुम्हांसही सांगतों कीं, नजीबखान रोहिला यास हातीं धरून भागीरथीस पूल बांधोन पुलापलीकडे अयोध्या व ढाका व बंगाला व काऊर[६५] देश पावेतों मोहीम करावी. रानही असुदें आहे. पैसा पाहिजे तितका मिळेल.आणि सुजाउद्दौवला यास तंबी[६६]पोंचवून भागीरथी पलीकडील अर्धा मुलूख घ्यावा. त्यांत दहा पांच किल्ले भारी असतील त्यांत ठाणीं घालावीं. म्हणजे चित्तास येईल तेव्हां श्वेतबंधासारिखें जावयास यावयास येईल. हें न करितां तुम्ही नजीबखान याचें पारिपत्य कराल. तर तुम्हांस पेशवे धोत्रें

६१. 'बाबा, तुमचा स्वभाव फार चांगला, एकनिष्ठ आहां' सां० प्रत.

६२. 'खळी' पुणें प्रत. 'खाडू'सां०प्रत.

६३. 'येवढी लीळा' तुं० प्रत.

* वर पृष्ठ ४३ टीप ३८ पाहा.

६४. 'दुसरें लग्न' सां० व क० प्रती.

६५. काऊर किंवा काहूर ? कोठें ?

६६. 'जरब देऊन' क० प्रत.

बढवावयास लावतील." असें स्पष्ट सांगितलें. तेव्हां दत्ताजी शिंदे यांचे ध्यानांत गोष्ट ठसली. खावंदांनीं सांगितलें तें मिथ्या भास जाहाला. मल्हारराव यांनीं सांगितलें हेंच पुरतेपणें प्रत्ययास आलें. जैसें लोभियाचे ध्यानांत धन वसतें तैसें जाहालें. मल्हारराव यांनीं मंत्र सांगोन[ते]देशास गेले. तसेच मागून रा। विठ्ठलराव शिवदेव देशास जात होते. त्यांनीं हीच गोष्ट सांगितली. अग्नीवरि आज्य[६७] टाकावें तसें पुरतेपणें ठसलें. जनकोजी शिंदे यांचे चित्तांत मल्हारराव यांचा मनसबा ठसला नाहीं. सुभेदार याचें ऐकावें तरि निमकहरामी पदरास येते. आणि धनियाची इतराजी होईल. खावंदाची आज्ञा ज्या प्रमाणें त्या प्रमाणें जनकोजी शिंदे यांची वृत्ती जाहाली होती. इकडे दत्ताजी शिंदे यांनीं मल्हारराव होळकर बोलले हा मजकूर प्राधान्य केला.

५०. जनकोजी शिंदे यांनीं मारवाड प्रांतींचा बंदोबस्त करून दिल्लीकडे चालिले. रेवाडीवर जाऊन पोहोंचले,तों दत्ताजी शिंदेही तेथें जाऊन मिळाले. चुलत्या पुतण्यांच्या भेटी झाल्या. त्यांस त्या रानांत कोणाचें भय नव्हतें. यास्तव दत्ताजी शिंदे यांनीं आपली स्त्री भागीरथीबाई व जनकोजी शिंदे यांची स्त्री काशीबाई यांस बरोबर घेऊन आले. तेथून कूच करून दिल्लीस पोहोंचले. दिल्लीपार लाहूरदरवाज्याकडे मजमूं[६८]च्या टिळियावर यमुनातीरीं मुक्काम करून राहिले. गाजुदीखान वजीर याची भेट जाहाली. जनकोजी शिंदे यांचा मानस कीं, "वजिरास समागमें घेऊन नजीबखान याचें पारिपत्य करावें." गाजुदीखान याचे चित्तांतील भावार्थ हाच होता. बाह्यार्थ दत्ताजी शिंदे वजीर यांसि नजीबखान याचे पारिपत्याचें बोलत, परंतु चित्तांत तो अर्थ नाहीं[६९]. निदान गाजुदीखान यांनीं पंधरा लक्ष रुपये कबूल केले. आपणहीं समागमें यावें असा निश्चय जाहाला. तों दत्ताजी शिंदे यांनीं विचार केला कीं, "हरएकविशीं वजिराशीं कवाईत[७०] करून हा मजकूर राहाता करावा." म्हणोन वजिराकडील वकील यास आज्ञा केली कीं, "पातशाई रसालियांतील तोफा पूर्वीं अकबरशाहा पातशाहाचे जिलबीस चालत होत्या त्या अटक व

---

६७. 'तेल' क० प्रत.

६८. मागें पृष्ठ २८ टीप ६० पहा 'मनूचे' किंवा 'मजूचे' असें क० प्रत सर्वत्र देते.

६९ 'नाहीं' पुढें सां० प्रतीत 'गाजुदीखान वजीर याचे मनांत नजीबखान याचे पारपत्याकरितां शिंदे यांस जो लागेल तो पैसा मी पुरवीन, परंतु या नफराचें पारिपत्य करावें. तूर्त पंधरा लक्ष' इ० अशीं वाक्यें आहेत.

७०. कवाईत=युक्ती, बहाणा, 'कवईत' तुं० प्रत.

एक फत्तेलष्कर व आणखी एक किल्लेकुशाद ऐशा तीन तोफा देणें." तों वरकड तोफा जिकडील तिकडे गेल्या होत्या. परंतु भारी म्हणावयास तीन मात्र राहिल्या होत्या. पंचरसी, सुवर्णासारिख्या तेजस्वी, चौदा हात लांबी व पेटीस[७१] रुंद सात सात हातीं[७२] दोरी लागत होती व तोंडास चार हात दोरी लागत होती. या प्रमाणें मातबर आणि एकेक तोफ नव लक्षांची होती. अशा तोफा मागतांच गाजुदीखान वजीर यास परम विषाद आला. " प्राण गेला तरी पुरवेल, परंतु तोफा द्यावयास अनुकूल पडत नाहीं," म्हणोन उत्तर होतांच दत्ताजी शिंदे यांनीं फौज सिद्ध करून पातशाही रसालियाकडे चालोन गेले. तों गाजुदीखान याजकडील सामीन[७३] चालोन आलें. तेव्हां थोडीबहूत गोळागोळी जाली. तों वजिराचें सामान थोडकें. त्यास यांची उपट सोसेनाशी जाली. मग सामान मागें सरून ठिकाणास गेले. ते गर्दींत दिल्लीचा पुरा जयसिंगपुरा म्हणोन होता त्याचा सत्यानाश जाहाला. एवंच शहराचा विनाशकाल !

**५१.** असो. शिंदे यांनीं दोन तोफा अटक व किल्लेकुशाद अशा दोन तोफा काढल्या. अटकेची जोडकरीण तोफ फत्तेलष्कर होती तेवढी मात्र शिलीमगडचे किल्ल्यांत राहिली. अटक तोफेस साडेतीनशें बैलांच्या तीन माळा वोढावयास लाविल्या. दोन हत्ती लाविले. परंतु तोफ जागेवरून हालेना. मग मनुष्य एक शहरांतून धरून आणून तोफेवर जेबं[७४] केलें. बकरीं, कोंबडीं, नारळ, लिंबें यांस गणती नाहीं. मोठे संकटें तोफ लष्करांत आणिली. उज्जनीस तोफ लावून द्यावयाची विवंचना केली. तों निभावणीचें संकट. शिंदे यांचा मानस होता कीं, "एक वेळ आणखी बिजेसिंग याजवर नागुरास जावें आणि तोफ लावावी." अशी उमेदं[७५] बहूत करून होते. तोफ निभावणीस बुद्धी कुंठित जाहाली. तेव्हां जाटाकडील रूपराम कटारी समागमें होता, त्यानें आपले खंडणीपैकीं दोन लक्ष रुपये सूट मागून तोफ उज्जनीस पोंचती करावी, असा करार करून, दारमदार करून तोफ त्याचे जिम्मेस केली. त्यानें इजारा करून तोफ वाटेस लाविली. तों शेवटीं तोफ उज्जनीस पोंचली नाहीं. यांचा पुढें विनाशकाल[७६] जाहाला. तेव्हां तोफ चमेलीच्या खळियांत येऊन आँचरीचे[७७]

---

७१. पेटी=मध्यभाग. 'पेधीस' तुं० व क० प्रती.

७२. 'सात हात वर्तूळ व तोंडास चार हात वर्तूळ' सां० प्रत.

७३. 'रिसालेवाले' क० प्रत.

७४. जेब किंवा जबे=ठार.

७५. 'हुटहुटी' तुं० प्रत.

७६. 'हारशकाल'=ऱ्हासकाल तुं० प्रत.

७७. 'अटेरीचे' तुं० प्रत. 'आचोरीचे' क० प्रत.

घाटास राहिली. किल्ले-कुशाद तोफ समागमें घेतली. गाजुदीखान वजीर यांचे चित्तांत खिलाफ आलियावरि वजीर दिल्लींतच राहिला. दत्ताजी शिंदे यांणीं कूच केलें ते मजल दरमजल पाणिपतावरून कुरु-क्षेत्रांत गेले. आठ मुकाम करून, चार तुळादानें करून, पुढें मजल दरमजल शतद्रूपावेतों गेले. तों लाहुरांतील सुभा संदीपबेग याचा पुत्र व लक्ष्मी नारायण त्याचा दिवाण असे येऊन भेटले. त्यांचे यांचे विचारें रा। साबाजी शिंदे व त्रिंबक बापूजी असे पंधरा हजार फौजेनिशीं पुढें लाहूर, मुलतान व पंजाब व काश्मीर अटकेपर्यंत मुलूख-जप्तीस पाठविले. आपण खांसा तेथून कूच करून कुंजपुरा-नजीक मुकाम केला. चित्तांत योजना केली, "नजीबखान यास सामील करून त्याचे हातोन भागीरथीस पूल बांधून महत्कार्य करावें." जनकोजी शिंदे व नारो शंकर व अंताजी माणकेश्वर यांचे चित्तांत कीं, "श्रीमंतांनीं आज्ञा केली तेणें प्रमाणें वर्तावें. नजीबखान याचें पारपत्य करावें. ठेवूं नये." हें सर्वत्रांचें अनुमतें होतें.

५२. इकडे गोविंदपंत बुंदेले यांचा व नजीबखान यांचा स्नेह होता. त्यानें गोविंदपंत यांजकडे सूत्र लाविलें कीं, "गोविंदपंत दाजी, तुमचे हातीं आम्हांस सुभेदार मल्हारराव देऊन गेले. प्रस्तुत रा। दत्ताजी शिंदे यांचा शह भारी आला आहे ? निभावणी होणें कठीण आहे." हें गोविंदपंत यांनीं ऐकून त्यास अभय दिलें कीं, "तुम्हीं आपले जागां स्वस्थ राहावें. उभयपक्षीं रदबदली आम्हांकडे लागली." असें बोलून रा। गोविंदपंत बुंदेले येऊन दत्ताजी शिंदे यांस भेटले. शिंदे यांनीं गोविंदपंत यांस मनसबा भागीरथीस पूल बांधावयाचा विचारिला. गोविंदपंत यांनीं जाबसाल केला कीं, "पाटील-बावा, विना नजीबखान यास हातीं घेतल्याशिवाय हें कार्य होत नाहीं." तों यांचेही चित्तांत हाच भावार्थ होता. त्यांनींही हाच संदर्भ लाविला. ती गोष्ट यांच्या चित्तांत ठसली. गोविंदपंत बुंदेले यांस वचन दिलें कीं, "नजीबखान यास बेलाशक घेऊन यावें. तुमचे आमचे अनुमतें जें कर्तव्य तें करूं." म्हणोन सांगितलें. मग गोविंदपंत यांनीं वकील नजीबखान याजकडे पाठविले.

---

७८. 'हस्तगत' पाठांतर.

७९. गो० बुं० 'पेशव्यांची बखर' पृष्ठ २८ व टीप ४० पाहा.

८०. "शिंदे यांची बदनजर आम्हांवर दिसते. आपले हातीं मल्हारराव देऊन गेले, याची शरम आपल्यास असावी, म्हणोन बोलणें लाविलें" क० प्रत.

तों तो अगोदरच आतुर होतीं. चार हजार फौजेनिशीं नजीबखान रोहिला भेटावयास आला. दोन कोसांवर येऊन मुकाम केला. हें वर्तमान दत्ताजी शिंदे यांस बुंदेले यांनीं श्रवण करितांच त्यास आडवे जावयास सिद्ध जाहाले. तेव्हां जनकोजी शिंदे व नारो शंकर व अंताजी माणकेश्वर व जानराव वांबळे[८२] व आणखी छोटे मोठे सरदार एकत्र मिळून इत्यर्थ केला कीं, "नजीबखान रोहिला ससें भाणवसिं[८३]यांस सांपडतें तैसा आला आहे. आजिचे समयीं सोडूं नये." म्हणोन बोलून दत्ताजी शिंदे यांजकडे आले. त्यास हें वर्तमान बोलतांच दत्ताजी शिंदे यांनीं अव्हेर केला. उत्तर केलें कीं, "आपले कार्याकरितां वैरी मित्र करणें प्राप्त[८४] आहे. यांत आम्ही खावंदांचें वाईट काय करितों?" म्हणोन धिःकारलें. जनकोजी शिंदे[८५] आपले जागां परम श्रमी जाहले कीं, "नकटें असावें परंतु धाकटें असों नये." यत्न कोणाचा चालेना. बायका मुलेंबाळें देखील कोणाचे चित्तीं नजीबखान यास सोडावें असें नाहीं. परंतु कोणाचें न ऐकतां दत्ताजी शिंदे आडवे जाऊन भेटून घेऊन आले. ते समयींची ममता आणि जिव्हाळे सांगावे असा अर्थ नाहीं. एकमय चित्तें उभयतांचीं जाहालीं. यांनीं नजीबखान यास जाबसाल केला कीं, "आम्हांस भागीरथीस पूल बांधून द्यावा. अघाडी तुम्हांस देतों. पलीकडील रुपया मिळेल त्यांत दहावी तक्षीम[८६] देतों. तसाच मुलूख हस्तगत होईल त्यांत दहावी तक्षीम देऊं. तुम्ही आम्ही एका खावंदाचे चाकर एकनिष्ठ होऊन सेवा करावी." म्हणोन बोलिले. नजीबखान यानें मान्य केलें. यांणीं आपला बेलभंडार इमान त्यासि दिलें, त्यानें आपली सानक[८७]-रोटी यांस दिली. केवळ एकदील जाहाले. आठ पंधरा दिवस एक जागां राहिले.

---

८१. या पुढें "त्यांनून शूर" असें क० प्रत लिहिते.

८२. 'साबळे' असा क० प्रतीचा पाठ सर्वत्र आहे.

८३. भाणवसा=चुली मागील ओटा.

८४. "आपले कार्याकरितां वैरी वोळखिजे याचें क प ग (!)" तुं० प्रत. "वैरी जेरीस असला तरी" क० प्रत.

८५. 'जनकोजी शिंदे यांनीं वडिलांस सुचविलें कीं यास हातीं धरल्यास परिणाम शुद्ध लागणार नाहीं. असें निखालस सांगितलें. याज उपरी वडिलांचे मर्जीस येईल तें खरें असें सांगोन" हें वाक्य कल्याण प्रतींत अधिक दिलें आहे.

८६. तक्षीम=हिस्सा, वांटा.

८७. सानक=जेवणाचे ताट किंवा ताटली. रोटी=भाकर. बेलभंडाऱ्याप्रमाणें मुसलमानांची दृढ शपथ, इमानप्रमाण.

५३. तिकडे भागीरथीपार सुजाउद्दवला अयोध्येंत होता. त्याजकडे गुप्तरूपें चेतराम वकील यास नजीबखान यानें पाठविलें. आणि सांगितलें कीं, "दत्ताजी शिंदे यांचा निश्चय, मोहीम तुम्हांवर आहे. आम्हीं एक वेळ मनसबा केला आणि अबदुल अलीस घेऊन आलों. तुम्हीं चहूंकडून ऊँपराळा केला नाहीं. तो मनसबा या रितीचा जाहाला. आम्हीच सर्वत्रांचे द्वेषी जाहालों. आतां एक वेळ तुम्हास पुसावें याकरितां मात्र सांगून पाठविलें आहे याचें उत्तर काय तें द्यावें." [असें] म्हणोन वकिलानें जाबसाल केला कीं, " अनुपशहरकर अहमदखान लंगडा पठाण हा मात्र आपले ममतेंत आहे. तुमचा निश्चय काय तो सांगावा." असें ऐकून सुजाउद्दवला यानें उत्तर केलें कीं, " आपला बाप मनसूर अली याची वजारत जाऊन इकडे कालक्षेप करून आहों, येथेंही सुखरूप राहूं देईनात. मरणाहून अपेश वोखटें. आतां आपला कांहीं दुसरा अर्थ नाहीं. नजीबखान यास सांगावें कीं, मी सर्वस्वें तुजला साह्य आहें, पन्नास हजार फौज व तीनशें तोफा तुझे जिंमेस करितों, व पांच कोट रुपये खर्च लागला तरी इतका खर्च पुरवितों. परंतु गनिमांस नदीपार होऊं देऊं नये." याप्रमाणें सानक-रोटी इमानप्रमाण घेऊन वकील आला.

५४. इकडे अबदुल अलीचें सूत्र वरचेवर ठीकच होतें. इतक्यांत सुजाउद्दवला याजकडून आश्रय खातरजमेचा होतांच नजीबखान रोहिला दत्ताजी शिंदे यांचे डेरियास येऊन जाबसाल केला कीं, " साहेब, तुम्हीं गणंमुक्तेश्वरीं जाऊन तीर्थविधी करावा. मजला आज्ञा द्यावी. मी मिरापुरानजीक शुक्रताल आहे. तेथें जाऊन भागीरथीस पूल बांधून ठीक करितों. तों पावेतों एक महिन्यानें मागाहून आपणही यावें." नजीबखान यांनें अगोदर महिना पंधरा दिवस केवळ आर्जव करून अकृत्रिम भाव दाखविला होता. याजकरितां शिंदे यांस खरें भासलें. हत्ती, घोडा, जवाहीर, वस्त्रें, बहुमान देऊन गाजदीपुऱ्याचे मुकामाहून रवानगी केली. ते समयीं जनकोजी शिंदे [यांनीं] व सर्वत्रांनीं सांगितलें कीं, "याचें पारिपत्य करावें तें न केलें. अस्तु. आतां यास जवळ ठेवूनच कार्य करून घ्यावें. यास निरोप देऊं नये." म्हणतांच दत्ताजी

---

८८. उपराळा=साहाय्य, मदत.

८९. 'गड मुक्तेश्वरी' पाठांतर. 'गण मुक्तेश्वरीस' क० प्रत

९०. या शब्दापुढें क० प्रत म्हणते "कपट वेश करून, राक्षसी माया दाखवून, केवळ जीवप्राणतुल्य भासवून अकृत्रिमपणा दाखविला"

शिंदे यांनीं जाबसाल केला कीं, " तुम्ही अवघे कर्तव्याचे मनुष्य आणि आम्हीच एक नाकाबील. तस्मात आम्हांस कांहीं एक सुचत नाहीं. नजीबखान याचें अंतर शुद्ध आम्हांस पुरतेपणीं प्रत्ययास आलें, तेव्हां आम्हीं त्यास निरोप दिला." या प्रकारें उत्तर होतांच दुसरें कोण बोलतो ? सर्वत्रांनीं कल्पना केली कीं, " मुंगीस पक्ष फुटतात तैशी गत‡ जाहाली." उपाय नाहीं म्हणोन आपले जागां स्तब्ध राहिले.

५५. नजीबखान यानें कूच करून तो शुक्रतालास गेला. शुक्रताल म्हणावयास कारण कीं शुकाचार्य यांनीं परिक्षिती राजास भागवत श्रवण ते स्थळीं केलें होतें व तें स्थळीं परिक्षिती राजा ऋषीचे शापानळें तक्षकदंशें भस्म जाला. तें स्थळ परम गूढ, भागीरथी उत्तरवाहिनी येऊन, पालखीचे दांडीसारखें नदीचें वळण होऊन दक्षिणवाहिनी गेली. तेथें नजीबखान यानें लष्कराचा मुकाम केला होता. आलीकडील तोंडीं खळया भारी, दोन दोन डोंभेरगणें सारख्या भारी, जावयास सुदामत वाट नाहीं. कोठें कोठें सुगम मार्ग होते तेथें खंदक खणून, त्यांवरि तोफा व वरकड रिसाला ठेवून, बंदोबस्त करून केवळ दुर्गाप्रमाणें असाध्य केले. तों इकडे दत्ताजी शिंदे श्रीभागीरथीस गणमुक्तेश्वरीं येऊन तीर्थविधी केला. आधींच शिंदे रणशूर व दानशूर होते. त्यांत अलभ्य लाभ श्रीभागिरथी प्राप्त जाली ! मग ज्यास जसें ईश्वरें अनुकूल दिलें तसें दानधर्म केले. ये अर्थीं दोहरा आहे:—

**जलकी शोभा कमल है, दलकी शोभा पील ।**
**धनकी शोभा धरम है, कुलकी शोभा शील ॥**

[असो] तों नजीबखान याजकडील पत्रांची मार्गप्रतीक्षा करीत होते. तों अकस्मात पत्रें नजीबखान याचीं आलीं. हलकारे यांनीं पत्रें दिलीं. खुशाली

---

९१. 'तुम्ही सर्वत्र शाहणे, आम्ही केवळ मूर्ख; मला कांहींच ज्ञान नाहीं' सां० प्रत.

९२. दुसरें=दुसऱ्यानें. " दुसरे कोणी न बोलतां " क० प्रत.

‡ मुंगीस पंख फुटणें हें मृत्यू जवळ आल्याचें लक्षण होय.

९३. 'अजुर्दे होऊन' क० प्रत.

९४. 'निधा [ध] न पावला.' क० प्रत. सर्व प्रतींचा पाठ 'शुक्रताल' असाच आहे. शुकाशीं संबंध असतां 'शुक्र' ताल कां म्हणूं लागले ?

९५. 'डोंभारगणें' अगर 'डोंबरगणें' डोंबरा=खड्डा. सांगली प्रतींत " दोन खड्या म्हणजे डोंगर गडासारख्या भारी " असें आहे. क० प्रतही 'खड्या' असा पाठ देते.

मानून एकांतीं जाऊन[९६] पारशी पत्रें मुनसीकडून वाचून पाहिलीं. त्यांतील अन्वय ध्यानांत आणिला. तों नजीबखान याणें पत्रीं लिहिलें कीं, "तूर्त बरसातकाळ, नदीला पाणी भारी, याजमुळें पूल सिद्ध तूर्त होत नाहीं. तुम्हीं या समयीं हर कोणीकडे तरी मोहिमेस जावें. बाजत-बरसांत देख लेऊं." याप्रमाणें उत्तर आलें. तरी यांस कृत्रिमभाव उमजला नाहीं. जाबसाल दिला कीं, "तूर्त राहिलें तरि राहूं द्यावें. तुम्हीं फौजेसुद्धां निघोन यावें." म्हणोन नजीबखान यास पत्रें लिहिलीं. रोहिल्यानें साफ उत्तर केलें कीं, "आपणास अनुकूल यावयास पडत नाहीं. तुम्हीं देखिली बुद्ध करावी."

५६. असें साफ उत्तर येतांच दत्ताजी शिंदे यांची मर्जी केवळ दिक्क[९८] जाली. लहान थोर यांनीं व खावंदांनीं सांगितलें तें न ऐकून मल्हारराव यांचे मनसबियावरून सर्वत्रांचा अव्हेर केला. त्याचा फळादेश या प्रकारचा जाहाला. नजीबखान यानें मात्रागमन केलें. म्हणून दत्ताजी शिंदे केवळ दंगी होऊन एक दोन दिवस अन्नपाणी देखील वर्ज केलें. मग जनकोजी शिंदे यांनीं हिमतीची मसलत दिली कीं, "अर्धींच लहान थोर यांचें ऐकिलें नाहीं, आतां 'हिंमत मर्दा मदत खुदा' मारतां मारतां मरावें. नजीबखान म्हणजे कोण जिन्नस[९९][१००]? चढते घोडियानिशीं उडवून टाकूं.[१]" म्हणतांच दत्ताजी शिंदे यांसही आवेश आला. तेच क्षणीं नगारा करोन कूच केलें. ते मजल दरमजल भागीरथीतिरीं हस्तनापुरावर मुकाम केला. तेथून दिल्ली इंद्रप्रस्थ कच्चे चाळीस कोस. हस्तनापुरीं कांहीं वस्ती नाहीं. साक्षा मात्र जुनी पांढरें[२] आहे. तिथें टेकडें मात्र आहे, तेथें तीर्थाचा कूप व वटवृक्ष मात्र आहेत. साक्षा मात्र सांगतात कीं, "या स्थळीं हस्तनापूर होतें." तेथें राहिले तों तेथें मागती रोहिल्याकडील वकील चेतराम येऊन भेटला. वटवृक्षाखालीं सावलीस बसले.

---

९६. 'जाऊन' पुढें "पारसनीस पारसी कागद वाचणार समागमें होतेच, त्यांस बोलावून कागद त्यांजकडून वाचून पाहिले" असें क० प्रतींत आहे.

९७. 'बाजत-बरसात' = पर्जन्य-काळानंतर. शब्दयोगी अव्यय शब्दाच्या पूर्वी लावण्याची ही फारसी पद्धत होय.-बफौज=फौजेसुद्धां. बमय-सरंजाम=सरंजामासुद्धां.

९८. दिक्क (मर्जी) = त्रासलेली, शिसारी आलेली.

९९. 'अजुर्दे' क० प्रत.

१००. 'नजीबखान याचा केवा काय!' क० प्रत. केवा=पाड, महत्त्व.

१. "घोड्याच्या पायाच्या ठोकरी खालीं उडवून देऊं" सां० व क० प्रती.

२. पांढर=गांवची जागा.

आणि त्यानें जाबसाल केला कीं, "प्रस्तुत तुम्ही आलियानें काम कारागर होत नाहीं; माघारें जावें." [असें] म्हणतांच दत्ताजी शिंदे यांनीं उत्तर केलें कीं, "सुजाउद्दौला व तुम्हीं मिळोन कोट रुपये खंडणी देणें, माघारें जातों." म्हणतांच वकील यांनीं उत्तर केलें कीं, "कौरव पांडव यांचा गृहकलह लागला ते समयीं भगवान श्रीकृष्ण परमात्मा यानें आपले आंगें याच वटवृक्षाखालीं शिष्टाई केली. ते समयीं दुर्योधन यानें उत्तर केलें कीं, 'सुईचे अग्रींची मृत्तिका देखील प्राप्त होणार नाहीं. तेथें इंद्रप्रस्थ कैचें व वारुणावंत कैचें?' साक्षात भगवंत याची शिष्टाई या जागीं सिद्धीस गेली नाहीं, तेथें तुमचा मनसुबा काय सिद्धीस जाणार? पुरवेल तरि कूच करून जावें; नाहीं तर युद्धास आपण सिद्धच आहों." या प्रकारें त्याचें निष्ठुर उत्तर होतांच वकीलयांस वेडेंवांकडें बोलून पिटून लाविलें. आपण कूच करून शके १६८१ भाद्रपद शुद्ध १० स[3] शुक्रवारीं शुक्रतालास जाऊन पोंचले. चढते घोडियानिशीं चालोन जावें अशी हिंमत धरून गेले. तों ती जागा केवळ असाध्य. कोसपर्यंत उभे राहूं देईनात. खळयांचा[4] आश्रय करून तोफांचा व बाणांचा मार देऊं लागले. चार घटिका उभे राहून, सायंकाळीं तेथून कोसभर मागें सरून, मिरापुराकडे, शुक्रतालापासून दोन कोस, जेथें परिक्षिती राजास ऋषीचा शाप जाहाला म्हणोनें[5]

---

३. 'वैशाख शुद्ध १० स' पाठांतर. वैशाख शु॥ १० ही गणमुक्तेश्वरीं किंवा हस्तिनापूर येथें आल्याची व भाद्रपद शुद्ध १० ही तेथून कूच करून शुक्रतालास गेल्याची मिती असावी. भाद्रपद शुद्ध १० ही मिती क० प्रत देते.

४. 'खड्याच्या' 'खडया' असा पाठ 'खळ्यां' बद्दल सां० प्रत व क० प्रती सर्वत्र देतात.

५. 'म्हणोन' या शब्दापुढें कल्याण प्रतीचा पाठ अगदीं निराळाच आहे तो असाः- "धन्वंतरी यास समजल्यावरून आला कीं श्रापयोगें करून राजा मृत्यू पावेल. त्यास लक्षावधि मरावे परंतु लक्षावधींचा पाळणवाला न मरावा, असें समजोन आला कीं याचा मृत्यू टाळावा. तेव्हां ऋषीचा पुत्र सांनिध्य होता. धन्वंतरी यास ऋषीचे पुत्रानें पृच्छा केली कीं, तुम्ही कोठील कोण? तेव्हां धन्वंतरी यानें उत्तर केलें कीं, राजास ऋषीनें श्राप दिला तेणें करून राजा मृत्यू पावेल; त्यास निधा(ध)न पावों देऊं नये म्हणोन आलों. त्याजवरून ऋषिपुत्रानें त्यास पृच्छा केली कीं पाहूं तुझा पराक्रम. मृत्यू पावला यास तूं कसा उठिवतोस! म्हणोन एक वृक्ष सांनिध्य होता, त्यास ऋषिपुत्रानें तो वृक्ष शापून दग्ध केला. धन्वंतरी यानें मंत्रसामर्थ्येंकरून वृक्ष जसा होता तसाच केला. तेव्हां ऋषिपुत्रास समजलें कीं राजास निधान पावो देणार नाहीं. ही खातरजमा होऊन त्याजला अपरिमित द्रव्य देऊन वाटेस लाविला. ते स्थळीं साक्षीस कूप आहे. कूप म्हणजे विहीर" इत्यादि.

धन्वंतरी यास समजल्यावरून उठवावयास जात होता तों मार्गीं तक्षक नागराज यानें ब्राह्मणाचा वेश धरून धन्वंतरी याचा पराक्रम पाहून, धन्वंतरी यास अमुप द्रव्य देऊन माघारीं फिरविला, ते स्थळीं साक्षीस कूप आहे, तेथें शिंदे यांचे डेरे जाहाले. तमाम अंतरवेद प्रांतीं रोहिल्यांचीं ठाणीं होतीं तीं घेतलीं. मिरापूरचे सैय्यदही येऊन भेटले. पूर्वीं दक्षिणेंत सैय्यद[६] आला [होता] तो त्याच मिरापूरचा. तेथें राहून प्रातःकाळीं नगारा करून, फौज सिद्ध करून चालून गेले. त्यांजकडून तोफांचा व बाणांचा मार होऊं लागला. यांणीं मनसुबा त्यांजवर तोफा चालू कराव्या असा केला. तोफा लावाव्या तों इकडील तोफा लावीत तो गोळा त्यांजवर कारागर होईना. खालीं तोफ लागू केली तो खळ्यांत गोळा पडों लागला. वरती तोफ लावावी तरि शुक्रतालावरून पार भागिरथींत गोळा पडे. ऐशी गती जाहाली. त्यांजकडील तोफांच्या व बाणांच्या मारानें दाहा पांच घोडे व मनुष्यें ठार पडलीं. असा प्रकार जाहाला. या प्रकारें नित्य नित्य भाद्रपद मासपर्यंत गोळागोळी होतच गेली. नजीबखान यानें भागिरथीस पूल बांधून कुतुबशाहा गुरू[७] दाहा हजार फौज व बुणगे नदी पार राहिले होते; वीस हजार फौज व तोफा नजीबखान याजवळ ते स्थळीं होत्या. त्यांजला रस्ता नदीवरून होऊन नदीपलीकडून रसद पुलावरून रोहिलियास चालूं लागली. गहूं, तांदूळ कमोदी, तीस बत्तीस शेर पक्के. याप्रमाणें सवंगाई त्यांजकडे होती. शिंदे यांचे गनिमाचे लष्करांत आठ शेर नऊ शेर धारण, वैरणचारा महाग. याजकरितां घोडीं व उंटें उठवणीस येऊन अस्थिचर्में जाहालीं. याप्रमाणें भाद्रपदपर्यंत जाहालें.

५७. तों एके दिवशीं फौज सिद्ध करून फौजेंत जनकोजी शिंदे येऊन जानराव बांवळे व नारो शंकर व जिवाजी भोइटे व दिल्लीची कुमक नागरमल्ल, बाहादरखान बलोचे, ऐसे कित्येक दुसरेकडे ढासर्ण[८] धरून गोळागोळी करीत होते. त्या फौजेंत दत्ताजी शिंदे गेले. तेव्हां त्या लोकांस अधिक हिंमत चढून पुढें खळ्यांकडे मार देत चालिले. तों नजीबखान रोहिला याजकडून फौज सिद्ध होऊन, खळ्या सोडून आलीकडे आली. त्याजवर दत्ताजी शिंदे

६. हुसेन अल्ली. इ० सन १७१७.

७. गुरू नजीबखानाचा.

८. ढांसण म्हणजे तोफा, जेजाला, यांत दारू ठांसण्याचा गज किंवा सोटा असा अर्थ संभवतो. कांहीं स्थळीं 'ठांसण' असा पाठ आहे. ढांसण म्हणजे तोंड, धुरा, पुढील बाजू असाही अर्थ आहे. मार्गें पृष्ठ ४२ टीप ३१ पाहा.

यांचें झुंज लागलें. तों जनकोजी शिंदे यांचे बाजूस रोहिलियाचें सामान होतें तेंही बाहेर निघालें. तोफा वगैरे यंत्राचा भडिमार दत्ताजी शिंदे यांजकडील फौजेवर होऊं लागला. परंतु घाव होईना. रोहिलियाची आग भारी. या रितीचें वर्तमान होतांच सांडणीस्वार जनकोजी शिंदे यांजकडे आला. त्यानें सुचविलें कीं, "पाटीलसाहेब यांनीं घोडे घातले. मारामार जाहाली." हें वर्तमान जनकोजी शिंदे यांनीं ऐकून नगारा केला. उभयतां चुलते पुतणे यांची हिंमत सारखीच, आणि एकमेकांची आंचही बाळगून होते. मग घोडियास तंगबार करून खांसा जनकोजी शिंदे हर! हर! शब्द करून उठले. तोफांच्या माऱ्यांत आले. तोही मार खाऊन बाणांचा व हस्तनाला व सुतरनाला व जेजालांचा मार खाऊन बेलाशक रोहिलियांत मिसळले. मोठा कडाखा जाहाला. क्षणभर तरवारीची[९] टिपरघाई[१०] जाली. तों हें वर्तमान दत्ताजी शिंदे यांनीं ऐकून दांतनिसैकीस[११] येऊन तिकडून घोडे घातले. त्यांनींही मिसळ होऊन घाव केला. दोहींकडून मार सोसून रोहिलियांचें सामान निघोन खंदकापार जाहालें. यांचे फौजेचें ढासण खंदकास लागलें. तों पुढें मार्ग नाहीं. आणि त्यांजकडील आगीनें केवळ भाजून काढिलें. दत्ताजी शिंदे यांजखालील घोडा खंदकाच्या तोंडावर ठार पडला. पाटील पायउतारा खंदकाचे तोंडीं उभे राहिले. हातांत तरवार होती. मोठा हिमतीचा पुरुष, त्याजवर घाव तरवारेचा करावयास हात पोंचेना. मग हातांत तरवार होती ती झिडकारून मारिली. पलीकडे रोहिला ठार जाहाला. जनकोजी शिंदे यांनी मार खाऊन खंदकाला थेटून उभे राहिले. ते समयीं जनकोजी शिंदे यांची उमर तो वीस वर्षांची होती,[१२] परंतु हिंमत भारी. खांसा जनकोजी शिंदे यांजकडील खांसा यांचे खालील घोडी ठार जाहाली. खांसा जनकोजी शिंदे यासि हातावर मनगटाजवळ तरवारीची जखम लागली व भालेची जखम कानपट्टीस लागली, परंतु [ती] हलकी होती. तसेंच दत्ताजी शिंदे यांस एक भाल्याची जखम व गोळी मानेस कातरती गेली. ते समयीं भले लोकांनीं दोघे

---

९. घाव=तरवारीचा.

१०. या पुढें "ही गोडी फौज, घोडीं उढवणीस आलेलीं" असें क० प्रत लिहिते.

११. दांत-निसकी = दांतनिकसणें, दातांवर दांत नेटानें,संतापानें घांसणें. 'दांत निकर्षास' सां०प्र. 'दांत निकशीस' क०प्रत.

१२. "लहान वय होत्साता, मोठें धैर्यवान, मर्दुमकी मोठी, ते समयीं त्यांचाही घोडा पडला" क० प्रत.

सरदारही बळें ओढून काढिले. शिंदे यांजकडील साडे सातशें खासे मनुष्य कामास आले. केवळ धारच खचली. बाराशें घोडे ठार पडले. दोन अडीच हजार[१३] घोडे मनुष्य जखमी घायाळ झाले. शिंदे यांजकडील सरदार जिवाजी शिंदे म्हणून बरा मनुष्य मातबर[१४] होता. तीन हजार पागा त्याचे जिमेस होती. तो ठार पडला. त्याचा पुत्र हणमंतराव शिंदे. तेही कामास आले. दोन अडीचशें मुडदे खंदकापाशीं राहिले. ते काढावयास फावलें नाहीं. फौज माघारीं सरून गोटांत आली. लष्करांत जिकडे तिकडे प्रळय! ते समयीं कित्येक लोकांचे लौकिक जाहाले. कित्येकांनीं स्थित होती ती अबरू गमाविली. आठ पंधरा दिवस जखमा बऱ्या व्हावयास लागले. परंतु नजीबखान यास कांहीं चैन पडूं दिलें नाहीं. नित्य गोळागोळी होतच होती. तों दसराही आला.

५८. मग नजीबखान यानें आपला भाऊ खंदारास अगोदरच पाठवून अबदुल अलीस सिद्ध केलेंच होतें. इकडे सुजाउद्दौला आधीं हस्तगत होताच. तैसाच अहमदखान लंगडा पठाणही त्याचे मेळणींत होताच. तैसाच माधवसिंग जयनगरकर व बिजेसिंग मारवाडीसुद्धां अगदीं हिंदुस्थान भारून टाकिलें[१५] होतें. हें अगदींच दत्ताजी शिंदे यांस दृश्य नव्हतें. असा कार्ट[१६] नजीबखान यानें केला. खंदाराचा पातशाहा अबदुल अली चाळीस हजार फौजेनिशीं अटक उतरून लाहोर प्रांतीं आला. तों त्या प्रांतीं साबाजी शिंदे होते त्यांनीं एक मोठें अरिष्ट केलें. कमाँऊचे[१७] पहाडानजीक ज्वालामुखी म्हणून महाजागृत शक्तीचें पीठ होतें. तें महाक्षेत्र, तेथील ब्राह्मण केवळ अवघे हिंदुस्थान प्रांतीं प्रतिसूर्य होते. त्या क्षेत्रास जाऊन साबाजी शिंदे यांनीं त्याचा विध्वंस केला. तेव्हां तेथील ब्राह्मण यांनीं शक्तीपुढें सहस्रचंडीचा होम [ करून ] प्रथम आहुती दत्ताजी शिंदे यांचे नांवें टाकिली. पूर्णाहुती नानासाहेब यांचे नांवें टाकिली. पुढील भवितव्य तैसेंच होणार. असो, साबाजी शिंदे यांनीं दुराणीस तोंड[१८] न देतां निघाले. पंजाब, मुलतान प्रांतीं त्रिंबक बापूजींचें

---

१३. 'हजार' बद्दल 'शेंहे' असें क० प्रत लिहिते.

१४. मातबर=अब्रूचा, नांवा लौकिकाचा.

१५. "हिंदुस्थानांत जाळें घालून त्याची दोरी रोहिल्यानें आपले हातीं धरली होती" सां० प्रत.

१६. काट = खोल मसलत, कृष्ण कारस्थान.

१७. "लाहोरच्या पाहाडा नजीक" सां० व क० प्रती.

१८. तोंड देणें = आडविणें, लढाईस समोर उभें राहणें.

पथक होतें. दहीं हजार फौजेनिशीं होते. ते केवळ कुबेर जाहाले होते. पंजाब मुलुख केवळ गरीब, निःशस्त्री. त्या राज्यांत जे चाकर[20] मनुष्य त्यांनीं मात्र हत्यार बांधावें, वरकड कोणीं हत्यार न बांधावें. या प्रकारचा तालुका गरीब, पांच राउतांनीं गांवांत जाऊन चावडीस बसावें आणि गांवांतील मालियत[21] आणणें तीं ज्याची त्याजकडून आणवावी. शेवट त्याचे डोईवर देऊन लष्करा पावेतों येऊन पोंचवावें. ऐशा सुखांत होते. केवळ गरीब खासेदार[22] यांजपाशीं हजार पांचशें रुपये यांची मालमत्ता बाळगून होते. ते तिकडेच गिलचे यांचे कवेंत सांपडले. निघों पावले नाहींत. साबाजी शिंदे मात्र निघाले होते.

५९. इकडे दुसरा जालियावरि दत्ताजी शिंदे यांनीं लहान थोर सरदार मिळून मनसबा केला कीं, "चार महिने या स्थळीं मेहनत केली. परंतु नजीबखान रोहिला जेरीस येईना. दिवसेंदिवस शेणामेणाचे [ते] लोखंडाचे होत चालिले. यास यत्न कोणता काय करावा? आतां एक तजवीज मात्र करावी. हर इलाज करून भागीरथीपार फौज चालवावी. म्हणजे पलीकडे रोहिलियाचे बुणगे व खजीना आहे, तो लुटून टाकावा. आणि नदीस पूल बांधिला आहे तो तोडून टाकावा. आणि फौज पलीकडे ठेवावी. म्हणजे सहजच वैरी अप्रयासें जेरीस येईल." तेसमयीं कित्येक लोकांनीं दिक्कत[23] घेतली कीं, "पलीकडे सुजाउद्दौला पन्नास हजार फौजेनिशीं असतां हें कसें घडतें?" दत्ताजी शिंदे बोलिले कीं, "सुजाउद्दौला याचा व आमचा स्नेह चांगला आहे. पूर्वीं मनसूर अली याचे कामास आमचे बाप राणोजी शिंदे बहूत प्रकारें आले होते. प्रस्तुतही त्याजकडील वकील येथें आम्हांपाशीं आहेत. बोलणियांत व स्नेहांत अंतर दिसत नाहीं." म्हणून बोलिले. परंतु मोंगलाई मसलत यांस उमजली नाहीं. एक सुजाउद्दौलाच्या बळावर तर नजीबखान यानें हिंमत बांधिली. असें असतां यांस कालगतीमुळें झांपड पडली. 'जैशी दैवाची उंजरी[24] तैशी बुद्धी उपजे शरीरीं.' असा प्रकार जाला.

६०. असो, "नदी उतरावयास यत्न पाहावा" म्हणोन बोलिले. तों नजीक मिरापूर होतें तेथील सय्यद हे नजीबखान याचे द्रोही होते, त्यांस बोलावून

---

१९. 'सात हजार' तुं० प्रत. 'सात आठ हजार' क० प्रत.

२०. चाकर मनुष्य=सरकारी नोकर अमलदार. 'चाकरमाने' क० प्रत.

२१. मालियत = मालमत्ता.

२२. खासदार=घोडेवाला, मोतद्दार.

२३. दिक्कत=आक्षेप, उलट कल्पना. आशंका.

२४. उजरी = तेज, उच्चत्व.

नदीचा विचार पुसला. ते समयीं सय्यद यांनीं सांगितलें कीं, “हरिद्वारा नजीक जैता गुजर म्हणोन गिरांशी[25] भारी[26] आहे. त्यास मात्र चोरवाट विदित आहे. त्याजशिवाय दुसरियास ठाऊक नाहीं.” म्हणोन सांगितलें. मग हरइलाज करून जैता गुजर यास आणून, त्यास बहुमान करून, हत्ती, चौघडा व जडावाची कंठी दिली. त्यास पांच लक्षांचा मुलूख द्यावा असा करार केला. तेव्हां त्यानें “वाट दाखवितों” म्हणोन मान्य केलें. मग यांनीं फौजेंतील निवडक गोविंदपंत बुंदेले व अंताजी माणकेश्वर यांचा पुत्र तात्या व जिवाजी भोइटे, नाइकजी भोइटे व तुकोजी होळकर, असे वीस हजार फौजेनिशीं नेमून जैता गुजर यासमागमें दिली. कार्तिक शुद्ध[27] प्रतिपदेस हरिद्वारास जाऊन पोंचले. तेथें खळाळ भागीरथीस होता. तेथें गेले. तों खळाळांत नाभीपर्यंत पाणी होतें. परंतु खळाळ भारी. दाहा हात निभावलें म्हणजे पार पडलें. नाहीं तर चार हात गेलें तरि डोहांत पडलियावरि समुद्रांत गेल्याची गत! मग यत्नच नाहीं. असें संकटांतून फौज भागीरथीपार गेली. हें वर्तमान दत्ताजी शिंदे यांस समजलें. हें ऐकून परम खुशाली जाली. तोफाही जाल्या.

६१. हें वर्तमान नजीबखान रोहिला यानें ऐकतांच तेच क्षणीं कुतुबशाहा पांच हजार फौजेनिशीं पुलावरून बुणगियांत लावून दिला. हुंदेखान रोहिला तो अगोदरच नदीपार होता. हुंदेखान व कुतुबशाहा एकत्र जाले. इकडे नजीबखान रोहिला यानें तावडतोब सांडणीस्वार सुजाउद्दौला याजकडे रवाना केले कीं, “तुमचे भरंवशावर आम्हीं हें कर्म पतकरिलें. आतां गनिमाची फौज नदीपार जाली. माझा जीव जगत नाहीं. अजूनही तुम्हीं कुमक जलद करितां तरि[28] उत्तम आहे. नाहीं तरि आम्ही दत्ताजी शिंदे यांस भेटून पुलावरूनच पार होतों. तुम्हांसाठीं म्यां एवढें दुर्घट कर्म अवलंबिलें.” म्हणोन सांडणीस्वार सुजाउद्दौला याजकडे पाठविला. गंगापार शिंदे यांची फौज गेली त्यांनीं नजीबखान याचे बुणगे व मुलेंमाणसें व खजीना गांठला. ते दिवशीं अगदींच हस्तगत व्हावयाचे, परंतु गोविंदपंत यांचा व नजीबखान याचा चांगला स्नेह होता म्हणोन लांच पांच लक्ष रुपये घेऊन त्याची बाजू मारून दिली. कमाऊचे

---

२५. गिराशी=डोंगरी लुटारू.

२६. भारी = जबरदस्त.

२७. ‘कार्तिक वद्य,’ कल्याण, पुणें व सांगली प्रती.

२८. या पुढें कल्याणप्रत म्हणते “तर माझी निभावणी होईल, नाहीं तरि परिणाम लागत नाहीं.”

२९. “अंतस्थ घेऊन शीत ज्वराचे निमित्यें आपलें आंग काढिलें” सां० प्रत.

पहाडांत भारी किल्ला होता त्यांत जाऊन अगदीं भारधडी[३०] पोंचली. निमित्य टाळावें म्हणून गोविंदपंत यांनीं पिछाडी गांठली. त्यांत दोन लक्ष रुपये पांच हत्ती व दोनचारशें उंट व दोनचारशें घोडीं अशीं सांपडलीं. तें घेऊन पुलाकडे यावें तों सुजाउद्दौला पन्नास हजार फौजेनिशीं व तिनशें तोफा [निशीं] असा चाल करून आला. यांचे कहीची[३१] व त्यांची गांठ अकस्मात पडली. कांहीं कही लुटली गेली. हें वर्तमान गनिमांनीं ऐकतांच तेक्षणीं माघारे पलायमान जाहाले. कोठें दम न खातां दोन रात्री व दोन वेळांत खळाळ उतरून आलीकडे पोंचले. झाडून नदी उतरून आलीकडे आले. त्या गडबडींत हजार बाराशें मनुष्य वाहून गेले. दम खाऊन उतरते तर इतके मनुष्य वाहून जातेना.

**६२.** असो, दत्ताजी शिंदे यांनीं वर्तमान ऐकतांच यांची खुशाली होती ती मोडली. निर्वाण-समय भासला. सुजाउद्दौला याजकडील वकील प्रीतराज[३२] होता त्यास बोलावून आणिलें आणि पुसलें कीं, "तुम्ही आम्हांस मसलत काय करीत गेलां, आणि कर्तृत्व काय केलें[३३]?" म्हणोन वकिलाची अप्रतिष्ठा करून दवडून दिला. फौज येऊन मिळाली. गोविंदपंत यांजवर बहुतच श्रमी[३४] जाहले. "मसलतीस धक्का यांनीं बसविला; असो, पुढें पाहून घेऊं," म्हणोन उगेच राहिले. सुजाउद्दौला याचा मुकाम भागीरथीचे पलीकडे जाहाला. यांजकडील कोणी तीर्थीचे स्नानास जाऊं पावेनातशीं जाहालीं. तोफांचे गोळियांनीं मारूं लागले[३५]. अस्तु.

**६३.** पुढें सुजाउद्दौला याची नजीबखानानें भेट घेऊन एकांतीं मनसबा केला कीं, "तुमचा व शिंदे यांचा स्नेह पूर्वीपासून आहे. तर त्यांस तुम्ही भेटीस आणावें व दगा करून दत्ताजी शिंदे यांस मारावें, व जनकोजी शिंदे यांस मारावें." म्हणोन मनसबा करून दत्ताजी शिंदे यांजकडे राजेंद्रगीर गोसावी याचा चेला उमरावगीर गोसावी सुजाउद्दौला याजकडे होता, त्याचे पदरीं पांच हजार फौज होती, उमर तो पंचवीस वर्षांचे खालें, परंतु[३६] कर्ता मनुष्य

---

३०. भारधडी = जड सामान (मागें पृष्ठ ३६ टीप पाहा.) भारधडी रोहिल्यांची.

३१. यांची कही म्ह० गनिमांची कही, कही = गवत, काष्टें इ० जमविण्याकरितां जाणाऱ्या लष्करी लोकांची टोळी.

३२. 'प्रीतिराम' क० प्रत.

३३. येथें 'दाढी धरून पाय तुडवावे' हें कर्म तुमचें!" असें क० व सां० प्रती.

३४. श्रमी = नाखूष, इतराज.

३५. येथें "गनीम यांणीं तो तळ बळकाऊन तेथेंच राहिले. या जाग्यावरून हालले नाहींत" असें वाक्य सां० प्रतींत अधिक आहे. तसेंच क० प्रतींतही आहे.

३६. 'शाहाणा, चतुर' क० प्रत.

होता, त्यास सुजाउद्दौला यानें कांहीं चित्तांतील कापट्य कळूं न देतां वरकरणीनें ममतापूर्वक बोलून दत्ताजी शिंदे यांजकडे पाठविलें. मनसबियांत दाहा पांच येरझारा केल्या. निदान मनसबियांत ठरविलें कीं, "सुजाउद्दौला याजकडील कोट रुपये खंडणी घ्यावी. नजीबखान यानें व तुम्हीं पाहून ३७घ्यावें नजीबखान भेटीस येत जात [आहे तों] पावेतों स्वस्थ३८ राहावें. तुम्हीं हजार फौजेनिशीं नजीबखान याचे फौजेंतून३९ उभयतां दत्ताजी शिंदे व जनकोजी शिंदे व नारो शंकर व अंताजी माणकेश्वर याचा पुत्र असे मिळोन भेटावयासि यावें." याप्रमाणें इमान प्रमाण बोलून करारांत आणिलें. इकडे यांस बोलीचे भरास लावून अबदुल अलीकडे वरचेवर पत्रें पाठविलीं कीं, "सुजाउद्दौला येऊन पोंचला. अहमदखान लंगडा पठाण तो दहा हजार फौजेनिशीं सिद्धच आहे. माधवसिंग जयनगरकर हा केवळ आम्हांस आप्ताहून आप्त, त्यानें सवती एक बाजूच आटोपली [आहे.] मल्हारराव होळकर देशींहून तीस हजार फौज घेऊन मजल दरमजल दत्ताजी शिंदे यांस मिळावयास येत होता, तो माधवसिंग यानें शहास गुंतोन पाडिला. महत्कार्य केलें. याप्रमाणें आज केवळ ससें भाणवसियास सांपडतें तैशी शिकार अनायासें सांपडली आहे. सत्वर येऊन पोंचावें. म्हणजे दक्षिणेस एक मनुष्य जाऊं पावणार नाहीं." याप्रमाणें पत्रें पाठविलीं. आणि अबदुल अलीस जलदीनें आणविला. तैसेंच दिल्लींत अलमशाहा पातशाही करीत होता, त्याचे भवितव्य४० होणार, त्यासही बुद्धिविपर्यास निर्माण जाला. त्यानेंही फितुराचीं पत्रें सुजाउद्दौला याजकडे पाठविली कीं, "तुम्हीं सर्वत्र मिळोन दख्खनियांचें पारिपत्य करावें, गाजुदीखान याचा शिरच्छेद करावा; तुम्हांस वजिरी देईन आणि बक्षिगिरी नजीबखान रोहिला यास देईन." म्हणोन पत्र पाठविलें. इकडे अबदुल अली खंदाराचा पातशाहा यासही पत्रें पाठविलीं कीं, नजीबखान व सुजाउद्दौला यांनीं गनिमाची फौज इरेस पाडिली आहे. तुम्हीं थोर थोर मजली करून दिल्लीस येऊन पोंचावें.

---

३७. "नजीबखान यास तुम्हीं पाहून घ्यावें. नजीबखान याचा जाबसाल आम्हांकडे नाहीं. किंवा रोहिला याशीं सख्य करणें असल्यास आपण स्वस्थ राहावें, त्याचाही समेट करून देतों" क० व सां० प्रती.

३८. "व नजीबखान याणें भेटीस यावें जावें, हजार फौज घेऊन यावें," सां० प्र.

३९. नजीबखान याची फौज एकीकडे सोडून' सां० व क० प्रती.

४०. येथें "त्यास मृत्यूनें ओढिलें. याजमुळें त्यास वासना फितुराची होऊन" इ० वाक्य क० प्रतींत अधिक आहे.

दिल्लीस हस्तगत करून, गाजुद्दीखान याचें कार्य उरकोन, मग, चौंकडोन दत्ताजी शिंदे यांस ससेहोलपट[४१] करावी. खबर सांगावयास दक्षिणेस मनुष्य जाऊं देऊं नये." म्हणोन अलमशाहानें अबदुल अलीकडे पत्रें पाठविलीं.

६४. तों इकडे दत्ताजी शिंदे कोड रुपयांचे आशेस लागून भेटीस पुलावर जावें, असा इत्यर्थ जाहाला. मग जनकोजी शिंदे व नारो शंकर, भागीरथीबाई दत्ताजी शिंदे यांची स्त्री होती, त्यांनीं एकांतीं भीड सोडून जाबसाल केला कीं, "अबदुल अली दुराणी याची फौज चाळीस हजार अटक उतरून लाहूर प्रांतीं आली. आमची फौज होती ती कांहीं उधळली, कांहीं पंजाबांत होती तिची गत काय जाहाली ते न कळे. हें वर्तमान प्रसिद्ध ऐकतच आहां. दुसरें अहमद-खान लंगडा पठाण दाहा हजार फौजेनिशीं जमून रोहिला व ते एकमतें आहेत. सुजाउद्दौला [याची]ही पन्नास हजार फौज, कुळीही दैत्याची व तीनशें तोफा [असा तो] उरावर उतरलाच आहे. नजीबखान वीस हजार फौज व दाहा हजार पायदळ, प्रत्यक्ष वैरी, युद्ध करीतच आहे. असें चहूंकडून जाळें पसरलें असतां तुम्ही आपले ऐश्वर्यानें व हिमतीनें व ईर्षेनें धुंद[४२] जाहीला. परंतु आम्ही मुलें बायकांनीं तुरुक-होडीस[४३] पडावें इतकें मात्र उरलें. प्रत्यक्ष वैरी नजीबखान याचे फौजेंतून पुलावर जाऊन भेटावें, ही मसलत, हा मनसबा [वाईट असें] केवळ नेणतें मूल असेल त्याचे ध्यानांत येईल आणि तुम्हांस काळाच्या गतीमुळें झांपड कैसी पडली, हें न कळे." असें ऐकोन दत्ताजी शिंदे यास परम विषाद आला. बोलता जाहाला कीं, "जनकोजी बावा, तुम्हांस जिवाची आस्था आहे. तुम्हीं फौजेंत राहावें. आम्ही भेटीस जातों. दैवीं असेल तें होईल." म्हणोन बोलतांच जनकोजी शिंदे बोलिले कीं, "तुम्हीं फौजेंत राहावें. आपण भेटीस जातों." म्हणोन केवळ गळां पडले. नारो शंकर काबिल[४४] मनुष्य बोलिला कीं,

---

४१. 'ससेहोलपट.' 'डुक्कर खळीस येतो' 'ससे भाणवसियास सांपडतें' 'पोटांत हरणाची काळजी शिरून' वगैरे पारधीच्या कामांत येणारे शब्द पूर्वी ब्राह्मण जातीच्या लेखकांच्या देखील तोंडीं होते.

४२. याबद्दल "तुम्ही तर आपले हिमतीनें व हर्षानें मदांध जाहलां आहां; परंतु आम्हां बायकामुलांनीं दुराणियास सांपडोन मरावें किंवा वैरियाचे घरीं कुलंबिणी होऊन राहावें इतकें मात्र राहिलें" सा० व क० प्रती.

४३. 'तुरुकहडीस' 'तुरुकबुडीस' 'पडीस' असें दुसऱ्या दोन प्रतींत आहे. तुरुक = मुसलमान. होड = पण, पैज, 'तुरुक बंदीस' तर नव्हे ?

४४. काबिल=हुषार, वस्ताद. 'उमदा मनुष्य, बहूत पाहिलेले आणि शाहाणा' क० प्रत.

"तुम्हांस भ्रांती कां पडली, हें न कळे. आधीं नजीबखान याचे फौजेंत गेल्यावर तो कांहीं प्राणानिशीं माघारां येऊं देत नाहीं. कदाचित त्याणें हें कर्म न केलें तरि पुलावर सुजाउद्दौला यास भेटावयास जालें[४५]. तेव्हां तो केवळ मनुष्य नव्हे. प्रत्यक्ष अंगींही दैत्य आणि कुळीही[४६] दैत्य. बळेंही भारी. हत्तीचे मागील पायावरि पाय देऊन शेंपूट[४७] वोढून धरिलें तरि हत्ती जाऊं न पावे. तैसेंच भागीरथी-सारखी नदी, मोठें विस्तीर्ण पात्र, तें सुजाउद्दौला यानें सहज ऑडसांगडीनें[४८] रिकामें यावें जावें. बुडी देऊन सुसर ओढून काढावी. उमर तो पहिला पंचविशी, परंतु शक्ती एवढी!" तेव्हां जवळ कोणी गृहस्थ होते त्यांनीं विचारिलें कीं, "मनुष्य-व्यक्तीमाजी एवढा पराक्रमी व्हावयास कारण काय?" नारो शंकर यांनीं उत्तर केलें कीं, "मनसूर अली यास पोटीं पुत्रसंतान नव्हतें. म्हणोन एवढें राज्य, केवळ दुसरी पातशायत, असें सुख असतां मनसूर अली यानें पुत्राविना केवळ हळहळ मानून चित्तांत योजना केली कीं, "धिक जिणें! याहून फकीरी बरी, परंतु हे जिकीर कामाची नाहीं." म्हणोन उदास वृत्तीनें अतीत–अभ्यागत फकीर–फुकरा यांस द्रव्यदान, वस्त्रदान व अन्नदान करीत आपण जात्या[४९] आपले स्वकर्मीं उजू–तवाजू करून सावध [होता.] पुत्र-उद्देशें अयोध्येंत ब्राह्मण व बैरागी यांस अनुष्ठानास घातलें. ते समयीं त्याच्या दैवयोगें केल्या कर्मीचें सार्थक करावें म्हणोन ईश्वरास भार जाहाला. मग त्याचें कुलदैवत[५०] मक्केहून एक अवलिया फकीर आला. त्यानें स्वप्नीं फळ दिलें कीं, "तूं पुत्राचे उद्देशें श्रमी तरि हें फळ आपले स्त्रीस भक्षावयास द्यावें." म्हणोन फळ हातीं दिलें. असें स्वप्नीं पाहिलें. प्रत्यक्ष दिवस उगवलियावरि फकीर आला. त्यानें फळ दिलें. दुवा देता जाहाला कीं, "फळ आपले स्त्रीस भक्षावयास देणें. बळवान तुजला पुत्र होईल." म्हणोन सांगतांच त्यास रात्रौ आधींच स्वप्नीं साक्षात्कार जाहाला होता. मग मनसूर अली यानें फळ नेऊन स्त्रीस भक्षावयास दिलें आणि बाहेर आला, तों फकीर गैब[५१] जाला. मग मनसूर अली यानें चित्तांत विचार केला कीं, "अवलिया फकीर आला असतां मी मोहास गुंतोन सेवा-चोर जाहलों." म्हणून बहूतच खेद करिता जाहाला. याप्रमाणें ईश्वरकृपेचें

---

४५. 'आले' पुणें प्रत,

४६. कुळीही दैत्याची. तुं० प्र०

४७. "पुशीट" तुं० प्र०

४८. 'हातपोहणीनें बिनसांगडी-शिवाय' क० प्रत.

४९ जात्या=जातीनें, स्वतः

५०. या पुढें 'मिळोन ही रा न बंदगी करितां' असे शब्द क० प्रत देते.

५१. गैब=गुप्त.

देणें!" असें म्हणतांच तेथें कोणी पाषांडी होते त्यांनीं उत्तर केलें कीं, "प्रालब्धीं पुत्र नसतां देवें कोठून दिला." "यास प्रमाण भारतीं आहे कीं नाहीं? भक्ताचे प्रालब्धीं पुत्रसंतान नसतां नवेंचि निर्मून देतो असें सिद्ध आहे. शास्त्र साक्ष देत आहे." त्यांत कोणी एकानें कल्पना घेतली कीं, "याजकडे भक्तपणाचें कर्म काय? प्रत्यक्ष म्लेंच्छ योनीस जन्म, अमंगळ तप, त्याचें कश्मल[५२] फळ म्हणोन दिक्कत[५३] घेतली. नारोपंतांनीं प्रत्युत्तर केलें कीं, "भक्तपणा कांहीं पाहावयास[५४] लागत नाहीं. दैत्यकुळीं भक्त प्रल्हाद जाहाला कीं नाहीं? किंवा राक्षसकुळींत बिभीषण जाला कीं नाहीं? तसें, अविंधाशीं मतलब[५५] नाहीं, तो केवळ नेकजाद[५६] प्राप्त पुरुष होता. असें दुवाचें फळ. या योगें करून बळ उत्कृष्ट प्राप्त जाहालें. असो, त्याचें बळ या प्रकारचें! त्यानें दगा न करितां सहजीं दोघांस बगलेस धरून गंगेंत उडी पुलावरून टाकिली,[५७] तरि त्याचें काय करावें?" असे बहुतां प्रकारें बुद्धिवाद सांगून, दृष्टांतद्राष्टांत देऊन भेटीची मसलत राहाविली. उमरावगीर बाहेर डेरियांत होता, त्यास साफ सांगितलें कीं, "आम्हांस पुलावरि भेटावयास अनुकूल पडत नाहीं. तुम्हांस भेटीचें अगत्य असेल तरि तुम्हीं हजार फौजेनिशीं नजीबखान याचे फौजेचे आलीकडे यावें. आम्ही हिकडून येतों. परस्परें भेटी होतील. हें न घडे तर तुमची आमची कागदपत्रीं भेट. इमानप्रमाण करून आमची क्रोड रुपयांची हुंडी उतरून द्यावी. तुम्हीं मित्रवादें अयोध्येस जाऊन स्वस्थ राहावें. नजीबखान याची कुमक करूं नये." याप्रमाणें बोलतांच उमरावगीर यास परम विषाद आला. "आम्हीं हिंदू असतां दगादुगा होऊं देऊं असें नाहीं हें चित्तांत काय आणिलें?" म्हणोन क्षणभर रदबदली केली. परंतु खातरजमेशीं मसलत मोडली. उमरावगीर गोसावी यानें सुजाउद्दौला यास वर्तमान सांगितलें. तेव्हां तो आपले जागां फिक्रीं[५८] होऊन राहिला. नजीबखान व नबाब सुजाउद्दौला मागती एकत्र होऊन मसलत केली कीं, "हा तो मनसबा राहिला. आतां

५२. कश्मल=वाईट, पापरूप.

५३. दिक्कत=आक्षेप.

५४. 'भक्तपणास कांहीं यातायात लागत नाहीं' तुं० प्रत. 'भक्तपणा पाहतां यास कांहीं लागत नाहीं.' क० प्रत.

५५. मतलब नाहीं=कर्तव्य नाहीं. अविंध असो कीं कोणी असो, तो भक्त असूं शकेल.

५६. नेकजाद=सद्गुणी, साधू.

५७. 'गंगेंत नेऊन बुडविलें' क० प्रत.

५८. 'खिन्न' सां० प्रत.

एक करावें. क्रोड रुपयांचे लटके आशेस गोंवून पाडावें. तों अबदुल अली दुराणीही येऊन पोंचेल. दुराणी आलियावरि बसले जागियावरून मराठे यांस उठों न द्यावें." याप्रमाणें मसलत करून नित्यशः "आज देतों, उद्यां निशा करितों" म्हणोन आशेस लाविलें.

६५. इकडे अबदुल अली लाहुरास पोंचला. तों साबाजी शिंदे व संदीपबेग यांचा पुत्र यांनीं लाहूर सोडून [ते] कुरुक्षेत्राचे रानांत आले. दत्ताजी शिंदे यांस पत्रें पाठविलीं कीं, "तुम्ही अजून तेथें कां राहिलां? दुराणी गिलचांची फौज भारी आली. तुम्ही निघतां तरि उत्तम, नाहीं तरि तुम्हांस कोणी यमुना उतरूं देणार नाहीं." म्हणोन पत्रें येतांच यांस निर्वाणसमय भासला[६०]. मग डोळियावरील पडळ निघतें तैशी गत जाहाली. परंतु द्रव्याची आशा सुटेना. फौजेंत मोठी खळबळ जाहाली. वैरणीचे दुष्काळामुळें तमाम उंटें, घोडीं मेलीं होतीं, त्यांनीं उंटें घोडीं घेतलीं. मग दत्ताजी शिंदे यांनीं बुणगे काढून मिरापुरावरते[६१] कोशावर ठेविले. आपण सडे फौजेनिशीं तळावर राहिले.

६६. तों इकडे फितुराचीं पत्रें दिल्लीहून अलमशाहा याचीं सुजाउद्दौला यास फितुराचीं गेलीं होतीं, त्याचीं उत्तरें अलमशाहा याजकडे जात होतीं तीं अकस्मात गाजुदीखान याचे चौकीस सांपडलीं. पत्रें वाचून पाहिलीं. तों आपला घात व्हावयाचा प्रसंग पाहिला. तेच समयीं गाजुदीखान किल्ल्यांत जाऊन, बेलाशक अलमशाहाचा शिरच्छेद करून, दिल्लींत मुरदा तैसाच टाकून, प्रहर रात्र उजेडावयाची तों अगोदरच गाजुदीखान व नागरमल्ल व बाहादरखान बलोचे[६२] चार हजार फौजेनिशीं निघोन कच्चे चाळीस कोस तिसरे प्रहरीं[६३] येऊन पोंचले. ते अंतर वेद, असें म्हणावयास कारण कीं, यमुना व भागीरथी या दोहींच्या मध्यें भाग कच्चे चाळीस[६४] कोसांची मर्यादा, या नांव अंतर-वेद, तेथें गाजुदीखान वजीर शिंदे जेथें होते तेथें येऊन पोंचले. आडवे यावयाचाही मान पाहिला नाहीं. अकस्मात गोटाजवळ येऊन दाखल जाहाले. सुजाउद्दौला

---

५९. निशा=खातरी (ऐवजाबद्दल.)

६०. 'धाबें दणाणलें' क० प्रत.

६१. "मिरापूरचे तळापासून तेरा कोश तेथें ठेविले" क० प्रत.

६२. 'बलोचे' कीं बेलोचे! मागें हें नांव अनेकदां आलें आहे. कांहीं ठिकाणीं 'बेलोचे' असें दिसतें. बलोचे म्ह० बलूची स्थानचे!

६३. "दिवशीं अंतर वेदींत" क० प्रत.

६४. "मुलूख एकशेंहेचाळीस" सां० व क० प्रती.

याजकडील हुसेनखॉंन व गफूरखान व उमरावगीर असे घेऊन शिंदे यांचे डेरियांत मसलत करितात तों, एकाएकींच पाइक[66] येऊन मजुरा केला आणि अर्ज केला कीं, "साहेब, वजीर तो आन पोंहोंचे." असें म्हणतांच पाटील जागियावरून बाडी[67]च्या बाहेर येऊन पाहतात तों गाजुदीखान याच्या अंबाऱ्या देवडीस येऊन पोहोंचल्या. दत्ताजी शिंदे यांनीं विस्मय केला कीं, "यांनीं मान महत्त्व न पाहतां एकाएकींच एवढे निकडीनें यावयास प्रयोजन काय?" असें म्हणतात तों वजीर हत्तीवरून उतरून दत्ताजी शिंदे यांस हातीं धरून तेच क्षणीं एकांतीं जाऊन साफ सांगितलें कीं, "अवघेंही हिंदुस्थान फिरलें. अबदुल अलीची दौर्ड[70] पानिपत कर्णोलचे रोखें येऊन पोंचली. सुजाउद्दौला व नजीबखान व अहमदखान लंगडा हे पाऊण लक्ष ऐशीं हजार येथें आहेत. तुम्ही क्रोड रुपयांचे आशेस लागलां आहां; तुम्हांस क्रोड रुपये कोणी देत नाहीं. अवघी भुलताप आहे. अबदुल अलीचा मार्ग लक्षीत आहेत. अवघा मनसबा एकीकडे ठेवून यासमयीं कूच करून जावें." असें ऐकतांच सर्वत्रांचें तोंडचें पाणी पळालें. पुढें होणार परंतु आजच जाहालें असें भासलें. कूच करावयाचा निश्चय जाला. सांडणीस्वार व पत्रें मल्हारराव यांजकडे पाठविलीं कीं, "तुम्हीं जयनगरचा शह सोडून लवकर[69] येतां तर उत्तम आहे. नाहीं तर पुन्हा तुमची आमची भेट होत नाहीं." म्हणोन निदानचीं पत्रें पाठविलीं.

६७. तों लाहुराकडून साबाजी शिंदे पळोन आले तेही येऊन पोंचले. ते समयीं उमरावगीर गोसावी यास सांगितलें कीं, "अबदुल अलीची फौज[68] नजीक आली. आतां नबाब सुजाउद्दौला यास सांगावें कीं, "प्रस्तुत आम्ही त्याचे पारिपत्यास जातों. तुम्हांस इमान, आमचा स्नेह, राखणें असलियास आजिचे समयीं क्रोड रुपयांची हुंडी उतरून द्यावी, व तुम्हीं कूच करून अयोध्येस जावें." म्हणोन बोलोन त्याज समागमें हत्ती, घोडा व शिरपेंच व मोतियांचा तुरा देऊन वस्त्रेही दिलीं. याप्रमाणें सांगितलें. तेसमयीं उमरावगीर गोसावी यास उमगलें कीं, "अविंधांनीं मोंगलाई मसलत केली होती, परंतु दत्ताजी शिंदे भेटीस आले नाहींत म्हणोन उत्तम जालें. नाहीं तरि आम्हांस जन्माचें अपेश येतें. ईश्वरेंच अरिष्ट[71] वारिलें." म्हणोन संतोष पावून उमरावगीर सुजा-

---

६५. "मुसेखान" पु० व सां० प्रती.

६६. पाइक=प्यादा, चाकर.

६७. बाड=तंबूच्या कनाथी.

६८. "फौजा" पुणें प्रत.

६९. 'अति निकडीनें' क० प्रत.

७०. "दौड" पाठभेद.

७१. 'आम्हांवरील अपेश टाळिलें' क० प्रत.

उद्दवला याजकडे आला. इकडील वृत्तांत सविस्तर सांगितला. तेसमयीं सुजा-उद्दौला यांनीं चित्तांत विस्मय केला कीं, "अशा अरिष्टांतून आजिचे समयीं दत्ताजी शिंदे निभावून चालिले! आमची केली मसलत तैशीच राहिली!!

६८. दुसरे दिवशीं दत्ताजी शिंदे यांनीं कूच करून मजल दरमजल कुंज-पुऱ्या नजीक येऊन यमुना उतरून आलीकडे आले. तों गिलचा कुरुक्षेत्रावर आला, याची बातमी पोंचली. मग दत्ताजी शिंदे यांणीं बुणगे, मुलें माणसें व जनकोजी शिंदे व गाजुदीखान यांस दिल्लीकडे वाटेस लाविलें. आपण सडे होऊन हे[७२] कोणी एकमेकांस मिळाले नाहींत तों अबदुल अलींस गांठून त्याचा रेंच मोडून टाकावा म्हणोन पाणिपतावर गेले. तों तेथून गिलचास सोळा कोसाचा छाटा होता म्हणोन बातमी आली. दत्ताजी शिंदे यांनीं मसलतीस लहान थोर सरदार बोलीवून सांगितलें कीं, "खंदारचा पातशाहा चालोन आला आहे. मी तर पेशव्यांचा बारगीर, माझी अबरू कांहीं विशेष नाहीं. परंतु तुम्ही सर्वत्र राज्यांतील मराठे नामी सरदार, तुम्हांस 'मरा' म्हणवत नाहीं. तरी लेजे दान की दीजे प्राणें[७३]. यदर्थ दोहोरा आहे.

मारूं तो मरजाउंना, हटूं तो जनोंकी लाज।
ये खुदा परवर दिगार, दोनो कटीण काजें[७४]॥

ऐसा विचार आहे. याचें उत्तर काय?" म्हणोन बोलतांच सर्व नामी सरदार बरेच कुलीन होते. त्यांनीं निरोत्तर केलें कीं, "पाटील, तुम्ही फौजेचे पाठीवर उभे राहाल तर आम्ही इरेनें झुंज करूं. तुम्ही फौजेस टाकून पुढें जालेत[७५], तर आम्ही गनीम जातीचे, पाठीवर काठी उठती तोंच जें होणें तें होईल. नाहीं तर झाडास बांधले तरी झाड घेऊन जातील. हा आमचा मराठियांचा स्वभाव. बोलावयाचा मात्र धर्म आहे कीं, जेथें साहेबांचा पायपोस पडेल तेथें आमचें

---

७२. 'हे' म्हणजे सुजाउद्दौला, नजीब खान, अबदाली वगैरे.

७३. "देय मान देय प्राण" पुणें प्रत. "लेजे दे दान की लेजे दे प्राण" तुं० प्रत.

७४. "याचा अर्थः रणांत शूरास मारूं नाहीं तरि मरून जाऊं. बचावला [वेला] तर माघारे येऊं हा भरवंसा नाहीं अगर समरंगणीं पळून जाऊं तर लोक निंदा करतील. जनास तोंड कसें दाखवावें! म्हणोन भगवंतास प्रार्थना हीच करतों कीं, दोन्ही कर्में कठीण. यांतून कसें पार पाडशील असा समय आला आहे." क० प्रतींत असा अर्थ देण्याचा यत्न केला आहे.

७५. "पुढें जाल तर आम्ही शत्रूवर उठणार नाहीं. मग जें होणें तें होऊं" क० प्रत.

डोकें पडेल. परंतु त्याचे वांटेकरी थोडे. नाहीं तरि जेथें साहेबांचें डोकें तेथें भल्याचा पायपोसही पडणार नाहीं ! ऐसा विचार आहे. यांत तुम्ही खावंद आहां." असें म्हणतांच दत्ताजी शिंदे बोलिले कीं, "तुम्ही ज्या रितीनें सांगाल त्याप्रमाणें वर्तणूक करूं." म्हणोन बोलून रात्रीं मुकाम करून राहिले. गिलचियाची बातमी आणविली तों तेथून कच्चे वीस कोसांवर अबदुल अली येऊन पोंचला. ही बातमी येतांच शिंदे यांनीं पुढें हारोळीस फौज जिवाजी भोइटे व नाइकजी भोइटे व गोविंदपंत बुंदेले व अंताजी माणकेश्वर यांचा पुत्र, असे पंधरा हजार फौजेनिशीं पुढें रवाना केले. त्यांनीं जाऊन सोळा कोसांवर दुराणी गांठिला. परंतु ईश्वराचें कर्तव्य, गनिमांचा विनाशकाल. नाहीं तरि दुराणी मनुष्य कांहीं पक्के मर्द मनुष्य नव्हेत. कूर्मवत फौजेचें आकर्षण करून, गोल बांधून, कुंजपुरियाचा रस्ता सोडून, कमाऊचे पहाडाचे सुमारें यमुनातीरीं अडचण होती तिकडे तडक पळों लागले. तेव्हां पुढें हारोळीस गेले होते त्यांनीं योजना केली कीं, "दुराणी केवळ नामर्द पळोन आम्हांस भेऊन तडक पळतो. दत्ताजी शिंदे मागेंच आहेत तों आपण घोडे घालून एवढें यश घ्यावें." म्हणोन मोठी कडनिकड मांडिली. अबदुल अली नजीबखान यास मिळाला नाहीं तों पावेतों युद्ध करावें, म्हणोन मनसबा केला.

६९. तों इकडे दत्ताजी शिंदे यांनीं तो प्रातःकाळीं उठोन, फौजेस ताकीद करून, शेला भाला आणि अनीन तंग सिद्ध करून, आंगांत बक्तरें व चिलखतें, टोप-पेट्या, जिरे-दस्तानें, टोपास बिन्या वगैरे बावन्न बिरदें सिद्ध होऊन गोटाबाहेर निघाले. तों अकस्मात पंजाब प्रांतीं त्रिंबक बापूचें पथक गेलें होतें तें दुराणीनें बुडवून तमाम मनुष्यांचा बंद धरून भंवताले राखणदार ठेविले. सायंकाळीं अदशेर अन्न द्यावें, आंगावर वस्त्र नाहीं. परंतु ते समयीं त्यांनीं जीवदान देऊन सोडिलें हेंच अधिकोत्तर. त्यांनीं पंजाबची संपदा मिळविली होती ती जाऊन दैवहत जाहाले. दरिद्री स्वप्नीं राजा होतो आणि जागृती होतांच तृणकाष्ठ आणावयाचें संकट पडतें, तैशी गत जाहाली. असो, त्यांनीं जीव जगविला हेंच मिळविलें. कुरु-क्षेत्राचे तळावरून त्यांज समागमें

७६. हारोळ(हरोळ=फौजेची आघाडी) टेहळणी.

७७. मागें पृष्ठ ११ टीप ५२ पाहा दस्ताना=लोखंडी हातमोजा, हस्तत्राण. बिनी = नासात्राण. बिरिद = गुणोत्कर्ष-दर्शक भूषण, बाहुभूषण.

७८. बंद, बांद धरून=आडवून, कैद करून, अटकाव करून.

७९. "त्रिंबकपंतास चरणसंपुष्ट घेण्यास सामर्थ्य नाहीं असा कंगाल केला." का०पत

पांच गिलचे देऊन रवाना केले होते. ते दोन अडीच हजार मनुष्य नागवें उघडे, केवळ मोठे मोठे सरदार होते, ते ओळखूं येईनात अशा अवस्थेनें आले. तों यांणीं युद्धास जावें म्हणून पुढें तळ सोडून बाहेर निघाले. तों तीं पुढें नागवीं उघडीं घायाळें आलीं. ते समयीं सर्वत्रांच्या मुखावरील पाणी उतरलें. महा-अपशकुन[८०] ऐशी सर्वत्रांची कल्पना जाहाली. दत्ताजी शिंदे यांस वाईट भासलें, परंतु मागती विवेक केला कीं, "ज्या ज्या काळीं जें जें होणार तें होतच आहे." म्हणोन दोन घटका घोड्यावरून उतरून, सर्वत्रांस भेटून, त्यांचें समाधान करून, खांशास पोषाख व मनुष्यांस दोन दोन वस्त्रें व सरसकट पन्नास रुपये खर्चास देऊन आपण घोडियावर स्वार जाहाले. शिंदे केवळ खर्जीनपूर[८१] सरदार, द्रव्यदृष्टी[८२] होते. त्यांस कांहीं द्रव्याची परवा नव्हती.

७०. असो. पुढें गेले तों गिलचा जाऊन यमुनातीरीं अडचणींत एकेकडून पानें[८३] व शेरणीचीं बेटें व पाणियाचीं झीलें[८४] असे अडचणींत उतरले. गिलचे यांनीं जातेक्षणीं हत्तीवर उंटांवर झडत पडत बुणगे नदीपार केले. आपण सडा पंचवीस हजार फौज व पांच सातशें उंटांवर सुतरनाले व दोन चारशें उंटांवर बाणांच्या कैच्या व जिलबींतील हलक्या तोफा पन्नास, असा जमून उभा राहिला होता. तों दत्ताजी शिंदे यांचे फोंजेचे धुराळे दृष्टीस पडों लागले. ते समयीं नाइकजी भोइटे व जिवाजी भोइटे व गोविंदपंत बुंदेले यांणीं आपण यश घ्यावें म्हणोन त्या अडचणींत शिरोन घोडीं घातलीं. ते समयीं अबदुल अली यानें हुशारी करून[८५] सुतरनाले व बाणांचे उंट बसवून तोफांचा व सुतरनाले यांचा व बाणांचा एक-दांच मार केला. तों पुढें होणार भवितव्य. भोइटे व बुंदेले यांचे दृष्टीस काय पडलें हें न कळे! एवढे पराक्रमी होते, परंतु त्यांच्या पोटांत हरणाची काळजी[८६] शिरून, निशाणें माघारीं फिरवून तडक पळों लागले. त्यांच्या मागें फौजही भरधांव पळों लागली. बापास पुत्र व पुत्रास बाप उभे राहिनात, तेथें दुसरे कोण उभे राहतील? असा पळ सुटला. तेव्हां गिलचे यांनीं उठावणी करून

---

८०. 'महा अपेश आलें.' पाठांतर.

८१. खजानपूर=खजीना भरपूर आहे ज्यांचा असे.

८२. द्रव्यदृष्टी (द्रव्यादृष्ट)=दैवाची धनसंपादनांत अनुकूलता आहे ज्यांस असे. "द्रव्यावर दृष्ट नाहीं, मनुष्यावर दृष्ट" क० प्रत.

८३. 'पालवे' क० प्रत.

८४. झील=दलदलीची जागा.

८५. 'गडबडोन' पाठांतर.

८६. मागें पृष्ठ ६३ टीप ४१ पाहा. "हरण काळजी" पाठांतर.

पाठलाग करून जैसा कुणबी विळयानें जोंधळयाचीं कणसें कापितो तद्वत शिरच्छेद् करूं लागले. गिलचे केवळ बेहोषं, एका शरिराच्यी बेलाशक उठोन येऊन तीन अवस्था केल्या. एकानें पुढें डोचकें कापावें, एकानें मागें * * व एकानें डोकें कापून न्यावें तें सरकारांत रुजू करावें, त्यांनीं इनाम दर शिरास पांच रुपये देऊन नाक कापावें. अशा एका शरिराच्या तीन अवस्था करून क्षणांत अडीच हजार खांसे यांचीं शिरें कापिलीं ! दुराणी व हे सरमिसळ पळत येतात, तों दत्ताजी शिंदे फौज सुद्धां येऊन पोंचले. एवढे शिंदे अंगें मर्द व हमेषा लढती फौज, ज्या फौजेनें मारवाडी राठोड हटविले, आणि एकदील ऐशी असतां, पुढील सोहोंळा पाहून केवळ दिपतात तैसे दिपोन उभे राहिले. तोंडें काळीं खापरासारखीं दिसों लागलीं. लोकांची वीरश्री उतरली. अंगें दत्ताजी शिंदे उभे राहिले. परंतु त्यांची कुमक करविली नाहीं. दत्ताजी शिंदे इकडे तोंड करीत तों इकडील फौजेचे सेले तोंडासन्मुख येत आणि इकडे तोंड फिरविलें तरि इकडील फौजेचे येतें. अशी आपले जागां गडबड जाहाली. परंतु त्यांची कुमक जाली नाहीं. गिलचे यांनीं आपले स्वइच्छेनें शिरें कापिलीं. आणि दुराणीकडे गेले. त्यांनीं तमाम शिरांचीं नाकें कापून डेरिया पुढें कलवंडाप्रमाणें चौत्रा घातला. अडीच हजार डोकीं, कांहीं थोडीं नव्हेत !

---

८७. बेहोष = देहभानावर नसलेले, अविचारी.

८८. "एका शिराच्या तीन गती" "एकानें सैती मारावी" असे क० प्रतीचे पाठ आहेत.

८९. सरमिसळ = एकाजागीं, एकमेकांत मिश्रित.

९०. सोहाळा = आनंद, उत्सव (व्याजोक्ती) आपले लोकांची दुर्दशा.

९१. त्यांची = आपल्या लोकांची. "पुढील फौजेची" सां० व क० प्रती.

९२. "दत्ताजी शिंदे इकडे तोंड करितांना इकडील फौजेचे तोंडासन्मुख सेले फिरविले इकडील फौज इकडे येत. अशी" तुं० प्रत. दत्ताजी शिंदे इकडे तोंड करितात हिकडे फौजेचे शेले तोंडापुढें येईत आणि फिरोन दुसरेकडे तोंड करितात तों हिकडून सोगे तोंडापुढें येईत" धोपेश्वर प्रत. "दत्ताजी बावा वोढ करून पुढें त्यांजवर जाण्याची हिंमत करीत परंतु शेल्याचे सोगे डोळ्यावर पुढें येत, आणि दुसरे कडे तोंड करून पाहात तों हिकडील सोगे तोंडापुढें येत" क०व सां० प्रती. येकंदरींत येथें अर्थ स्पष्ट होत नाहीं.

९३. दुराणी=अबदाली.

९४. कलवड=शेण, माती इ० कांच्या लेपानेंआच्छादित जो गोंवऱ्यांचा ढीग तो. 'कोट म्ह० गडगडा' घातला, धोपेश्वर प्रत.

७१. असो, ते दत्ताजी शिंदे तिसरे प्रहरपर्यंत तेथें उभे राहून, माघारे सरून पुलानजीक उतरले. अबदुल अली सडा होता तो अगदींच नदीपार गेला. दुसरे दिवशीं दुराणी ताबडतोब नजीबखान यास मिरापूरचे तळावर मिळाला. तिकडून सुजाउद्दौलाही पन्नास हजार फौज व तीनशें तोफा भागीरथी उतरून आलीकडे आला. अनुपशहराहून अहमदखान पठाण लंगडा दहा हजार फौजेनिशीं मिळाला. अशी एक लक्ष चाळीस हजार फौज एक जागां मिळाली.

७२. इकडे दुसरे दिवशीं दत्ताजी शिंदे यांनीं कूच करून दुराणीचे तळावर आले. तों शिरांचा गंज[९६] पाहिला. डोळयास पाणी आलें. एका क्षणांत पंधरा हजार फौजेंतील निवडक निवडक मनुष्यें गेलीं. ओळख पडेनांशी जाहाली. मोठा प्रळय. फौजेंत जिकडे तिकडे रुदंती जाली. क्षणभर तेथें उभे राहून सोमाजी बावा भोंसले फलटनांत राहात होते—ते केवळ साधु मनुष्य होते—त्यांनीं ते दिवशीं क्षणभर क्षत्रियधर्म विशेष केला. परंतु विनाशकाल! त्यांचेंही शिर छेदून नेलें होतें. मोठ्या प्रयासें त्यांचें धड मात्र हुडकून काढिलें. त्या धडास अग्निप्रसाद देऊन मोठीशी मजल करून बाहादरगडचे नजीक बुणगे व जनकोजी शिंदे यांशीं गांठ घातली. तेथून मजल दरमजल तिसरे दिवशीं दिल्लीनजीक मजमूंचे टिळिया नजीक मुकाम केला. किल्लयांतून गाजुद्दीखान वजीर आला आणि "आम्हीं कोठें राहावें?" म्हणोन विचारलें. दत्ताजी शिंदे यांनीं सांगितलें कीं, "तुम्हीं स्वस्थ किल्लयांत राहावें. दुराणी नामर्द, त्याच्यानें काय होणें आहे? आम्ही गनिमी[९९] काव्यानें राहातों. तों पावेतों मल्हारराव होळकरही येऊन पोंचतात, त्यांचेंही पत्र आलें आहे, या उद्देशें शह जयनगरचा सोडून येतात, तेही एक दोन दिवसांत येऊन पोंचतील." असें त्याचें समाधान करून त्यास किल्लयांत वाटेस लाविलें. आपण स्वस्थ राहिले.

७३. तेसमयीं भागीरथीबाई यांनीं नारो शंकर यांस सांगून पाठविलें कीं, "आजपर्यंत आमचा होता[१००] काळ होता; जें केवळ असाध्य तें तें साध्य होत होतें. आतां जी गोष्ट योजावी ती विपर्यास[१] होते. प्रस्तुत सर्व हिंदुस्थान एक जालें.

---

९५. 'तीन प्रहर रात्र पर्यंत' क० प्रत.

९६. 'शिरांगण' पाठांतर.

९७. 'ओळखावयास कोणी दृष्टीस पडेनासें जालें' पाठभेद.

९८. 'यमुनेचे कडी[डे!]वर' क० प्रत.

९९. गनिमी कावा = समोर लढाई न देतां युक्तीनें शत्रूचा नाश करण्याची मराठी रीत.

१००. होता काळ = चालता काळ 'साह्य काळ' क० प्रत.

१. विपर्यस्त, उलटी. 'विपरीत' क० प्रत.

दीड लक्ष फौजेची गणती दुराणी व अवघे मिळून जाले आहेत. तुम्हांपाशीं पन्नास हजार फौजेची गणती नाहीं. पाटील तो दुराग्रहास प्रवर्तले. आपण मरावें आणि जग बुडवावें, असा विचार घडला आहे. तुम्हीं मरावें आणि आम्ही तुरकें बंदीस पडावें असेंच आमचे प्रालब्धीं ईश्वरें नेमिलें होतें म्हणून ईश्वरें आम्हांस जन्मादारभ्य या रानांत आणिलें. तुम्हीं पाटील यांस विवेक करून सांगावें." म्हणून सांगितलें. तेसमयीं नारो शंकर यांचींही मुलेंमाणसें समागमेंच होतीं. त्यांणीं चित्तांत योजना हीच केली होती. मग नारो शंकर, जानराव वांबळे[३] व गोविंदपंत बुंदेले व जनकोजी शिंदे [असे] एकत्र होऊन दत्ताजी शिंदे याजकडे आले. आणि साफ जाबसाल केला कीं, "तुम्हीं मरावयास सिद्ध जालां.परंतु मुलें-लेंकरांनीं काय पाप केलें आहे? याजकरितां आपण सडे या स्थळीं राहून बुणगे व कबिले[५] चमेलीपार लावून द्यावें, मग तुमचे दैवीं असेल तें घडेल." म्हणोन ऐकतांच दत्ताजी शिंदे यांस विषाद येऊन बोलते जाले कीं, "नाना! तुम्हीं काय समजून हा अर्थ बोलिलां? आम्हांसही पुरतेपणीं समजलें कीं, आमचे आयुष्याचा अंत जाला. मग मुलें माणसें जगून काय करावीं? कोणीं आप[६] तरावें आणि जग तारावें, कोणीं आप बुडावें व जग बुडवावें. मुलें माणसांची शाका[७] करून, हत्तीस अंदू[८] घालून मारतां मारतां मरावें. मरणाहून अपेश वोखटें[९]. अपजय घेऊन नानासाहेबांस व भाऊसाहेबांस तोंड काय दाखवावें? आतां मरावें हाच निश्चय. याविणें दुसरी कल्पनाच

---

२. 'तुरुकबंदीस' असा एका प्रतीचा पाठ आहे. पण दुसऱ्या दोन चांगल्या प्रतींत 'तुरुकहडसि' तुरुकचुडीस, तुरुकधडीस असें दिसतें. त्याचा अर्थ दुर्बोध आहे. मागें पृष्ठ टीप पाहा सां० प्र० म्हणते "त्यांच्या धाडीस सांपडावें" आम्हीं त्यांच्या धाडीस पडावें क० प्रत.

३. वांवळे किंवा वांबाळे। 'साबळे' क० प्रत.

४. "तुम्ही मरावयास उदार जाहला परंतु मुलांमाणसांची वाट काय! त्यांणीं काय पातक केलें आहे कीं, असते आयुष्यांत प्राण द्यावा! आयुष्याची मर्यादा जाहालियावर ठीकच आहे, मग कोणाचाच उपाय नाहीं. आज त्यांचे धाडीस पडतील" क० प्रत.

५. कबिले=बायका मुलें.

६. आपण मरावें आणि जगास तारावें, कोणी बुडावें आणि जगास बुडवावें. क. प्रत

७. शाका= तुकडे, नाश. 'सीमा' पु० व क० प्रती.

८. अंदू= हत्तीस ठाम करण्याकरितां ज्या साखळदंडानें त्यास बांधितात तो.

९. 'वोखटें' बद्दल 'वेळाचे' तु० प्र. 'वाईट' क० प्रत. वोखटें— वाईट; कळंक आणणारें.

नाहीं." असें ऐकून नारो शंकर यांनीं उत्तर केलें कीं, "पाटील, तुम्ही बोलिलां हें पुरवून घ्यालच यांत संदेह नाहीं: तुम्ही बोलिलां तें कराल, परंतु मुलें माणसें मारवत नाहींत. हें कर्म, एक दोन वेळ शींका[10] मंडळियाचे राजयानें केल्या. आणि हिंदुस्थानांत बुंदी [चे] व कोटियाचे राजे हाडे रजपूत यांनींच हीं कर्में करावींत. मराठियांस मायाजाळ सुटत नाहीं. या गोष्टी घडणार नाहींत. आम्ही आपलीं मुलें माणसें वाटेस लाविती[11]. " म्हणोन बोलून डेरियास आले. दत्ताजी शिंदे उठोन बाडांतें[12] स्त्री भागीरथीबाई यांजकडे गेले. त्यांचे चित्तांतील काळजी ध्यानांत आणिली तों त्यांचे चित्तांतही निघतां उत्तम. त्यांत भागीरथीबाई गरोदर, नऊ महिने पूर्ण भरले होते,दत्ताजी शिंदे यांनीं चित्तांत योजना केली, " हिचे पोटीं पुत्र नाहीं. स्त्री गरोदर आहे. वाटेस लावितां उत्तम आहे."म्हणून बाहेर येऊन जनकोजी शिंदे यांस बोलावून सांगितलें कीं, "बुणगे मुलें-माणसें घेऊन तुम्ही चमेलीपार होणें. आम्ही येथें राहून होईल तसें पाहून घेऊं. " असें ऐकतांच जनकोजी शिंदे यांणीं उत्तर केलें कीं, " काकासाहेब, तुम्ही राहातां आणि म्यां जाऊन काय करावें ? मजकडून या गोष्टी घडावयाच्या नाहींत. तुम्हीं मुलें-माणसें पाठविलीं तरि उत्तम आहे, नाहीं तरि आम्ही आग्रह करीत नाहीं." असा दुराग्रह ऐकून दत्ताजी शिंदे डेरियांत येऊन मुलां-माणसांस चार गोष्टी विवेकाच्या सांगितल्या. त्याजवरून त्यासमयीं बायकांचा शोक ! ज्याप्रमाणें मनुष्य मरतें तैशी गत जाली ! भागीरथीबाई यांस असें जालें कीं, " पाटील आजच आपणांस अंतरले. भगवंतें आजच आमची ताडातोड केली." म्हणून बहुतां प्रकारें शोक केला. अगदीं बुणगे व मुलें माणसें समागमें पांच हजार फौज व सुरजमल्ल जाट याजकडील वकील रूपराम कटारी यास समागमें देऊन वाटेस लाविलीं. तेथून फरकाबादे[13]नजीक बारा कोसांवर जाऊन बुणगे पोंचले.

७४. तेच दिवशीं अबदुल अली दुराणी, सुजाउद्दौला, नजीबखान रोहिला असे व अहमदखान लंगडा व कुतुबशाहा व दुंदेखान रोहिला असे यमुनें[14]

---

१०. 'सा हो ळा मंडळियांनीं या रानांत केलें' क० प्रत.

११. येथें " या गोष्टी घडणार. तुम्हीं वाटेस लावाल तर उत्तम, नाहीं तर" इ० तुंगार प्रतीचा पाठ.

१२. बाड= तंबूचें आवरण.

१३. द्रुलकाबाद' क० सां० प्रती. 'फरुकानगर ' तर नव्हे.

१४. "यमुना दिल्लीला शाहाधडा म्हणून मोठासा पुरा, अंतरवेदींची उत्तरती पेंठ, तो व पटपटंग असे दोनी पुरे मिळून अर्धी दिल्ली होईल" असा तुं० प्र० पाठ.

पलीकडे शाहाधडा म्हणोन मोठासा पुरा, अंतरवेदीची उतरती पेठ, पटपंचगॅण असे दोनी पुरे मारून त्यांचा सत्यानाश केला. एक लक्ष चाळीस हजार फौज होती. पौष शुद्ध १४ सँ, संक्रांतीची भोगी त्या दिवशीं होती. ते दिवशीं यमुनातीरीं दुराणीचा मुकाम जाला. यमुनेचे अलीकडील तीरीं गनीम पाणी पीत होते व पलीकडील तीरीं दुराणी वगैरे पाणी पीत होते. दोन्हीं सैन्यें एकमेकांनीं पुरतीं पाहिलीं. तों शिंदे यांजकडील फौज, भारी सैन्य पाहून, फारच संकटांत पडली. ते दिवशीं दत्ताजी शिंदे यांनीं दिल्लीसमीप राजघाट होता तेथें हत्ती घालून यमुनेस ठाव पाहिला. तों पाणियांत ठाव लागला नाहीं. तसेंच मजमूचे टिळियानजीक घाट होता.तेथेंही जाऊन ठाव पाहिला. तों तेथेंही ठाव नाहीं. तों सायंकाळही जाहाला. रात्रचे रात्र आपलाले जागां राहिले. पाहांटेची रात्र प्रहर उरली. मग दत्ताजी शिंदे यांनीं जानबा वांबळे यांस नजीक घाट होता तेथें राखावयास जावें, म्हणोन सांगून घाट राखावयास पाठविलें, व मॅालोजी शिंदे म्हणोन बरा उमदा मनुष्य होता, तो हजार फौजेनिशीं दिल्ली नजीक राजघाट होता तेथें घाटावर त्यास पाठविलें. दिवस उगवला. समागमें नामी पांच सात हत्ती व सडे बुणगे [ब] तीन लक्ष रुपये समागमेंच होते. त्यांत हत्ती नामी जव्हेरॅगज, व पट्टागज, कृष्णगज व रामबाण असे चार हत्ती अमोल्य. त्यांजवर माहातही थोर अबरूचे. चौघांस खडी ताजीम होत होती. त्यांस दत्ताजी शिंदे यांनीं ताकीद केली कीं, " यार हो ! निदानसमय येऊन पडलॅं आहे. आमचे अबरूवर आलें आहे. आमचे मनांत आहे कीं, "निदानसमयीं हत्तीस अंदू घालून लढाई करावी." असें माहातांनीं ऐकून उत्तर केलें कीं, "रावसाहेब ! आम्हीं बहूत दिवस तुमचे पदरचें अन्न खादलें आहे. ऐॅक वेळ आपण हें रण सोडून निघालां तर आमचा प्राणांतसमय आला. आम्ही कांहीं वांचत नॅाहीं. " असे

---

१६. ,पंचगण' इतकेंच क० प्रत देते व 'तीन' पुरे मारून असें म्हणते.

१७. पौष शुा१४ पाठांतर "शुा१४संक्रमण आलें. तिची भोगी होती" सां० प्रत.

१८. "वाल्होजी शिंदा " तुं० प्रत. " मल्हारराव " सां० प्रत व क० प्रत.

१९. "जवाहीरगज व पोटागज व रामबाण' व मदनमस्त व कृष्णगज; त्यांत चार हत्ती बहूत थोर " क० प्रत.

२०. 'बालखादम ' ' बाजखादम ' पु० व तुं० प्रती.

२१–२१ ह्या वाक्यांऐवजीं " आपण इरेस पडलां त्यापेक्षां आमचे प्राण वांचत नाहींत. परंतु प्राणांची आशा धरून आज्ञा उल्लंघन करून आम्ही तोंडें मागें मात्र फिरवणार नाहीं" असें सां० प्रतींत आहे. " आपण इरेस सोडूं नये. आमचा प्राणांतसमय आला आहे. " क० प्रत.

एकमेकांस निरवानिरव करिते जाले. समागमें हत्तीवर घटकाही वाजत होती. तीन घटका दिवस आला तों तमाम फौज जेऊन खाऊन, तिळगूळ वांटून[२२] जीन सामान सिद्ध होऊन बसलेच होते. तो अबदुल अलीची फौज व तोफा सिद्ध होऊन कांहीं राजगडाचे घाटें चालिले व कांहीं मजमूचे टिळियाचे घाटें व कांहीं चमेलीचे[२३] घाटें चालिले. इतक्यांत किल्ल्यांतून गाजुदीखान वजीर आला. दत्ताजी शिंदे यांस येऊन बोलता जाला कीं, "तुम्ही गनीम आहां, तुम्हीं घाट धरिले[२४]. ते[२५] हे मोंगलाई लोक. तुम्हांस घाट बांधणें सोसणार नाहीं. तुम्हीं घाट सोडून दुरोन गनिमी काव्यानें राहिलां तरि आम्ही किल्ला राखतों. नाहीं तरि तुमचे तुम्हांपाशीं राहातों." असें म्हणतांच दत्ताजी शिंदे यांनीं सांगितलें कीं, "तुम्हीं बिनघोरी किल्ल्यांत जावें. आम्ही आज कांहीं घाट धरून युद्ध करीत नाहीं". असें बोलून वाटेस लाविले.

७५. तों दुराणीची फौज व तोफा पलीकडील[२६] तीरीं येऊन दाखल जाले. गनिमाचा प्रतिकूळ काळ म्हणोन यमुनेनें वाट त्यांस दिली. पलीकडील तोफांचा मार जाला. जानराव वांबळे यांस घाटावर दम निघेनासा झाला. उंटावर सतरनाला व हत्तीवर हस्तनाला पुढें घालून मागें फौज तडका उतरूं लागली. पांच घटका दिवस आला होता. इतकियांत जानराव वांबळे यांजकडील स्वार धांवत आला कीं, "पाटील, तुम्ही काय म्हणोन स्वस्थ बसलां? दुराणीची फौज अर्धी यमुना उतरली. आम्हांस घाटावर ठरूं देत नाहीं, तोफांच्या गोळयांनीं शें दीडशें मनुष्य ठार जालें." असें ऐकतांच दत्ताजी शिंदे यांजपाशीं साबाजी शिंदे यांचा पुत्र बयाजी शिंदे, जवळ बसले होते. त्यांस आज्ञा केली कीं, "बयाजी बावा, तुम्ही जानराव वांबळे यांची कुमक करणें." याप्रमाणें हुकूम होतांच बयाजी शिंदे यांनीं उठोन तसलीम[२७] केली. आणि जाबसाल केला कीं, "पाटील-साहेब, आम्ही लाहुराकडून आलों [ते] गिलच्याशीं युद्धप्रसंग न करतां चुकावून आलों [असा] आपले मनांत संशय आला असेल, तरि चाळीस हजार फौज दुराणीची त्यास आम्ही दहा हजार फौजेनें त्याचें काय करावयाचें? अस्तु, आतांही प्रसंग आहे.

---

२२. कारण संक्रांत होती.

२३. "चमेलीचे घाटें" हें तुं० प्रतींत नाहीं. 'रेवाडीचे घाटें' धो० व सां० व क० प्रती.

२४. घाट धरणें, घाट बांधणें= घाट राखणें, घाटावर शत्रूस तोंड देऊन घाटाचें रक्षण करणें, घाटावर शत्रूस आडविणें.

२५. ते= तर, त्यास, अशास.

२६. अर्थात यमुनेच्या.

२७. तसलीम= रामराम.

खावंद जवळ आहेत. बहूत दिवस साहेबांचें निमकें भक्षिलें आहे. जी सेवा घडेल ती रूबेरू दृष्टीनें पाहावी." असें म्हणतांच दत्ताजी शिंदे यांनीं प्रत्युत्तर केलें कीं, "बयाजी बावा, तुम्ही हमेशा लढाया करितां, नव्यानें झुंज करीत नाहीं. केलियाचें नवल नाहीं. न केलियाचें मात्र नवल. आतां बोलावयास पुरवत नाहीं, त्वरा करावी," म्हणोन बोलिले. बयाजी शिंदे यांनीं आपली पांच सात हजार फौज घेऊन नदीची झीलँ उतरून घाटास गेले. तों दुराणीची फौज आलीकडील तोंडीं आली. ते समयीं बयाजी शिंदे यांनीं चित्तांत योजना केली कीं, "दुराणीची फौज नदी उतरली आतां दत्ताजी शिंदे यांस तोंड काय दाखवावें ?" म्हणोन पांच सात हजार फौजेंतून पंधरा खासेनिशीं बयाजी शिंदे यांनीं घोडे उठवून दुराणीचे लोकांवर घातले. त्यांनीं त्यांचे-कडेस घाव घातला तों बयाजी शिंदे यास गोळी लागली आणि ठार पडला. अर्धा मुर्दा वाळूंत आणि अर्धा मूर्दा पाण्यांत पडला. त्याजसमागमें दाहा मनुष्यें ठार पडलीं. गनिमाचे फौजेनें अगदींच घाट सोडिला. रोहिले व दुराणी यांनीं घाट घेऊन आलीकडील बाजूस उभे राहिले. तोंपर्यंत दुराणीस दत्ताजी शिंदे यांची सैलाबत होती.

७६. इकडे दत्ताजी शिंदे यांस बयाजी शिंदे याजकडील स्वार धांवत आला आणि सांगितलें कीं, "पाटील, बयाजी शिंदे तो ठार पडले. मुर्दा त्यांनीं नेला. आणि घाट घेऊन फौज जमावून उभी आहे." असें ऐकतांच नगारा केला. दत्ताजी शिंदे घोड्यावरि स्वार जाले. तों फौज अगोदरच सिद्ध होती. जनकोजी शिंदे यांनीं आंगांत बक्तर घातलें. दत्ताजी शिंदे यांनीं रागास येऊन आंगांतील सामान काढविलें. आणि बोलले कीं, "आज कांहीं आम्ही युद्ध करीत नाहीं. मल्हारराव होळकर नजीक आले आहेत, एका दोंहों रोजांत येऊन पोंचणार, तों पावेतों काव्यानेंच दुरून राहावें." म्हणोन रागास येऊन आंगांतील सामान काढविलें. आपण घोडियावर स्वार जाले. घाटाचे सुमारें चालिले, तों फौज जमून मुजऱ्यास आली. मुजरा करितात तों त्यांस आज्ञा केली कीं, " निशाणाबराबर चालावें " म्हणोन फौज

---

२८. निमक=मीठ. अन्न.

२९. 'रुबेरूब'पुणें प्रत. रूबरू=समक्ष.

३०. झिल=ओघ, प्रवाह, दलदल.

३१. सलाबत=भय, धाक.

३२. "मुजरा करीत त्यांस आज्ञा करीत कीं तुम्हीं निशाणाबरोबर चालावें" तुं॰ प्रत.

निशाणाबराबर लाविली. तों यमुनातीरीं अडचण भारी, शेरण्यांचीं[33] बेटें होतीं. दिसेनात असे अडचणींत शिरले. मराठियांस पाठीवर काठी उडत असली तरच हिंमत होते. त्यांत दैवयोगें करून दडण[34] भारी. कोणाची शरम कोणास नाहीं. तों निशाण जाऊन युद्धास थेटलें. ते समयीं दोहीं तर्फेनें तोफांचा, हस्तनाले व सुतरनाले व जेजाला व गंजिफियाच्या गाड्या वगैरे गारभांडीं[35] व बंदुकांचा मार ऐसा जाहाला कीं, जैसे भडबुंजे लाह्या भाजतात, कीं विद्युल्लतापात होतो. तैसा एकच धडाका जाहाला. मोठी गर्दी जाहाली. बाणांचा वर्षाव मेघमालांप्रमाणें होऊं लागला. घोडे मनुष्य धुंद जाहाले. धुराची गर्दी जाहाली. तेणेंकरून कोणी कोणास दिसेनातसे जाहाले. मोठे मोठे वीर, त्यांच्या वीरश्रिया उतरल्या. आलीकडे मराठियांनीं झुंज याप्रमाणें पाहिलें नाहीं. न भूतो न भविष्यति. तेसमयीं प्रसंगीं होते त्यांस मात्र अनुभव असेल. असें दोन घटिकापर्यंत जाहालें. तेथून[36] दोन कोसांवर घाट होता, तेथें गोविंदपंत बुंदेले होते. तिकडून त्यांनीं[37] यमुना उतरून परस्परें गोविंदपंत बुंदेले यांस तिकडेच ताण बसविला. ते तिकडेच राणभरी[38] जाहाले. यांजकडे[39] यावयास फुरसत जाली नाहीं. पांच सातशें खाशियांचीं डोचकीं कापून नेलीं. तैसेंच दिल्ली नजीक राजघाटावर मालोजी शिंदे तेही घाटावरून उधळून, शाहाधड्या नजीक घाट उतरून, तिकडूनही फौजा आल्या. मालोजी शिंदे याची फौज झाडून पोटाशीं[40] सांपडली. त्याजमुळें ज्याचें आयुष्य पुरतें ते मात्र वांचले. खांसा मालोजी शिंदे बाणाची खास्ते[41] निघाले होते, तो चित्तांत योजना केली कीं, "दत्ताजी शिंदे आम्हांदेखतां बहुतांची टीका करितात. आतां आम्हीं त्यांस तोंड काय म्हणून दाख-

---

३३. 'अडचणाभारी' काऊस व शेरण्यांचीं बेटें. तुं० प्रत. शेरणी=नदींत उगवणारा वनस्पतिविशेष. काऊस (माऊस?) म्हणजे काय?

३४. दडण भारी=दडण्यास, लपण्यास जागा फार. 'दडण शेरणीचें.' क० प्र०

३५. गारभांडीं=गारगोटीचा चाप आहे ज्यांस अशी भांडीं म्हणजे यंत्रें.

३६. तेथून म्हणजे दत्ताजी होते त्या जाग्यापासून.

३७. दुराणींनीं.

३८. राणभरी=रानभरी. रानांत पळून गेलेले.

३९. दत्ताजीकडे.

४०. पोटाशीं सांपडली=तिच्या भोंवतीं शत्रूचा वळसा पडला. 'पाठीशीं [सां०] पडली' क० प्रत.

४१. बाणाची खास्त=बाणाचा टप्पा, बाण जाई इतक्या अंतरावर. पृष्ठ ५३ टीप ६ पाहा.

वावें ? [४२]म्हणोन घोडे घातले. त्यांतच गै[४३]बत जाले. त्यांचा मुर्दा देखील कोणीं दृष्टीनें देखिल नाहीं. इकडे दत्ताजी शिंदे यांजकडे तुंबळ युद्ध होतच होतें. निशाणापाशीं पांचशेंही फौज नाहींशी जाली. आधींच मराठी फौज, हिंमत [४४]भारी नाहीं. त्यांत अडचण होती. त्या योगेंकडून अडचणींत फौज गैब जाली. चाळीस हजार फौज; थोडकी नव्हती. परंतु अडचणींत कांहीं दिसेनासें जालें. इकडे निशाणाकडे जनकोजी शिंदे झों[४५]बतच होते. दत्ताजी शिंदे निशाणाचे बाजूं[४६]स उजवे होते. दिल्लीचे बाजूनें पंचवीस खांसा व आपण उभे होते. गिलचास त्यांची धास्त होतीच. इतकी फौज हिंमत सोडून होती, परंतु तेही लोक बेलाशक अंगावर येईनात. अशी पस्स्परें झो[४७]टधरणी होतच होती. तों हत्तीवर घटका वाजत होती. आठ घटिका पूर्ण [४८]भरल्या. त्या अडचणींत पांचशें मनुष्यें ठार जालीं. तैशींच घोडींही पडलीं. तैसेच जखमीही जाले. केवळ शेणसडा होऊन गेला. तैशा समयीं जवळ तान्हाजी खराडा म्हणून सरदार होता, त्यानें अर्ज केला कीं, "पाटील, दुराणीची फौज झाडून उतरली. गोविंदपंत बुंदेले तों तिकडेच बुडविले. तैसेच मालोजी शिंदे यांस तेच गत जाली. निशाण उघडें पडलें. अबरू जावयाचा प्रसंग आला. निशाण काढतां उत्तम आहे." असें म्हणतांच दत्ताजी शिंदे यांनीं उत्तर केलें कीं, "आपण मेला जग बुडाला. अबरू जाते आणि वांचतो कोण ? अझून काय निघावयाची बाकी राहिली आहे कीं काय? [४९]सफेजंग होऊन गेली. आतां निशाण काढाल तर फौज पळूं लागेल. मग म्यांही पळावें ? मग देशीं तोंड म्यां दत्ताजीनें काय म्हणोन दाखवावें?" असें बोलिल्यावर तान्हाजी खराडे मागती बोलिले कीं, "पूर्वीपासून देव दैत्य, दानव काय करीत गेले? त्यास आम्हीं मृत्युलोकींचे मानव पडलों. वेळेस मान द्यावा. या समयीं काळावर नजर देऊन निघावें." म्हणोन बोलिले. त्यावर दत्ताजी शिंदे यांनीं साफ सांगितलें कीं, "हा

---

४२. "असें मनांत आणोन घोडा उठवून दुराणीचे लोकांवर जाऊन पडले" क० प्रत.

४३. गैबत= गैब= गुप्त, नाहींतसे.

४४. " हिंमत पक्की नाहीं. " तुं० प्र०

४५. 'झटतच' पाठांतर.

४६. 'निशाणाचे बादलेस उभे होते.' पाठांतर. बादल = फरारा. 'ब प के स उजवे' सां० प्रत व तुं० प्रत.

४७. झोट-धरणी = केशाकेशी युद्ध, हातघाईची लढाई.

४८. 'जालिया' पाठभेद. जालिया=जाल्या. 'आठ घटका दिवस आला' क० प्रत.

४९. सफेजंग (सफेजंगी) = दारुण युद्ध, कत्तल, फडशा.

खंदारचा पादशाहा अबदुल अली चालून आला आहे. या रानांत ईश्वरें मृत्यु आणिला तरि उत्तम आहे. योगी, सन्यासी, तँपस्वी नानाप्रकारचे देहदंड करितात कीं मोक्षसाधन व्हावें. त्यांत आम्हां क्षत्रियांचे स्वँधर्म हेंच कीं, रणांत विन्मुख न होतां मृत्यु आल्यास सर्वही साधनें सांधिलीं. तें ही कर्म ईश्वरें दाटून वोढून आणिलें. अशांत जो कोणी अभागी आहे तो विन्मुख होईल ! रण सोडून निघालियास दोहींसही मुकावें. इकडे नर्कसाधन, इकडे अपेश मरणाहून वोखटें. यांत मरतांच उत्तम." म्हणून गाडूँन उभे राहिले.

७७. तों इकडे जनकोजी शिंदे निशाणापाशीं झोंबत होते. त्यांचे उजवे दंडास एकाएकींच गोळी लागून दंड फोडून हाड बाहेर आलें. जनकोजी शिंदे यांस तँव येऊन घोड्याखालीं आले. तों जवळ खिजमगार उभा होता तो धांवत दत्ताजी शिंदे यांजकडे आला. आणि घाबरेपणें वर्तमान सांगितलें कीं, " बाबासाहेबैं गोळी लागून पडले. " असें वर्तमान ऐकतांच दत्ताजी शिंदे यांणीं जवळ लोक उगे होते त्यांस जाबसाल केला कीं, "बाबा आम्हांस सोडून गेले, आतां आम्हांस देशीं तोंड दाखवावयास येणार नाहीं. रणांत मृत्यू आला तर उत्तम आहे, नाहीं तर विष भक्षून प्राण द्यावा" असें बोलून दत्ताजी शिंदे यांचे पुढें दाहा हजार कुतुबशाहा व दुराणीचे लोक उभे होते, त्यांजवर अठरा असामीनिशीं घोडे घातले. घोडियाँचे तोंड शिरैलें तों त्यामध्यें अकरा खासे ठार पडले. जात्या खाशांनीं घाव केला. तेथून माघारे गोळीच्या माऱ्यांत निघाले. तों यशवंतराव जगदळे थोराळेकर यांस गोळी लागून ठार पडले. त्यांचा भाऊ पिराजी जगदळेही समागमेंच होता. त्यानें भावाचे मुरदियासाठीं बहूत प्रयत्न केला. काढावा म्हणून बोलिले. म्हणोन पाटील यांनीं लालमणी घोडियाचें तोंड माघारे किंचित फिरविलें. मुर्दा ओढा ओढा

५०. 'तापसी' तुं० प्रत.

५१. 'स्वकर्म हेंच कीं' तुं प्रत.

५२. 'रणांत सन्मुख मृत्यु असल्या' पाठांतर.

५३. गाढून=ठाम. 'गाठून' तुं० प्रत. 'मनाचा खंबीर करून' क० प्रत.

५४. तव=घेरी, मूर्च्छा. 'कलम म्हणजे मूर्च्छना' सां० प्रत. 'कलम' क० प्रत.

५५. 'दादासाहेब' तुं० प्रत.

५६. या वाक्यां ऐवजीं "त्यांचे फळींत घोड्यांचीं तोंडें शिरतात तों अकरा असामी ठार पडले. खाशास निघावयास जागा नाहीं. तेथून गोळीचे टप्यावर फळींतून पार पडून निघाले" अशीं वाक्यें क० प्रत देते.

५७. 'घायाचे तोंडास जात पावेतों.' तुं० प्रत.=तरवारीचा घाव होईतों.

५८. 'ओळखावा म्हणून फिरविलें' क० प्रत.

म्हणून बोलतात तों एकाएकींच आकाशाची दोरी तुटते, तैशी गोळी येऊन उजवे बगलेस बरगडींत लागली, आणि घोडियाखालीं आले. तों नजीकें राजाराम चोपदार व राघोबा शेणवई[६०] पागनीस होता. त्यांनीं इत्यर्थ केला कीं, "बहूत दिवस यांचें अन्न भक्षिलें, आणि पाहिजे तितके विलास यांच्या जिवावर केले. आतां यांस टाकून जावें याहून मरण बरें." म्हणोन घोडियावरून उतरले. तों [ दत्ताजी ] घायाळ होते. प्राण कांहीं गेला नव्हता. घायाळ काढावा तरि त्यांजकडील फौजेची निकड बसली. घायाळ काढावयास फुरसत पडेनासी जाली. तों नजीबखान रोहिला याचा गुरू कुतुबशाहा[६१] याच्या अंबाऱ्या नजीक आल्या. राघोबा पागे यांनीं राजाराम चोपदार यास सांगितलें कीं, "तुम्हीं कुतुबशाहा याजपावेतों जाऊन पोंचावें. दत्ताजी शिंदे रणांत घायाळ म्हणून सांगावें कीं, तुम्हीं यांचा बचाव करावा, नाहीं तर अबदुल अली हरामी याची गांठ पडली तर आमचें व पाटील यांचें शीर कापून नेतील. त्याहून यांजकडे पाडाव[६२] सांपडले ते उत्तम." म्हणून राजाराम चोपदार यास सांगून पाठविलें. तों कुतुबशाहाची अंबारी केवळ नजीक आली. त्यास राजाराम चोपदार यानें जाऊन मुजरा केला. रात्रंदिवस येणें जाणें सहजच होतें. ओळख पूर्वींच होती. "राजाराम तूं कहां ?" म्हणोन अविंधी[६३] भाषेनें पुसलें. त्यानेंही खरें वर्तमान सांगितलें कीं, "साहेब, पटेल घायाळ पडा है, या बचावे." असें म्हणतांच कुतुबशाहास मोठा आनंद जाला. इक्षुदंडांतूनच शर्करा सांपडते. किंवा तु प गी च नें व तीं त [?] सांपडतें,[६४] तैसा अनायासें करून महालाभ जाला. बोलिला कीं, "पटेल कहां है ? दिखलाव." म्हणोन तैसेंच अंबारी राजाराम जेथें दत्ताजी शिंदे घायाळ पडले

५९. 'तान्हाजी खराडा' हें नांव क० प्रत प्रथमच देते, त्याप्रमाणें सां० प्रतही 'खराडा' हें नांव प्रथम देते. १०।१।१७६०.

६०. राघोबा इ० राघोराम पागे हा कर्ता पुरुष पेशव्यांच्या पदरीं होता. पुढें यानेंच महादजीस वस्त्रें देवविलीं. वि.ज्ञा. वि०पु० ११ अंक ४ पृष्ठ ७८ व ८० पाहा.

६१. मागें पृष्ठ ५६ टीप ७ पाहा.

६२. पाडाव = हस्तगत.

६३. अविंधी म्ह० मुसलमानी. कवी मोरोपंताप्रमाणें ह्या लेखकाची ही गैरसमजूत आहे. हिंदी भाषा ही मुसलमानी नव्हे. "कुतुबशाहास बोलिला कीं तुम्ही उपकारी आहां. म्हणोन अविंधी भाषेनें नेकजात पुरुष आहां, याजकरितां तुम्हांकडे आलों" असें येथें अधिक वाक्य क० प्रत देते.

६४. 'दुधापासूनतच नवनीत' असें तर नव्हे ! 'दुपगी च नवनीत' असें घेतलें तर 'च' निरर्थक दिसतो. एतावता अर्थ अस्पष्ट.



महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था
११११ सदाशिव पेठ, ...
... पुरुषोत्तम चौक, पुणे–४११ ०३०

होते तेथें घेऊन आला. कुतुबशाहा यानें अंबारींतून खालीं उतरून जवळ आलीं. तों दत्ताजी शिंदे उताणे पडले होते. येथें कुतुबशाहा यानें जाबसाल केला कीं, "पटेल, हमारे साथ तुम और लढेंगे[६६] ?" म्हणोन पुसलें. दत्ताजी शिंदे सावध होते, त्यांस पुरतें उमजलें कीं, "हे कांहीं आपणांस वांचवीत नाहींत, मग व्यंगीं[६७] गोष्टी सांगणें हें विहित नव्हे." म्हणोन दम बांधोन जाबसाल केला कीं, "निशीं[६८] अकताला ! बचेंगे, तो औरबी लढेंगे." असें ऐकतांच कुतुबशाहा यानें कमरेचा सुरा ओढून, लाथेनें ढकलून, पालथा घालून, दत्ताजी शिंदे यांचा शिरच्छेद केला. राघोबा पागे व राजाराम चोपदार यानें बहुत ग्लानता केली कीं, "साहेब, इस्को बचाव, क्रोड रुपये पाहिजे तरि देऊं" म्हणोन बोलिले. परंतु त्यानें ऐकलें नाहीं. आपलें महत्कार्य केलें. तों आठ घटका दिवस आला होता. कुतुबशाहा यानें शीर भालियास खोवून शाहादानें बाजवीत जाते जाले. फत्ते जाली म्हणोन नजीबखान याजकडे गेले. शीर त्यानें काढून रुमालांत घेतलें.

७८. इकडे दत्ताजी शिंदे घायाळ खालीं आले त्यांजकडील लालमणी घोडी[६९] तानाजी खराडे यांनीं घेऊन निशाणाकडे घेऊन आले. तों निशाणापाशीं बहूत लोक झोंबत होते. ते समयीं निशाणापाशीं दोन चार सरदार होते त्यांस तानाजी खराडा यानें जाबसाल केला कीं, "यार हो, आतां निशाण काढावें, नाहीं तर निशाण निघत नाहीं." लोकांनीं जाबसाल केला कीं, "निशाण येथें आहे म्हणोन दम पडला आहे. निशाण निघालियावरि कोणी कोणाच्या दृष्टीस पडत नाहींत." असें ऐकून तानाजी खराडा याणें साफ सांगितलें कीं, "तुम्ही कोणाचे भिस्तीवर लढतां ? दत्ताजी शिंदे तो रणीं पडले. जनकोजी शिंदेही पडले म्हणून ऐकतों. मग त्यांची गत काय असेल ती असो. प्रस्तुत दत्ताजी शिंदे यांजखालील घोडा लालमणी हा आम्हीं

---

६५. या वाक्याबद्दल "कुतुबशाहा अंबारींत दत्ताजी शिंदे यांस बोलला कीं, पाटील आमचे अंबारीचे पुढें बसावें. शत्रूस शरण जावयाचें नाहीं म्हणून दत्ताजीनें उत्तर केलें कीं, यांतून वांचलों तरि तुमचे अंबारीपुढें बसवीन" अशीं वाक्यें सां० प्रतींत आहेत. पटेल, हमारे पास अंबारीके आगे बैठणा म्हणोन बोलला" क० प्रत.

६६. 'लडो' 'लढोंगे' पाठभेद.

६७. व्यंग=हलकेपणाची, कमीपणाची.

६८. इन्शा हाखूनाला=ईश्वराचे इच्छेनें मागें पृष्ठ २६ टीप ४६ पाहा.

६९. "घोडी पंचकल्याणी पुठ्यावर डागिली होती. तिचें नांव कलमिणी" असाही पाठ आहे.

आणिला." म्हणोन प्रत्यक्ष दाखविला. लोकांनीं अवसानें सोडलीं. दम खात खात निशाण अडचणींतून झील उतरून मैदानांत आले. जनकोजी शिंदे घायाळ घोड्यावर घातले. तों झाडून फौज झुरेमुरे बाहेर निघोन मैदानांत आली. तों रोहिला व दुराणी पाठीवर आला. पांच सात हत्ती व सडे बुणगे तळावर उभे होते. संदीपबेग यांचीं मुलें बुणगिया समागमें होतीं. परंतु त्यांचे दिवाण लक्ष्मुमी नारायण [ व ] पांच हजार फौज तळावर उभी होती. चौकडून दुराणीची व रोहिलियाची मिठी बसली. मँग भले लोकांनीं एकदाच घोड्यास चाबूक केले. तीस हजार फौज अद्कोस पर्यंत ताफाचा ताफा एकदाच आरडा ओरडा जाला. कोणी कोणास पुसेनासें जालें. बाप, लेक, भाऊ उभे राहीनातँ. दे धरणी ठाव असा प्रकार गिलचानें केला. ते समयीं येसुजी भुईटे व जानराव वांबळे यांनीं कडानिकड करून, जनकोजी शिंदे यांस घोडियावर बैसवून दोहीं बाजूस धरून फौजेंत तडक पळूं लागले. घायाळ यांनीं "पाणी! पाणी! पाणी!" ही म्हटलियास पाणी द्यावयास दम निघेना. एवढा तालिवँार त्याची दैवयोगें या रितीची गत जाली. असो. गिलचे पाठीवर डोचकीं कापीत चालिले. सांडवला [ ? ] भला माणूँस याची कोणी कुमक करीनात.

७९. इतकियांत इकडे तळावर बुणगे व लक्ष्मी नारायण व हत्ती उभे होते, त्यांजवर येऊन मिठी बसली. ते समयीं हत्तीवरले माहूत अबरूचे होते, त्यांनीं क्षणभर फौजेंत रण-खुंदल करून मारामार केली. तों महँात गोळ्या लागून खालीं येतांच हत्ती मोकळे जाले. ते त्यांजकडे सहजच हस्तगत जाले. त्यांत एक बडेखान महात यानें जव्हेरगज म्हणोन बरा नामी हत्ती जलद

---

७०-७०. "त्यास कांहीं इकडील शिंदे यांची व्यवस्था काय जाली हें वर्तमान माहीत नाहीं.त्यांजवर दुराणी व रोहिले यांची चोहोंकडून मिठी पडली. तळावरील भले लोकांनीं घोड्यास चाबूक लावून दुराणी व रोहिले यांची तीस हजार फौज, परंतु त्यांणीं ते समयीं दुराणीचे फौजेस मार देऊन अर्ध कोशपर्यंत माघारे हटवून घातले. असा हल्ला त्यांजवर केला. तोफखाना तळावरील सुरू होतांच त्या आरड्यावोरड्यामुळें बापलेकास विचारी ना" अशीं येथें कल्याण प्रतींत वाक्यें आहेत.

७१. तालिवार, तालेवार = सुदैवी, श्रीमंत.

७२. "भला मनुष्य कोणी कोणाचे हुकूम मानीनात" क० प्रत.

७३. 'माहात जेठीमण गोळी लागून' पु० प्रत. 'माहात म्ह ण जे ठी मान गोळ्या लागोन' तुं० प्रत.

व मर्द होता. तो दोन कोस पर्यंत काढिला होता. तळावर सडे बुणगे व हत्ती अंबाऱ्या व खजिना निघूं पावला नाहीं. तळावरच लुटलीं. बहूत करून मनुष्यें व खिजमतगार व पालखीचे भुई यांचे शिरच्छेद केले. क्वचित कोणी दैवयोगें करून थोडकीं वांचलीं असतील. लक्ष्मीनारायण लाहूरचा सुभा तळावरच होता. त्यांनीं गनिमांची कीर्ती ऐकतच होते कीं, गनीम यांनीं पळावें. मागुती उलटून घोडे घालावे म्हणोन ऐकत होते. त्याजवरून लक्ष्मीनारायण आपले लोकांस वरचेवर सांगत कीं, "यार हो ! भागो मत, मराठियाचे गनिमी काम[७४] आहे. अब सायतमे उलट आन पोहंचतात. मारो! मारो! अब सायतमे[७५] उलटे, म्हणोन तट[७६] घालोन क्षणभर मारामार केली. तों त्यांची[७७] जड काय. मराठियांनीं पुरताच गनिमी कावा केला ? दंगा होऊन ते तळावरच कत्तल बहुत करून जाले[७८].मग लक्ष्मीनारायण पांचशें खाशियांनिशीं उरला. तों गनिमांचा धुराळा दृष्टीस पडेना! मग लक्ष्मीनारायण पांचशें खांशानिशीं दोन कोस पर्यंत जव्हेर हत्ती निघाला होता [तेथें गेला.] तों दुराणीची मिठी त्यांजवर बसली. मराठे हत्ती सोडून चालिले. बडेखान महात यानें बहूत करून बोलिला कीं, "यार हो ! तुम्हीं दम खात निघावें. या वेळपर्यंत येथवर हत्ती आणिला आतां निभावून नेणें. " म्हणून बहूता प्रकारें सांगितलें. परंतु मराठे मनुष्य पळूं लागलियावर कोणाची वीर[७९] कोणास नाहींशी होते. रांडेनें सांवळें[८०] हुसकटलें तर झाडास बांधिले असतां झाड घेऊन बारा कोस पळतील ! तेथें हत्तीची गत काय ? खांसा जनकोजी शिंदे एवढा सरदार घायाळ पाणी मागत असतां वाटेनें दम धरून कोणी पाणी पाजीनात ! तेथें हत्ती कोण जिन्नस ! मग बडेखां महात यानें जाबसाल केला कीं, "यार हो ! तुम्ही दम खात नाहीं. परंतु क्षणभर दम खाऊन माझा तरी तमाशा पाहा !" म्हणोन माघारा फौजेंतून दुराणीची फौज होती त्यांत हत्ती चालवून क्षणभर मारामारी केली. शेंपन्नास दुराणी ठार पाडिले. मग त्यांनीं भाले लावून हत्ती व माहूत पाडाव करून चालविला.

---

७४.पाठीमागील 'गनिमी कावा' पृष्ठ ७२ टीप ९९ पाहा.

७५. साअत, सायत=तास, घटका.

७६. तट घालोन = दम धरून, उभे राहून.

७७.गिलचांची 'काय' ची स्त्रीलिंगी योजना.

७८. ' जाला ' जाहाला 'पु० तुं० प्रती. पळाले ते पळालेच !

७९. वीर=ईर्षा, आस्था. 'हरा' क० प्रत.

८०. सावळें=हलक्या प्रतीचें लुगडें.

८०. इकडे शिंदे यांची गत ही जाली. तों दिल्लीचे किल्ल्यांत गाजुदीखान वजीर होता. त्यानें किल्ला टाकून कालिका-भवानीकडून तडक पळून पांच सात कोसावर जनकोजी शिंदे यांची फौज गांठिली. तोही यांचे समागमें पळूं लागला.असो;दुराणीची तीस हजार फौज गनिमाचे पाठीस लागली. लहान थोर सात आठ हजार मनुष्यांचीं शिरें कापून नेलीं.

८१. इकडे दत्ताजी शिंदे यांचे तळावर दुराणी व रोहिला व सुजा व अहमदखान लंगडा पठाण व कुतुबशाहा असे येऊन उभे राहिले. तों नजीबखान रोहिला याणें रुमालांत दत्ताजी शिंदे याचें शीर घालून अबदुल अली दुराणी याजकडे आला. अंबारीस अंबारी तटली. अंबारींतूनच नजीबखान यानें कुरनीस करून, हातावर रुमाल घेऊन,वर शीर ठेऊन पुढें आला. आणि शीर पुढें ठेविलें. आणि अर्ज केला कीं, "पातशाहा अलंपना, साहेब संदेकत नंजैर असे." म्हणोन शीर पुढें ठेविलें. तेसमयीं पातशाहाचा आनंद अति उत्कृष्ट,शाहाजणें वाजवून "शाहाका बोलैबाला!!" म्हणोन उल्हासाची एकच आरोळी जाली.दुराणी नजीबखान याजवर परम खुशाल होऊन बहुमान हत्ती व घोडे दिले. जवळ आणून पाठ थोपटली. या प्रकारें गौरव केला.

८२. तदनंतर राजाराम चोपदार जिवानिशीं जगून गेला होता त्यानें नजीबखान यास अर्ज केला कीं,"दत्ताजी शिंदे याचें शीर कापून आणिलें. असो, जें जालें तें त्याचे प्रालब्धानेंच जाहालें. तुम्ही आपला जो वौघ-मान करावा तो करून घेतला. आतां हिंदुधर्म आहे. शीर ठेविलियांत नफा नाहीं. उमरावगीर गोसावी यांजपाशीं बहूत मराठे आहेत. धड शीर एकत्र करून त्याचें सार्थक करतील" या प्रकारें बोलिला.तों नजीबखान मान्य करीना. मग राजाराम चोपदार उमरावगीर गोसावी यांजकडे जाऊन, त्यास अर्ज केला कीं, "तुमचा हिंदुधर्म आहे. दखनचा सुभा दत्ताजी शिंदे यांचें शीर अविंधांनीं नेलें. तें उमरावगीर गोसावी येथें असतां त्याचा सद्वियोगे होऊं नये

---

८१. पातशाहा अलमपन्हा, साहेब सदाकत् नजर असो=पातशाहा दुनियेचे सांभाळकर्ते आहेत;धणीसाहेब ! कृपेची ( चांगली ) दृष्टी [ मजवर ] असावी.

८२. शाहाका बोलबाला! '=राजाची दौलत चढती असो !

८३. 'वाघमान' पुणें प्रत. 'वोघ' सां० प्रत. 'धर्म' धो० सां० क० प्रती. "आपला वाघमान करणें तो अवघा करून घेतला" तुं० प्रत. वाघमान=मुख्य मान, जेत्याचा मान.

८४. 'सद्विनियोग' ह्या अर्थी.

हें चांगलें नाहीं. तरि एवढें भूषण ईश्वर तुम्हांस देत आहे. यश ईश्वरें बळें होऊन घर पुसत आणिलें आहे. तरि पदरीं घेणें." म्हणतांच उमरावगीर गोसांवी याचे प्रत्ययास आलें. "सायास केलियानें असें घडून येणार नाहीं." म्हणोन उमरावगीर गोसांवी सुजाउद्दौला याजकडे येऊन अर्ज केला कीं, "साहेब, आमचा स्वधर्म आहे. त्यास आम्ही साहेबांच्या पदरीं असतां दत्ताजी शिंदे यांचें देहसार्थक नाहीं असें होईल तर आम्ही पदरीं राहिल्याचें सार्थक नाहीं." असें ऐकतांच सुजाउद्दौला यानें नजीबखान याजपाशीं जाऊन दत्ताजी शिंदे यांचें शीर मागितलें. त्यांनीं उत्तर केलें कीं, "आम्ही शीर अबदुल अलीस नजर केलें आहे, आम्हांस मागतां येत नाहीं,तुम्ही परस्परें पातशाहास अर्ज करून शीर मागोन घ्यावें." हें ऐकून सुजाउद्दौला यासही संकटच जालें. नजीबखान यास बोलिला कीं, "माझा बाप मनसूर अली पूर्वीं गनिमांचे पेंचांत आला. ते समयीं मनसूर अलीनें आपली दाढी राणोजी शिंदे यांचे हातीं दिली कीं,इची शरम राखावी. असें बोलिल्यावर राणोजी शिंदे यांनीं त्याची अबरू रक्षून गंगापार [८६]करून दिले.त्या तागाईत आम्हीं राज्य खाऊन सुखरूप आहों.त्या राणोजी शिंदे यांचे पुत्र दत्ताजी शिंदे. वरकड अवघीं बेइमानी आम्हांकडून घडली. परंतु एवढें तरि उत्तीर्ण व्हावें." म्हणोन अबदुल अलीपाशीं [८८]स्वतां रदबदली करून शीर मागितलें. तेसमयीं शाहा यांनीं निदान दोनें लक्ष रुपये मागितले. तेसमयीं उमरावगीर गोसावी यानें दोन लक्षांची निशा करून शीर आपलेपाशीं घेतलें.डेरियापाशीं येऊन दत्ताजी शिंदे यांचें धडही आणिलें. आपणाकडील मराठे होते त्यांस आणून साहित्य उत्तम प्रकारें करून, चंदन-काष्ठें, वेलकाष्ठें व तुळसी-काष्ठें [आणून] यथाविधी यमुनातीरीं दहन केलें. तीन हजार रुपये दानधर्म, खैरातही वांटिली.असो.इकडे दिल्लीचा किल्लाही सहजच खालीं होता. त्यांनीं किल्ला घेऊन आलीकडे येऊन मुकाम केला.

---

८५. तुं० प्रत म्हणते 'दत्ताजी शिंदे यांचें शीर अविंधांनीं नेलें तें उमरावगीर यानें सोडविलें, येवढें भूषण ईश्वर तुम्हांस देत आहे."

८६. गनिमांचे = शत्रू, रोहिले यांचे. मागें पृष्ठ ५९ कलम ५९ पाहा.

८७. एवढी तरि उत्तीर्ण व्हावें असा पु० प्रतीचा पाठ आहे. 'एवढी तरी उत्तीर्णता व्हावें" तुं०प्रत. परंतु एकही पाठांत 'एवढी' आणि 'व्हावें' यांचा व्याकरणतः मेळ बसत नाहीं. वरील पाठ क० प्रतीचा.

८८. 'सक्त रदबदली' तुं० प्रत.

८९. तीन लक्ष रु. पुणें व सां. प्रती.

९०. "पांच हजार रुपये धर्म केला. अस्थी काशीस पाठविल्या" सां. प्रत.

८३. तों इकडे जनकोजी शिंदे घायाळ व भग्न असे फौजेसुद्धां पळत असतां अठरा कोसपर्यंत गिलचे यांणीं पाठलाग केला, आणि मग दुराणी फिरोन माघारे गेले. जनकोजी शिंदे यांस घोडियावर बसावयास अवसान पुरेनासें जालें. पालख्यांच्या जागीं पालख्या राहिल्या ! मग खेडियांतील खाटलें काढून खाशियांनीं[९१] उड्या टाकून घायाळ चालविला. तैशियांत दुराणीनें गडबड केली. खाटलें भुईस उतरावयास फुरसत पडली नाहीं, मग उभियानेंच खालें टाकिलें. जनकोजी शिंदे जखमी भारी, शरिरास परम दुःख जालें. मागुती खाटलें[९२] घोडियावर घालून तीन चार कोसपर्यंत निंघाले. सायंकाळ जालें[९३]. दुराणीही झाडून माघारीं गेले. नजीबखान यानें मोठें यश संपादिलें. इकडे शिंदे यांचे बुणगे व कबिले चोवीस कोसांवर उतरले होते. त्यांत जनकोजी शिंदे तीन प्रहर रात्रीं दाखल जाले. तों बुणगे आधींच तयार होते. वाटेनें लोकांस जनकोजी शिंदे पुसत कीं, "काकासाहेब यांची गत काय ?" लोकांनीं दत्ताजी शिंदे पुढें गेले म्हणोन चाळवीत चाळवीत बुणगियांत आले. कचेरीचे डेरियानजीक बाडापुढें खाटलें उतरलें. तों रामाजीपंत दिवाण व रूपराम कटारी धांवत आले. त्यांजसमागमें पांच सात मशालीही होत्या. जनकोजी शिंदे येईत तों पावेतों बायकांस कांहीं दत्ताजी शिंदे यांची अवस्था ठाऊक नव्हती. बाडांत[९४] वर्तमान कळतांच भागीरथीबाई व जनकोजी शिंदे यांची स्त्री काशीबाई अशीं उभयतां मराठधर्म[९५] विसरून धांवत बाडाबाहेर आलीं. तों जनकोजी शिंदे घायाळ खाटलियावर पाहिले. तोंड उघडून पाहिलें तों जनकोजी शिंदे यांनीं डोळियास पाणी आणून चुलतीस विचारिलें कीं, "बाई, काका कोठें आहेत ?" तेसमयीं भागीरथीबाईस पुरतें उमजलें कीं, पाटील निश्चयें रणांत पडले. बाईस मोठा उभडा[९६] आला. मागती विवेक केला कीं, "जात्यांतील रडती[९७] आणि सुपांतील हांसती." त्यांची गत तो या रितीची

---

९१. खाशियांनीं = बरोबरील मोठे मोठे सरदारांनीं.

९२. 'मागती घोडियावर घालून' तुं० प्रत.

९३. "दुराणीचे कांहीं हस्तगत झाले नाहींत" असें वाक्य 'जाला' शब्दापुढें क० प्रत देते.

९४. 'बायकांस' क० प्रत.

९५. ही बायकांनीं बाहेर दृष्टीस न पडण्याची चाल मराठ्यांनीं मुसलमानांपासून उचलली. महाराष्ट्र ब्राह्मणांनीं पुढें तिचें अनुकरण केलें नाहीं, ही आश्चर्याची गोष्ट आहे.

९६. उभडा=अनावर गहिंवर.

९७. रडतात' व 'हंसतात' असा अनेक वचनी पाठ क० प्रतीचा आहे.

जाली. आणि हा तो घायाळ, याचेंही जगावयाचें कठीण. दुराणीचा मार्गे पेंच भारी. आतां मी शोक करितें तर याची गत काय ?" याविषयीं दोहरा आहे.

॥ मेरे मनमे कछु और । कर्ता के कछु और ॥
॥ उधो माधो कहे । झूटी मनकी दौर ॥

म्हणून उभडा आला तो विषासारिखा घोंटून जनकोजी शिंदे यांस जाबसाल केला कीं, "बाबा, तूं रांडेसारखा रडतोस काय ! जयाजी शिंदे यांचे पोटीं चौघी लेकी जाहाल्या, तैशीच तूं एक आणखी जाली असतीस तरि आणीक एक जांवई येता. पाटील काय घेऊन गेले ? दुनिया, दौलत, महाल, मुलूक, खजिना, हत्ती, घोडे सर्व तुम्हांपाशीं ठेऊन गेले. तुम्हीं हिंमत धरून त्याचें सार्थक करावें. आतां रडून होणें काय ?" म्हणोन हिंमत देऊन बोलतांच जनकोजी शिंदे उगेच स्तब्ध राहिले. रामाजीपंत दिवाण व रूपराम कटारी यांस बाईनीं आज्ञा केली कीं, "रात्रीचे रात्र लष्करचा मुक्काम करणें. प्रातःकालीं कूच करून जावें." असें ऐकून नगारचीस सांगून शाहाजणें केलीं. परंतु लष्कराचा धर सुटला. खावंदाची देखील आस्था धरीनात मग लष्कर तडक रेवाडीचे रोखें चालिलें. धरण फुटल्यासारखें जालें. मग यांनींही तेथून कूच करावें म्हणून इत्यर्थ केला. तों पोतनीस व जामदार यांनीं येऊन अर्ज केला कीं, "खजिना व कापड, नरमिना उंटावर चालत होतें. वरकड साधें कापड छकाडियांवर चालत होतें. आतां छकड्याचे जागीं छकडे राहिले. आतां ओझियांची आज्ञा काय ?" असें म्हणतांच भागीरथीबाई यांनीं उत्तर केलें कीं, "आम्हीं कधीं कारभार केला नाहीं. तुम्हीं रामाजीपंत यांस विचारावें." तों जवळ जनकोजी शिंदे यांची स्त्री काशीबाई होती. तिची उमर तो अठराविसां वर्षांची होती. परंतु बुद्धी मोठी पोक्तप्रमाणें. मोठे हिमतीची बायको. तिनें जाबसाल केला कीं, "एवढाले जीव गेले, आतां दौलतीची आस्था कोणास आहे ? तुम्ही खजिना, नरमिना कापड असेल तें घ्यावें. आणि डेरे व

---

९८. गिळून, आंतल्या आंत दाबून.

९९. यावरून जयापास जनकोजी सुद्धां पांच अपत्यें होतीं असें होतें.

१००. धरण नदीचें. "तळ्याचा बांध फुटतो आणि पाणी रानोमाळ होतें तशी फौजेची गत जाहाली," सां० प्रत. व क० प्रत.

१. नरमिना = नर्मीना = रेशमी वस्त्रें. "कौशेयजातं नर्मीना" राजव्य० कोश.

२. "बुरजी वगैरे सरंजाम चालण्याची आज्ञा काय" असें क० प्रतींत आहे.

३. "येवढा दौलतीचा खांब गेला तेथे नर्मिन्याची आस्ता कोणी धरिली आहे !" क० व सां० प्रती.

साधें कापड त्यासि आग लाऊन द्यावी." म्हणोन साफ सांगितलें. मग तैसेंच जामदार व पोतनीस यांनीं सांगितलें त्याप्रमाणें वर्तणूक केली. जितकें अगत्याचें ओझें होतें तितकें मात्र घेतलें. बरकड वाडें व कचेरीचे डेरे व सामान व खासे महालांतील डेरे व जामदारखाने व नगारखान्याचे डेरे व साधीं कापडें यांस कडबा घालून आग लाऊन दिली. मोठा प्रळय जाला. जनकोजी शिंदे यांस बाईचे पालखींत घातलें. दोही बायांच्या पालखींचे भुई एके पालखीस लाविले.[४] बायकांस घोडीं बसावयास पाहाण्यास गेले. तों त्या धुंदींत ज्याचे हातास जें घोडें आलें [तें] त्या बारगिरानें नेलें. मग भलतीशीं बळेंगीं[५] दोन घोडीं होतीं त्यांजवर बायका स्वार केल्या. तों भागीरथीबाई गरोदर, नऊ महिने पूर्ण भरले होते. घोडियावर बसावयाचें संकटच. परंतु संकटास उपाय नाहीं. एवढा तालेवार मेला, परंतु रडावयास फावलें नाहीं! घायाळ जनकोजी शिंदे यांच्या जखमा बांधावयास दुराणीचे दहशतीमुळें फावलें नाहीं![६] असो. या रितीनें कूच केलें. बहुतकरून तोफखाना तळावरच राहिला. अडीच प्रहर रात्रपावेतों तेथून दहाबारा कच्चे कोस गेले. तों जखमी याजसमागमें एकदील पांचशें खांसा नाहीं.[७] जिकडील तिकडे रानोमाळ [होऊन] कोणास कोणी पुसेनासे जाले. तों रूपराम कटारी याणें पालखी उतरून[८] मनसुबा करिता जाला कीं, "दुराणीची दौड भारी. आतां दुराणी कांहीं या फौजेस निभाऊं देत नाहीं.[९] तरि उभयतां बायका व जनकोजी शिंदे व रामाजीपंत यांस कोणांस न कळतां नेऊन भरतपूर अथवा रामगड अथवा कुंभेरी येथें

---

४. 'लाविले' यापुढें क० प्रत म्हणते "कारण कीं समय आहे. यास्तव जनकोजीस पालखींत घालोन जलदीनें निभावून गेलें पाहिजे. एका पालखीच्या भोयांनीं निभावणी होणार नाहीं यास्तव लाविलें. जनकोजी जखमी भारी आणि दुराणीचें भय. मजल काढून जावयाचें. बत्तीस असले म्हणजे हां हां, म्हणतां निभावून नेतील. या प्रसंगीं दुसरे कोठून मिळणार!"

५. कंटाळीं, टाकाऊ, ह्या अर्थी. 'रबळगीं' असें तुं० प्रतींत आहे. 'रोड' क० प्रत.

६. याच्यापुढें क० प्रत म्हणते "असा वक्त पडला. असा वक्त दुस्मानावरही न पडावा तों ईश्वरें दैवयोगें करून घडला. 'अन्यत् किंचित् भविष्यति' तसें घडलें."

७. 'पांचशेंहेही लोक नाहींत, एवढी फौजेची दुर्दशा होऊन गेली!' क० प्रत.

८. 'थोपवून' क० प्रत.

९. "दुराणीची दौड भारी. यांस निभावून जाऊं देणार नाहींत. त्यांची गांठ पडल्यास यांची स्थिती कांहीं राहाणार नाहीं. सर्वस्वी बुडवील" क० प्रत.

ठेवून दुराणीची दौड आली तरि आम्ही हातीं देणार नाहीं. वरकड फौजेचे दैवीं असेल तें होईल." असें म्हणतांच जनकोजी शिंदे यांनीं उत्तर केलें कीं, "[१०]बाईस विचारावें." तों बाईनें ऐकून सांगितलें कीं, "मनसोबा मजला कांहीं सुचत नाहीं. तुम्ही चित्तास येईल तसें करावें." म्हणतांच काशीबाईनीं भीड मर्यादा सोडून बोलली कीं, "तुम्ही हा मनसोबा काय करितां? जाट आमचा काय भाऊ [११]व्यंकटराव नव्हे, किंवा मावळा भापकर नव्हे. त्यांनींच जर बंदीस घातलें तर पेशवे यांस आमचें अगत्य [१२]कोय? दुसरें, दक्षणचे आमचे जिवासाठीं या रानांत आले त्यांस मोकलून आम्ही आपले जीव जगवून तरी काय करावें? सोक्ष मोक्ष जे चौघांत होतील ते होऊत, परंतु हा मनसुब उत्तम नाहीं." म्हणोन म्हणतांच भागीरथीबाई यांनीं आज्ञा केली कीं "पालखी चालूं देणें," असें म्हणोन तडका लष्कर चालों लागलें. तें दिवस उगवावयास रेवाडीनजीक आलें. दिवस उगवला. तों गांवकरी खेड्यापाड्याचे लोक उंटें, तट्टें, घोडीं वोढूं लागले आणि गिलचा आला म्हणून आवाई घालून लुटूं लागले. मागती गडबड जाली. ते समयीं मोठा प्रलय जाला. [१३]पडेती यांनीं बायका मुलें टाकून दिलीं. तेथें वरकड काय पाहावें? अंगावरील वस्त्रें कोणी ठेवीनात. असे पळूं लागले. तों पालखीजवळ दोघी बायका होत्या. पालखींत जखमी जनकोजी शिंदे होते. भोई घाबरे होऊन पालखी टाकावयाचे विचारांत आले. ते समयीं जनकोजी शिंदे यांस नेटें पालखी चालली तर यातना सोसेना. ते वक्तीं भागीरथीबाई यानीं भोई यांची प्रार्थना केली कीं, "बत्तीस भोई तुम्ही आहां! तुम्हांवर घात पडे तोंवर पालखी न टाकावी. दर असामीस शेर शेर सोन्याचें कडें देईन." याप्रकारें हिंमत दिली. तों पळायाची फारच गडबड जाली. जिवाचे धास्तीनें [१४]बावन्न बिरदांचे धणी, भले

१०. 'काकूबाईस' सां० प्रत.

११. व्यंकटराव निंबाळकर. मागें पृष्ठ ४१ पाहा. 'वेंकटराव' तुं० प्रत.

१२. असें ह्या बायांस अशा संकटावस्थेंत वाटलें असेल, यांत फारसा दोष नाहीं. परंतु अगत्य होतें कीं नव्हतें हें मागील पुढील हकीकतीवरून सिद्ध होईलच. मागें पृ. १९ क० २० व पृष्ठ २१ क० २३ पाहा.

१३. 'पळतियांणीं' असें तर नाहीं? "पडरी यांनीं" पुणें प्रत. "पेंडारी बायकांनीं मुलें" तुं० प्रत. "पेंढारी यांणीं आपलीं मुलें माणसें टाकून टाकून तडाका पळों लागली. अंगावर वस्त्र आहे कीं नाहीं याची शुद्ध राहिली नाहीं." सां० प्रत व कल्याण प्रत.

१४. हीं बावन्न बिरुदें कोणतीं? मागें-ही असा उल्लेख आला आहे.

सरदार, घोडे सोडून जीव जगविण्याकारितां पाहाडांत शिरले ! “ जीव द्यावा त्यापेक्षां जितरबें[१५] गेलें तरी उत्तम ” म्हणोन घोडीं सोडलीं. रांडा पोरें घोडीं धरूं लागलीं[१६]. ते समयीं भागीरथीबाई यांनीं जनकोजी शिंदे यांस सांगितलें कीं, “बाबा, मजला आतां घोडियावर बसून पळावयाची निभावणी पडत नाहीं. तुम्हीं झाडून पुढें चालावें. माझे समागमें जिव्हाळियाचा[१७] मनुष्य असेल तो द्यावा. गिलचा दृष्टीस पडे तों पावेतों मजला रक्षावें. निदान दृष्टीस पडून निभावणी दिसेनाशी जाहाली म्हणजे माझे दोन तुकडे करावे[१८] ” असें बोललियावर याप्रमाणें आवजी आनंदराव[१९] म्हणून बरा मर्दाना आणि जिव्हाळीयाचा होता, त्यास जनकोजी शिंदे यांनीं सांगितलें कीं, “ बाई-समागमें दम खात खात यावें. निदान दुराणी दृष्टीस पडलियावर बाईचे दोन तुकडे करावे. आशा न धरावी. यांस जिवें मारून मग तुमचे दैवीं असेल तसें पाहावें.” याप्रमाणें सांगोन त्यास भागीरथीबाई यांजसमागमें दिलें. तसेंच काशीबाई यांजसमागमेंही कुसाजी शिंदे यांस नेमून दिलें. परंतु भागीरथी-बाई पोटाशीं, नऊ महिने पूर्ण भरले, म्हणोन त्यांस पळावयाचें संकट. काशीबाई सडी होती. तिनें पालखी सोडली नाहीं. या प्रकारें तीन कोस भोई पालखी घेऊन पळाले[२०]. जखमी आंत परम कष्टी. प्राण गेला तरि पुरवला, परंतु [वेदना] सोसवेना, म्हणोन भोई यांस शिव्यागाळ करीत. परंतु कोणी ऐकेनात. मग पळतां पळतां एक गांव बरा मातबर होता. तेथील हजार दीड हजार

---

१५. जितरब = जितराब = जनावर घोडीं. “ जीव प्यारा ” तुं. प्रत.

१६. ह्या पळाच्या हृदयद्रावक हकीकतींत ह्या गोष्टीसारखी दुसरी वाईट वाटण्याजोगी गोष्ट नाहीं. ज्या शूरांचें नांव ऐकून हिंदुस्थानांतील लोक कांपत होते, त्यांची घोडीं रांडापोरांनीं न्यावीं आणि त्या रांडापोरांस व ‘दांडगियांस’ योग्य शिक्षा करण्याचेंही सामर्थ्य त्यांच्या अंगीं राहूं नये ! अशी स्थिति खरोखरच झाली होती किंवा बखर लिहिणारानें आपले आंगीं कमीपणा आणण्यासाठीं असें अतिशयोक्तीनें लिहिलें ! शेवटीं आम्ही हरलों तेव्हां आम्ही शूर नव्होंच असा त्याचा ग्रह झाला असावा काय ?

१७. जिव्हाळियाचा=ममतेचा, कळकळीचा.

१८. हें ह्या बाईचें भाषण लक्षांत ठेवण्याजोगें आहे.

१९. ‘आनंदराव ’पाठांतर—“मालजी अरणराव ”पुणें प्रत व सां. प्रत. मावजी आनेराव तुं० प्रत. मावजी अरणराव क० प्र.

२०. ‘भोई यांणीं पालखी एक घटकेंत आले.’ क० प्रत.

मुळें बायका पुरुष दांडगे लष्करास ओढाओढ करूं लागले. तों पालखीजवळही दिवस उगवलियावर पांच सातशें खांसा जमला होता. ते वक्तीं काशीबाई यांनीं जाबसाल केला कीं, "तुम्ही एवढे मनुष्य, दुराणी तो दृष्टीस पडेनात. रांडा पोरें घोडीं ओढतात. तुमच्या पोटांत हरणाचीं काळेजें[२१] कशीं शिरलीं?" असें ऐकून जनकोजी शिंदे यांणीं भोई यांस रागास आले कीं, "पालखी थोपवावी. घोडें बसावयास द्यावें." असें म्हणतांच लोकांस ईर[२२] येऊन दांडगियांवर घोडे घातले. पांच सातशें मनुष्य कापून काढिलें. मग हुल्लड[२३] शांत जाहाली. सायंकाळ जाहाला. लष्कर जिकडे तिकडे पळून गेलें एक जागां जमून राहिलें नाहीं. जातीनिशीं जनकोजी शिंदे खांसा दहा हजार एकीकडे आणि नारो शंकर एकीकडे, साबाजी शिंदे एकीकडे, कोणी कोणास पुसेनात, तमाम लष्करांत जनकोजी शिंदे असतां आरोळी जाली, "जनकोजी शिंदे जाटांनीं कुंभेरींत नेले. आम्हांस रानांत मोकलिलें." म्हणोन लोक दिलगीर जाले. असो. तेवढी रात्र घोडियावर जीन व उंटावर ओझीं तशींच [ठेवून] जिकडील तिकडे लष्कर उभें राहिलें. दुसरे दिवशीं दिल्लीहून कच्चे ऐशी कोस कोटपुतळी येथें जनकोजी शिंदे राहिले. तमाम डोंगरांत सांडणी स्वार पाठऊन लष्कर जमा केलें.

८४. तों तेच दिवशीं मल्हारराव होळकर, यांची[२४] निकडीचीं पत्रें गेलीं होतीं म्हणोन, मल्हारराव होळकर यांनीं जयनगरचा शह टाकून मजल दरमजल मोठ्या मजली करून मिळावयास येत[२४] होते. तों इकडे यांची अवस्था ऐशी जाली. हें मल्हारराव यांस विदित नवतें. तेही मुकामास कोटपुतळी पासून दोन कोसांवर आले. बुणगियाचा पुढें मुक्काम जाला. मागून मल्हारराव सडी स्वारी अस्तमानास मजलीस शाहाजणें वाजवीत आले. तों शिंदे यांचे लष्कराचे पळाचे राऊत जाऊन तेथें पोंचले. मल्हारराव यांनीं जवळ बोलावून वर्तमान विचारिलें. स्वारांनीं वर्तमान सांगितलें कीं, "दत्ताजी शिंदे यांचा

---

२१. हरणाची 'काळजी' पाठांतर. ह्या बाईचें वर्तन ध्यानांत ठेविण्याजोगें आहे.

२२. ईर=(वीर्य) हिंमत, ईर्षा.

२३. हुल्लड=गडबड, धामधूम.

२४–२४ होळकर यांस निकडीचीं पत्रें गेलीं होतीं. त्यांचीं उत्तरें आलीं कीं आम्ही जयनगरचा शह सोडून भर मजला करीत येऊन तुम्हांस मिळतों अशीं आलीं, "तों मल्हारजी बावा भर मजला करून येत होते" असें पहिल्या वाक्याऐवजीं क० प्रतीचें वाक्य आहे.

२५. यांचीं=शिंद्यांचीं. मागें पृष्ठ ६७ कलम ६६ पाहा.

शिरच्छेद जाहला. जनकोजी शिंदे जखमी व बायका व लुटलेलें लष्कर असे येथून तीन कोसांवर कोटपुतळीस मुकाम करून राहिले आहेत." हें वर्तमान मल्हारराव यांनीं ऐकतां क्षणींच अंबारींतच घालून[26] घेतलें व गंगाधर तात्या शाहाजणें वाजवीत होते तें मना केलें. असे डेरियांत जाऊन शोक करिते जाले. ते समयीं त्यांची स्त्री गौतमाबाई[27] होती, तिनें निषेध केला कीं, " सुभेदार, तुमचें वृद्धपण जाहलें. शिंदे यांचीं मुलें म्हणजे काय ? त्यांचे तोंडचें जार वाळलें नाहीं ! त्यांनीं एवढा पराक्रम करून मारतां मारतां मेले. एरवीं हा मृत्युलोकच आहे. जाला प्राणी वांचत नाहीं. परंतु इहलोकीं कीर्त करून परलोक साधन करणें, हेंच दुर्लभ. हें मूल जनकोजी शिंदे, याणें एवढा पराक्रम केलें[28] ! तुमचे दिवस समीप आले. तरि हिंमत धरून मारतां मारतां मरावें. हा प्रलाप[29] स्त्रीजातीनें करावा. असें पुरुषास बोलिलें नाहीं. प्रस्तुत जवळ जखमी व मुलें बाळें आले आहेत. तर ऐसेच जाऊन भेटून त्यांचें समाधान करावें. " म्हणोन बोलतांच[30] वृद्धास विषाद येऊन गौतमाबाईस बोलिले कीं, " तुझे चित्तांत आम्हीं मरावें असें आहे. " यावर गौतमाबाईनीं उत्तर केलें कीं, " सुवासिणी[31] असतां वैधव्याची आस्था धरील अशी कोण चांडाळीण असेल ? अहेवपणें[32] हळद-कुंकु-मंडित मरावें, हीच इच्छा सर्व स्त्रियांची. परंतु जैसें पूर्व आचरण असेल तैसें घडेल. आपले पदरीं लौकिक भारी. तुम्हीं आपलें घोंगडी विणावयाचें स्वकर्म करीत असतां तरि सहजच वाचावयाची आस्था धरावी. बांडा तरि शूराचा उचलिला आहे. वाण सतीचें घेतलें [तें] जैसें सांभाळावें, तैसेंचि

---

२६. घालून घेणें=आंग टाकणें, भूमीवर पडणें.

२७. " गौतुमाबाई " तुं० प्रत. गोदावरी ' चेंच नांव ' गौतमी ' असेंही आहे. ' गोदुबाई ' असाही पाठ आहे.

२८ " आपण तरी आजपावेतों बहुत लढाया केल्या व आपली हिंमतही मोठी असून असा शोक करितां ! हा स्त्री-जातीनें करावा" सांगली प्रत.

२९. प्रलाप=(रिकामी बडबड) विलाप ह्या अर्थी. पुढें पृष्ठ ९४ टीप ३९ पाहा.

३०. " म्हणून बोलिली. येविशीं दोहरा आहे:—

" उजले उजले सब भले, उजले भले न केस। नारि न नवे न रिपु डरे न आदर करे नरेस ॥ " तुं० प्रत; हा दोहरा मल्हाररावाच्या तोंडीं आला असता तर बरें झालें असतें.

३१. 'सुदैव,' 'सदैव' पाठांतरें.

३२. अहेवपणें [ अविधवा–पणें ]= सुवासिनी असतां. ' अयोपणें ' पुणें प्रत.

धर्मशास्त्र [३३] आहे." बाईचें वचन ऐकून, तैसेच रागास येऊन, घोडियावर स्वार जाहाले. हत्ती व फौज सिद्ध होऊन जनकोजी शिंदे यांजकडे चालिले. "जैशी दैवाची उपरी तैशी बुद्धी उपजे शरीरीं" बरोबरील तमाम फौजेची [३४] छबी पळाली. तोंडें काळीं खापरासारखीं दिसों लागलीं. एकमेकांस बोलूं लागले कीं, शिंदे यांची फौज एवढी लढती, तिची ही गत! आमची खानदेशी फौज बहुतकरून तिची गत काय होईल न कळे."

८५. असो. या प्रकारें शिंद्यांच्या लष्करास मल्हारराव आले. [३५] तों भागीरथीबाई व काशीबाई यांस राहुटी देखील नाहीं. झाडास वस्त्रें गुंडाळून बसलीं होतीं. तेथें गौतमाबाई आली ते समयीं उभयतां बायांचा व [३६] भानसिनी यांचा कोल्हाळ जाला. तीन दिवस दम खादला होता तितका उमडा आला. "भगवंतें आम्हांवर केवढा गहजब केला! आम्हीं देवाचे घरीं काय चोरी केली होती? एवढें निर्वाण आम्हांस [कां] दाखविलें? आमचा वियोग केला! आतां पाटील यांस कोठें पाहूं?" म्हणोन धाय मोकलून ऊर माथा बडवून तोंडीं माती घालूं लागली. ते समयीं गौतमाबाई यांणीं बहूत शांतवन केलें. मायाजाळ, स्मशानवैराग्य दुसरियास सांगावें. परंतु ज्याचा [३७] उभड तोच जाणत असेल. हा अनुभव मनुष्यदेहीं सर्वत्रांस आहेच. तैसेंच [३८] मल्हारराव [यांची] जनकोजी शिंदे यांस पाहून जैशी माय [३९] प्रलाप करिते तैशी गत जाली. उफराटे जनकोजी शिंदे यांणीं मल्हारराव यांचें समाधान केलें. "सुभेदार, हा मृत्युलोकच आहे. यांत केव्हांही जाणें खरें. वडील कीर्तीच करून गेले. आपणही किती दिवस जगणें

---

३३. 'वाण सतीचें घेतलें जैसे सोहाळे भोगावे तैसेच धर्मशिलेस पाय द्यावा' तुं० प्रत. 'क्षत्रिय धर्म धरिले तैसें चालावें' सातारा प्रत.

३४. छबी=छवि, तेज, पाणी.

३५. "तों इकडून भागीरथीबाई मागें होती तीही येऊन पोंचली. दीड प्रहर रात्र जाली. बरोबर डेरे राहुटी वगैरे कांहीं एक सरंजाम नाहीं; तेव्हां झाडावर माळा करून त्याजवर शेला घालून शेल्याचें पाल करून जनकोजी शिंदे घायाळ यास पुढें ठेऊन बाया दीनाप्रमाणें बसल्या होत्या" असें सां० प्रतींत व कल्याण प्रतींत आहे.

३६. भानसिणी = दासी. कुणबिणी. 'यांच्या भासणी भाणसिणी' तुं० प्रत.

३७. 'अनुभव' तुं० प्रत.

३८-३८. याबद्दल "मल्हारराव व जनकोजी बावा या उभयतांस दुःख मातेचें अपत्य मृत्यु पावतें आणि माता रुदन करून विलाप करिते तशी गत उभयतांस जाहाली" असें वाक्य कल्याण प्रतींत आहे.

३९. प्रलाप = विलाप.

आहे ? त्यांत अवकाशही नाहीं. 'सुपांतील हांसती आणि जात्यांतील रडती' हाही दृष्टांत जाणावा. प्रस्तुत आमचे हातांत ग्रास जात्यांतील आहे." म्हणोन शांत केलें. मल्हारराव यांनीं डेरा व बाडाच्या कनाथा व बिचोबा[40] व खाजगीचे डेरे पूर्ववत प्रमाणें आणून दिले. आपण तेथें राहिले. दोन्हीं सैन्यें एक जागां जालीं. त्या वेळेस लोकांस असें जालें कीं, कुडींतील प्राण व्याकूळ जाला असतां परततो तैसें घडलें, मल्हारराव आले म्हणोन ते दिवशीं सैन्य स्वस्थ राहिलें. तों मल्हारराव यांचे लष्करांत तीन वेळां दुराणी आले आले म्हणोन गडबड जाली.

८६. दुसरे दिवशीं जाटाची बातमी आलीं कीं, दुराणीची "फौज तुम्हांवर सडी होऊन येणार, तुम्ही स्वस्थ कसे राहिलां ?" म्हणून पत्रें आलियावर मल्हारराव, जनकोजी शिंदे व गंगाधरपंत व रामाजीपंत दिवाण असे एकत्र होऊन जनकोजी शिंदे यांस विचार सांगते जाहाले कीं "बाबा ! तुम्ही जखमी आहां. दुराणीची दौड भारी. सहजीं चालणें कच्चे चाळीस कोस. त्यांत तुमची निभावणी पडणार नाहीं. यास्तव बुणगे व बायका व तुम्ही आम्ही चमेली पार जाऊन सडे फौजेंत रामाजीपंत व आमचे गंगाधरपंत राहातील." याप्रमाणें मल्हारराव यांचें वचन ऐकून जनकोजी शिंदे यांणीं उत्तर केलें कीं, "सुभेदार, तुम्ही वडील आहां. मुलें माणसें व बुणगे घेऊन जावें. माझा नेमच आहे कीं, जेथें पाटील मृत्यू पावले त्या स्थळीं आपला देह टाकावा. असा माझा नेमं[41] [ आहे ]. आपल्यास राहाणें नाहीं." असें ऐकून मल्हारराव यांणीं बहूत प्रकारें वडीलपणें धिःकार करून सांगितलें. परंतु जनकोजी शिंदे यांचे बुद्धीस उतार पडेना. मग रागें मल्हारराव डेरियास येऊन गौतमाबाई यांसि वर्तमान सांगितलें कीं, "जनकोजी शिंदे आम्हांस सर्वत्रांस घेऊन बसतात. ऐकत नाहींत." तेव्हां गौतमाबाई थोर हिंमतीची बायको, तिनें मागती मल्हारराव यांस विचार करून सांगितलें कीं, "सुभेदार, तुमची 'साठी बुद्धी नाटी' तैसा विचार जाला आहे. अपकीर्तीं मिळवून किती पन्नाशा जगणें आहे ? बहूत रोज गुजरले, थोडके राहिले आहेत. जनकोजी शिंदे मूल होत्साता त्याची एवढी हिंमत ! आणि तुम्हीं हा विचार काय म्हणोन ध्यानांत आणिला ?" असें ऐकून मल्हारराव यास विषाद येऊन दातानें

४०. बिचोबा=लहान तंबू (याला काठी नसते.)

४१. "असा माझा कृतनिश्चय. अन्यथा होणें नाहीं." तुं० प्रत.

ओठ चावून[४२] बोलता जाहला कीं, "म्यां तुझें चित्त पाहिलें." असें म्हणोन तैसेंच जनकोजी शिंदे यांचे डेरियास येऊन खचीत जाबसाल केला कीं, "तुम्ही आम्हीं सर्वत्र फौजेंत राहून बायका, मुलें बुणगे झाडून माळव्यांत लावून द्यावीं. तुम्हीं आम्हीं सडे राहून दुराणी भंवताले गनिमी काव्यांनें[४३] राहून गिलचा हारीस आणावा." म्हणोन बोलून तेच समयीं बुणगियाचें कूच करविलें. शिंदे इमानाचे शाबूद, अशा आकांतांतही सावध; फौजेस आठवडा रोजमुरा दिला. बुणगियाचा बंदोबस्त करून वाटेस लाविले. केरोलीचे[४४] राजाचा व मल्हारराव यांचा स्नेह, म्हणून केरोलीचे घाटें बुणगे वाटेस लाविले. केरोली-वरून दत्ताजी शिंदे यांचे दहावे दिवशीं चमेलीस[४५] आले. होळकर यांचींही मुलें माणसें बरोबरच होतीं. कोशभराचे छाव्यानें गौतमाबाईचा तळ होता. तेथें क्रियाकर्म करून, कूच करून कुवारी नदीवर मुकाम केला. तेथें तेरा दिवस करून राहिले. तों रात्रौ भागीरथीबाई प्रसूत जाली. पुत्र जाहला[४६]. ते समयीं तोफा व बरकड यंत्रें सुटलीं. दत्ताजी शिंदे यांचें दुःख एकीकडे ठेवून बहूतच आनंद जाहाला, खुशाली केली. सूर्योदय जाल्यावर मल्हारराव यांची स्त्री गौतमाबाई व तिची सून, खंडेराव होळकर याची स्त्री, अहिल्याबाई डेरियास उभयतां आल्या. त्यांणींही खुशाली करून गजांवर शर्करा वांटल्या. मोठे संकटीं पांच दिवस मुकाम करून कूच केलें. ते माळवियांत येऊन पोंचले. शिंदे यांचे बुणगे व बायका उज्जनीस राहिल्या. मल्हारराव यांचीं मुलें माणसें, भार-घडी[४७] इंदुरास राहिलीं.

८७. इकडे मल्हारराव व जनकोजी शिंदे यांनीं कूच करून मारवाड प्रांतास गेले. तों दुराणीनें पाठलाग केला. गिलचे तिकडे येतां क्षणींच गनीम पाणिपत, कर्णोल इकडे गेले. दुराणी तिकडे जातांच गनीम दिल्लीस पोंचले[४८].

---

४२. 'चावून, कोपरानें लोड फाडिलें.' तुं० प्र०

४३. 'कावे देऊन' तुं० प्रत.

४४. केरौलीचें राज्य जयपूरच्या व शिंयांच्या मुलुखां दरम्यान चमेलीचे पश्चिमतीरीं आहे. 'केरोलीच्या टाचा' तुंगार प्रत.

४५. 'सचोलीस आले' तुं० प्रत. 'चोळीस पोंचले' क० प्रत.

४६. ह्या पुत्राच्या नांवाचा उल्लेख पुढील इतिहासांत कोठें केलेला आढळत नाहीं ह्यावरून तो अल्पायुषी झाला असें वाटतें.

४७. भारघडी = जड सामान. 'धार वाडी' हा हस्तदोष दिसतो. तुं० प्रत.

४८. "बादशाह वजीर जंगलांत होता तो सुरजमल जाट याचे आश्रयानें कुंभारीस राहिला." असें वाक्य येथें सां० व क० प्रतींत आहे.

अबदुल अली तेथें येतांच शिंदे, होळकर आगरियास आले. अविंध आगरियास येतांच हे जयनगर प्रांतांत गेले. तिकडे दुराणीची दौड पोंचतांच हे उदेपूरचे सुमारें गेले. तिकडे गिलचा गेला [तों] गनीम तिकडे नाहींत गनीम केवळ सडे नदार.[४९] याप्रकारें गनिमी कावे करून गिलचा हारीस आणावा म्हणोन उपाय केले. परंतु दुराणीची हिंमत यांजहून भारी. गनीमच पिटून दमास आणिले. या पिटविण्यांत गनीम अन्नाविणें मरावे, परंतु रान सुबत्ता.[५०] ओले हरबरे व गहूं व गाजरें पुष्कळ. या करितां अन्नाची परवा नव्हती.[५१] अवांतर मुलूख असता तर अन्नाविणें मरतीं. आणि दमही न पुरता. या प्रकारें फाल्गुन शुद्ध १४ स दिल्लीस येऊन गनीम पोंचले. पौर्णिमेचे दिवशीं थोर मजल करून शिकंदरा म्हणोन शहर मोठें अंतरवेद प्रांतीं होतें-तेथें यमुना उतरून पोंचले. शिकंदरियास खबरही नव्हती. एकाएकींच गनीम यांणीं जाऊन घाला घातला. शहर लुटून सत्यानास केला. ते दिवशीं लष्करांत भांडीं, वस्त्रें, मैदा, तांदूळ, साखर व तूप कोणी ते समयीं घेईनात असें जालें. लष्कर केवळ सडें, अधीक एक तांब्या घ्यावयास अनुकूल पडेना. तेथें थोर हांडे, बासनें[५२] कोण[५३] घेतो? असो. ते दिवशीं शिमगी पौर्णिमा होती. सर्वत्रांनीं

---

४९. 'न (ज?) सर' पाठांतर. नदारत (?) अगदीं ह्या अर्थी? जवळ कांहीं न ठेवणारे.

५०. 'राण (न) सुभिक्षेचें' 'राण' 'म्हराठे' असें पाठ तुं० प्रतीचे सर्वत्र आहेत.

५१. 'दुराणीनें [तमाम] मुलखांत झाडून नर्मदेपर्यंत ठाणीं घातलीं' असें वाक्य येथें सां० प्रतींत व क० प्रतींत आहे.

५२. बासनें = ताटें वगैरे भांडीं.

५३. एथपासून तों पुढें पृष्ठ १०१ टीप ७० घातली आहे तेथपर्यंत सातारा प्रतीचा पाठ निराळा आहे तो ऐणेंप्रमाणें:--

"असो, ते दिवशीं येथें मुकाम करून दिल्लीवर आले. दुसरे दिवशीं तेथून कूच करून दिल्लीवर आले. तों दुराणीची दौड यांजवर येण्याची बातमी येतांच दिल्लीवर अवसान न खातां तेथून मागती ग्वाल्हेर, कुंभेर, दीग, भरतपूर या रोखें चालिले. दुराणीची दौड यांचे पिछाडीस येत चालली पळतां पळतां खराब जाले. घोडे मनुष्य थकले. दर मुक्कामास शेंपन्नास घोडीं व उंटें थकून राहात. कोणी मनुष्य थकलें असतां दुराणीनें नेऊन शिरच्छेद करावा असा अनर्थ जाला. गनिमांचा हर्ष उडून गेला. बहुत फिकिरींत पडले. हमेषा हिंदुस्थानांत गनिमांनीं दिग्विजय करून संतोषांत कालहरण करून होते. प्रस्तुत काळीं काळ फिरला. यांची गत होऊन फार जेरीस आले. फौजेंत कोणावर होष राहिला नाहीं. शह सोडून दक्षिणेस येतां नये. शिंदे अभिमानास पोंचले. तेव्हां

(पुढें चालू, पृष्ठ ९८.)

ते दिवशीं अन्न-पाणी केलें. हुताशनीपूजन केलें. तों एकाएकींच सुरजमल्ल जाट याचा सांडणीस्वार धांवत शिंदे यांजकडे आला कीं, "दुराणीची फौज दिल्ली नजीक यमुना उतरून अंतरवेदप्रांतें तुम्हांवर आले. तुम्हीं देखत चिटी झुरती[५४] करणें" म्हणोन आली. जाटांनीं शिंदे यांचा उपकार[५५] ध्यानांत आणून सर्व प्रकारें वरचेवर साहित्य करीतच होते. जनकोजी शिंदे यांनीं चिटी घेऊन मल्हारराव यांजकडे आले. त्यांस वर्तमान सांगितलें. तेव्हां मल्हारराव जनकोजीस बोलले "या दिवसपर्यंत आम्ही तुमचे आवाईवरच

---

( पृष्ठ ९७ वरून पुढें चालू. )
होळकर यांसही शहास गुंतून पडणें प्राप्त जालें. एरवीं होळकर मतलबी, ते इतके खराब न होते. अशा संकटानें रोज कूच करून वीस पंचवीस कोसांचा चाटा पाडावा. पुनः दुराणीनें येऊन गांठावें असें होत चालिलें. देशीं श्रीमंतांस वर्तमान वरचेवर लिहून पाठवितच होते. परंतु इकडून कुमक गेली नाहीं, कारण श्रीमंतांचा व बंदेखान निजामअली यांचा बिघाड होऊन श्रीमंत फौजेसुद्धां त्याजवर चढाई करून गेले होते. यामुळें हिंदुस्थानांत फौज पाठवावयाची तर्तूद जाली नाहीं व श्रीमंतांचे चित्तांत शिंदे होळकर उभयतां त्या प्रांतीं आहेत ते मसलतीस धक्का बसूं देणार नाहींत. या खातरीवर [ श्रीमंत ] स्वस्थ होते. इकडे शिंदे व होळकर पराकाष्ठा करीतच होते. तत्रापी दुराणी गिलच्यांचा शह भारी. उपाय चालेना. गनिमांची फौज जेरीस आली. सन्मुख सामना होऊन लढाई करण्याची हिंमत गनिमांची राहिली नाहीं. गनिमांचे फौजेंत महागाई फार जाली. हिंदुस्थान प्रांतींचे राजेरजवाडे कोणी यांची कुमक करीनात. कुंभेरीकर जाठ मात्र गनिमांचें संधान राखून होता. परंतु त्यासही उघड कुमक करण्याची हिंमत नव्हती; गिलच्याची जरब होती. असे कांहीं दिवस लोटले; इतक्यांत गनिमांनीं आपणांत विचारणा केली कीं, "असे किती दिवस पळावें? एक वेळ साम्ना करून मारावें किंवा मरावें." ऐशी योजना करून फौजेंतील निवडक फौज वेगळी करून एके तोंडावर शिंदे व एकीकडे होळकर उभे राहिले. इतक्यांत दुराणीची दौड येऊन पोंचली. त्यांचा यांचा मुकाबला होऊन लढाई सुरू जाली. ते दिवशीं गनिमांनीं मोठी शिकस्त करून गिलच्यांचें तोंड मागें हटविलें. परंतु गिलच्यांची फौज भारी व अविचारी लोक; बेलाशक मारामार करून गनिमाचे फौजेंत मिसळले. शिंदे यांनीं जागा सोडली नाहीं. होळकर यांची फौज खानदेशी पाठ देऊन पळों लागली. गिलच्यांनीं मिसळोन जो सांपडेल त्याचा शिरच्छेद केला. असे करितां पंधरा कोस पाठलाग केला. मल्हारराव यांजकडील महिपतराव होता त्याचें शीर कापून नेलें" इत्यादि.

५४. झुरती=पलायन. 'देखतसांडणी पुढें कूच करणें' क० प्रत.

५५. उपकार = जयापा शिंद्यांचा. मागें कुंभेरीच्या वेढ्याची हकिकत पाहा.

पळत होतों. दुराणी केवळ आकाश फाँडून[५६] आला नाहीं. आम्ही उगेच व्यर्थ पळतों, अद्यापी दुराणीचें तोंड आम्हीं पाहिलें नाहीं. आमचें तोंड त्यांणीं पाहिलें नाहीं. कोठवर पळावें ?" या प्रकारची शिंदे यांचे फौजेची हेटाळणी[५७] भार्गाडे[५८] म्हणून होळकराचे लोक करीत होते. हें कानोपकानीं शिंदे यांनीं वर्तमान ऐकलें होतें. त्यांत होळकर यांनीं बळ बांधून गोष्टी सांगितल्यावर जनकोजी शिंदे यांनीं उत्तर केलें कीं, "सुभेदार, तुम्हीं एक वेळ युद्ध करणें. आम्हांस आज्ञा देणें. आम्ही तुमचे फौजेंत राहिल्यास उत्तम नाहीं." मल्हारराव यांनीं "तुम्हीं आम्हीं राहून युद्ध करावें," म्हणून बहुतसा दुराग्रह केला. जनकोजी शिंदे यांणीं साफ उत्तर केलें कीं, " सुभेदार, आमचे लोकांनीं धास्त खादली आहे. दुराणी आलियावर झाडास बांधले असतां झाडच घेऊन जातील. वरकड गोष्टी काय सांगावयाच्या आहेत ? आस्था या रितीची आहे. ही फौज तुमचे फौजेंत राहिलियास तुमचे फौजेस अपाय होईल. एक पळालियावर दुसरियाची हिंमत कमी येते. यास्तव आपण या स्थळीं राहून एक वेळ दुराणींचा मोकाँबला[५९] घ्यावा." असें बोलून शिंदे यांणीं नगारा केला आणि कूच केलें. तों मल्हारराव यांजकडील सर्वत्रांस हुटहूट होती कीं, " एक वेळ झुंज करावें." दुसरियाचीच आवई ऐकून कोठवर पळावें ? मग मल्हारराव यांणीं गंगोबा तात्यांस बोलावून आज्ञा केली कीं, " फौजेंत तुम्हीं राहून कोणी आल्यास युद्ध करणें. जखमी मूळ[६०] गेलें, आम्ही राहूं नये. बहूत युक्तीनें युद्ध करावें." म्हणोन चार अर्ध्वर्य[६१] होते त्यांस सांगितलें. आणि आपण निघोन जनकोजी शिंदे यांस गांठलें. तेवढी रात्र व दुसरे दिवशीं तिसरा प्रहरपर्यंत आगरियानजीक येऊन पोंचले. तों यमुनेस उतार सांपडेना. घोडे घालून ठाव पाहात तों ठाव लागेना. ते समयीं मल्हारराव बहूत घाबरा जाला. जाटाकडील वकील रूपराम कटारी यास बोलावून विचारणा केली कीं, "बाबा जखमी आहेत, यांस पार करून देणें." म्हणोन [६२]अंजीज होऊन गोष्ट सांगितली. कठीण समय वैरियास न यावा. मल्हारराव या प्रकारें बोलतांच रूपराम कटारी याणें मर्यादा खंडून जावसाल केला कीं,

---

५६. 'अस्मानाची गांड फाडून' पाठभेद.

५७. 'थट्टा' सां० प्रत.

५८. भागाडे = भागणारे, पळपुटे.

५९. मोकाबला, मुकाबला = गांठ.

६०. " मूल जखमी आहे. पळणेंमुळें जखमा शेजेस आल्या नाहींत. त्यापेक्षां तुम्हीं येथें राहून बहूत युक्तीनें युद्ध करावें." क० प्रत.

६१. अध्वर्य, अध्वर्यू=प्रमुख सरदार.

६२. आजीज = नम्र, दीन.

" डोखरे रोता है क्यौं ? तुम्हारा जान खालीं आम्हारा जान उपर[६३] है. फिकीर न करावी" असें निष्ठुर बोलतांच कठिण शब्द प्रसंगोपात्त साहाणें पडलें. डोखरे म्हणोन हिंदुस्थानी भाषेनें म्हातारा म्हणोन आहे. असें रूपराम कटारी यानें बोलून दोन नावा आणून दोन राहुटियांनजीक खुंटविल्या. निदान दोन खांसे यांस पार करून आगरियाचे किल्ल्यास पोंचते करीन म्हणोन गांठल्या[६४]. ते समयीं तमाम फौजेस गैरइतबार जाहाला. निदानीं हे आम्हांस मोकलून यमुना पार जातील म्हणून रात्रींच शोध करून तेथून दोन कोसांवर[६५] पेंढारी यांनीं छाती बराबर पाणियाचा उतार ठिकाणीं लाविलें[६६]. लष्करात खबर कळतांच कोणीं खावंदांची देखील वाट पाहिली नाहीं. रात्रींच फौज नदी उतरावयास गेली. मग मल्हारराव व जनकोजी शिंदेही त्याच घांटें[६७] नदी उतरून दिवस उगवावयास आगरियाचे सराईत जाऊन राहिले.

८८. इकडे मागें गंगाधरपंतीं शेटियाजी खराडे व संताजी वांबळे[६८] पांच हजार फौजेनिशीं पुढें बातमीस पाठविले.आपण जीनसामान बांधून सिद्ध होऊन बसले. तों उजेडावयास जालें. तोंडास तोंड दिसों लागलें ते समयीं गिलचे यांची फौज येऊन पोंचली. बातमीचे लोक सावधच होते. तयार होऊन घोडियांवर बसतात तों ते गिलचे सरमिसळ होऊन फौजेंत पोंचले. ते समयीं गंगाधरपंत कडनिकड करून पुढें सरले. आले होते त्यांजवर घोडे घालून एक वेळ घाव केला. सारून माघारे घातले. तों रोहिले व दुराणी दुसरे झाडून येऊन पोंचले. होळकर यांचे लोकांनीं क्षणभर बरीच मारामार केली. घायास हजार पांचशें मनुष्य ठार पडतांच मल्हारराव यांची फौज तडक आगरियाचे रोखें पळूं लागली. गनिमांहून गिलचियांचा कावा अधिकोत्तर. झुंजास इकडे आरंभ होतांच हजार फौजेनें पळावयाची वाट धरावी. गनीम पळूं लागतांच मागून डोचकीं कापीत पाठीस लागावें. [तेव्हां] पुढें वाट धरून उभे होते ते सहजच मध्यें शिरून मारामार करूं लागले. होळकरांच्या फौजेंत मोठासा प्रलय जाला. 'दे माय धरणी ठाय' तैशी गत जाली. कितीएक जिवाची आस्था धरून दांतीं तृण धरून उभे राहातात. दुराणी केवळ कठोर, निर्दय, "गौ घास

---

६३. 'डोखरे डरता है क्यों ! तुमचा जीव खालीं आमचा जीव वरता आहे.' तुं० प्रत. 'डोकरा ठाकूर रोता ये क्या' क० प्रत.

६४. 'गाडल्या' पाठांतर.

६५. 'मेंढवी पुढें दोन कोशावर' सां० प्रत.

६६. ठिकाणीं लाविला=ठायीं पाडला.

६७. 'उपन घाटें' क० प्रत.

६८. 'वांबळे' बद्दल सांगली प्रतींत व क० प्रतींत सर्वत्र 'सावळे' असें आहे.

खाती, बेजानें करो, अल्लाका डेरा दिखलाव" म्हणोन शिरच्छेद करावा. असें करीत पंधरा कोसपर्यंत पाठलाग केला. मल्हारराव यांजकडील महिपतराव म्हणोन दिवाण होता. तो घायाळ होतांच त्याचें शीर कापून नेलें. तैसेच शेटियाजी खराडा म्हणोन मातबर सरदार होता. त्यास जखमा भारी लागतांच घोडियाखालीं आला. तेसमयीं त्याचा शिवाजी खराडा केवळ सत्पुत्र होय. त्यानें पित्याकरितां जीवित्वास उदार होऊन, घोडियावरून उतरून, पित्याच्या डोक्यास मांडी देऊन बसला. तशांमध्यें दैवयोगेंकरून एक पठाण बहूत नेकजात थोर मनुष्य होता त्याची गांठ पडली. तो जवळ येऊन उभा राहिला. तों शेटियाजी खराडे यांस जीव होता. पठाण यास उत्तर केलें कीं, "तूं थोर, भला मनुष्य दिसतोस. मी शेटियाजी खराडा आहें. हा माझा पुत्र आहे. घरीं संपत्ती थोडी बहूत आहे. परंतू वंशीं संतान पुत्र एवढाच आहे. माझे तो आयुष्याची मर्यादा जाली. परंतु एवढा कृतोपकार करावा कीं, माझा पुत्र वांचवावा. निदान पार पाडून गनिमाचे फौजेंत पोंचवाल तर तुम्हांला लाख पन्नास हजार रुपये पावते होतील." हें ऐकून पठाणासही करुणा आली. त्याची अबदुल अली पावेतों भीड भारीच होती. त्याणीं आपले दाहा पठाण जवळ ठेविले कीं, हलाली-हरामीची गांठ पडली तर यास मारूं न द्यावें. ऐसें सांगून पुढें गेले. वीस कोसपर्यंत पाठलाग केला. पांच सात हजार मनुष्यांचीं शिरें कापून नेलीं. तेसमयीं खानदेशी लोक घोडियांस म्हणों लागले कीं, "माय जिभाउ हिसाय नय" असें म्हणतांच दुसरे म्हणूं लागले. "तिकडे गंगोबा तान्या धां ड ले. अजुनी काय पाहातां?" असें खानदेशी लोक बोलूं लागले. शिंदे यांचे फौजेस हांसत होते त्यांची मोडशी उतरली! समदुःखी

६९. "बी जा करो" असाही पाठ आहे.

७०. मागें पृष्ठ ९७ टीप ५३ पाहा.

७१. 'सटवाजी' पुणें व सां० प्रती.

७२. यापुढें क० प्रतींत वाक्यें आहेत तीं अशीं "खराडे याचे मनांत कीं आम्हांस मारील आणि पुत्रासही मारील आणि शीर घेऊन जाईल, हें भय हृदयीं. पठाण याणें पाहिलें कीं रणांत घायाळास मांडी देऊन कोण बसला आहे म्हणोन तेथें उभा राहिला."

७३. हलाली-हरामी=भला-बुरा, बरावाईट.

७४. माय जिभाऊ हिसाय नय = माझ्या बावा हिंसूं नको. 'माये निभाव सोनें न जालय धोडू' तु० प्रत.

७५. 'या धाडले' पु० प्रत. 'धाडले' म्ह० धाड पडली! 'पडल' क० प्रत.

जाले. असो. या प्रकारें मल्हारराव यांचे फौजेची पोळजत्रा[७६] जाली. त्यांत वांचले त्यांचा पळ दाहांनीं पांचांनीं आगरियास पोंचले. जे पुढें येत त्यांस असें वाटे कीं, आपणच जगून जालों. अवघे कत्तल जाले. इकडे शेटियाजी खराडा घायाळ होता त्याचा प्राण निघून गेला. पठाण यांणीं शिवाजी खराडे यांस आपले लष्करांत घेऊन गेले. दुराणींनीं थोर यश संपादून शिकंदरियावर मुकाम केला. इकडे मल्हारराव यांनीं आगरियाहून कूच करून जयनगराचे रोखें निघाले. गंगाधरतात्या[७७] यांचे वृषण घागरी येवढे जाले. घोडियावर बसतां नये असें जालें. कोठवर पळतील? गिलचियांनीं शिकंदरियाहून कूच करून आगरियानजिक यमुना उतरून मागती गनिमाचे पाठलागींस[७८] गेले.

८९. इकडे पूर्वील वर्तमान दत्ताजी शिंदे पडलियावर जनकोजी शिंदे यांचें पत्र नानासाहेब व भाऊसाहेब यांस पाठविलें होतें. त्यांत सविस्तर जाहालें वर्तमान साकल्यें लिहिलें होतें. तों भाऊसाहेब यांणीं तांदुळज्याच्या[७९] मुकामीं नबाब निजामअली यांशीं लढाई केली होती. तेथें तुंबळ युद्ध करून यश संपादिलें होतें कीं, असें गनिमांनीं कधीं मोंगलांशीं युद्ध करून मोंगल शिकस्त[८०] केला नव्हता. केवळ मोंगल जेरीस आणून त्याजपासून मुलूख व किल्ले देवगीर व अशेरी आणखी अवांतर किल्ल्यांच्या सनदा करून घेतल्या. ते समयीं भाऊसाहेब यांस परम आनंद होऊन गर्व बहूत जाला होता. यशाच्या फुंदांत[८१] निमग्न जाहाले होते. तों गर्वाचें घर खालीं. ईश्वरास साहेना.[८२] अशीं आनंदांत असतां अकस्मात शिंदे यांचीं पत्रें येऊन पोंचलीं.[८३] ते वेळेस पत्रें वाचून पाहिलीं, आणि भाऊसाहेब यांचा आनंद होता तो नाशातें पावून दुःखें निमग्न जाले. दुधाचे रांजणींत कांज्याचे शिंतोडे [पडतात] किंवा धनलोभियाचें धन जातें, अथवा राजा दशरथास कैकयेचे शब्दबाण, किंवा जानकी-हरणीं राजा राम-

---

७६. पोळजत्रा = वसु सोडलेल्या बलास मारितात त्याप्रमाणें कत्तल किंवा दुर्दशा (?)

७७. गंगाधरतात्या यांचे आंगांत अंतरगळाचा विकार होता. घोड्यावर बसोन पळतां पळतां तो रोग फार वाढला. सां० प्रत.

७८. ग्रांटडफ यांनीं शिंदे-होळकरांच्या संबंधानें या प्रसंगास अनुलक्षून दिलेली हकिकत निराळी आहे.

७९. तांदुळज्याच्या म्ह० उदगीरच्या.

८०. शिकस्त = पराभूत, जेरीस आणिलेला.

८१. "वाऊदांत निमग्न" तुं० प्रत. आनंदांत सां० प्रत. फुंद = घमेंड.

८२. ईश्वरास 'साहीनातशा' तुं० प्रत.

८३. "आलीं कीं दत्ताजी शिंदे लढाईंत पडले. ईश्वरें मोठा गहजब आम्हांवर केला." क० प्रत.

चंद्र, किंवा रुक्मिणी-सैंवराचे समयीं शिशुपाळ राजास जैसी गत अपमान जाला, तैशी गत भाऊसाहेब यांची जाली. विजय जालियाचे अति उत्कर्षें समाधान मानून होते, तों एकाएकींच दत्ताजी शिंदे यांजकडील पराजयाचें वर्तमान ऐकून, पत्र वाचून पाहून, आपले जागां मुहूर्त मात्र दंग होऊन बैसले. जैसे टांकियांनीं पाषाण ल व वि जे,[८५] कीं निर्जीव काष्टांचे* पुतळे, तैसे देव-भाव-तटस्थता जाली. तेसमयीं जवळ बळवंतराव गणपत व गोविंदराव शिवराम व गोपाळराव गोविंद[८६] व आणखी जिव्हाळियाचे दाहा पांच मुत्सद्दी बसले होते. त्यांत बळवंतराव यांनीं जाबसाल केला कीं, "भाऊसाहेब, गोमीसैं पाय बहूत, एक पाय मोडला तर उणें पडत नाहीं." तों आधींच त्यांचे अंगीं ताम्र-पराभवाचें वारें होतें. त्या फुंदांतेंच बळवंतराव यांनीं अग्नीवर घृत टाकावें तैसा चढाचा जावसाल केला कीं, "दुराणी म्हणजे कोण जिन्नस? साहेबीं खांसा स्वारी हिंदुस्थानांत करावी. शिंदे होळकर यांणीं त्या रानांतील बहूत दिवस सौख्य अनुभविलें आहे. एकमेकांत कलह करून स्वामि-कार्याची नुकसानी केली. आतां ऐशीच फौज घेऊन हिंदुस्थान काबीज करावें. दुराणी बहूतकरून त्या रानांत येतो, त्याची एक वेळ खोड मोडून द्यावी, कीं पुन्हां अटक उतरून येऊं न पावे." असें बोलतांच तेक्षणीं भाऊसाहेब यांणीं श्मश्रू पिळून अति उत्कर्षें बोलते जाले कीं, "आम्ही हमेशा देशीं मोगलाशीं लढाया करितों, परंतु नर्मदापार जाऊन अद्याप कोठें दिग्विजय केला नाहीं. एक वेळ हिंदुस्थानांत जाऊन अबदुल अलीचें पारपत्य करावें, म्हणजे शिंदे होळकर यांचा गर्व-परिहार होईल, आणि आमचे पुरुषार्थाचें सार्थक [होईल.] नाहीं तर अपकीर्ती लौकिकांत होईल कीं, ज्याचा सेवक गांजला त्याचे जालेपणाची निर्फळता. यास्तव लक्ष मनसुबे एकीकडे ठेवून हिंदुस्थानांत मसलतीस जावें."

---

८४. 'रुक्मियाचा अपमान जाला तैशी' पु० प्रत.

८५. "टाकियांनीं पाषाण जेवविले" पु० प्रत. 'लवविजे तुं० प्रत.

*काष्टांगात्रे, पु० प्रत.

८६. मेहेंदळे, खाजगीवाले व पटवर्धन. यांतून बळवंतराव मेहेंदळे यांणीं कर्नाटकांत कडापा वगैरे ठिकाणीं मोठा पराक्रम केला होता. हे बळवंतराव प्रसिद्ध आपाबळवंत यांचे तीर्थरूप. गोपाळ गोविंद यांणींही कर्नाटकांत मोठमोठीं कामें बजाविलीं होतीं.

८७. गोम=घोण. 'इंगळीस' तुं० प्रत.

८८. "मोगलपराभवाचें" पाठभेद.

८९. फुंद (फुगलेला)=वारें, घमेंड. वर टीप ८१ पाहा.

९०. श्मश्रू=मिशा. 'मिशांस पीळ घालून' क० प्रत.

९१. 'भलेपणाची' पाठभेद.

९०. ऐसा चित्तांत निश्चय करून राजश्री नानासाहेब यांजकडे[९२] गेले. तों तेही शिंदे यांचें वर्तमान ऐकून प्रलापांतच[९३] होते. तों भाऊसाहेबांनीं जाऊन विनंती केली कीं, " हिंदुस्थानांत वर्तमान तो या रितीनें जाहालें. अवघे हिंदुस्थान एकत्र जाहालें आहे. पाण्या आधीं वळण बांधितां उत्तम. नाहींतर शेणामेणाचे लोखंडाचे जालियावर पुढें भारी पडेल. यास्तव राजश्री दादासाहेब यांची रवानगी साठ हजार फौजेनिशीं करावी[९४] ते पुढें जातील. जड भारी सारखें आणखी साहित्य करावयास येईल. " असें ऐकून नानासाहेबांनीं उत्तर केलें कीं, " तिघां खांशियांनीं ठिकाणीं राहूनच झाडून देशाच्या फौजा पाठवून द्याव्या, परंतु खांसा स्वारी गेलिया आब तुटेल[९५]. " असें बोलिल्यावर भाऊसाहेब [यांनीं] मर्यादा सांडून उत्तर केलें कीं, " नानासाहेब, एवढें कर्म एक कीर्तीसाठीं करावें. दुराणीचा शह भारी. फौजेनें कार्य होणार नाहीं. या कार्यास खांसा स्वारी कोणी तरी गेली पाहिजे. मग दैवीं असेल तसें घडेल. आ शा न शीं[९६] [?] मृत्यू स्वदेशीं परदेशीं सुटत नाहीं. अथवा मेलें तर कोणी वाळवून ठेवणार नाहीं." असें वर्म–भेदक[९७] उत्तर येतांच नानासाहेब आपले जागीं कुंठित[९८] जाले. चित्तांत पुरता भाव समजला कीं, " भाऊसाहेब दुराग्रहास पडले. तेव्हां कोणाचें ऐकत नाहींत." म्हणून क्षणभर भाऊंस शांत करून सांगितलें कीं " दादासाहेब यांची रवानगी करितों, " म्हणून सांगून भाऊंस लावून दिलें. जवळ स्त्री गोपिकाबाई होती तीस बोलिले कीं, " भाऊसाहेब यांचा दुराग्रह कीं दुराणीचे पारिपत्यास दादांस रवाना करावें. त्यांस अबदुल अली व नजीबखान रोहिला व सुजाउद्दौला व अहमदखान लंगडा पठाण व माधवसिंग जयनगरकर व बिजेसिंग मारवाडी व दुंदेखान रोहिला समग्र हिंदुस्थान एकत्र जालें आहे. एवढी शिंद्यांची लढती फौज तिची कोण गत जाली ! आपले हातें मुलास वोपून द्यावें असें जालें आहे. " असें ऐकून

---

९२. नाना, भाऊ वगैरे सर्व या वेळीं मांजरा नदीच्या तीरीं आंबे-पडदुरास होते.

९३. प्रलाप=विलाप. मागें पृष्ठ ९३ टीप २९ व पृष्ठ ९४ टीप ३९ पाहा. ' दुःखसागरांत ' क० प्रत.

९४. भाऊंनीं स्वतः जाण्याचा बेत केला असतां दादासाहेबांस पाठवावें असें आतां कां सुचवितात ?

९५. "फौज त्यांचे पुस्त पन्हास पाठवून यावी हें उत्तम, खांसा स्वारी गेली असतां बोज राहणार नाहीं. भ्रम जाईल कीं, खांसा आला. यश किंवा अपेश कोणाचे स्वाधीन नाहीं. यास्तव याप्रमाणें करावें " अशीं वाक्यें कल्याण प्रत वरील वाक्याऐवजीं देते.

९६. ' अशानिशीं ' पु० प्रत.

९७. वर्मभेदक=मर्मभेदक.

९८. ' खिन्न ' क० प्र.

गोपिकाबाईनीं उत्तर केलें कीं, "दादासाहेब यांस रवाना करावें यांत हित आहे. जें दैवीं असेल तें होईल." असें ऐकतांच नानासाहेब यांस विषाद आला आणि म्हणाले कीं, "स्त्रीबुद्धिः प्रलयं गता" * * * * * * * स्त्रीजातीसें मनसबा पुसावा याहून अश्लाघ्यता दुसरी नाहीं." म्हणोन बोलून निवांत राहिले.

९१. उपरांतिक भाऊसाहेब व नानासाहेब एकत्र होऊन, दादासाहेबांस पाठवावें असा भाऊंचा दुराग्रह पाहून दादासाहेब यांस बोलिले कीं, "हिंदुस्थानांत शिंदे यांची फौज बुडाली. त्यास तुम्हीं फौज घेऊन हिंदुस्थानांत जावें. ताम्रै पराभवातें पाववावे." असें ऐकून दादासाहेब यांनीं उत्तर केलें कीं, "हिंदुस्थानांत जावयाची मजला आज्ञा कराल तरि ऐशीं हजार फौजेस भरनालबंदी देऊन समागमें क्रोड रुपये खजिना द्यावा, म्हणजे आम्ही हिंदुस्थानांत जातों. मग दुराणी व आम्ही पाहून घेऊं. हें तुम्हांस अनुकूल पडत नसल्यास आम्हांस जाणें साफ पुरवत नाहीं." म्हणोन बोलून उठोन गेले. अशी एक दोन दिवस मनसब्याची गडबड जाली. तों रघुनाथराव यांचा पुरता दुराग्रहसा दिसोन आला.

९२. मग राजश्री भाऊसाहेब व बळवंतराव गणपत एकांतीं बैसून मनसबा केला कीं, "दादासाहेब समागमें खजिना मागतात. दुसरें, नानासाहेबांचें चित्तांत निखालसतेनें दादासाहेब यांस पाठवावें असें नाहीं. जुलमांत नानासाहेब आहेत. त्यांत रडत-राऊत घोडियावर बसविलिया पुढें पराजय कशास इच्छावा?" नानासाहेब व गोपिकाबाई यांचें बोलणें एकांतीं जालें तेंही भाऊंस कानोपकानीं श्रुत जालेंच होतें. भाऊसाहेब यांचें वचन ऐकून बळवंतराव गणपत यांनीं हित-शत्रुपणें निरोत्तर केलें कीं, "बाहेर पैसा मिळवून घरास खजिना आणावा, तो घरचा खजिना नेलियावर बाहेर यांणीं खजिना काय

---

९१. 'आत्मबुद्धिहितार्थाय' इ० सबंध श्लोक तुं० प्रत देते.

१. 'स्त्रीजातीस मनसुबा [पुसावा] याहून दुसरी लाज नाहीं' क० प्रत

२. वर पृष्ठ १०४ टीप ९७ पाहा.

३. ताम्र=मुसलमान. 'ताम्रमुखी' क० प्रत.

४. या वाक्यांऐवजीं क० प्रत म्हणते तें असें: "त्यापेक्षां निखालस त्यांस पाठवूं नये. नानासाहेब जावें न जावें या जुलमांत. त्यापेक्षां रडत राऊत घोड्यावर बसविल्यास तो तरवार मारून यश संपादून काय येणार आहे, हें कळतच आहे. जय कशास इच्छावा." पराजय कशास इच्छावा म्हणजे तो होणारच.

मिळवावा ? आयत्या पिठावर रेघा कोणीही ओढील. एवंच दादासाहेब खातर-जमेशीं जात नाहींत." असें बळवंतराव यांचें बोलणें ऐकून भाऊसाहेब बोलिले कीं, "आतां अवघा मनसबा एकीकडे ठेवून आम्हींच जावयाचें करावें. नानासाहेब यांचे दादासाहेब सख्खे भाऊ. आम्ही चुलत भाऊ. त्यांचे आमचें ममतेस महत अंतर." पुढील भवितव्य विपर्यास. यास्तव अशी बुद्धि निर्माण जाली. धैर्य-समुद्र डहुळला. भाऊसाहेबीं आपणच जावें असा पुरतेपणें निश्चय केला.

९३. मग भाऊसाहेब नानासाहेब यांजकडे जाऊन बोलते जाले कीं, "दादासाहेब यांस जावयास अनुकूल पडत नाहीं. खजिना पाहिजे. आतां आम्हांस जावयाची आज्ञा करावी. मीच हिंदुस्थानांत जातों." म्हणोन निक्षून जाबसाल केला. नानासाहेब यांनीं भाऊंचें वचन ऐकून आपले जागीं निवांत राहिले. मुहूर्त-मात्र उगेच राहून भाऊंस बोलिले कीं, "भाऊसाहेब, हें चित्तांत काय आणिलें ? आपले जागां राम-लक्ष्मणाची जोडी म्हणवितों. भाऊ ! तुम्ही आजपर्यंत जितकें पाणी पाजिलें तितकेंच प्यालों. तुमचें कधीं शब्द-उल्लंघन केलें नाहीं. आम्हांस मोकलून जाऊं म्हणतां, तेव्हां आम्हांस दशरथाची गत आली. तुमचा वियोगानळ कांहीं आम्हांस साहोणार नाहीं." असें बोलून डोळियांस पाणी आणिलें. तों ज्या ज्या काळीं जें होणें तें चुकत नाहीं. बहूत बहूत नानासाहेबांनीं मायाजाळांत गोंविलें. परंतु भाऊंचे चित्तांत उदासीनता भरली. तें चोखोळेनासें जाहालें. पुरता जावयाचा दृढ निश्चय जाहाला.

९४. [तेव्हां] नानासाहेब गोपिकाबाई यांजकडे जाऊन बोलिले कीं, "भाऊंनीं जावयाचें चित्तांत निश्चयरूप आणिलें. बहूत ग्लांती केली. परंतु निष्ठुरच बोलतात. तस्मात तुम्हांस आम्हीं सहजीं उत्तर केलें तें त्यांचे कानावर

---

५-५. या वाक्याबद्दल क० प्रतींत "आमचे मनांत असें आणि त्यांचे मनांत तसें यासि महदंतर आहे. भव्यतव्य असेल तसें घडो. त्यांस किलाफबुद्धी निर्माण जाहाली" अशीं वाक्यें आहेत.

६. भवितव्य = पुढें खचित घडून येणारी.

७. विपर्यास = विपरीत गोष्ट.

८. डहुळला = हेलावला, उचंबळला.

९. "तुमचा कधीं शब्द उल्लंघिला नाहीं." तुं० प्रत.

१०. "तुमचे वियोगानें काळ कांहीं आम्हांस साहाणार नाहीं." व "सुचणार नाहीं." पाठांतरें.

११. 'मायाजाळ टाकून गोविलें' तुं० प्रत.

१२. चोखाळणें=स्वच्छ, साफ होणें. 'व चित्त स्वच्छ होईना' सां० प्रत. 'स्थिर न होई' क० प्रत.

१३. 'ग्लानी' पु० प्रत.

गेलें कीं काय ? हें न कळे. आमचा सांगावयाचा यत्न राहिलों[१४]. तुम्हीं त्यांस बोलावून कळेल त्या रितीनें शांतवन करावें." म्हणून गोपिकाबाईस सूचना केली. त्यावर बाईनीं **भाऊंस** बोलावून आणिलें. बोलती जाहली कीं, "साहेब,आम्ही तुमचे जिवावर सुखरूप आहों. आणि तुम्हीं मनांत हिंदुस्थानांत जावयाचें काम म्हणोन आणिलें ? आपण शाबूद तों दुनिया शाबूद. तुम्हांस जाणें तरि आमचें देहसार्थक[१५] करून जावें." असें ऐकतांच **भाऊसाहेब** यांस सतीची गत जाली. सतीनें जावयास निश्चय केलियावर मग पुढें मुलें बाळें संपत्ती आणिली तरी वमनप्राय होतें, तैसें जालें. उत्तर केलें कीं, "बाई, तुम्ही वं **नानासाहेब** व **दादासाहेब** शाबूद असलिया आम्हांसारिखे शतशा कारभारी होतील. आजिपर्यंत आम्ही हिंदुस्थानांत न गेलों. बरें वाईट जें करणें तें [येथें] केलें. आतां एक वेळ आम्ही हिंदुस्थानांत जाऊन येतों. तुम्ही लक्ष गोष्टी सांगितल्या तरी आम्हांस जावयाचें. राहावयास अनुकूल पडत नाहीं." असें ऐकतांच बाईस असें जालें कीं, काळजीं घाव पडतो, तैसें जालें. आणि क्षणभर आक्रोश[१६] करून आंगावरील शालजोडी होती ती पुढें आडवी टाकिली आणि उभी राहिली कीं, "**भाऊ**, आम्हांस वोलांडून न जावें." असें म्हणतांच **भाऊंनीं** विषादास येऊन निरोत्तर केलें कीं, "तुम्ही जातीच्या स्त्रिया, तुम्हांस हा मनसबा कशास पाहिजे ? तुम्हीं आपले घरांमील कामकाज करून असावें." म्हणून अव्हेर करून रागेंरागें उठोन गेले. तेव्हां **गोपिकाबाई** यांस पुतें कळोन आलें कीं, **भाऊ दिल्लीस** निश्चयें जातात[१७]. मग **गोपिकाबाईनीं नानासाहेबांस** सांगितलें कीं, "**भाऊ** राहात नाहींत. जावयाचा निश्चय केला. आतां मिथ्या[१८] वाचा शिणविणियांत सार्थक नाहीं. आतां एक मात्र मनसबा आहे कीं, समागमें **सौ. पार्वतीबाईस** घेऊन जाणार, तेव्हां मागें त्यांचें काय आहे ? दिल्लीस गेले आणि तिकडेच राहिले तर मग यत्न नाहीं. यास्तव समागमें पायगुंता **विश्वास-राव** यास द्यावें." असा दोघांचा संकेत जाला. एवंच **भाऊसाहेब** जावयाचा पुर्ता एकांतीं घरांतच मनसबा ठरला. तों पावेतों बाहेर कोणास कळों[१९] दिला नाहीं.

---

१४. राहिला = थांबला, खुंटला. 'राहिला नाहीं' पुणें प्रत.

१५. 'आमची विल्हेवाट करून मग जावें.' क० प्रत.

१६. 'क्रोध येऊन' क० प्रत.

१७. येथें क० प्रतींत "ब्रह्मदेवही आला तरी ऐकत नाहींत" असें अधिक वाक्य आहे.

१८. मिथ्या=उगीच, व्यर्थ.

१९. ह्या सर्व घरगुती एकांतांतील गोष्टी ह्या दिल्लीस राहणाऱ्या बखर-लेखकांस कशा कळल्या कोण जाणे !

९५. मग फाल्गून मास आला[२०] होता, म्हणोन तमाम मराठे, ब्राह्मण व अविंधी सरदार लहान थोर व सर्व मुत्सद्दी रंग खेळावयास आणिले. तमाम डेरे, छबिने देऊन जागोजाग आरास केली. रमणीक बैठक करून रंग खेळावयास आरंभ केला. नृत्यांगना नृत्य गाणें व रंग [ या ] दोहींस गांठ पडली. राग रंग एकत्र जाले. पण्यांगनांनीं केवळ अप्सरांप्रमाणें गायनकला मांडिली. सायंकाळ मर्यादा जो रंग होणें तो जाला. उपरांतिक हिंदुस्थानांतील वर्तमान श्रुत केलें आणि भाऊंनीं हिंदुस्थानचे मोहिमेस जाण्याचा आपला निश्चय सांगितला.

९६. भाऊसाहेबीं मुहूर्त निकडीचे पाहिले, तों जवळ मुहूर्त निघेनासा जाला. मग शिवालिखिताचे मुहूर्तें रात्रीं[२१] बाहेर निघाले. समागमें सरदार दमाजी गायकवाड व यशवंतराव पवार व समशेर बहादर व इभ्रामखान गाडदी व हरी दामोदर, सोनजी भापकर व राणोजी शिंदे यांचे राखेचे पुत्र तुकोजी शिंदे व महादजी[२२] शिंदे, आणखी लहान थोर सरदार हजेरीची पन्नास[२३] हजार फौज नेमिली. भाऊसाहेबीं सरदार लोकांचे चित्तांत किलाफ[२४] होते त्यांचे संशय दूर केले. दमाजी गायकवाड डावे हातें श्रीमंतांस मुजरा करीत[२५] होते, जाते समयीं त्यांचे गळां पडोन त्यांस वचन दिलें कीं, "हिंदुस्थानांतून फिरोन आलियावर तुमची गुजराथ संपूर्ण तुमचे स्वाधीन करितों[२६]." म्हणून त्यांचे

---

२०. 'तो माघमास जाऊन फाल्गून मास आला. हुताशनी करून रंगपंचमीचे दिवशीं ' सां० व क० प्रती.

२१. 'मध्यरात्रीं' तुं० प्रत. 'तेच रात्रीं' क० प्रत. चैत्र शु॥ १ ता. १८ मार्च १७६०.

२२. 'विठोजी शिंदे' पुणें, क० सां० प्रती. हें चुकीचें असावें. महादजीचें नांव मागें एकदां मारवाडच्या हकिकींत टॉड यांच्या ग्रंथांत आलें आहे. ( पृष्ठ ८ टीप ३८) नंतर शिंदखेडच्या लढाईंत व दिल्ली-जवळ झालेल्या युद्धांत त्यानें मोठा पराक्रम केला असें ग्रां० डफ म्हणतात. वरील पाठ तुं० प्रतीचा होय.

२३. याबद्दल क० प्रतींत असें वाक्य आहे. "शिवाय हुजुरातीची पन्नास हजार फौज नेमिली."

२४. किलाफ=किंतु, वांकडें, वैरभाव. ' किलाफ होता तो त्यांचा दूर संशय करून ' पु० प्रत.

२५. ' डावे हातें ' इ०—शाहू मरण पावल्यावर पेशव्यांस हुसकावून लावण्याची ताराबाईनें खटपट चालविली होती. तींत दमाजी गायकवाड यानें तिला मदत केली. पुढें नानासाहेबांनीं त्याशीं सलुखाचें बोलणें लावून आपले लष्करांत नजरबंदींत ठेविलें, याकरितां दमाजी पेशव्यांस डावे हातानें रामराम करूं लागला होता.

२६. याबद्दल "तुमचे मनू काय आहेत ते पूर्ण करून देऊं " क० प्रत.

समाधान करून त्यांस उजवे हातें रामराम करावयास लाविलें. तैसाच यशवंतराव पवार यांचाही गौरव केला. आणि कित्येक लहान थोर सरदार यांचे वृत्ति-उच्छेद केले होते, कोणाचे सरंजाम जहागीर कारणामुळें जप्त[२७] केल्या होत्या, त्यांसही वचन दिलें कीं, "तेथून आलियावर तुमचे तुम्हांस मोकळ्या करून देऊं." म्हणून समाधान केलें. इभ्रामखान गाडदी यास समागमें घेतलें. ते वेळेस इभ्रामखान गाडदी यानें भाऊसाहेबांस जाबसाल केला कीं, "तुम्ही गनीमी लोक, दहा वेळ पळाल व दहा वेळ उभे राहील[२८]. आम्ही गाडदी लोक केवळ पायउतारे, आम्हांस पळावयास पाय नाहींत, आणि गांठ तो दुराणी-रोहिलियांची पडणार, त्याची आज्ञा काय?" ते समयीं भाऊसाहेब यांनीं इमान दिलें कीं, "निदानप्रसंग पडला तरी तुम्हांस सोडून निघणार नाहीं. तुम्ही गाडून उभे राहाल तेथें मीही उभा राहीन. यास अंतर करणार नाहीं." म्हणोन त्यास बेल-भंडार दिला. त्याजपासून सानकरोटी आपण घेतली. आणि कूच केलें. ते समयीं गोपिकाबाईंनीं बळें करून विश्वासराव यास त्यांचे हातीं दिलें. त्याजला समागमें घेऊन निघोन चालिले. ते समयीं नानासाहेब व गोपिकाबाईस असें जालें कीं[२९] बाळ आजच आपलें आपणांस अंतरलें. सर्वत्रांचें मायाजाळ सारखेंच. पुढें होणार भवितव्य विचित्र होतें. यास्तव तमाम लष्करांत निरवानिरव करून, एकमेकांचे गळां पडोन निघाले. या प्रकारें भाऊसाहेब चांगली फौज, चांगले हत्ती, सरस घोडीं, उंच वस्त्रें, व उष्टरखाना व तोफखाना, कांहीं खजिना घेऊन, कूच करून गेले. इकडे नानासाहेब यांनीं तेथून[३०] कूच करून पुणियास जाते जाले.

९७. भाऊसाहेब मजल दर मजल बऱ्हाणपुरास आले. अशेरी किल्ल्यास पांच हजार फौज भोंवताली टाकून आपण पुढें विंध्याद्रीपर्वत वोलांडून नर्मदापार जाले. विंध्याद्रीसच सातपुडा प्राकृत अभिधान आहे, संपूर्ण देश खानदेश, बागलाण, नेमाड ओलांडून माळवियाच्या घाटास गेले. घाट वोडसियाचे नजीक चढून[३१] माळवे प्रांतीं गेले. सुरंज-भेलशिया नजीक मुकाम केला. तेथून जनकोजी शिंदे

---

२७. 'जप्त' ऐवजीं 'खालसा' 'खालीं' तुं० प्र० व पु० प्रत.

२८. "दाखवाल एक व कराल एक, त्यास असें होऊं नये. बरगे लोकांची चाल लढण्यास तोंड यावें आणि कमजोर जाहाला म्हणजे पळून जावें ही रीत आहे." क० प्रत.

२९. "भाऊसाहेब व मूल" क० प्रत.

३०. तेथून म्ह० आंबेपडदुराहून.

३१. "बोडशियाचे नजीक मुकाम-केला. तेथून घाट चढून" तुं० प्रत.

व मल्हारराव यांस पत्र लिहिलें कीं, "आम्ही मजल दर मजल यावें किंवा दमें स्रात यावें ?" म्हणोन पत्रें जासूद याजबरोबर पाठविलीं. मल्हारराव यांणीं पत्र पाहून त्यांस थोर विषाद आला कीं, "हे थोर खावंद असतां यांणीं ठिकाणीं[३२] राहूनच फौजेचा पुरावा करावयाचा होता. त्यास भाऊसाहेब कर्ते मनुष्य ते निघोन आले. तेव्हां साऱ्या गोष्टी यांतच आटपल्या. पुढें नानासाहेब यांस कांहीं उपराळा[३३] करावयाची हिंमत होणार नाहीं. असो. *आले त्यास उपाय नाहीं." म्हणोन पत्राचें उत्तर लिहिलें[३४] कीं, "आधींच न यावें. ज्यांनीं मनसबा दिला ते थोर आहेत. रोहिला व सुजाउद्दौला व अहमदखान लंगडा व दुराणी कांहीं सामान्य नाहींत. यास्तव मोहरा इरेसें[३५] पाडावा असा अर्थ नाहीं. याजकरितां साहेबीं माळवे प्रांतीं राहून छावणी करावी. पुढें फौज मात्र सडी रवाना करावी. आम्ही साहेबांचे दमावरिच कार्य उरकोन घेतों." म्हणोन पत्रें आलीं. तीं भाऊसाहेब यांनीं वाचून पाहिलीं. आपले लहान थोर मुत्सद्दी बोलावून त्यांस विचार पुसला. तेसमयीं बळवंतराव गणपत यांणीं जाबसाल केला कीं, "भाऊसाहेब, शिंदे होळकर यांणीं या रानांत बहूत दिवस क्रमून[३६] राजे जाहाले[३७]. त्यास आम्ही आलियाचें सुख काय आहे ? आम्हास दबवणी मात्र देतात. भाऊसाहेब, आपली सलाबत[३८] कांहीं सामान्य नाहीं. आपला पुण्यप्रताप या प्रकारचा आहे कीं, गिलचा स्वामींनीं कानीं मात्र ऐकिले, परंतु दृष्टीस पडणार नाहींत. खातरजमा असों द्यावी[३९], निश्चयेंच कूच करून दिल्लीस पोंचावें."

९८. इकडे दुराणी गनिमांचे पाठी लागून हैराण जाले. गनीम[४०] यांनीं कावे देत देत अंतरवेद प्रांतीं गेले. तों दुराणी अंतरवेद प्रांतीं गेला. मागती

---

३२. 'बसले ठिकाणीं.' क० प्रत.

३३. उपराळा=पाठपुरावा, मदत.

* 'ते खावंदच आले.' क० प्रत.

३४. या वाक्याबद्दल क० प्र० म्हणते, "हा संदर्भ पत्रीं सुचवोन पत्राचीं उत्तरें पाठविलीं कीं येण्याचा बेत करावयाचा नव्हता. पुढें प्रकर्णे बहूत आहेत."

३५. मागें पृष्ठ १ टीप १ पाहा. इरेसें पाडणें=अब्रूखातर कोणतेंही कार्य करावयास लावणें, ईर्ष्येस घालणें.

३६. 'रमोन' क० प्रत.

३७. 'शिंदे होळकर यांणीं या रानांत बहूत दिवस केळें खादलींत, केळीं कोंकणी शब्द आहे. आपणच या रानांतील राजे जाहाले.' तुं० प्रत.

३८. सलाबत = धाक, दरारा.

३९. "हा खातरजमा असों द्यावा." असा पुल्लिंगी प्रयोग तुं० प्रत करिते.

४०. 'गनीम यांणीं धुरोळा दृष्टीस पडों देईनासें जाहाले. कावे देत देत आणखी गनीम अंतर्वेदप्रांतीं गेले.' तुं० प्रत.

गनीम यमुना उतरून आलीकडे आले. दुराणी नदीपारच राहिला. तों ज्येष्ठ मासही समीप पूर्ण होत आला. यमुनेस पाणी आलें. मग सहजच दुराणी काळजळेश्वराजवळ[४१] राहिले. इकडे मल्हारराव व जनकोजी शिंदे केरोलीचे सुमारें चमेलीपार राहिले.

९९. इकडे भाऊसाहेब खंडण्या करीत करीत नरवर वोलांडून ग्वालेरीचे सुमारें आले. तेथून ढउळपूर चमेलीचा घाट धाकट्या तीन मजला राहिला. निदान कुवारी नदीवर मुकाम केला. तों तेथून मागती शिंदे होळकर यांस पत्रें लिहिलीं कीं, “ढउळपूरचे घाटें उतरावें किंवा अचरीकडून[४२] यावें, याचा निश्चय करून पाठवणें.” म्हणोन पत्रें मल्हारराव यांस हलकारे यांणीं दिलीं. त्यांणीं पत्रें वाचून पाहिलीं. पत्रांतील गर्भभाव ध्यानांत आणिला. तों भाऊसाहेब क्षेपनिक्षेपें[४३] आले. हें ऐकून मल्हारराव याचे तळवियाची आग मस्तकास जाऊन भाऊसाहेब यांस पत्र लिहिलें कीं, “तुम्हांस माळवे प्रांतीं छावणीस राहावें म्हणून लिहिलें असतां येथपावेतों यावयास कारण काय? तस्मात सर्व भोंवताले नूतन-वयें[४४] मिळाले ते तुमचे हिताचे, आणि आम्ही वृद्ध, आमची साठीची बुद्धी नाटी जाली[४५]. आम्ही आजिपर्यंत जितकें कर्म केलें तितकें साहेबांचें अनहित केलें. असो. आतां सर्व मिळून हितें[४६] करावें.” याप्रमाणें मल्हारराव यांणीं पत्रें भाऊसाहेब यांस लिहून पाठविलीं. पुन्हा पत्रांत लिहिलें कीं, “जें जालें तें उत्तमच जालें. अतःपर तरी चमेलीपार ग्वालेरीचे नजीक छावणी करावी.” म्हणोन पत्रें पाठविलीं. पत्रें भाऊसाहेब यांणीं पाहून आपले जागां चार कारभारी यांस बोलावून आणून त्यांस विचार पुसला. मागती बळवंतराव यांणीं मसलत दिली कीं, “मजल दरमजल दिल्लीस जाऊन पोंचावें.” असें ऐकून विठ्ठलराव शिवदेव[४७] यांणीं जाबसाल केला कीं, “समागमें मुलेंमाणसें आहेत. तुमचें निर्भय राज्य म्हणून तमाम कुटुंबें समागमें घेतलीं, व जनार्दनपंत फडणीस[४८] यांची स्त्री काशीस जावयाचे उद्देशें आली आहे. तैसेच

४१. ‘कालजैश्वरावर’ तुं० प्रत. ‘कौळजळेश्वराजवळ’ क० प्रत.

४२. ‘अटेरी’ तुं० प्रत.

४३. क्षेपनिक्षेप=टाकोटाक.

४४. “नूतन नवे मिळाले” सातारा प्रत.

४५. “साठी बुद्धी न्हाटी जाली” तुं० प्रत.

४६. ‘स्वहित’ पाठांतर.

४७. ‘विठ्ठलराव शिवदेव’ हे शब्द तुं० व सातारा प्रतींत नाहींत.

४८. ‘नानाफडणीस यांची मातोश्री’ तुं० प्रत.

पांयगुडे यांचें कुटुंब व आणखी कितीएक लहान थोर सरदार यांचीं कुटुंबें समागमें, आणि शत्रूची प्रबलता भारी, यास्तव मल्हारराव यांणीं लिहिलें तें मान्य करून या स्थळीं छावणी करून राहावें हें चांगलें." असें ऐकून सर्वत्र मिळोन, त्यांणीं हास्य करून विनोदें जाबसाल उडवून दिला कीं, "शिंदे, होळकर व अंताजी माणकेश्वर व विठ्ठल शिवदेव व गोविंदपंत बुंदेले व नारो शंकर असे सर्वत्र या रानींत सुख पावले. त्यांस आम्ही आलियाचें सुख नाहीं." म्हणून हेटाळणी करून कूच केलें. ढउळपूरचे घाटें चमेलीपार जाले.

१००. ढउळपूर नजीक मुचकुंद तीर्थ म्हणून आहे. जे समयीं देव-साह्यार्थ कालयवनदैत्य यांशीं बहुत काल रात्रंदिवस [मुचकुंदानें] युद्ध करून दैत्य पराभविले, त्यांत कालयवन दैत्य मात्र चुकावून राहिला होता. त्यासि बहूत रात्रीं झोंप नव्हती. दिवसा उसंत नाहीं. याप्रकारें मुचकुंद युद्ध करून श्रमला होता. यास्तव ब्रह्मा, विष्णू, महेश्वर हे मुचकुंदाकारणें वर देते जाले कीं, "आमचे कारणीं फार शिणलास यास्तव पाहिजे तो इच्छित पदार्थ मागावा." असें म्हणतांच मुचकुंद देवापाशीं वर मागता जाला कीं, "मी युद्ध करून फार श्रम पावलों आहें. यास्तव बहूत काल इच्छा पुरे तों पावेतों मजला झोंप द्यावी." ऐसें ऐकून ब्रह्मदेवें मस्तकीं हस्त ठेविला कीं, "संख्यारहित [वर्षें] तुजला निद्रा दिली. तूं निजला असतां तुला कोणी उठवील त्याजवर तुझी दृष्टी पडतांच त्यानें जळोन भस्म व्हावें." म्हणोन वर देऊन त्यास ढउळपुरा-पासून वरतें कोसावर लहानसा पहाड आहे, तेथें गुहा आहे, त्यांत निद्रा करविली होती. असे बहूत दिवस जाले होते. तों कोणे कालेंकरून विष्णूचें व कालयवन याचें अतिशय करून युद्ध जालें. ते समयीं ब्रह्मराक्षस कालयवन याचें बळ भारी म्हणोन विष्णूस परम संकट प्राप्त जालें कीं, "कालयवन आपणास आटोपत नाहीं, त्यास यत्न काय करावा ?" म्हणोन ध्यानांत आणिलें. मग विष्णू नाटकी मूर्ती, कौशल्य केलें. कालयवनाचे भयें, ज्या

---

४९. 'धायगुडे' क० व सां० प्रती.

५०. 'फौज भारी' पु० प्रत.

५१. रान=मुलूख, प्रदेश.

५२. 'ढवळपूर' 'ढउळपूर' 'ढहुळपूर' 'ढोलपूर' असेही पाठ आहेत. मूळचें हें 'धवलपूर' असावें.

५३. मुचकुंद हा सूर्यवंशी राजा. याणें देवांस बहूत साहाय्य करून दैत्य मारिले.

५४. कालयवन=या ठिकाणीं 'कालेय' पाठांतर तर नव्हे? ही कालयवनाची कथा हरिविजय, अध्याय २२, किंवा बृहद्दशम, अध्याय २, यांत पाहावी. तेथें 'दैत्य' इतकेंच म्हटलें आहे.

५५. 'शंकरहित' तुं. प्रत.

गुहेंत मुचकुंदानें निद्रा केली होती तेथें पळत येऊन आपला पीतांबर होता तो मुचकुंदावर पांघरूण घालून आपण तेथेंच गुप्त जाले. तों मागें धांवत कालयवन गुहेस आला. तों कालय[56]वनास असें भासलें कीं विष्णूच निजला आहे. असें जाणून कालयवन दैत्य दुर्वृत्त त्याणें रागें करून लाथेनें हाणून त्यास जागा केला, आणि बोलिला कीं, "चोरा, पळून येऊन दडला आहेस, तुजला वांचूं कैसा देतों ?" म्हणून लत्ताप्रहारें त्यास ताडन करून जागें केलें. तों मुचकुंद याणें डोळे उघडून त्याजकडे पाहिलें. तेव्हां ब्रह्मवरदें करून कालयवन जळोन भस्म जाला. मुचकुंद आपले जागां सं[57]चिंत होऊन विष्णूचा धांवा केला कीं, " मजला ब्रह्महत्या घडली, त्यास यत्न काय ?" ते समयीं विष्णू प्रगट होऊन त्याचें समाधान केलें कीं, " तूं आमचें महत्कार्य केलें. आतां तुजला ब्रह्म-हत्येचा दोष घडला यास्तव चिंतातूर, तर यास यत्न एक सांगतों. तेथून अर्ध कोस दक्षिणेस तीर्थ [58]आहे. त्या तीर्थी स्नान केल्या ब्रह्महत्येचें पातक जातें." या प्रकारें सांगून त्यास तेथें स्नान करवून ब्रह्महत्येपासून मुक्त केला. त्या दिवसापासून त्या तीर्थास मुचकुंद-तीर्थ म्हणों लागले. त्या तीर्थाचीं स्नानें दानें करून, भाऊंनीं कूच करून, आगरियाचे रोखें गंभिरा नदीवर मुकाम केला.

१०१. मग त्या मुक्कामीं मल्हारराव होळकर व जनकोजी शिंदे व नारो शंकर असे खावंदांस भेटावयास आले. भेटी जाल्या. जनकोजी शिंदे यांचें बहूत प्रकारें समाधान करून त्यांस हत्ती व घोडे व वस्त्रें दिलीं. ते समयीं मल्हारराव यांणीं भाऊंची मर्यादा कांहीं धरली नाहीं. भरले सं[59]भेंत गर्जो लागला कीं, "भाऊसाहेब, तुम्हांस चमेली नदीपार राहावें म्हणून लिहिलें असतां, यावयास कारण काय ? चार भोंवताले मिळाले ते केवळ बेवकूब आहेत. एवढा मोहोरा आणून इरेस घातला. [60]आतां यास काढावयास यत्न नाहीं," म्हणोन बहूत गालि-प्रदानें केलीं. परंतु कोणी शब्द का[61]ढीनात. असो. या प्रकारें बोलिले, परंतु गोष्ट तो गुद[62]रली. उपाय राहिला. मग तेथून आगरियावर येऊन मुकाम केला. दुराणी, सुजाउद्दवला, रोहिले वगैरे यांच्या फौजेचा भरणा भारी असें ऐकून,

---

५६. " तो निद्रागत पीतांबर पांघरून विष्णुशोधार्थी लागला " तुं० प्रत.

५७. तुं. प्रत. ' अजुर्दा '=खिजलेला. दुःखी. ' संकोचित ' क० प्र.

५८. ' होतें ' पु० व तुं० प्रती.

५९. ' भर कचेरीस ' क० प्र०

६०. 'परंतु आपणास काढण्याचा यत्न कोणाचे हातून होणार नाहीं.' सां० प्रत.

६१. यापुढें "खिन्न होऊन सर्व तटस्थ बसले " असें वाक्य क० प्रत देते.

६२ गुदरली, गुजरली,=होऊन गेली. ' गुदस्त. उपाय नाहीं. ' तुं० प्रत.

बरोबर मुलें-माणसें आणिलीं आहेत त्यांस कांहीं आश्रय करावा, थांग्यास ठेवावीं, म्हणून आगरियाचा किल्ला होता, तेथील किल्लेदाराशीं स्नेह करून, त्यास दाहा हजार रुपये दारू-गोळियास दिले. आणि त्याजपासून इमान प्रमाण घेतलें कीं, "निदानसमय प्रगट जाला तरि बायका-मुलें आहेत त्यांस स्थळ करून किल्ल्यांत द्यावें." याप्रमाणें बंदोबस्त करून गौघाटावर मुकाम केला. तों गिलच्या पलीकडे यमुनेचे[६३] तीरीं येऊन नदी-पार काळजळेश्वरावर [त्याणें] मुकाम केला होता, त्याणें कूच करून [तो] यमुनापार यांच्या बरोबरीनें राहिला. परंतु यमुनेस पाणी भारी यास्तव त्याचा यत्न यांजवर चालेना. या प्रकारचें यांचें कूच जालें, म्हणजे त्यांणींही पलीकडे कूच करून बरोबरीस राहावें. भाऊसाहेब तेथून निघाले. यमुनेचे व वृंदावनाचे मध्यें[६४] मुकाम करून राहिले. तीर्थविधी यथाविधी करून, छायाती सराईवरून होडल वरून पलवल वरून दिल्लीस पोंचले.

**१०२.** तों दिल्लीचे किल्ल्यांत रोहिले व गाडदी नजीबखान याजकडील चार हजार सामान[६५] किल्ल्यांत होतें. ते समयीं शहरचें वस्त्राहरण[६६] करून किलियास मोर्चे लाविले. आणि जनकोजी शिंदे व मल्हारराव होळकर यांणीं[६७] इमान प्रमाण देऊन सुरजमल्ल जाट यास पांच सात हजार फौजेनिशीं भेटीस घेऊन आले[६८]. भाऊसाहेब त्यास आडवे जाऊन, सन्मानें करून घेऊन आले. तों दिल्लीचा किल्ला अपेशी, पांच सात रोजांत हल्ला करून, माळा लावून[६९], हस्तगत केला. त्यांत रोहिले वगैरे माणसें होतीं.* त्यांस जीवदान देऊन सोडलें. आणि किल्ल्यांतील अलमशाहा पातशाहा होता तो गाजुदीखान यानें मारून [तो] शिंदे यांजकडे गेला होता. त्या तागाईत कोणी पातशाहा तक्तीं बैसविला

---

६३. 'गंगेचे' पु० व तुं० प्रती. गंगा=यमुना. मागें पृ० १११ कलम ९८ पाहा.

६४. 'मथुरा वृंदावनास मुकाम केला' सां० प्रत. 'ब्रिंदावनाचे' तुं० प्रत.

६५. 'सामायेन' पाठ तुं० प्रत. 'लोक' क० व सां० प्रती.

६६. 'वस्त्रहरण' सां० प्रत.

६७. 'यांचें इमान प्रमाण' पुणें प्रत.

६८. या वाक्याबद्दल "आणि शिंदे यांस सांगितलें होळकर यांचें व सुरजमल्ल जाट याचें सौरहस्य नाहीं त्यास होळकर व जाट यांचें सख्यत्व करून देऊन होळकर यांजपासून त्याजविशीं इमान घेऊन सुरजमल्ल जाट यास भेटीस आणविला." असें सां० व क० प्रतींत आहे तें बरें दिसतें; कारण कुंभेरीचे वेढ्यांत होळकरांचें मन जाटाविरुद्ध झालें होतें.

६९. 'हलका करून मोकळा होऊन' पु० प्रत.

* 'सामान होतें व लोक होते त्यांस' पुणें प्रत.

नव्हता. मग भाऊसाहेब यांणीं अलीगौर चेंकते[70] याचा पुत्र चौदा वर्षांचा शाहाजादा होता, त्यास तक्तीं बैसवून, त्याचे नांवें शिक्के व मोहोरा व रुपये केले. सुरजमल्ल जाट याजपाशीं गाजुद्दीखान होतें. तों त्यास वजारत द्यावी म्हणोन बहूत करून आग्रह सुरजमल्ल जाट याचा व शिंदे होळकर[72] यांचा होता. परंतु बळवंतराव कोणाचें चालूं देईनात. नारो शंकर यांस राजे-बहादर ऐशी किताबत देऊन, वजिरात सांगून किल्ल्यांतील व शहरांतील कुल पारपत्य[73] त्यांचे स्वाधीन केलें. त्यांजपाशीं पांच हजार फौज ठेविली. ते समयीं शिंदे होळकर यांचे चित्तांत संशय आला कीं, "भाऊसाहेबीं आमचें मानिलें नाहीं, तेव्हां सुरजमल्ल जाट यांणीं काय चित्तांत आणिलें असेल? या प्रकारें या हिंदुस्थानांत आमची अप्रतिष्ठा जाली. यांत आपला परिणाम काय?" म्हणोन मल्हारराव यांणीं जनकोजी शिंदे यांस विचारिलें. जनकोजी शिंदे यांणीं जाबसाल केला कीं, "आपलें चालेनासें दिसोन आलें तेव्हां हरएक[74] मसलत आपण सांगो नये. आपले जागीं प्रतिष्ठेनें राहावें." म्हणोन बोलिले. तैसेच सुरजमल्ल जाट यांणीं आपला वकील रूपराम कटारी यास बोलिले कीं, "गाजुद्दीखान याचे वजारतीविषयीं भाऊसाहेब यांस आम्हीं रुबेरूब[75] विनंती केली. तैसेंच शिंदे, होळकर यांणीं अर्ज केला. परंतु त्यांणीं मानिलें नाहीं. तेव्हां या स्थळीं राहिलियाचें स्वरूप नाहीं. अपाय होईल. यास्तव येथून हरयत्नें निघतां उत्तम," म्हणोन मनसबा केला. परंतु शिंदे होळकर यांचे नजीक राहाणें[76]. जावयास उपाय नाहीं. म्हणोन चिंतातूरच होता.

---

७०. 'चेमकत' पुणें प्रत. 'शाहाजादा शाहाअलम' हे शब्द तुं० प्रतींत नाहींत. अलीगौर यासच शाहाअलम (दुसरा) म्हणतात. त्याचा पुत्र जवानबक्त यांस भाऊंनीं तक्तावर वली-अहद करून बसविलें. अलीगौर पूर्वेकडील प्रांतांत पळून गेला होता. 'चकते' हें मोगल बादशाहांचें आडनांव.

७१. "शिंदे यांजवर दत्ताजी शिंदे पडल्यामुळें वक्त गुजरला तेव्हां जाट याचा आश्रय करून जाटाजवळ होता." क० प्रत.

७२. 'होळकर' तुं० प्रतींत नाहीं.

७३. कुल = सर्व; पारपत्य = अमल, अधिकार. 'कुलमुक्त्यारी' क० प्रत.

७४. हरएक = कोणतीही.

७५. 'उरूबरू' तुं० प्रत. रूबरू=समक्ष.

७६. यापुढें क० प्रतींत मजकूर आहे तो असाः— "तेव्हां निघोन जाण्याचा योग कसा घडेल! ते उभयतां एकाच् खावंदाचे चाकर. आपला स्नेह उभयतांचा खरा. परंतु न कळे त्यांस विचारल्याशिवाय आपण जाण्याचा योग केला आणि त्यांस समजलें असतां आपले पदरीं बेमानी येईल. आणि ते फौजबंद. एखादे त्यांणीं पिच्छा आपला केल्यास जड जाईल. परिणाम लागणार नाहीं."

१०३. 'तों विनाशकाळीं विपरीत बुद्धी' तैसा विचार घडला. गोविंदपंत बुंदेले यास तँसदी करून पन्नास लक्ष रुपये भाऊसाहेबांनीं मागितले. त्यांणीं समय जाणून, आणावयास जातों म्हणून पाराजीपंत वाघ व आपण बुंदेलखंडास गेले. यांहीं खर्चाची तंगचाई जाणोन पातशाहा याचे तक्तावरतें कचेरीस छत रुप्याचें होतें, तळहाता इतका [ पत्रा ] मोठा होता, त्याजवर सोनेरी वर्खी मुलाम्याचें काम होतें,त्याजवर नजर भाऊसाहेबांची गेली.चित्तांत विचार केला कीं, "हें छत आहे. हें काढून फौजेस रोजमुरा द्यावा व छताचे जागीं लांकडी फळ्या द्याव्या." म्हणोन मसलत ठीक केली, आणि उगेच फुँलें द्यावीं म्हणोन शिंदे, होळकर व सुरजमल्ल जाट यांस विचारणा केली. ते समयीं सुरजमल्ल जाट याणें अर्ज केला कीं, "भाऊसाहेब, पातशाही तक्ताची जागा मर्यादेची आहे. पूर्वीं नाजरशाही जाली होती तेवेळेस तक्तावर सोन्याचें कवँच होतें तें नेलें, परंतु या छतास हात लाविला नाहीं. त्याजवर खंदाराचा पातशाहा अबदुल अली दोन वेळ चालोन आला. त्याणें तोफा देखील कँाढून नेल्या. परंतु याची मर्यादा राखली. प्रँस्तुत मी पादशाही उमराव तुम्हांपाशीं आहें. आम्हां देखत या गोष्टी होऊं नयेत, आम्हांस या गोष्टीनें यश येणार नाहीं. आणि स्वामि-द्रोहही पदरीं पँडेल. यास्तव अर्ज करितों कीं, आजिचे प्रसंगीं एवढी जोड मजला द्यावी. तुम्हांस तंगचाई जाली असली तर मजला आज्ञा करावी. मी पांच लक्ष रुपये साहेबांस देतों." असें ऐकतांच यांस अधिकच आँभाव जाला कीं "हेच पांच लक्ष रुपये देतात तेव्हां कांहीं अधिक असेल." म्हणून त्याचा अव्हेर करून, कचेरीचें संपूर्ण छत कँाढिलें. झाडून रुपें वजन केलें, तों तीन लक्षांचें भरलें. ते समयीं भूमिकंपही जाला. जनवदंता उल्कापातही जाले म्हणतात. ते समयीं बहुतांस वाईट वाटलें. सुरजमल्ल जाट यांणीं हुजूर जाऊन अर्ज केला कीं, "भाऊसाहेब, आम्ही जवळ असतां तुम्हीं तख्ताचा विध्वंस केला. येणेंकरून

---

७७. 'तगादा' क० प्रत.

७८. 'फुलें द्यावीं म्हणोन' = बाह्योपचारार्थ.

७९. 'कळस' तुं० प्रत.

८०. 'गाळून' पु० प्रत.

८१–८१. 'हालीं आपलेंजवळ बादशाही उमराव आहेत, त्यापेक्षां आम्हां देखतां हा विचार घडूं नये. याणें आपलेस यश येणार नाहीं आणि आमचे पदरीं स्वामिद्रोह येईल" क० व सां० प्रती.

८२. आभाव=संशय. 'अभाव' 'भाव' पाठभेद.

८३. 'कचेरीचा छत काढिला' असा तुं० प्रतीचा पुल्लिंगी प्रयोग सर्वत्र आहे.

आम्हांस दूषण. ज्या गोष्टीचा साहेबांस आम्हीं अर्ज करावा ते समयीं आपण अव्हेर करितांत. आमचे चित्तांत हिंदुधर्म आहे. राज्य स्वस्थ राहावें. तुमचें आमचें इमान जालें. यमुनेचें पाणी हातांत घातलें त्याचें सार्थक हेंच कीं काय?"

१०४. ते समयीं भाऊसाहेबीं ती गोष्ट टाकून शिंदे, होळकर समग्र बोलावून मनसबा केला कीं, "यमुनेस पाणी भारी. दुराणी यमुनेपार राहिले. सध्यां कुंजपुरियांत कुतुबशाहा व महमदखान कत्तलबाज असे पंधरा हजार फौजेनिशीं बळावून राहिले आहेत. प्रस्तुत त्यांचें पारिपत्य करावें. त्याची तजवीज काय?" असें म्हणतांच मागती सुरजमल्ल जाट याणें प्रत्योत्तर केलें कीं, "आमचे ऐकाल तरि छताचें रुपें काढिलें आहे, तें मागती छत यथास्थित करांवें. येणें करून आपला जय होईल. दुसरें, गाजुदीखान याची वजारत त्याची त्यास द्यावी. येविशीं शिंदे होळकर यांचें व आमचें इमान-प्रमाण गुंतलें आहे. पुढें आणखी छोटा मोठा अर्ज ऐकत जावा. म्हणजे मी सर्वस्वें तुमचे पदरीं आहें. लागेल तो दाणा व साहित्य पुरवीन. दिल्ली सोडून जाऊं नये. येथूनच सर्व मनसबा मसलती कराव्या. कदाचित तुम्हांस कुंजपुरियाचें पारिपत्य करणें तरि लक्ष प्रकारें करावें. परंतु तेथें गुंतून राहूं नये." या प्रमाणें मसलत दिली. पुढील होणार बलोत्तर, भाऊसाहेब यांणीं जाबसाल केला कीं, "आम्ही कांहीं दक्षण सोडून तुमचे बळावर आलों नाहीं. आमचे चित्तास येईल तसें करूं. तुम्ही राहावेल तर राहावें, नाहीं तर आपले ठिकाणास जावें. गिलचांचें पारिपत्य केल्यावर तुम्ही आम्ही समजून घेऊं." ऐसा निष्ठुर जाबसाल होतांच शिंदे होळकर यांस वाईट वाटलें. आपलाले जागीं स्तब्ध राहिले. उपरांतिक सुरजमल्ल जाट आपले जागां अजुरदा होऊन आपले डेरियास गेला. चित्तांत

८४. 'आपण अव्हेर करितात' असा द्वितीयपुरुषाचा तृतीयपुरुषीं प्रयोग करण्याचा उत्तर हिंदुस्थानांतील मराठे लोकांचा प्रघात आहे. असा प्रयोग बहुमानवाचक होय.

८५, यापुढें "कीं हिंदुधर्म राज्याधिकारी आहेत ते स्वस्थ असावे हें आमचे चित्तीं" क० प्रत.

८६. 'जाट यास उत्तर कांहींच केलें नाहीं. तसेंच ठेविलें.' क० प्रत.

८७. 'सैयद महमद' क० प्रत.

८८. 'तें मागती छताचें छतास लावावें' पाठभेद.

८९. 'सर्वकार्य मसलती' क० प्रत.

९० 'आम्हांस' पु० प्रत.

९१. "पारिपत्य करणें तर खांसा स्वारी खुद्द शहास गुंतू नये" सां० व क० प्रती.

९२. 'राहवेल तोंवर' तुं० प्रत.

९३. 'पाहून घेऊं' पुणें प्रत व क० प्रत.

९४. अजुरदा= खिन्न.

विवंचना करिता जाहाला कीं, " आम्ही आलों हेंच मूर्खपण केलें. आतां येथून जाण्याची तजवीज कोणत्या रितीनें होईल ?" म्हणोन महासंकटीं पडला.

१०५. इकडे भाऊसाहेब यांणीं कुंजपुरियावर जावयाचा कृतनिश्चय केला. मल्हारराव व जनकोजी शिंदे आपले डेरियास आले. एकत्र एकांतीं मनसबा केला कीं, " जाटास आम्हीं इमान देऊन आणिलें. भाऊंची मर्जी तो केवळ कठीण. बळवंतराव व भाऊसाहेब यांणीं मनसबा पूर्ण केला कीं, सुरजमल्ल जाट यास धरून, कैद करून, त्याचा गोठ लुटून टाकावा. हा यांचे मनांतील मजकूर खचीत जाला आहे. आतां हर यत्न करून सुरजमल्ल जाट यास काढून द्यावा. म्हणजे आपलेकडे बेमानाचा दोष येणार नाहीं. मग त्या निमित्त खावंद आम्हांसच काय करितील तें करोत. " असा विचार ठरवून रूपराम कटारी, वकील जाटाकडील, यास बोलावून सांगितलें कीं[९६], " तुम्ही आज रात्रीं हर यत्न करून निघोन जावें. भाऊसाहेब यांचा गोट दूर आहे. त्यांस कळों न देतां निघोन जावें. इतकियावर तुमचें आमचें इमान उगवलें. अतःपर आम्हां-वर शब्द नाहीं. " म्हणोन कानावर हात ठेविले.

१०६. याप्रमाणें शिंदे होळकर यांचें बोलणें ऐकून रूपराम कटारी आपले गोटास गेला. सविस्तर अर्थ सुरजमल्ल जाट यास सांगितला. सुरजमल्ल जाट यानें उत्तर केलें कीं, " दोहींकडून अवघडच आहे. आजिचे प्रसंगीं दैवयोगें करून निभावून गेलों तर सर्वस्वें भाऊसाहेबांचे द्रोही जालों. गिलच्यांचें पारि-पत्य दैवयोगें करून जालें तर आम्हांस पुरताच क्षय आला. आधींच भाऊ पुरते आग्रही, मग आम्हांस आश्रयही कोणाचा नाहीं. या गोष्टींचें भय धरून [येथें] राहावें तर सध्यांच बंदीस पडावें. या दोहीं संकटांचा अर्थ काय करावा?" रूपराम कटारी याणें निरोत्तर केलें कीं, " एक अनीं चूकी तो बारा बरसकी हयात" ऐसा आहर्णा प्रसिद्ध आहे. प्रस्तुत बचावून जावें. पुढें इकडे भाऊ आणि तिकडे अबदूल अली दुराणी. दोनीही सबळ अनुष्ठानी, दोहींचीं सुकृतें सध्यां ताजव्यांत घातलीं आहेत. न्यून-पूर्ण थोडकिया दिवसांत दिसोन येईल तों

---

९५. 'निभावणी कोण अर्थी होईल' तुं० प्रत.

९६ यापुढें क० प्रत म्हणते "येथील दरबारचा रागरंग पाहातां ठीक दिसत नाहीं. तुम्हांस तरि आम्ही इमान प्रमाण देऊन आणिलें. तुम्ही देखली वाट पाहावी."

९७. अनी, अणी=प्रसंग, संकटाची वेळ. मराठींतही " एक अणी चुकली, बारा वर्षांचा वायदा. "अशी म्हण आहे.

९८. 'बोल' क० प्रत.

९९. न्यूनपूर्ण = कमी कोण जास्त कोण, सामर्थ्य अधिक उणें कोणाचें हें.

पावेंतों आम्हीं आपले जागां दम बांधोनें[१००] स्वस्थ राहावें. पुढें जें रामजीचे चित्तांत येईल तें सुखरूप होईल. उद्यांची फिकीर आज कशास पाहिजे ? सध्यां निभावणी होईल अशी निघावयाची मसलत सिद्ध करावी. जें होईल तें सुखें होऊ. परंतु आज रात्रौ निघावें." म्हणोन निश्चय केला. मग अवशीची प्रहर रात्र गुदरलियावर गुप्तरूपें हत्तीच्या घांटा काढून, डेरे दांडे पाडून झाडून, निघाले. जवळ शिंदे होळकर होते, परंतु त्यांनीं काणा डोळा केला. चार कोश भुई गेलियावर मग होळकर[१] यांजकडील दिवाण गंगोबा तात्या कचेरीस जाऊन वर्तमान सांगितलें कीं, "सुरजमल्ल जाट गुप्तरूपें कोणास न कळतां पळून गेला. आम्हांकडील[२] फौज पाठिलागास गेली. आपणही फौजेची रवानगी करावी."[२] असें ऐकतांच भाऊसाहेब यांणीं फौज सिद्ध केली. ताकीद करावयासि व फौज तयार होऊन निघावयासि, आणखीही साहा चार घटका लागल्या. इकडे शिंदे होळकर यांचीही फौज निघोन गेली. तों सुरजमल्ल जाट सडा झाडून रामगडांत पोंचला. मागें थोडे बहूत बाजार बुणगे सांपडले ते लुटून आणिले. असो. या प्रकारें जाट तो निभावून गेला. इकडे भाऊसाहेबहीं पुरतेपणीं उमजले कीं, "शिंदे होळकर यांचे अनुमताखेरीज जाट गेला नाहीं. अस्तु. आतां गोष्ट चित्तांतच राखावी." म्हणोन आपले जागां राग शांत करून राहिले. कचेरीस मात्र बोलिले कीं, "ईश्वर-सत्तेकरून दुराणीचें पारिपत्य जाहालियावर जाटाचें अधिकोत्तर काय आहे[३] ?"

---

१००. 'ठांसून' क० प्रत.

१. 'होळकर' हा कल्याण प्रतीचा पाठ. 'शिंदे होळकर' असा पु० व तुं० प्रतींचा पाठ आहे.

२–२. "आम्हांकडील छबिनेवाले यांणीं आम्हांसही न कळवितां जाट याचे पाठलागास दौड करून गेले आहेत." सां० व क० प्रती.

३. येथपासून तुंगार प्रतीचा पाठ निराळा आहे तो असा:– "खामाखाय जाट होता कीं नाहींसा करीन तरीच जातीचा ब्राह्मण" म्हणोन प्रतिज्ञा केली. या प्रकारें सध्यां निधान हातीचें गमावलें. उपरांतिक भाऊसाहेबीं नारो शंकर किल्यांत ठेविले. त्याजपाशीं किल्यांत दोन हजार फौज, प्यादे व हजार गाडदी व शहरचे गिर्दनबाजीस पांच हजार फौज ठेवून मजल दरमजल कूच करून कुंजपुरियास जाऊन पोंचले. तों दुराणीची फौज पलीकडे यमुनातीरींच होती. कुंजपुरियास पोहोंचलियावर दुराणी [यांणीं] नदी उतरावयासि बहूत तल्लास केला. परंतु भाऊसाहेब यांस तेव्हां यश द्यावयाचें होतें यास्तव त्यांस यमुनेनें वाट दिली नाहीं. मग रोहिले दुराणी यांनीं मनसबा करून कमाऊच्या पहाडानजीक यमुना उतरावी म्हणोन दोन दिवसांत ऐशीं कोस

(पृष्ठ १२० पहा.)

१०७. [मग] त्यांसा भाऊसाहेब व बळवंतराव गणपत व जनकोजी शिंदे व मल्हारराव होळकर व दमाजी गायकवाड व यशवंतराव पवार व विठ्ठल शिवदेव व समशेरबहादर व इभ्रामखान गाडदी व आणखी सरदार सर्वत्र मिळोन मनसबा केला कीं, "कुतुबशाहा व सैमतखान कत्तलबाज कुंजपुरियांत आहेत. यांजवर जाऊन त्यांचें पारिपत्य करावें, व कुंजपुरियाचा किल्ला खाणोन टाकावा." ऐशी मसलत करून मुहूर्त पाहून कूच दरकूच मजल दरमजल कुंजपुरियानजीक लागले. त्यांचीही बातमी होती. सावध होते. तयार होऊन शहर सोडून फौजेसुद्धां बाहेर आले. त्यांची यांची गांठ पडली. त्यांजकडील यांजकडील तोफांचा व बाणांचा ऐसा मार जाला [कीं] गर्दी होऊं लागली. मनुष्यास मनुष्य दिसेनासें जालें. मोठी खणाखणी एक प्रहर पावेतों जाहाली. ते समयीं घोडियाचें तोंड आंत शिरकेनासें जालें. ते समयीं भाऊसाहेब यांणीं बळवंतराव गणपत यांसि आज्ञा केली कीं, "तीन टोळया करून हल्ला करावा." त्याजवरून तीन टोळया केल्या. एका बाजूस समशेर बहादर व दमाजी गायकवाड व नारो शंकर व एकीकडे यशवंत पवार व इभ्रामखान गाडदी निजाम अलीपाशील, यांणीं एकीकडून चालून घेतेलें. मोठी दोन घटिकापर्यंत मारामार जाली. कुतुबशाहाकडील चांगले मनुष्य तितकें शिकस्त जाले. मग गनिमांनीं

---

(पृष्ठ ११९ वरून समाप्त.)

कचे पहाडाच्या सुमारास गेले. तों तिकडेही उतार सांपडेना म्हणून ते निवांत दोन रोज तिकडेच राहिले. इकडे कुंजपुरिया भोंवताल्या फौजा उभ्या राहिल्या. तों कुतुबशाहा व संमदखान कत्तलबाज आंत होता त्यांणीं कांहीं गांवांत सामान टाकून बाहेर निघावें तें न करितां झाडून सामान बाहेर काढून युद्धास तोंड लाविलें. बाहेरील गनिमांच्या तोफांचा व हस्तनाला व सुतरनाला व जेजाला व बरखंदाज बाणांचा मार अतिशयें करून जाला. तों ते थोडके आणि गनिमांच्या फौजा भारी. शिंदे होळकर यांजकडील त्यांणीं कत्तल फार वेळां केली होती, यास्तव केवळ हे दांतनिकसीस आले. इभ्रामखान गाडदी निजाम अली पाशिल रहवाई त्याणें एकीकडून चालोन घेतलें. मोठीशी दोन घटकांपर्यंत मारामारी झाली" खामाखाय=खचित, कांहीं होईना.

४. 'संमदखान' तुं० प्रत. 'अहमदखान' पु० प्रत.

५. येथपर्यंत तुंगार प्रतीचा पाठ निराळा आहे. वर ३ री टीप पाहा.

या वाक्यावरून तीन टोळ्या होत नाहींत. दोनच होतात. कल्याण प्रतींत तीन टोळ्या सांगितलेल्या अशाः— "एका बाजूस समशेर बहादूर व एका बाजूस दमाजी गाइकवाड व एका बाजूस खासगी हुजुरातीनिशीं बळवंतराव गणेश व इभ्रामखान गारदी, असें तिहींकडून चालून घेतलें."

६. शिकस्त=पराभूत, मृत.

चोहोंकडून 'हर! हर!' म्हणोन घोडे घातले. एकच धौशा केला. ते समयीं मोठी धुंद्री जाली. बाहेरलें सामान माणूस गांवांत जाऊं पावलें नाहीं. चोहों-कडून तोंडें लागून लांडगेतोड झाली. मग चोहोंकडून हल्ला जाऊं लागली. ते दिवशीं मराठियांणीं कांहीं चित्तांत करुणा आणिली नाहीं. जितके हाता खालीं सांपडले तितके जिवें मारावयास आळस केला नाहीं. ते समयीं पांच सात हजार मनुष्य त्यांजकडील ठार मारिले. तैसेच घायाळ जाले. मुडदे-घायाळांचे ढीग एकत्र जाहाले. शहरपन्हा खालीं होता तो हल्ल्यासरसे चढून गांवांत जाऊन पोहों-चले. गांवांतील चिंधीचोळी केली. कुंजपुरियाची वस्ती अँपूट होती, लूटही मुबलक सांपर्डली. नजीबखान रोहिला याचा व्याही व जांवई असे कुंजपुरियांत होते. ते हस्तगत जाले. धरून आणिले. इकडे कुतुबशाहा गायकवाड यांच्या फौजेंत जिता सांपडला. तैसाच सैमतखान कत्तलबाजही सांपडला. भाऊ-साहेब व जनकोजी शिंदे व मल्हारराव होळकर एक जागां उभे होते. लुटीची गर्दी जाहाली. कोणी घोडें, कोणी उंट, कोणी हत्ती व कोणी बैल असे ज्याचे दैवीं जैसें होतें तैसें सांपडलें. दत्ताजी पडले तेसमयीं जव्हेरगज हत्ती कुतुबशाहा याजकडे सांपडला होता तो कुंजपुरियांतच होता. तो अनायासें करून जन-कोजी शिंदे यांजकडे सांपडला. ते दिवशींचा शिंदे यांचा आनंद कोठवर वर्णावा ? असो.

१०८. इकडे दमाजी गायकवाड यांणीं कुतुबशाहास हत्तीवर बैसवून भाऊसाहेब यांजकडे लावून दिला. पुढें दिवाणानें येऊन भाऊसाहेबांस सांगि-तलें कीं, "कुतुबशाहा आम्हांकडे सांपडला तो आपणांकडे घ्यावा" म्हणोन सांगितलें. तों तोही नजीक येऊन पोंचला. त्याकडे पाहातांच भाऊसाहेब यांस रागाचा उत्कर्ष आवेश येऊन सर्वांगास रोमांच आले. बोलते जाले कीं, "या मात्रागमानियास एवढे प्रतिष्ठेनें कशास आणिलें ?" अशीं गालीप्रदानें देऊन "हत्तीवरून लोटून द्यावा" म्हणोन बोलिले. तें कुतुबशाहा याणें कानें ऐकून

७. अपूट (अस्पृष्ट) = हात न लाग-लेली, कोरी. "कुंजपूरची वस्ती चांगली संपन्न होती" सां० प्रत.

८. 'लुटीही मोबलग सांपडल्या.' तुं० प्रत.

९. मागें पृष्ठ ८४ पाहा.

१०. उत्कर्ष=उत्कृष्ट = खूप, मनस्वी, अतिशय.

११. "त्याजकडे भाऊसाहेब यांणीं पाहतांच व्याघ्रास आवेश येतो तसा भाऊ-साहेबांस येऊन सर्वांगास रोमांच उभे राहिले." सां० व क० प्रती.

आपणच हत्तीवरून उडी टाकिली. धरून जवळ आणिला ते समयीं भाऊंनीं त्यास विचारलें कीं, " आतां काय खबर आहे ती बोलणें. " असें म्हणतांच कुतुबशाहा यानें चित्तांत विचारणा केला कीं, "आतां आपण यांच्या कवेंत सांपडलों. आतां आजिज होऊन बोललों तर मला कोणी वांचवीत नाहीं. मग व्यंगोत्तर कां बोलावें ? " म्हणोन प्रत्योत्तर केलें कीं, " तुमचे चित्तांत काय मजकूर आहे ? तुम्हांस सल्ला करणें तर मजला वांचवावें. तुमचे इच्छेप्रमाणें दुराणी व रोहिला यांचा [व तुमचा] सल्ला करून देईन. हें न होय तर मजपासून पन्नास लक्ष रुपये घेऊन मुक्त करावें. तुम्हांस युद्ध करावयाची हिंमत असली तरी खंडणी घेऊन मजला सोडावें. आजपासून पंधरा दिवसांत पंचवीस हजार फौजेनिशीं तुम्हांशीं लढाई करावयास सिद्ध आहें. " हें ऐकून मागती भाऊंनीं विचारलें कीं, " दत्ताजी शिंदे यांचा शिरच्छेद तुवांचें[12] केला कीं काय ? "असें ऐकून कुतुबशाहा याणें चित्तांत विचार केला कीं, " यांणीं हें वर्म काढिलें, तेव्हां आपणास प्राणानिशीं सोडीत नाहींत. आतां आंजीज[13] होऊन बोलणें हें मूर्खपण आहे. " जाणून बोलता जाला कीं, " आम्ही आपला स्वधर्म केला. आमचे कुराणांत निश्चय आहे कीं, शत्रूचा शिरच्छेद करून शिर भाल्यास टोंचून मग शाहजणें वाजवावीं. त्याप्रमाणें वर्तणूक केली. " असें ऐकून भाऊसाहेब यांचे तळव्याची आग मस्तकास गेली. अंग रोमांचें[14] जालें. क्रोधाचा सीमासमुद्र डहुळला[15]. आज्ञा केली कीं, " ढालेपाशीं[16] नेऊन याचा शिरच्छेद करावा. " हें ऐकून मल्हारराव व जनकोजी शिंदे यांणीं अर्ज केला कीं, "यास वांचवून याचे हातून महत्कार्य संपादून घ्यावें. यास मारलिया दत्ताजी शिंदे कांहीं उठत नाहींत." म्हणून विवेक करून सांगितलें. परंतु भाऊसाहेब यांस विशाद-अग्न शमेनासा जालें[17].'शिरच्छेद करावा'म्हणून आज्ञा करून एकदांचें[18] तीन परवानग्या दिल्या. मग ढालेपाशीं नेलें[19]. तो कुतुबशाहा याणें

---

१२. " तुम्हींच " पु० प्रत.

१३. आजीज = दीन, गयावयां.

१४. रोमांचित ह्या अर्थी.

१५. डहुळला = उचंबळला, हेलावला. मागें पृष्ठ १०६ टीप ८ पाहा.

१६. ढालेपाशीं = निशाणापाशीं.

१७. या ऐवजीं क० प्रत हीं वाक्यें देते, " परंतु भाऊसाहेब यांस क्रोध आलेला, संतप्त केवळ अग्नीप्रमाणें जाहालें. एक वेळ अग्नी हातीं धरवेल, परंतु यांचा राग उपशमन न होई असें जाहालें. "

१८. 'शिरच्छेद करावा म्हणोन आज्ञा एकदांच दिली.' पु० प्रत.

१९. 'मग ढालेपाशीं नेऊन शिरच्छेदास सिद्ध केलें. ते समयीं' तुं० प्रत.

पाणी प्यावयास मागितलें. " आधीं पाणी पाजून मग शिरच्छेद करावा " [ असें बोलला. ] तेव्हां पाणी पाजावें हें विहित होतें. परंतु दत्ताजी शिंदे यांचें वर्तमान ऐकून सर्वांस विषाद सारखाच, कोणास करुणा येईना. निष्ठुरपणें बोलिले कीं, "या मात्रागमनियास लघुशंका प्राशन करवणें." ऐसें बोलून तात्काळच शिरच्छेद केला. त्यास गोरगपणें[20] प्राप्त जाला नाहीं. ढालांपुढें काकजंबूक यांणीं खादेला.[21] तैसेंच सैमतखान कतलबाज सांपडला, तोही याप्रकारेंच मारिला. दोन्ही सरदार पंधरा हजार फौजेचे[22] मारिले.

१०९. उपरांत कुंजपुरियाचें वस्त्रहरण केलें. लूटही मुबलक ज्याचे दैवीं जैशी होती तैशी सांपडली. किल्यांत नजीबखान याचा व्याही व जांवई होता. तोही सांपडला. त्यांचीं मुलें माणसें सांपडलीं. त्यांस[23] द्रव्याच्या आशेनें बोटांस पलिते लाविले कीं, नजीबखान याची ठेव काय असेल ती दाखविणें, म्हणोन फारच हाल केले. तेव्हां पंधरा लक्ष रुपयांची मालिस्त[24] दाखविली. त्यांचे हाल या रितीनें करून कैदेंत ठेविले. भाऊसाहेब यांणीं मुकाम तेथें करून स्वस्थ राहिले. कामाठी बेलदार असे लावून कुंजपुरियाचा किल्ला व शहरपन्हा ढांसळून टाकिला. तेसमयीं भाऊसाहेब व बळवंतराव गणपत यांणीं यशप्राप्तीचा संतोष मानून परस्परें बोलते जाले कीं, " शिंदे होळकर यांणीं आम्हांस दुराणीची सलाबत[25] घातली, ते दुराणी काय जाले ?" बळवंतराव यांणीं प्रत्योत्तर केलें कीं, " सुरंजेचे मुक्कामीं मी साहेबांस बोललों होतों कीं, " शिंदे होळकर आम्हांस धुडाविर्तीत.[26] परंतु गिलचे आम्ही कानीं मात्र ऐकूं. परंतु दृष्टीस पडणार नाहींत. साहेबांचा पुण्यप्रताप थोर आहे.[27]" असें बोलून संतोष मानिला. तों शिंदे होळकर डेरियास आले. अर्ज केला कीं, "साहेबीं महत्कार्य करून यश संपादिलें. आतां कूच करून दिल्लीस जाऊन पोंचावें. यांत उत्तम आहे." असें ऐकून बळवंतराव यांणीं जाबसाल केला कीं, " सुभेदार, तुमचे आंगांत

---

२०. " गोरकपन प्राप्त जाहालीं नाहींत. " तुं० प्रत. गोर-कफन=स्मशान-वस्त्र, मूठमाती.

२१. ' कर्माप्रमाणें फळही जाहालें ' असें येथें क० व सां० प्रतींत आहे.

२२. " फौजेनिशीं " पु० प्रत.

२३. त्यांस = त्यांच्या = व्याहीजांवई यांच्या.

२४. ' माया ' तुं० प्रत. ' खजीना ' सां० प्रत. ' दौलत ' क० प्रत.

२५. सलाबत = धाक, दरारा.

२६. ' दुराणीची दबकावणी घालितात ' क० प्रत.

२७. "पुण्यप्रताप या प्रकारचा आहे" तुं० प्रत.

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था
११११ सदाशिव पेठ, ... 
... पुणे-४११ ०३०

दुराणीचे शाहारे कां शिरले ? अद्यापी तुमचें भय कां जाईना ? ” असें ऐकून मल्हारराव यास विषाद आला. तो स्पष्टवक्ता, त्यास कोणाची परवा नाहीं. आणि अंगीं कृत्रिमही नव्हतें.[२८] “ तुम्ही ब्राह्मण-जात निर्बळें,[२९] कांहीं आकाश फोडून आलां नाहीं. पंचाननाची गांठ पडली नाहीं तोंच वल्गना करतां.[३०] गांठ पडलियावर शुद्धही निघून जाईल.” म्हणोन बोलून रागें रागें डेरियास गेले. भाऊंनीं त्यांचें बोलण्याचा त्रास[३१] मानून, दुराणीशीं फितूर म्हणोन विकल्प चित्तांत आणिला. असो पुढील होणार बलोत्तर, तेथें कोणाचाही यत्न नाहीं. ते समयीं दिल्लीस प्रविष्ट होते तर अवघड न पडतें. ते[३२] कुंजपुरियांत खणत्या लावल्या आणि तेथेंच स्वस्थ राहिले.

११०. इकडे नजीबखान व दुराणी यांणीं कुंजपुरियाचें वर्तमान ऐकिलें. कुतुबशाहा व सैमदखान कत्तलबाज यांच्या शिरच्छेदाची वार्ता ऐकून दांत ओंठ चावून मणगटें तोडूं लागले.[३३] “ आतां जीव ठेवणें हें उचित नाहीं. ” सर्वत्रांनीं मसलत करून, तेथून कूच करून, कच्चे साठ कोस भूमी एक वेळ एक रात्र चालोन, पाणिपत कर्णोल येथें यमुनेस गचक्या[३४] उतार होता, तेथें पुढें हत्तीवर हस्तनाले व उंटावर सुतरनाले व बाणांच्या कैंच्या अशा पुढें घालून सडी फौज झाडून आलीकडे उतरली. मागोन तोफखाना व बुणगे झाडून उतरले. हें वर्तमान भाऊसाहेबांस कळलें नाहीं. ऐसा प्रकार. आकस्मात् विघ्न उतरलें. इतकियांत पाणिपत कर्णोल यांत भाऊसाहेबांचीं ठाणीं होतीं, तीं पळोन लष्करांत दाखल जाले. तेव्हां हें वर्तमान भाऊंस कळलें. तेसमयीं भाऊंनीं तमाम उमराव, मल्हारराव होळकर व जनकोजी शिंदे व दमाजी गायकवाड व यश-

---

२८. ‘ कृत्रिम ही नवतें.’—बखरकार आतां असें म्हणतात. पण मागें मल्हाररावाविषयीं एतद्विरुद्ध त्यांनीं लिहिलेलें आढळतें.

२९. “ तूं ब्राह्मण, जातीनें निर्बल ” तुं० प्रत. “तुम्ही ब्राह्मण आधींच निर्बळ. तुम्ही वेद म्हणावयाचे उपयोगी. या गोष्टींची तुम्हांस माहितीच नाहीं. तुम्हांसी काय बोलावें!” असें सांगली प्रत म्हणते.

३०. ‘ तोंवर हें बोलणें बोलतां ’ पाठांतर.

३१. ‘ विषाद ’ सां० प्रत.

३२. ते = परंतु तें न करितां. “शिंदे होळकर यांच्या सांगण्याचा अनादर करून ” क० प्रत.

३३. यापुढें क० प्रत हें वाक्य देते. “ आतां जैसें होईल तैसें होऊं, त्यांणीं गनिमी कावा केला तर आमचा यत्न हरला. ”

३४. गचक्या उतार = सपाट नाहीं असा, खालवर तळ आहे ज्याचा असा.

वंतराव पवार विठ्ठलराव शिवदेव व अंताजी माणकेश्वर व समशेर बहाद्दर व इभ्रामखान गाडदी व सोनजी भापकर [व] या वितरिक्त आणखी लहान थोर सरदार बोलावून विचार केला कीं, "दुराणी एकाएकींच यमुना उतरून आलीकडे आला. तस्मात त्याचा जोर भारी, तेव्हां उमेदीनें आला. आतां यास यत्न काय करावा ?" हें मल्हारराव यांणीं ऐकून उत्तर केलें कीं, "हा विचार बळवंतराव यांस विचारावा. आम्हांस कांहीं मसलत सुचत नाहीं. आमची साठी बुद्धि नाटी जाली." म्हणोन बोलून कानांवर हात ठेविले. ते समयीं आणखीही कित्येक शाहाणे तार्किक होते. त्यांणीं मसलत दिली कीं, "दिल्लीस जाऊन पोंचावें. म्हणजे बचाव होईल. परंतु निभावणी होऊन जाण्याची मसलत इभ्रामखान गाडदी यास विचारावी." त्याजवरून इभ्रामखान यास विचारलें. त्याणें मसलत दिली कीं, "तुम्ही देशचा मोंगलँ बंदेखान अली याजप्रमाणें गोल बांधून चालिलां तरि तुमची निभावणी करून देईन. गनिमी कावा केला तरि मग आमचा यत्न राहिला." असें ऐकून तोच मनसबा प्राधान्य करून, कुंजपुरा सोडून, दिल्लीचे रोखें चालिले.

१११. पुढें बातमीस बाजी हरी व भगवंतराव कदम व शिंदे यांजकडील येसोजी भोइटे असे पांच सात हजार लोक पाठविले ते बातमीस निघाले. तेथून दुराणीची फौज पांच कोस होती. तेथें उभे राहिले. तों त्यांणीं[36] हें दुःखँ[37] पाहिलें नव्हतें. अस्ताव्यस्त लोक गाशे टाकून झरझऱ्या[38] लावून बसले. कोणी घोडीं सजगुरियांत[39] सोडून चारीत बसले व कोणी निजले. असें पाहून येसोजी भोइटे यांणीं जाबसाल केला कीं, "तुम्ही बातमीस आलां. येथून गिलचे पांच कोसांवर आहेत. त्यास हे कांहीं देशचे मोंगल नव्हत, जे तुम्ही स्वस्थ राहिलाँ. हे

---

३५. बंदेगान इ० = हैद्राबादकर. हे देशींचे मोंगल.

३६. त्यांणीं=शिंद्याच्या लोकांशिवाय इतरांनीं.

३७. हें दुःख = गिलचा पुढें असतां अव्यवस्थित राहणें किती घातकारक होतें ही गोष्ट.

३८. झरझऱ्या = हुका किंवा त्याच्या लांब नळ्या.

३९. सजगुरा = बाजरी.

४०. यापुढें सां० प्रतींत असें आहे. "आपले देशी मोंगल मिजासी त्यांजला जेरीस आणिलें. त्याप्रमाणें हे लोक नाहींत. प्रसंग पडल्यास समजेल. त्यांची दौड भारी, चाळीस कोसांची मजल करणारे. सावध राहावें." कल्याण प्रतींत अशाच प्रकारचा मजकूर आहे. क० प्रत येथें लिहिते "आपले तिकडील मोंगल लोकांस दाहा कोशांची वळणीची मजल पडिली म्हणजे तोबा म्हणोन हयात सोडून देणार ! त्यांची अजगर वृत्ती, या साम्यतेचे हे नव्हेत. हे परम कठीण." हयात = जीव, प्राण.

दुराणीचा दौर्ड[41] भारी. बेफाम राहूं नये. " हें ऐकून सर्वांनीं त्याची हेटाळणी केली. हातावर हात मारून विनोद करिते जाले कीं, " शिंदे होळकर यांचे फौजेनें दशहत खादली आहे. जे गोष्ट सांगतात ते हिंमत सोडून बोलतात. म्हणोन बोलतांच येसाजी भोइटे स्तब्ध राहिले. यांणीं आपला एक भला माणूस झाडावर टेहेळ्या बसवून, आपण घोड्यावर स्वार होऊन, मजबुदीनें उभे राहिले. तों एकाएकीं झाडावरून टेहेळ्या सांगों लागला कीं, "तेथून दोन कोसांवर फौजेची गर्दी आली. धुराळे दृष्टीस पडूं लागले." असें म्हणतांच शिंदे यांजकडील लोक हुशार होऊन, गडबडून घोडियावर स्वार जाले. आणखी एक वेळ यांसीं[42] इशारत केली कीं, " घोडियावर जलदी स्वार व्हावें. " मागती त्यांची मस्करी करून दम बांधून [हे] तसेच बैसले. तों धुराळा दृष्टीस पडूं लागला. जवळ आले असें [पाहून] येसाजी भोइटे यांणीं जागा सोडून लष्कराचे रोखें पळूं लागले. तों एकाएकींच फौज दृष्टीस पडूं लागली. मग गडबड करून [इतर लोक] घोडीं संभाळावयास गेले. तों ज्याचें घोडें जवळ आणि [जो] सावध होता तो स्वार जाला. वरकडांस घोडीं प्राप्त होऊं दिलीं नाहींत. तों यांत येऊन [गिलचे] मिसळ जाले. त्यांची प्रतिज्ञाच कीं, सांपडेल मनुष्य त्याचा शिरच्छेद करावा. असो. ते समयीं बाजी हरी यांजकडील स्वार घोडियावर बसोन लष्कराकडे भरधांव पळों लागले. तो आंत गिलचे सरमिसळ जाले. लष्कराच्या ढाला दिसत तोंपर्यंत सरमिसळ आले. ढाला पाहिल्यावर दुराणी फिरून गेले. ते समयीं बातमीचे बाराशें स्वारांचीं लोकांचीं डोचकीं कापून नेलीं.

११२. हें वर्तमान फौजेंत कळतांच फौजेची छबी मावळली. हिंमत[43] दिल्लीस जावयाची होती ते राहिली. पाणिपत नजीक असल्यास तेथें राहावें म्हणोन शोध केला. तों पाणिपत जवळ आहे असें समजलें. मग भोंवताले लष्कर उतरलें. भंवताला खंदक खणून[43] सभोंवताले आरांबा[44] पसरून राहिले. फौजेचे तोंडावर इब्रामखान गाडदी राहिला. तेथून अबदुल अली व सुजाउद्दौला व नजीबखान रोहिला व अहमदखान लंगडा पठाण, अशी एक लक्ष वीस हजार फौज व तीनशें तोफा यमुनातीरीं तीन अंडीच[45] कोशांवर उतरले. त्यांसही धास्त होतीच.

---

४१. " होड " तुं० प्रत.

४२. यांस = इतरांस.

४३. "कळतांच भाऊंची हिंमत इ०" पाठांतर. " फौजे भोंवताला छबीना होता तो दबकला. " असें क० प्रत अधिक देते.

४४. 'आराबा' = तोफखाना.

४५. 'ती चौं' कोसांवर तुं० प्रत.

एकाएकींच कांहीं गळां पडले नाहींत. परंतु गनिमाचे फौजेनें धास्त खाऊन कूर्मवत आकर्षण करून राहिले. दुराणी भोंवताले कांवे[४६] देत फिरो लागले. दाणा पाणी याची रस्त[४७] पोंचेनाशी जाहाली. सुरजमल्ल जाट हातींचें निधान गमाविलें. त्याची पहिलीच प्रतिज्ञा होती कीं, सरसाल तुम्हीं दुराणीशीं युद्ध केलें तरी पैसा शेर पीठ व हरभरेही तैसेच पुरवीन. तो असता तरि धान्यास अंतर न पडतें. असो. होणार बलोत्तर[४८]. ज्या काळीं जें होणें तें होतेंच[४९] आहे. या प्रकारें महिना पंधरा दिवस गोळागोळी होतच होती. तों दिवसेंदिवस धान्याची महर्गता होत चालली. वैरणही नाहीं. घोडियांची शक्ती चालली. तेसमयीं भाऊसाहेब यांस परम संकट भासलें कीं, " आतां निभावणी होणें कठीण आणि देशाहून कुमकही व्हावयाची नाहीं. आणि मीं नानासाहेबांशीं प्रतिज्ञापूर्वक निघून आलों असतां, कुमक करा म्हणोन म्हणावें हें उचित नाहीं." असें जाणोन स्तब्ध राहिले.

११३. हें वर्तमान विश्वासराव यांस कळतांच त्यांणीं जनकोजी शिंदे यांसि एकांतीं बोलावून विचार पुसिला कीं, " भाऊसाहेब तो अभिमानानें पेंचांत आले. मनसबा तो भारी पडला[५०]. निभावणी व्हावयाचा प्रकार राहिला. भाऊसाहेब तो अभिमानी पुरुष. आतां नानासाहेब यांस निदानचें पत्र लिहावें." म्हणोन मनसबा करून विश्वासराव यांणीं बापास पत्र लिहिलें कीं," गिलचे यांचा पेंच भारी पडला. निभावणी व्हावयाचा प्रकार राहिला[५१]. भाऊसाहेब तो अभिमानी पुरुष, यांतच गर्द[५२] होतील परंतु व्यंगोत्तर लिहिणार नाहींत. यास्तव संकटांत[५३] आणखी पन्नास हजार फौज व क्रोड रुपये खजीना असें पाठवितां तरि तुमचीं आमचीं दर्शनें होतील. नाहीं तर पत्रीं लिहिलें ही भेट समजावी. नानासाहेब, आम्हांसारखे तुम्हांस पुत्र आहेत व आणखीही होतील. परंतू भाऊंसारखा बंधू मिळणार नाहीं." म्हणून भाऊसाहेब यांस कळूं न देतां पत्र

---

४६. 'तलावे' क० प्रत.

४७. रस्त, रसद् = दाणा वगैरे इत्यादिकांचा पुरावा.

४८. बलोत्तर = बलवत्तर

४९. 'तदनुसार बुद्धी होते' क० प्रत.

५०. अवघड प्रसंग येऊन ठेपला. 'मसलत भारी पडली' क० प्रत.

५१. " राहिला नाहीं" तुं० प्र० राहिला नाहीं=शिल्लक राहिला नाहीं.

५२. गर्द = गारद, गाडद् (पुरलेला, गडप) होतील = मरून जातील.

५३. " संकटार्थ आणि [क] पन्नास हजार फौज " तुं० प्रत.

लिहिलें. हें वर्तमान कर्णोपकर्णी भाऊसाहेब यांणीं ऐकून, जनकोजी शिंदे व विश्वासराव यांस एकांतीं बोलावून क्रोधें संतप्त होऊन बोलिले कीं, "तुम्हांस जीव निभावणें असेल तर उत्तम आहे. अजुनी लावून द्यावयास फुरसत आहे. हर प्रयत्न करून तुम्हांस दिल्लीस पावते करितों. तेथून पांच हजार फौज घेऊन देशास जाणें. आमची आस्था धराल तरि आमचीं शंभर वर्षें पूर्ण भरलीं." या प्रकारें निष्ठुर वचन ऐकून विश्वासराव यांस असें जालें कीं, अंगावर कडा कोसळतो, कीं मस्तकीं विद्युल्लता पडते. ऐसा प्रकार होऊन अधोवदनें तटस्थ राहिले. मर्यादेची सीमा उल्लंघेनाशी झाली. तेसमयीं जनकोजी शिंदे यांणीं उत्तर केलें कीं, "भाऊसाहेब, तुम्हीं हा चित्तांत अंदेशा काय आणिला? अशा समयास वडिलांस न लिहावें तर मग शत्रूस लिहावें कीं काय?" हें ऐकून मागती भाऊंनीं उत्तर केलें कीं, "जें दैवीं असेल तें होईल. अतःपर तुम्हीं पत्र लिहिण्याचे वाटेस न जावें." म्हणोन साफ सांगितलें. त्यांणींही मान्य केलें. पायांवर हात ठेविला कीं, "या उपरि आम्ही पत्र लिहिणार नाहीं."

११४. असो. या प्रकारें दिवसेंदिवस गनीम जेरीस येत चालिले आणि शत्रू भर घेत चालिले[५५]. जामदारखानियांतील पैसा[५६] कुल खालीं जाला. गोविंदपंत बुंदेले खजिना आणावयास बुंदेलखंडात पाठविले होते. त्यांणीं कांहीं दिवसगत लाविली. म्हणोन त्यांजवर कोपायमान होऊन ढालाईतें[५७] व दहा हजार रुपये मसाला[५८] करून पाठविले. मग गोविंदपंत बुंदेले वीस लक्ष रुपये घेऊन दिल्लीस आले. तो खजिना आणोन दिल्लीस टाकिला. परंतु लष्करांत पोंचेना. रुपयांचा तोटा आणि धारण पांच शेर, सात शेर जाहली. यत्न नाहीं. मग भाऊंनीं विचार केला कीं, "अंतरवेद्प्रांतीं फौजा पाठवून भागीरथीचे पुलावरून दुराणीस रस्त येती ती मना करावी." म्हणोन मनसबा करून गोविंदपंत बुंदेले व पारांजीपंत[५९] वाघ यांस हातरोखे[६०] वरचेवर पाठवून अति आग्रहें

५४. 'घेऊन' तुं० प्रत.

५५. याबद्दल क० प्रतींत आहे तें असें "आणि शत्रूची प्रबलता त्यास धान्यांचे वगैरे महामुरीमुळें होत चालली."

५६. 'रुपये फारिक' तुंगार प्रत. फारिक = खलास

५७. ढालाईत=ढाल बांधलेले शिपाई, परिचारक.

५८. मसाला, मोहसल् =पाठविलेल्या लोकांस त्या कामाबद्दल जो पैका घेण्याचा हक्क आहे तो पैका. दंडरूपच हा पैका कुळांकडून घ्यावयाचा

५९. "रामाजीपंत." क० प्रत म्हणते पण पुढें 'पाराजीपंत' असेंच लिहिते.

६०. हातरोखा = आज्ञापत्र, हातचें पत्र "हातचिठ्या पाठविल्या कीं, तुम्हीं फौजसुद्धां अंतरवेद् प्रांतीं जाऊन दुराणी वगैरे यांचे लष्करांत भागीरथीचे पुलावरून रस्त आणितात ती बंद करावी, असें लिहिलें असतां तें लक्ष न ठेवितां त्यास बुद्धी, पुढें होणार तशी वासना होती." क० प्रतींत हीं वाक्यें अधिक आहेत.

अंतरवेदींत घालविलें. गोविंदपंत यांचे आयुष्याची सीमा सरत आली. म्हणोन त्यांस तैशीच बुद्ध निर्माण जाली. तारखी पारखीनें[६१] राहावें तें न करितां मुक्काम करीत खंडण्या घेत चालिले.[६२]" ते जैता गुजर[६३] याणें तिकडील सूत्र ठीक करून गोविंदपंत यास खंडणीचे नादीं लावून गोंविलें. तों नजीबखान रोहिला याचा सासरा व[६४] दुंदेखान रोहिला व उमरावगीर सुजाउद्दौला याजकडील व अहमद-खान लंगडा याचा भाऊ ऐसे पंधरा हजार फौज निवड करून गोविंदपंत बुंदेले याजवर पाठविले. अविंधानीं मोंगलाई मसलत करून, होळकराचीं निशाणें लावून गेले. तों गोविंदपंत यांणीं दुरून पाहिलें. फौजेची गडबड जाली. जीनबंदी लोकांनीं केली. तों जात्या[६५] आपण उठेनात. ते लोकांस म्हणों लागले कीं, "नारो शंकर[६६] यांची फौज आली, निशाणें त्यांचीच आहेत." असें म्हणतात तों ते जवळ दम बांधून येऊन एकाएकींच यांजवर अविंधांनीं घोडे घातले. ते समयीं गोविंदपंत यांणीं गडबड करून पळों लागले. तों ते सर-मिसळ यांतच जाले. गोविंदपंत यांस घोड्यावर बसावयाचा सराव थोडकाच होता. कोस अदकोस पळाले तों गोविंदपंत बुंदेले घोडियावरून खालीं आले. ते वेळेस कोणी मातबर[६७] मनुष्य होते त्यांणीं दम बांधोन, घोडियावरून उड्या टाकून घोडियावर घातले. पुढें आणखी एक कोस पर्यंत सांभाळीत गेले. तों त्यांची दाटी भारी जाली. तमाम शिरें कापीत सुटले. तेवेळेस मागती गोविंद-पंत घोडियावरून खालीं आले. तेव्हां पाय जायां जाला. उठावयाचीही हिंमत हरली. लोकांस उडी टाकून काढावयासि अवसान[६८] पुरेनासें जालें. जवळ पुत्र होता तो टाकून गेला. तेथें दुसरियावरि शब्द काय ठेवावा? ते समयीं त्यांस

---

६१. तारखी पारखी=हुषारी, सावधपणा.

६२. 'चालिले' यापुढें सांगली व क० प्रती लिहितातः—" जयंता गुजर होता त्याजवरही खंडणीची जिकीर चालविली. त्याणें रोहिले व दुराणी यांजकडे सूत्र लावून बुंदेले खंडणीचे नादीं गुंतविले." इ०.

६३. जैतागुजर—पृष्ठ ६० पाहा. या गिराशानें मराठ्यांस भागीरथीस उतार दाखवून दिला होता. परंतु आतां तो मुसलमानांकडे सामील होऊन गोविंदरावाचा त्यानें नाश केला. तिकडील = रोहिले वगैरेकडील.

६४. 'व' क० प्रतींत नाहीं यावरून दुंदेखान हाच सासरा कीं काय? 'आताईखान यास पाठविलें.' ग्रां० डफ.

६५. जात्या=स्वतः, खुद्द आपण.

६६. 'निसबत होळकर' क० व सां० प्रती.

६७. मातबर=शूर, धीराचे सरदार.

६८. " काढावयाचीं अवसानं पुरेनाशीं जाहालीं " पु० प्रत.

गोविंदपंत पाडाव सांपडले. खांशांच्या गांठी पडल्या. त्यांस गोविंदपंत आजीज होऊन बहूतकरून काकुळतीस आले कीं, "मजला प्राण-दान देणें, क्रोड रुपये देतों" म्हणोन बोलिले. तेव्हां ते केवळ दैत्य, त्यास करुणा कैंची ? तात्काळ शिरच्छेद करून, धड तेथें टाकून शीर घेतलें. ते समयीं दीड हजार मराठियांचीं शिरें कापिलीं. 'मुरगी मारी बचडे दाणादाण' तैसे जिकडील तिकडे पळाले. मग त्यांणीं गोविंदपंत बुंदेले यांचें शीर घेऊन, आपले फौजेंत गेले. खान रोहिला याणें परम संतोष मानून, रुमालांत शीर घेऊन अबदुल अलीस नजर केलें. याप्रमाणें मित्रत्व गोविंदपंत यांचे कामास आलें.

११५. इकडे भाऊसाहेबांकडील वर्तमान तरि* लष्करांत महागाई झाली. भोंवताले गिलचे फिरों लागले. दाणापाणियाची रस्त फौजेंत पोंचेनाशी जाली. आणि जामदारखान्यांतील खजीना कुल खालीं जाला. अन्नदुष्काळ आणि दामदुष्काळ, दोन्हींस ऐक्य जालें. मनुष्यास अन्नाचें खोबरें जालें. दिवसामध्यें मनुष्यास अर्ध पाव भाकर मिळेनाशी जाली. तेथें हत्ती घोडे यांचा विचार काय पाहावा ? लष्कर केवळ जेरीस आलें. घोडे मनुष्यांची हिंमत हरली. तमाम फौजेंत निरवानिरव होऊं लागली. कोणास जगून जाऊं असा भरंवसा नाहींसा जाला. ते समयीं भाऊसाहेब यांणीं प्राणांतसमय जाणोन आपले जागां विस्मय करिते जाले कीं, "आम्ही गनीम, [आम्हीं] मोंगलाचें अन्नपाणी बंद करावें. तें न करितां आमचाच आटा बंद जाला. तेव्हां सर्व उपाय राहिला. देशींहून कोणी कुमक करावी, तेही आस्था राहिली. समागमें मुलें मनुष्यें आणिलीं एवढें वाईट केलें. असो. 'आप मेला जग बुडाला' ज्याचे दैवीं जें असेल तें घडेल" म्हणोन मनास चढ उतार करूं लागले. परंतू बाहेर व्यंगोक्ती शब्द बोलेनात. लष्करांत सोनियाचीं कडीं व रुप्याची जितकी चीजवस्त होती तितकी मोडून, एक टंकशाळा घालून, भाऊशाई व मल्हारशाई

६९. "मुरगी मारल्यावर बचड्यांची दाणादाण होते तशी फौज जिकडे तिकडे पळून गेली." क० प्रत.

७०. 'मित्रत्व कामास आलें' ही व्याजोक्ति नजीबखानाचा गोविंदरावानें पूर्वी बचाव केला होता ही गोष्ट ध्यानांत आणिली म्हणजे नीट समजेल. मागें पृष्ठ ५० कलम ५२ पाहा.

* 'गिलच्याचे परिवेष्ठनामुळें' असें येथें क० प्रत म्हणते.

७१. खोबरें जालें=खोबऱ्याप्रमाणें अन्न दुर्मिळ झालें ! असें म्हणण्याचा प्रघात प्रथमतः देशावर पडला असावा.

७२. 'अर्धपोटीं मिळेनाशी जाहाली.' पु० प्रत.

७३. 'साळ' तुं० प्रत. 'मोडून आटणी घालून' सां० प्रत.

जनकशाई तमाम मोहरा व रुपये केले. तरी पैसा पुरेनासा जाला. मोठ्या संकटें लमाणांची खेप आली तरि पांच शेर सात शेर धारण जो आधीं जाईल त्यास मात्र मिळत होती. नाहीं तर पैसा पदरीं असोन दाणा मिळेनासा जाला! ते समयीं जाट बरोबर असता तर अन्नपाणियाची कमती न पडती. दिल्लीस खजीना सरकारचा व शिंदे होळकर यांचा चाळीस लक्ष रुपये रोकड व शिवाय कापड होतें,[७४] परंतु लष्करांत पोंचेना.

११६. ते समयीं गोविंदपंत बुंदेले यांचा पुत्र व पाराजी वाघ असे भग्न फौज घेऊन दिल्लीस होते, त्यास भाऊंनीं रागास येऊन पत्रें लिहिलीं कीं, "खजीना घेऊन येणें." त्याजवरून पाराजीपंत यांणीं दीड हजार घोडा खासे खासे मनुष्य निवड करून घोड्यावर पांच[७५]शें रुपये ओझें घालून सूर्य अस्ताचे समयीं निघाले. ते कडनिकड करून कच्चे चाळीस कोस भुंई[७६] [चालून] चार घटिका रात्र आहे तों लष्करपासोन दोन कोसांवर दाखल जाहाले.तों तेच दिवशीं दुराणीची फौज जा[७७]गा सोडून दिल्लीचे रस्त्यावर येऊन राहिले होते.[७८] हें वर्तमान पाराजीपंत यांस ठाऊक नव्हतें. आणि येणें-जाणियास अनाभ्यासी होते. त्यांस लष्करनजीक येतांच असें भासलें कीं, लष्करा नजीक पोंचलों. म्हणोन आपण दूर उभे राहून गोठ कोणाचा म्हणोन पुसावयास पाठविलें. तो गोठ सुजाउद्दौला याचा होता. कोणाचा गोठ म्हणोन विचारतांच त्यांणीं कृत्रिम[७९]पण सांगितलें कीं, " गोठ इभ्रामखान गाडदी याचा आहे." असें ऐकतांच लोक [यांचे] केवळ थंडीनें हात पाय आंखडले होते. हिमालय नजीक यास्तव शीत[८०] भारी. पाणी गो[८१]ठतें. तेथें वरकड गोष्ट काय सांगावी? त्यांतही सावध पुरुष होते त्यांणीं दम राखोन [ते] दूर उभे राहिले. गुडगुडीचे तलबी होते

---

७४. येथें कल्याण प्रत म्हणते "सरकारचे व शिंदे होळकर यांचे कोट्यावधी रुपये रोख होते,परंतु लष्करांत कसे पोंचतात!"

७५. 'हजार' सां० प्रत.

७६. 'भोई' असा तुं० प्रतीचा पाठभेद जेथें तेथें असतो.

७७. 'यमुना सोडून' तुं० प्रत. 'फौजेची एक टोळी यमुना सोडून' सां० प्रत व क० प्रत.

७८. यापुढें क० प्रत म्हणते "इकडून दिल्लीकडून पाराजीपंत खजिना घेऊन येत होते. त्यांपैकीं बाराशेंस्वार नीटमार्गानें आले ते दुराणी जेथें उतरले होते त्यास्थळीं येऊन दाखल जाहाले. खजीना घेऊन स्वार आलेले त्यांस असें भासलें कीं आमचेंच लष्कर आहे. आणि चाळीस कोसांची मजल काढून थकोन उभे राहिले"

७९. 'लबाडी करून' तुं० प्रत.

८०. 'हिंव' तुं० प्रत.

८१. "पाणी गारठतें होतें" तुं० प्रत

त्यांनीं शेंपन्नास लोकांनीं घोड्यांवरून उतरून हातांत गुडगुड्या घेऊन त्यांचे गोठांत शिरले. तों एकदांच "लेंवें ! लेव!" म्हणोन पुकार जाहाला. जे घोडियावर सावध होते, ते निघोन गेले. आणि तलबे गुडगुडीचे होते ते त्यांजकडे तमाम हस्तगत जाहाले. त्यांत त्यांणीं एकास सोडिलें नाहीं. तमाम शिरें कापीत मारामार केली. त्यांचीं घोडीं व त्याजवरील खजीना झाडून घेतला. वरकड पाराजीपंत वाघ व तीनशें स्वार[८३] आड वाटेनें लष्करांत जाऊन पोंचले. बाराशें स्वारांचा ठिकाण पाडितात तों बातमी कळली कीं, ते त्यांचे कवेंत सांपडोन त्यांचें मुंडमोचन करून खजीना लुटून घेतला.

११७. त्याजवर तेच दिवशीं कचेरीस शिंदे, होळकर व दमाजी गायकवाड व आणखी थोर थोर सरदार होते. तों बळवंतराव गणपतराव यांणीं शिंदे होळकर यांजवर आरोप ठेवून कुरापत काढिली. बोलते जाले कीं, "शिंदे होळकर एवढे लँढते[८४] सरदार असतां त्यांची केवळ हिंमत हरली. वेजीं उतरलियाची[८५] गत अशी होऊन गेली. आम्ही हिंदुस्थानांत आलों या अर्थें[८६] ध्यानांत आणीनांत. असें दिसून आलें." या प्रकारें दुरोक्ति[८७] शब्द बोलिले. तें मल्हारराव यांणीं हास्य विनोदावर नेलें.[८८] तों जनकोजी शिंदे यांस [ती] गोष्ट साहिली नाहीं. भाऊसाहेब जवळ असतां ऐसा जाबसाल केला कीं, "बळवंतराव, तुम्हीं काय पाहिलें ? आमची हिंमत हरली [म्हणतां पण] तुम्हीं दिग्विजय कोणता केला ? असो. तुम्हांस आमचा तमाशा पाहाणें तर उदयीक आम्हीं युद्ध करितों." म्हणोन जिदेचा[८९] जाबसाल करून, ते समयींच मुजरा करून, उठोन चालिले. भाऊसाहेब यांणीं होकारून[९०] पाहिलें. तों यांस विषाद

---

८२. 'लवलव' पु० प्रत.

८३. "वाघ व लोक दोन कोस आड वाटेनें" तुं० प्रत. १०००।९०० स्वार पु० प्रत. 'पाराजीपंत तीनशेंहे स्वारानिशीं होते ते रात्रीच्या ठायीं रस्ता चुकोन आडमार्गे गेले होते ते मात्र आपले लष्करांत जाऊन पोंचले' क० प्रत.

८४. "एवढे एवढेसरदार" पुणें प्रत.

८५. "वेजीं उतरलियाची गत दिसोन आली "=जुने झाल्याची, पाणी उतरल्याची स्थिती दिसते. धो० प्रतीचा पाठ आहे तो असा "ओझें घेऊन वीस कोस माणूस चालून उगीच बसतें ती गत होऊन बसले." असाच पाठ क० प्रतीचाही आहे.

८६. ह्या अर्थे इ० = आम्ही आलों म्हणून मनावर घेत नाहींत.

८७. 'दुरोक्ति,' 'निरोत्तर' वगैरे अपपाठ पुणें व तुंगार प्रतींतील आहेत.

८८. "टाळून नेलें" पु० प्रत.

८९. जिदेचा = जिद्देचा=हटातटाचा, ईर्ष्येचा. 'ईरेचा.' क० प्रत.

९०. होकारणें = हो हो थांबा असें म्हणणें. "भाऊसाहेब यांणीं स्नेहानें बोलावूं पाठविलें तों मुजरा जाला आतां बसावयाचें नाहीं म्हणोन गेले. विचार पाहतां शिंदे यांस विषाद इ०" धो० प्रत.

प्राप्त होऊन, रागें संतप्त होऊन डेरियास आले. तमाम फौजेंतील सरदार बोलावून सांगितलें कीं, “यार[९१] हो, आतां जिद्देचा मजकूर आहे. मारतां मारतां मरावें हें उत्तम, परंतु वारंवार भग्न फौज घेऊन[९२] जाणें हें मूर्खपण.” म्हणोन फौज सावध करून प्रातःकाळीं चार घटिका रात्र आहे तों नगारा करून, जेवून खाऊन, दिवस उगवतांच खंदक सोडून बाहेर आले. मल्हारराव यांस सांगून पाठविलें कीं, “तुम्हीं फौज सिद्ध करून बाहेर निघावें.” मल्हारराव यांस भाऊसाहेबीं ताकीद केली होती कीं, “जनकोजी शिंदे हे मूल आहेत. त्यांणीं उतावळी केली. तरि त्यास काकुलपणें[९३] सांगून पाहावें आणि तुम्हीं न जावें” असें सांगितलें. त्यावरून त्यांस संकट प्राप्त जाहालें. आड-विहिर जाली. “आपण जावें तर भाऊसाहेब रागास येतील. न जावें तर पांढरे केसांस बोल लागेल.” असें जाणून खांसा आपण राहून, संताजी वाघ व गोविंदराव बुंदेले यांचा पुत्र व भोजराव बारगळ * असे पांच सात हजार फौज तयार करून एका बाजूस उभे राहिले. हें[९४] वर्तमान भाऊसाहेब यांणीं ऐकून बळवंतराव गणपत यांस आज्ञा केली कीं, “हुजुरातीची फौज सिद्ध करून, जनकोजी शिंदे यांची कुमक करावी. त्यांचे वडील आमचे सेवेवर कामास आले. तो वंश एवढाच राहिला आहे. तोहि तुम्हीं वचनानें पोळून इरेस घातला. हें उत्तम जाहालें नाहीं. सत्वर कुमक करणें[९५]” म्हणोन आज्ञा करून बळवंतराव गणपत तयार करून वाटेस लाविले.

११८. इकडे हें वर्तमान मोंगलास कळतांच, नजीबखान रोहिला व अहमदखान लंगडा पठाण व कांहीं सुजाउद्दौवला याजकडील फौज व कांहीं दुराणी-

---

९१-९१. ‘आतां दत्ताजी शिंदे यांचा मजकूर तोच आमचा. बळवंतराव गणपत कुरापतीनें भाषणें बोलतो त्यापेक्षां जिदीचा मजकूर आहे क० प्रत.

९२. ‘घेऊन जाऊन ब्राह्मणाकडून बोलून घेणें हा केवळ मूर्खपणा आहे’ सां० व क० प्रती.

९३. काकुलपणें=वडीलपणें. ‘माकुलपणें’ असेंही होईल.

* कदमबारगरकर, पाठ भेद.

९४. ‘हें वर्तमान’ म्ह० शिंदे लढाईस गेल्याचें क० प्रत.

९५. हें भाऊंचें बोलणें व करणें तुंगार प्रतींत मात्र नाहीं. नजरचुकीनें तें लिहावयाचें राहिलें असावें. कारण, पुढें बळवंतराव यांनीं शिंद्यास मदत केली नाहीं वगैरे मजकूर तींत आहे.

भाऊंच्या ह्या बोलण्यावरून पेशव्यांस सरदार लोकांचें ‘आगत्य’ होतें कीं नव्हतें हें स्पष्ट दिसतें. मागें पृष्ठ ९० टीप १२ पाहा.

कडील, असे निवडक फौज सिद्ध करून समागमें दहा पंधरा तोफा घेऊन आपली फौज सोडून एकांगीस[९६] यावें याजप्रमाणें बाहेर आले. उभयतां दळें सन्मुख दृष्टीस पडों लागलीं. आधीं दुरूनच तोफा व बाणाचा मार होऊं लागला. तिसरा प्रहरपर्यंत याजप्रमाणें झालें. तों होळकराकडील संताजी वाघ वगैरे यांणीं गनिमी काव्यानें त्यांजवर उठले. हुतुतूची घाई घडीभर जाली. तों त्याचे पाठीवर रोहिले व दुराणी बेलाशक उठले. ते समयीं संताजी वाघ यांणीं आपले बाजूस निघावें [तों] त्यांस दम पुरला नाहीं. शिंदे यांच्या फौजेचे आश्रयास आले. तों दुराणी व रोहिला, शिंदे यांचे फौजेवर आदळले. तो जनकोजी शिंदे आधींच इरेस पडले होते. ते समयीं त्यांणीं आपला नेम कीं फौजेंतून आधीं खुद्द खाशानीं उठोन हाणावें, उष्टे झुंजास शिवूं नये, ऐसा मजकूर होता; तो सर्वांचे अनुमतें सोडून[९७] फौजेचे पाठीवर खांसा आपण व तमाम लंबेचे[९८] खिजमतगार व जासूद व चोपदार व भालदार व कारकून यांणीं हातांत काठ्या घेऊन होळकरांची[९९] फौज हांकून घालविली. उभय दळें एकमेकांस आदळलीं. वरकड रिसालियाचा मार राहिला. तरवारीची खणाखणी जाहाली. पूर्वीं जैसे मारामारी रामायणीं राक्षस आणि वानर, किंवा भारतीं कौरव पांडव यांचें सैन्य, या प्रकारें समारंभ जाहाला. गनिमाचे फौजेंतील भले लोकांनीं तोंड माघारें केलें तरि काठी मारीत पुढें जावें तर शत्रू मारितात, माघारे फिरावें तर इकडील काठ्यांचा मार भडभडां अंगावर बसतो. शिपाई लोकांस 'एकीकडे आड एकीकडे विहीर' ऐसा प्रकार जाला. लोकांस 'लेजे दे दान लेजेदे प्राण' तैसें घडलें. दोन्हीही दळें हटेनात. उभयतां फौजेमध्यें अंतर[१००], हात थोडा दूर; त्यांत ज्यांस हिंमत त्यांणीं उठोन हाणावें. मोंगलांकडील विशेष चमत्कार वर्णावा तर त्यांचा सहजच स्वभाव, ते असुरेंच[१], परंतु मराठियांनीं ते दिवशीं शर्थ केली[२]. तों सायंकाळ होत आला. ते समयीं बळवंतराव गणपत यांणीं

९६. 'एकांतीस' तुं० प्रत 'एका अंगास' क० व धो० प्रती. एकांगीस येणें=ऐकीकडे स्वतंत्रपणें उभें राहणें.

९७. सोडून या शब्दापुढें सांगली प्रत म्हणते "होळकर यांचे व दुराणी यांचे फौजे मध्यें आपण खुद्द शिंदे हे जाऊन होळकर यांची फौज एकीकडे काढविली. तेव्हां शिंदे यांची फौज व दुराणीची एकमेकांवर आदळली."

९८. लंबेचे=निरोप पोंचविणारे.

९९. 'होळकरांची' हा शब्द पु० व तुं० प्रतींत नाहीं.

१००. 'पंचवीस हातांचे' क० व सां० प्रती.

१. 'ते प्रत्यक्ष असुरच' पाठांतर

२. 'मराठियांची शर्थ झाली' पाठांतर.

कुमक केली असती तरि तेच दिवशीं ताम्राचा पराभव जाला असता. बळवंतराव यांचे चित्तांतील मनसबा कीं, " शिंदे होळकराचे फौजेनें धास्त खादली आहे. दुराणीपुढें यांस दम निघणार नाहीं. " ही खातरजमा चित्तांत आणून आपले जागियावर तमाशा पाहात उभे राहिले. ही फौज नामोहरम जालियांवर आपण पुढें घोडे घालून मारामार करावी, या अर्थें दम खाऊन राहिले. तों ते दिवशीं शिंदे केवळ इरेस पडले. रण सोडून माघारे हटेनात. तों सायंकाळ व्हावयास आला. मग शिंदे यांजकडील फौजेनें गुरोंनें रेटावें तैसा मार देत देत [गिलचा] माघारा सारून त्याचे गोटांत घातला. त्याचे गोटाचा खंदक होता तेथपर्यंत घालवून तोफा देखील सोडविल्या. दोन चार ओढून आणिल्या. थोर तोफा ओढेनात त्यांचे कानियांत खिळे मारिले. तों केवळ अंधार पडला. मग जनकोजी शिंदे फौजेसह माघारे फिरले. पांच सातशें मनुष्य घोडे ठार पडले. तैसेच जायां जाले. ते दिवशीं रोहिले व दुराणी हजार संख्या मनुष्य ठार जाले.

**११९.** याप्रमाणें यश संपादून, धौंशा गाजवून, जनकोजी शिंदे शाहाजणें वाजवीत गोटास चालिले. ही बातमी क्षणक्षणां भाऊसाहेब यांजकडे खेळतच होती. तेव्हां खांसा स्वारी भाऊसाहेब आडवे आले. तों बळवंतरावही येऊन पोंचले. जनकोजी शिंदे यांजकडे बळवंतराव आले, तेसमयीं जनकोजी शिंदे

---

३. ही फौज = शिंद्याची. नामोहरम = पराभूत.

४. यापुढें " आपण त्याजवर उठावणी करून त्यांचा पराभव करून यश मिळवावें आणि खावंदाजवळ सर्फराज व्हावें म्हणोन मनांतील धर्म. परंतु 'मनसा चिंतयेत् कार्यं दैवमन्यच्च चिंतयेत्' तसा प्रकार जाहाला. शिंदे यांणीं बळवंतराव यांस भरकचेरीस बोलले होतें कीं, उद्यीक आम्ही युद्ध करितों, तमाशा आमचा पाहावा तो बळवंतराव यास दाखवून नखरा उतरोन टाकिला." अशीं क० प्रतींत वाक्यें आहेत.

५. " छातीनें रेटावें " सां० प्रत. " उतार व्हावा तैसा " तुं० प्रत.

६. "सायंकाळ जाला. मशाला लागल्या तेव्हां शिंदे यांणीं एक वेळ हर हर म्हणोन एकदांच उठावणी करून * * तसा मार देत देत त्यांचे गोटांत नेऊन घातले. तमाम लष्कर याचा कल्होळ होऊन तमाम बुणगे पळों लागले. तोफा शिंदे यांणीं सोडविल्या. तोफा भारी. माणसांनीं वाहेनात. तोफांचे बैल घेऊन गेले होते. * * अपरात्र जाली माणसास माणूस ओळखीनासें जालें. ते समयीं चार तोफा आणिल्या." धो० प्रतीचा पाठ. " त्यांचें छकड्यांचे कणे मोडून टाकून प्रहर रात्रीं " सां० प्रत.

७. यापुढें सां० प्रत व क० प्रती म्हणतात. "मोठे सन्मानें करून शिंदे यांस डेऱ्यास आणिलें. + + तुम्हीं शिंदे यांच्या वंशांत येऊन कुळाचा उद्धार केला. असें बहूत प्रकारें बोलून शिंदे यांचा गौरव केला. "

यांस क्रोधाचा आवेश येऊन गालि-प्रदानें केलीं कीं, " तुमचे चित्तांत आमची फजिती व्हावी असें होतें. परंतु ईश्वरसत्ता प्रमाण. आम्ही सेवेशीं चोर नव्हत. सेवेशीं चोर असतों तरि ईश्वर आम्हांस यश न देता. कौतुक तुमचे दृष्टीस पडतें. म्हणोन बोलतांच भाऊसाहेबीं त्यांस चार गोष्टी सांगून शांतवन केलें. डेरियापावेतों आले. समाधान करून भाऊसाहेब आपल्या डेरियास गेले. जनकोजी शिंदे यांजकडील भले मनुष्य ठार पडले होते.गोरंकपणेंचीं साहित्यें करून त्यांचीं सार्थकें केलीं. तों बळवंतराव गणपत यास वाईट वांटलें. " गोष्ट आपणाकडे आली. आमचा घात आम्हींच केला. करावयास गेलों एक आणि जाहालें एक." असें अवघड मानून स्तब्ध राहिले. इकडे दुराणी अबदुल अली व रोहिले व सुजाउद्दौला यांणीं हें युद्ध जालियावर शिकस्त खादली होती. आपले जागां मोंगल दगावले होते. त्यांतच [मराठ्यांनीं] कूच केलें असतें तर त्यांस गळां पडावयाचें सामर्थ्य नव्हतें. पुढील होणार भवितव्य. मागती दम खाऊन ठिकाणींच राहिले!

१२०. पुढें एक दोन दिवस जाहले तों इकडे गोविंदपंत बुंदेले यांचें शीर कापून नेलें होतें, [ तें ] शीर व वकील व पत्रें भाऊसाहेब यांजकडे पाठविलीं कीं, [१२]"तुमचे गोविंदपंत पुढें तुम्हांस स्वर्गीं जागा पाहावयास गेले आहेत. आणि तुम्हांस न्यावयासि शीर पाठविलें आहे. होय कीं न होय हें पाहावें." म्हणोन तें शीर व पत्रें भाऊसाहेब यांजकडे वकील घेऊन आले. रुमालांतून शीर पुढें ठेवून पत्रें हातीं दिलीं. भाऊसाहेबांहीं पत्रें वाचून पाहून त्यांतील गर्भभाव ध्यानांत आणिला. गोविंदपंत बुंदेले यांचें शीर ओळखिलें. ते समयीं कचेरीस लहान थोर सरदार होते त्यांच्या मुखश्रिया उतरल्या. तमाम लष्करांत खबर कळतांच फौज थोडी बहूत हिंमत धरून होती त्यांचीं अवसानें गेलीं. इकडे भाऊसाहेब यांणीं पत्राचें उत्तर दिलें कीं, " तो जागा सर्वत्रांचा आहे. त्याशिवाय दुसरी गती कोणती आहे ? प्रस्तूत तुम्ही थोर, खंदारचे पातशाहा, तुम्ही तेथें जाल तेव्हां तुमचे स्वरूपाप्रमाणें मान जाला पाहिजे. म्हणोन तुमचे मेजवानीचे तरतुदीस्तव-

---

८. ' केवळ ' पुणें प्रत.

९. मूळप्राती. मागें पृष्ठ १२३ टीप २० पाहा.

१०. 'वाईट भासलें,' तुं० प्रत.

११. दगावणें=नाश पावणें. हानी होणें. धास्ती खाणें. सांगली प्रत म्हणते " त्यांचे फौजेंत शिंदे यांचे धास्तीनें गलबल होऊन लुटालूट आपआपल्यांतच जाली. " क० प्रतही अशा प्रकारचाच मजकूर लिहिते.

१२. येथें सां० व क० प्रती म्हणतात " दुराणी यांणीं ' आपलें अवसान गेलें' असें गनीम मनांत आणतील यास्तव कल्पना करून दाचाचें पत्र व शीर वकिलाबरोबर पाठविलें "

पुढें गोविंदपंत बुंदेले साहित्यास गेले आहेत." म्हणोन उत्तर दिलें. शीर होतें तें ठेवून घेतलें. त्यास अन्न–प्रसाद दिला.

**१२१.** त्यास पंधरा वीस रोज जाले. लहान थोर म्हणूं लागले कीं, " शिंदे यांची कुमक बळवंतराव यांणीं केली असती [तर] गोष्ट फत्ते होती. कुमक न करून मसलत बुडविली." हें ऐकून बळवंतराव यांस आवेश आला. पृथक युद्ध करावें ऐसा चित्तांत मनसबा करून, भाऊसाहेबांकडे जाऊन अर्ज केला कीं, " शिंदे यांणीं युद्ध केल्यावर दुराणींनीं शिकस्त खादली होती. त्यास गोविंदपंत यांचें शीर कापून आणल्यावर मागती गिलचे शेर[१४] जाले. भोंवताले फिरों लागले. रस्तीं[१५] मना जाल्या. त्यांस आतां मजला आज्ञा करावी. मी हुजुरात घेऊन एक वेळ युद्ध करितों." म्हणून बहूतच अतिशय[१६] केला. भाऊसाहेब यांणीं दुराग्रह जाणून तमाम हुजुरात व लहान थोर सरदार यांसि आज्ञा केली कीं, "बळवंतराव जरीपटका घेऊन युद्धास जातात. तुम्हीं फौज सिद्ध करून युद्धास जाणें" म्हणून ताकीद जाली. तों वरकड सरदार बहूतकरून कोणी निघाले नाहींत. शिंदे होळकर मात्र इरेनें फौज सिद्ध करून ऐंके बाजूस[१७] उभे राहिले. बळवंतराव यांणीं हुजुरात सिद्ध करून गिलचांस[१८] चिठ्ठी पाठविली कीं, "आपण बाहेर निघालों." चित्तांत विचारणा केली कीं, " यश प्राप्त जालें तरिच भाऊंस तोंड दाखवावें, नाहीं तरि तिकडेच मरावें" अशी योजना करून, निदानसमय जाणून, बळवंतराव आपले कुटुंबांत गेले. समागमें स्त्री व मूल आपाराव होता. स्त्रीशीं जाऊन बोलिले कीं "ईश्वरें यश दिलें तरि उत्तम, नाहीं तरि पुन: तुमची आमची भेट स्वर्गीं होईल." म्हणोन डोळियांस पाणी आणून निरवानिरव केली. तों बळवंतराव यांची स्त्री महा-पतिव्रता होती. तिणें जाबसाल केला कीं, " उत्तम आहे. शत वर्षांत केंव्हां तरी मरावें, त्यास या समारंभांत मुक्तता जाली तरि उत्तम जालें. त्याची[१९] क्षीत कशास करावी?" म्हणोन समाधान करून बोलती जाली कीं, " तुम्ही लौकीक करून गेलां तरि

१३. 'हा घात बळवंतराव यांणीं केला' सां० प्रत.

१४. शेर ( वाघ ) = जबरदस्त.

१५. रस्त = धान्यादिकांचा पुरवठा.

१६. अतिशय=आग्रह, दुराग्रह.

१७. 'आपले बाजूस' पाठांतर.

१८. 'त्यांस' पाठभेद.

१९–१९. "केंव्हां तरी मरण आहेच हें जाणोन आतां स्वामिसेवेंत अशा समारंभानें थोर तीर्थस्नान जाहाल्यास इहलोकीं कीर्ती होऊन अंतीं परलोकीं स्वर्गप्राप्ती आहे. मृत्यूची क्षीत" इ० सां० प्रत लिहिते.

मीही वांचणार नाहीं. तुमची सांगातीण होईन." म्हणोन बोलिली. मागती बळवंतराव यांणीं उत्तर केलें कीं, "आपाराव मूल नेणतें आहे, समागमें येणें उचित नाहीं." हें ऐकून स्त्रीनें उत्तर दिलें कीं, "त्याचे प्रालब्धीं असेल तैसें घडेल, त्याची आस्था कशास पाहिजे?" म्हणोन परस्परें बोलून बाहेर आले.

१२२. [नंतर] नगारा करून, फौज सिद्ध करून, खंदक सोडून निघाले. तों दुराणी व रोहिले यांची फौज ते दिवशीं भारी चढून आली. बळवंतराव व गिलचे यांचे युद्धास तोंड लागलें. मोठा प्रलय जाला. इरेचें काम. बहूतच कडनिकड केली. परंतु रोहिले व दुराणी यांणीं केवळ आगीनें भाजून काढिले. धुराची व रेतीची व धुराळियाची गर्दी जाली. कोणास कांहीं दिसेनासें जालें. उभय दळांतील यंत्रांचा एकच भडिमार झाला. घोडीं मनुष्यें धुंद जालीं. तो प्रळय मराठियांस सोसेनासा जाला. गनीम गोटाचे सुमारें तडक पळों लागले. त्या धुरळियाचे गर्दींतें[२०] शिंदे होळकर यांस[२१] कांहीं दिसेनासें जालें. फौज पळोन धमधमियापावेतों[२२] आली. तों शिंदे होळकर यांजवर मागून उमाळ[२३] गोळया पडूं लागल्या. तों तशांत कांहीं वायू सुटला. त्यानें धुराळा मना जाला. पाहातात तों रोहिलियांचीं धमधमियाशीं निशाणें[२४] जाऊन पोंचलीं. धमधमियाशीं गेल्यावर बळवंतराव यांणीं तोंड काय दाखवावें, म्हणोन माघारे फिरोन मारामार केली. दुराणी व रोहिल्याचें तोंड थोपून राहिलें. तैसेच पळाले असते तरि दुराणी येऊन गोटांत शिरते. तशांत एकाएकींच बळवंतराव यांचे आयुष्याची दोरी स्वर्गींची तुटली. आयुष्याच्या संग्रह सरला म्हणोन कुटुंबाचा ऋणानुबंध पुरला. आयुष्याची मर्यादा जाली म्हणोन गोळी लागतांच घोडियावरच प्राण निघोन गेला. ठार होऊन घोडियाखालीं आले. तों दुराणीची गांठ पडली. त्यांणीं बळवंतराव यांचें शीर कापावयास उरावर पाय देऊन गळ्याची घाटी सोडविली. तों हें अनुचित पाहून खंडेराव नाईक निंबाळकर अकलूजकर[२५] यांणीं केवळ सती पडतात तैसेच त्या मुरद्यावर[२६] जाऊन वर्षले. शिपायगिरीची

२०. "धुरळियांत गर्दीत" पुणें प्रत.

२१. 'कांहीं काय होतें तें दिसलें नाहीं' तुं० प्रत.

२२. धमधमा– खंदकाच्या बाजूनें तोफा लावण्यासाठीं रचलेला मातीचा बांध, मोरचा.

२३. उमाळ-(अतिशय, वर्षाव) पुष्कळ ह्या अर्थी. "गोळ्यांचा उमाळ पडूं लागला" तुं० प्रत.

२४. 'निशाणें लालबुंद पाहिलीं.' क० प्रत.

२५. अकलूज सोलापूर जिल्ह्यांत आहे.

२६. 'शत्रूचे अंगावर पडोन' सां० प्रत.

शर्त करून मुरदा सोडविला. शीर कापूं दिलें नाहीं. निदान खानदान[27] मनुष्य याप्रमाणें कामास येतें. खंडेराव नाईक यांस जखमाही लागल्या, परंतु शीर कापूं दिलें नाहीं. असो. त्यांणीं क्षत्रधर्माची यथास्थित पुरवून दिली. तों धुरळियाची गर्दी निघून गेलियावर एकाएकींच रोहिल्यांचीं निशाणें धमधमियापाशीं आलीं [ होतीं ] तीं शिंदे होळकर यांचे दृष्टीस पडलीं. मग शिंदे होळकर यांणीं मध्यें बेलाशक घोडीं घालून अगदींच खांडावा तोडिला[28].पांच हजार रोहिला पाठीशीं सांपडला, तितका ठार मारून टाकिला. त्यांत एक खबर सांगावयास जाऊं दिला नाहीं. वरकड फौज दुराणीची निघोन गेली. पांच हजार मनुष्य त्यांजकडील ठार जाले. मुरद्यांवर मुरद्यांचे ढीग पडले. अशुद्धाचे प्रवाह चालिले. याप्रमाणें मोठें युद्धं होऊन शांत जालें.रोहिले व दुराणी आपले गोटास गेले. श्रीमंतांकडील भले लोकांचे मुरदे त्या मुरद्यांत सरमिसळ होते ते ओळखू न येत. प्रयत्नें हुडूकून काढून त्यांचीं सार्थकें केलीं. बळवंतराव यांचा मुडदा भाऊसाहेब यांणीं आणवून पाहून डोळ्यांस पाणी आणिलें. " बळवंतराव आम्हांस टाकून गेले." म्हणून बहूतच शोक केला. मुरदा डेरियास आणिला.

**१२३**. हें वर्तमान बळवंतराव यांची स्त्री डेरियांत[30] होती, तिनें ऐकून तैशीच बाहेर आली. मुडदा पाहून क्षणभर स्तब्ध होऊन बोलती जाली कीं, " राव आम्हांस टाकून गेले. अतएव अहेवपणें[31] हरलें. आतां आपण राहाणें उत्तम नाहीं." म्हणोन रूदन न करितां मुरदियापाशीं बैसली. बळवंतराव यांचें मुख अवलोकन करून, पूर्व सुख आठवून बोलों लागली कीं, "राव ! तुम्ही आम्हांवर कां रुसला ? आमचे हातचा विडा कां घेतं[32] नाहीं ? आम्हीं तुमचें काय केलें ? आम्हांशीं बोलून गेलिया एक प्रहर लोटला नाहीं ! ईश्वरें आम्हांस एवढें निर्वाण कां दाखविलें ? राव यांणीं सर्व संपत्तीची व आमची आस्था सोडून गेले[33] ! " तों जवळ पुत्र आपाराव बळवंत हे मूल होते. बारा वर्षे जालीं

---

२७. खानदान=कुलीन, कुलशीलयुक्त.

२८. यापुढें सां० प्रतींत असें आहे " त्यांचे फौजेचा गोठ होता त्यांत शिरून मारामारी करून गोठ दुभाग केला-त्यासमयीं पांचचार हजार रोहिला कापून काढला, " खांडावा = खांडकाम, तोड ! ' खडावा ' पु० प्रत.

२९. "सबेजंग, सफेजंग, सफेजंगी" पाटांतरें.

३०. " बाडांत " तुं० प्रत. बळवंतरावाच्या स्त्रीचें नांव लक्ष्मिबाई असें होतें.

३१. अहेवपण = अविधवापण = सुवासिनीत्व.

३२. ' घेतला नाहीं ' तुं० प्रत.

३३. " राव यांणीं माझा त्याग केला त्याचें मला दुःख नाहीं. कारण कीं त्यांनीं मला सोडिलें तरी मी त्यांस सोडीत नाहीं. परंतु राव तुमचा या मुलावर भारी लोभ असतां त्याचा त्याग कसा केलात ! असा शोक करीत आहे " अशी सां० प्रतींत अधिक वाक्यें आहेत.

होतीं. त्यांणीं मातुश्रीचे ओटींत शिरून दाढीवोटी[३४] धरून बोलूं लागले कीं, "आम्हांस सोडून राव निघोन गेले. आणि तुम्हीं समागमें सहगमन जाऊं म्हणतां तेव्हां आम्हीं अन्नपाणी कोणास मागावें? व कोणावर रुसावें?[३५]" असें ऐकून बाई बोलती जाली कीं, "बापा, तुम्हीं अन्नपाणी ईश्वराजवळ मागावें, आणि ईश्वरावरच रुसावें. आतां आम्हांस मिथ्या मायाजाळांत गोवूं नये." म्हणोन त्यांस ढकलून दिलें. तों भाऊसाहेब यांणीं येऊन बहूत प्रकारें बोध केला कीं, "पुत्र असतां जाणें उचित नाहीं. आपाराव आहे यास सवाई बळवंतराव करीन तरीच जन्मा आलियाचें सार्थक." म्हणोन समाधान करून बोलले. बाईनीं उत्तर केलें कीं,[३६] "मूल तुमच्या वोटींत आहे. कळेल तैसा परामर्ष करीत जावा. आम्हीं प्रपंचाचें रहस्य संपूर्ण अनुभवलें. आतां आस्था कांहीं राहिली नाहीं. यासमयीं आमचे मायबाप तुम्हीं होऊन आमची बोळवण करावी." म्हणोन निश्चयाचें उत्तर दिलें. मग भाऊसाहेबांनीं सहगमनाचें साहित्य यथास्थित करून उभयतां स्त्रीपुरुषांचें दहन केलें. मुलाकडून त्यांचे तेरा दिवसांचें सार्थक करून यथाविधी दान धर्म केलें.[३७]

**१२४.** याप्रमाणें बळवंतराव यांची समाप्ती जाल्यावर फौजेनें धास्त बहूत खादली. बाहेर कोणी निघेनासें जालें. दुराणी हगियांसि[३८] मारूं लागले. अन्न दृष्टीस पडेनासें जालें. मग तमाम लोक भाऊसाहेब यांचे डेरियास जाऊन अर्ज केला कीं, "भाऊसाहेब! आम्हांस रणांत मारावें, परंतु अन्नाविणें मारूं नये." असें बोलिल्यावर भाऊसाहेब यांणीं शिंदे होळकर व दमाजी गायकवाड व समशेर बहादर व विठ्ठल शिवदेव व अंताजी माणकेश्वर व यशवंतराव

---

३४. दाढी वोटी (होटी) धरून=लडिवाळपणें, काकुळतीस येऊन. 'हनुवटी धरून मुखाजवळ मुख नेऊन' सां० प्रत.

३५. यापुढें सां० प्रतीत लिहिलें आहे तें "माझें पोषण कोण करील! आणि जाऊन माघारीं केव्हां येशील! असें बालभाषण करून बोलत आहे हें ऐकून त्यास बोलली कीं बाळा तुझी आमची ताटातूट ईश्वरानें केली ++ असें बोलून पाठीवर हात फिरवून चुंबन देऊन मला आतां शिऊं नको म्हणून सांगितलें. परंतु वरचेवर आईचे गळां पडो लागला. ते समयीं आतां हें मायाजाळ कशास पाहिजे म्हणून हातानें पलीकडे ढकलून दिला."

३६. 'कीं' पुढें सां० प्रत म्हणते, "या देहास मुलाची थोडी काळजी होती तीही आपण बोललां यावरून तुटली."

३७. ही बळवंतरावाची व त्यांच्या धर्मपत्नीची हकिकत वाचून अंतःकरण पिळून जातें.

३८. 'हागायास देखील मारती [ल] असें दुराणी यांचें भय' सां० प्रत.

पवार व सोनजी भापकर व आणखीही कित्येक सरदार थोर थोर होते त्यांस बोलावून आणिलें. आणि एकत्र होऊन मनसबा केला कीं, "आतां कुजून मरावें हें ठीक नाहीं.[३९] गिलचे यांचें पारिपत्य करावें. गिलचांचें बळ दिवसें-दिवस बहूत होतच चालिलें. आणि आपलें लष्कर सडत[४०] चालिलें. घोडीं बहूत मेलीं. मातबर खांसा घोड्यामुळें पाय-उतारा जाली.[४१] यास्तव एक वेळ हा मुकाम सोडून बाहेर मोकळे रानीं निघोन जावें. दिल्लीचा[४२] रस्ता सोडून दुसरेकडून जावें तरि झाडी मातबर आहे, मार्ग नाहीं. तोफखाना निभावणार नाहीं. दिल्लीच्या रस्त्यानें जावयासि मार्ग उत्तम आहे. परंतु वाटेवरि गिलचे यांचा मुकाम राहिला आहे. ते जाऊं देणार नाहींत. यास्तव बंदोबस्तीनें निघोन जावें. यमुनेच्याच तीरीं येथून पांच कोसांवर जाऊन नदी पाठीशीं[४३] घ्यावी, पुढें गिलचांचे तोंडावर तोफखाना द्यावा, दिल्ली उजवे बाजूस राहून, दिल्लीहून सरंजाम आणवून सारें लष्कर आबाद करावें.[४४]" तेव्हां मल्हारजी होळकर बोलिले कीं, "गिलचा मार्गावरि असतां फार करून जावयास निभाव कैसा होईल?" तेव्हां निश्चय केला कीं, "कुल बुणगे सुद्धां झुंज देत, उडवीत, मारीत जावें. आणि पुढें मुकाम जाल्यावर चोहोंकडून सरंजामही येऊन पोंचेल. लष्कर अबादान जाल्यावरि पुनः गिलचाचें पारिपत्य करूं." हा सिद्धांत केला. तेव्हां जनकोजी शिंदे यांसि[४५] मल्हारराव यांणीं सांगितलें कीं, "निभाव जाला तरि हा विचार उत्तमच आहे. नाहीं तरि, निभाव न जाल्यास पुढें गत कैशी होईल? निघण्याचा विचार ठीक दिसत नाहीं." परंतु भाऊसाहेबांचा व सर्वत्र मुत्सद्दी व सरदार यांचा लहान थोरांचा आग्रह कीं, कूच करून दिल्लीच्या रोखें जावें. यास्तव उपाय राहिला. परंतु उद्यांच निघून जावें असें नाहीं. रविवारीं कूच करून जावें. तेव्हां भाऊसाहेब बोलले कीं, "आज मंगळवार आहे, रविवारास साहा दिवस अवकाश आहे. तोंपर्यंत लष्करचे लोक कितीक अन्नाविणें मरतील, कितीएक अन्नामुळें गिलचांचे लष्करांत जातील, मग जाऊन सार्थक काय?

---

३९. 'आतां कुजून मरूं नये. निघतां उत्तम 'पाठभेद.

४०. 'झडत' पाठांतर.

४१. म्हणजे मोठमोठे राऊत घोडे मेल्यामुळें अश्वरहित झाले.

४२-४२. 'दिल्लीचा रस्ता' पासून तो खालीं "हा विचार पुसला" इतका मजकूर तुं० प्रतींत नाहीं.

४३. 'पोटीं' क० प्रत.

४४. 'हा मुक्काम सोडावा आणि यमुना तीरीं करावा' असें येथें क० प्रतींत अधिक वाक्य आहे.

४५. 'शिंदे यांनीं मल्हारराव यास विचारिलें कीं' असा पाठ क० प्रतींत आहे.

इतके दिवस लष्करांत लोकांस धीर पुरवत नाहीं. यास्तव उदयीकच कूचकरून जावें. मरावें कीं, मारावें. हाच सिद्धांत उत्तम." यास्तव याप्रमाणें मनसबा ठरवून इभ्राहिमखान गाडदी यास बोलावूं पाठविलें. त्यासही हा विचार पुसेंला[४२] तों इभ्राहिमखान गाडदी यानें जाबसाल केला कीं, "भाऊसाहेब, तुम्हीं जे समयीं इकडे यावयाची मसलत केली, ते समयीं तुमचें आमचें इमान प्रमाण जाहालें तेंच करार आहे. आमचें गैरइमान असतें तरि आम्ही आजपर्यंत येथें तुम्हांपाशीं ठरतोंच नाँ[४६]. कधींच मुजरा करून जातों. तुम्हांस मिथ्या भासेल तरि प्रचीत दाखवितों." म्हणोन बोलोन दुराणी व नजीबखान रोहिला व सुजाउद्दौवला यांचीं पत्रें पंचवीस, त्या पत्रांवर त्यांचे शिक्के अशीं, दाखविलीं कीं, "तुम्हीं आम्ही एकजात आहों. यासमयीं आम्हांकडे यावें म्हणजे तुम्हांस पंचवीस लक्षांचा मुलूख देऊं. पातशाही उमरावी देतों." म्हणोन पत्रें दाखविलीं प्रविष्ट केलीं. भाऊंनीं वाचून पाहिलीं तेव्हां इभ्राहिमखान गाडदी याची निखालसता देखिली. उत्तर दिलें कीं, "तुमचें आमचें इमान आहे तेंच करार[४७] आहे. परंतु आतां दिल्लीस जाऊन पोंचावयाची मसलत कोणती करावी? निभावणी कैशी होईल? याची मसलत काय?" याप्रमाणें पुसतांच इभ्राहिमखान गाडदी याणें निरोत्तर केलें कीं, "तुम्ही गनीम लोक, तुम्हांस हिंमत पुरवणार नाहीं. तुम्ही आम्हांस घेऊन आलां ते आमची कांहीं निभावणी करावयाची दिसत नाहीं. रणांत आम्हांस सोडून जाल. आम्हांस मात्र मृत्यूनें गांठलें, हेंच खरें." असें ऐकून मागती भाऊसाहेबीं दुसरें इमान दिलें कीं, "तुम्हांस सोडून आम्ही कदापि जाणार नाहीं. तुम्ही जेथें गाडून[४८] उभे राहाल, तेथें आम्हीही कत्तल होऊन जाऊं. परंतु रणें[४९] सोडून जाऊं हें घडणार नाहीं." म्हणोन इमान प्रमाण दिलें. तेव्हां इभ्राहिमखान यांणें[५१] निखालसता मसलतें[५०] दिली कीं, "हरयत्नें

४२. पृष्ठ. १४१ टीप ४२ पाहा.

४६. "गैर-इमान असते तरि तुम्हीं आजपर्यंत येथें न ठरतां" पु० प्र० 'न ठरतों.' पाठभेद.

४७. करार=शाबूद.

४८. 'उडी टाकून' पाठभेद.

४९. "तुजला सोडून." "तूं जेथें × × उभा राहाशील तेथें" "असें एक वचनी पाठ तुं० प्रतीचे आहेत.

५०. "यानें आपले जमातींतील मोठे मोठे जमादार लोक यांस बोलला कीं हरएक यत्न करून दिल्लीस जाऊन पोचावयाची तजवीज कशी करावी जें सांगणें त्या रितीनें वर्तणूक करूं." असें वाक्य येथें क० प्रत देते. पण जमादारांचें उत्तर देत नाहीं.

५१. 'इभ्रामखान यार्णे व आणखी लहान थोर सरदार यांणीं' पुणें प्रत.

दिल्लीस पोंचावें हें खरेंच आहे. आतां जावयास उपाय सांगणें त्या रीतीनें वर्तील तर अवघेच पार पडून जाऊं. याची मसलत एक आहे कीं, देशी मोंगल निजाम अली नबाब तुम्हांशीं लढाई हमेशा करितो. त्याजप्रमाणें गोल बांधून मध्यें बुणगे घालावे. व भोंवताला आराबा वांटून द्यावा. चहूंकडे चार सरदार मातबर देऊन जिकडील तिकडे बाजवा वांटून द्याव्या. आणि कोस दोन कोस लढत भांडत दिल्लीस जाऊन पोंचावें." याप्रमाणें मसलत सांगितली ती सर्वत्रांचे चित्तासें आली.

**१२५.** याप्रमाणें निश्चय ठरल्यावर दुसरे दिवशीं तमाम फौजेस खर्चास दिलें. पहिल्यानें ज्यांस बाजारांत अन्न मिळालें, त्यांनीं आणिलें. ज्यांस अन्न न मिळे त्यांनीं मिठाया आणिल्या. निदान कोणी गूळ, खोबरें, खारीक, साकरही आणिली. वाणियाचे घरीं नाहींशी केली. फौजेंत तमाम निरवानिरव जाली. प्रहर रात्र पहांटेची उजेडावयाची राहिली तों कुचाचा नगारा जाला. तो दिवस शके १६८२ सोळाशें ब्यांयशीं, पौष शुद्ध ८ बुधवासर होतों[५३], विक्रमनाम संवत्सर होता. तमाम फौज सिद्ध होऊन बुणगे व फौज व तोफखाना बाहेर झाडून निघाला. तों सूर्योदय झाला. ते दिवशीं प्रातःकाळीं स्वारी तयार केली. भालदार चोपदार व कारकून[५४] जागां जागां सरदारांचे गोटास पाठविले कीं, "लौकर स्वार होऊन निशाणापाशीं यावें." याप्रमाणें सर्वत्रांस ताकीद करून खांसा आपण व विश्वासराव अंबारींत स्वार जाले. सौभाग्यवती पार्वतीबाई अंबारींत व नाना फडनवीस यांची मातुश्री व स्त्री अशा एक अंबारींत, पार्वतीबाईचे नजीक होतीं[५५]. आणि तोफखाना [व] इब्राहिमखान गाडदी [पुढें.] उजवे बाजूस शिंदे होळकर होते. डावे बाजूस दमाजी गायकवाड व यशवंतराव पवार व अंताजी माणकेश्वर व विठ्ठलराव शिवदेव व समशेर बहादर व आणखी लाहान

---

५२. ह्या मसलतीस काशीराजानें लिहिलेल्या फारशी बखरीचा किंवा इंग्रजी ग्रंथांचा आधार नाहीं.

५३. 'बुधवासर होता' हे शब्द तुं० व सां० प्रतींत नाहींत. ता० ७ जानुआरी सन १७६१ ग्रां० डफ. ता. १४ जानुआरी, १७६१ राजवाडे.

५४. 'सरकारकून' पु० प्रत.

५५. ह्या शब्दापुढें तुं० प्रतींत असें लिहिलें आहे:–"रात्रौ मनसबा केला होता जो तो राहिला. पुढें विनाशकाल आराबा मार्गे टाकून फौजा झाडून पुढें निघाल्या. उजवे बाजूस शिंदे होळकर होते." ह्या कलमाचे अखेरी पर्यंत मजकूर पुणें प्रतींतील होय. सांगली प्रतीचा पाठः- 'सर्वांनीं आराबा मार्गे ठेऊन निशाण सोडून घोडीदळ [घोडदळ] फौजे पुढें होऊन गोल मोडून फरा धरून उभे राहिले.'

थोर पथके डावे बाजूस[५६] होते. मध्यें आपण खांसे व हुजुरात होती. कितीएक पथके पिछाडीस बुणगे मध्यें घालून होते. याप्रमाणें नेमणूक करून, गोलाचा गोल, सात आठ घटका दिवस आल्यावर निशाणें हत्तीवर देऊन, नौबत चौघडा सुरू करून, भाराचा भार चालिले. दीड कोसावर जाऊन उभे राहिले. आणि तोफखान्यापैकीं मातबर मातबर तोफा निवड करून पुढें गिलचियाचे तोंडावर घातल्या. बाकीच्या हलक्या तोफा सभोंवत्या देऊन त्यांचे मागें गारदी यांचा रिसाला नेमून दिला. त्यांचे मागें सड्या फौजा, त्यांचे मागें बुणगे, त्यांचे मागें कांहीं सड्या फौजा, असे जिकडे तिकडे बंदोबस्त यथास्थित राखिले. आणि तळ सोडून दीड कोसावर जमाव सुद्धां आले. मागें तळावरील गाडे व छकडे आणि कितीएक सरंजाम न चाले, तो जाग्यावरिच टाकिला.

**१२६.** तिकडे मोंगलें[५७] आपले तळावरि तयार होऊन जमावसुद्धां आंवळून उभा राहिला. तों भाऊसाहेब यांणीं मसलत केली कीं, " आपण नीट चालून जावें. आम्हांस गिलचानें वाट देऊन एकीकडे बगलें[५८] मारून जाहला तरि यांसीं[५९] आपलें लढाईचें प्रयोजन नाहीं. आणि मार्ग मोकळा करीत नाहीं तरि मधींच घोडे घालून मारामार करीत उधळून[६०], मार देत, नीट निघोन जावें. " अशी मसलतें[६१] केली. रात्रीं मनसबा केला होता तो राहिलीं[६२] आणि पुढें होणार 'विनाशकालीं विपरीतबुद्धी' निर्माण जाली. तेसमयीं सर्वत्रांस सांगून आराबा अवघा मागें टाकून, निशाणें सोडून, फौजा पुढें चालिल्या. तेव्हां फौज जमूनही नव्हती. मुजऱ्यास धारसीं[६३] धरावा तैसा फरा बांधोन फौज उभी राहिली. तेसमयीं इब्राहिमखान गाडदी याणें हें पाहून चित्तांत विचारणा केली कीं, " रात्रौ भाऊसाहेब यांणीं मनसबा केला काय ? आणि कर्तव्य हें केलें काय ? असो. आतां

---

५६. पुढें काशीराजानें दिलेली व्यवस्था टीप ६९ मध्यें दिली आहे ती पाहा.

५७. ' दुराणी व रोहिले व सुजात उद्भवला ' क० प्रत.

५८. बगल मारून=एके बाजूस होऊन.

५९. धो० प्रतः- " त्याचें लढाईचें प्रयोजन एकंदर नाहीं. " ' त्याच्याशीं लढाई करण्याचें कारण नाहीं.' क० प्रत येथपासून तुंगार प्रतीच्या पाठांत अंतर फार येतें. बहुधा मधील मधील मजकूर गाळलेला आहे व कोठें कोठें मागें पुढें झालेला आहे.

६०. " उधळून यावें आणि आपण मार्गानें निघून जावें " सा ० व क ० प्रती.

६१ 'अशी मसलत रात्रौ केली होती एकीकडेच राहून' क० प्रत.

६२. मागें टीप ५५ पाहा.

६३ धारसा = कड, धार. ! ' फरा ' क ० प्रत.

मसलतीस धक्का पुरता बसला. उपाय अवघाच राहिला. भाऊसाहेबांच्या बोलण्याची शाश्वती पुरती समजली. असो. आम्हीं भाऊसाहेब यांस इमान दिलें आहे. त्यापेक्षां आतां मागें पुढें पहावें तरि आपले पूर्वजांस बोल लागेल. भाऊसाहेब जें करतील, त्यास सादर न होतां गत तर नाहीं. दैवीं असेल तैसें घडेल. परंतु रणांत विन्मुख व्हावयाचें नाहीं. असो, आपले आयुष्याची सीमा होऊन शंभर वर्षें आतांच पूर्ण भरलीं, हें खरें. आतां " आपले बळें घालावी कास, कोणाची न धरावी आस, तैसें घडलें." इब्राहिमखान गारदी याणें आराबा सोडून तोही डावे बाजूस आला. बुणगे व तोफखाना झाडून मागें मोकळा राहिला.

१२७. इकडे झाडून मोंगलें[६४] तयार होऊन तोही युद्धास उभा राहिला. तेसमयीं अबदुल अलीकडील वकील भाऊंकडे आले. " आजचे दिवस झुंजास तहकुंबी[६५] करावी, सल्ल्याचें बोलून ठीक करितों. उतावळी न करणें. " म्हणोन बोलले. भाऊसाहेबीं त्यांस धिःकार करून माघारें लाविलें[६६]. परस्परें गोळागोळीस तोंड लागलें. त्यांजकडील तीनशें तोफा व गनिमांकडील दोनशें तोफा, एकदांच सरबत्ती झाली. शिवाय धाकटीं यंत्रें, हस्तनाला व सुतरनाला व जेजाला व बंदुका व रेकले ह्यांस गणित नाहीं. मोठीशी गर्दी होऊन गेली. धुराचे गर्दीनें सूर्यबिंब आच्छादिलें. कोणाची खबर कोणास नाहींशी जाली. त्यांत शूर होते त्यांस वीरश्रिया आल्या. भ्याड होते त्यांस ऐसें जालें कीं, 'धरणी माय दे ठाय[६७]' तैसें जालें. धडाकियाखालीं घोडे मनुष्यें धुंद जालीं. रणतुरें व रणभेरी व आराबियाचीं वाद्यें यांचा एकदांच कल्होळ जाला. उभय दळें मिळतीं जालीं. तों हुजरातीची फौज, बहूत दिवसांचे खानदान[६८] लोक होते, त्यांणीं कृत-संकल्प केला कीं, "बहूत दिवस यांचें अन्न भक्षिलें आहे. त्याची उत्तीर्णता आज आहे." म्हणोन त्यांजवरि हुजरातीनें कडनिकड करून घोडे घातले. झुंजास तोंड

६४. 'दुराणी' क० प्रत.

६५. 'महकुबी' क० प्रत.

६६. या गोष्टीशीं इंग्रजी ग्रंथांचा अगर काशिराजाचे बखरीचा मेळ पडत नाहीं. उलटें त्या ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं, भाऊंनींच शेवटली चिटी सुजाउद्दवला याजकडे पाठविली कीं, 'भांडें पूर्ण भरलें. एक बिंदूही जास्त राहूं शकत नाहीं. सल्याचें काय करणें असेल तें आतां करा. अगर नाहीं म्हणून साफ सांगा.'

६७. "दे माय धरणी ठाय" क० प्रत.

६८. खानदान=कुलीन, मोठ्या कुळांत जन्मलेले.

लावून घाव केलीं, क्षणभर हुतुतूं[70] सारिखे त्यांस मोडूनही घालविलें. एक वेळ यांसही मोडून ते माघारें घालवीत. अशा पांच सात हिराहिऱ्यॉं[71] जाल्या. तों विठल शिवदेव व यशवंतराव पवार कॉंहींसें[72] पुढें वाढूनं[73] गेले. त्यांजवर झुंज पडलें. तेव्हां हे कच खाऊनं[74] माघारे तोफखान्यांत येऊन उभे राहिले. दमाजी गायकवाड यांजवर गिलच्यांनीं येऊन नेट बसविला. तेही माघारे येऊन उभे राहिले. मुकामीं गोटाचा गोट येऊन उभा राहिला होता, त्याप्रमाणें पथकें उभीं होतीं.[75] त्यांजवर खांसा अबदुल अली त्या झुंजावरि डावे बाजूस होतीं[76], त्यानें झुंज भारी केलें. कुल भाऊसाहेब यांजकडील पथकें माघारीं फिरविलीं. हलके बहूत जाले. इभ्राहिमखान गाडदी याजवर खांसा दुराणी व रोहिला याणीं

६९. लढाईच्या वेळीं दोन्ही फौजांची व्यवस्था खालीं लिहिल्याप्रमाणें होती म्हणून काशिराज म्हणतो. रा० रा० चिं० वि० वैद्य यांनीं तयार केलेला नकाशा शेवटीं देऊं.

अहमदशहाचा तंबू.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बरखुरदार खान. | अमीर बेग खान. | दुंदे-खान रोहिला | हाफीज रहिमत खान. | अहमद खान बंगश. | दुराणी वजीरशाहा वलीखान. | सुजाउद्दौला. | नजीबखान रोहिला. | शाहापसंदखान. |

दुराणी तोफखाना.

[ उत्तर ] मधील मैदान [ दक्षिण ]

मराठी तोफखाना.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| इभ्रामखान गारदी. | दमाजी गायकवाड. | विठ्ठल शिवदेव | भाऊसाहेब व विश्वासराव | यशवंतराव पवार. | समशेर बहादर | मल्हारराव होळकर. | जनकोजी शिंदे. |

मराठ्यांचा गोट.

७०. हुतुतू सारखें = सपाट्यासरसें. 'रगडून माघारे' क० प्रत.

७१. हिरिहिऱ्या=वेगानें, त्वेषानें केलेल्या उठावण्या किंवा हल्ले. 'हिराऱ्या' क० प्रत.

७२. 'के सी चे' क० प्रत.

७३. वाढून गेले = पुढें गेले, चालून गेले.

७४. 'क स्क रा नें' पु० प्रत.

७५. क० प्रत म्हणते 'मुकामीं गोटाचे गोट राहातात तशीं पथकें उभीं राहिलीं होतीं.'

७६. " खांसा अबदाली कांहीं फौजेनिशीं मागें राहून पुढील लढत्या फौजेची व्यवस्था करीत होता. बारावर एक वाजतां मराठ्यांच्या ऐन जयाच्या वेळीं त्यानें जागजागीं मदत पाठविली व पळोन आलेल्या आपल्या शिपायांस पुनः लढण्यास हांकून लाविलें. ह्या व्यवस्थेमुळेंच दुराणीस ह्या दिवशीं यश आलें." असें काशीराजाचें म्हणणें आहे.

चालून घेतलें. यांची[७७] एक रंजक उडाली. दुराणीकडील लोक बहूत पडले. परंतु जाग्यावरून हालले नाहींत. तैसेच नेट धरून मारीत आले. आणि इभ्राहिमखान गाडदी याजवरि चालोन आले. इभ्राहिमखान गाडदी याजवरिच पडले. कुमक कोणींच केली[७८] नाहीं. तथापि संभाळून येऊन हुजरातीचे लोक व आपण एक होऊन संधान साधिलें. तोफाही सुटत होत्या. लढाई मना जाली नव्हती. मातबर एक प्रहरपर्यंत लढाई केली.

**१२८.** इकडे उजवे बाजूस शिंदे होळकर होते. यांजवरि सुजाउद्दौला वगैरे यांणीं येऊन झुंज दिलें. झुंज मातबर होऊं लागलें. मध्यें भाऊसाहेब व विश्वासरावसाहेब अंबारींत होते. ते उतरून घोडियांवर स्वार जाले. भाऊसाहेब बोर घोडीवर[७९] व रावसाहेब पीलबाला घोडा याजवरि स्वार जाले. चहूंकडून[८०] संभाळून होते. झुंजाचें तोंड भारी लागलें. मारामारी होतच आहे. मातबरच खांसे हुजरातींतील पडों लागले. तेसमयीं विश्वासराव हुजरातीच्या लोकांत येऊन त्यांनीं घोडे घातले आणि घाँव केला. तों ईश्वरी क्षोभ जाला. एकाएकींच छातीमध्यें गोळी[८२] लागून विश्वासराव ठार[८३] जाले. नानासाहेबांचें निधान हरपलें. लोकांनीं कडनिकड करून मुर्दा अंबारींत घातला. आणि वरती शालजोडी घातली. हें वर्तमान भाऊसाहेबांनीं पाहून अवसान सोडिलें. बहुतसा विलाप करूं लागले. मग त्या त्वेषानें भाऊसाहेबांनीं निश्चय केला कीं, या उपरि गिलचा खाशानिशीं मारीन. म्हणोन लोकांस ताकीद केली. आणि

---

७७. म्ह० गाडदी लोकांची.

७८. दमाजी गाईकवाड यांची मदत इभ्रामखानास फार झाली, असें ग्रांट डफ म्हणतो.

७९. "हर घोडीवर व रावसाहेब पिल्या घोड्यावर" धो० प्रत. पीलबाला=हत्तीच्या बांध्याचा. बोर=काळसर तांबड्या रंगाची. 'दिलपाक घोड्यावर' क० प्रत.

८०. 'चहूंकडून खाशांस' क० प्रत.

८१. 'आपला घोडा उठवून शत्रूचे फौजेंत तलवार चालविली' सां ० प्रत.

८२. तोफेचा गोळा' क० प्रत.

८३. दुपारीं १२ वाजतांचे सुमारास भाऊंनीं दुराणी वजिरास मागें हटविलें. त्याचे लोक पळून जाऊन त्याचा अगदीं मोड झाला होता. अशा समयांत अबदालीनें वजिरास मदत करण्याकरितां पाठविलेली १०००० स्वारांची मांडची मांड भरधांव भाऊ व विश्वासराव यांजवर पडली, त्यावेळीं जी हातघाईची लढाई झाली तींत विश्वासराव जखमी होऊन घोड्याखालीं आला. काशिराज म्हणतो गोळीची जखम नव्हती.मानेवर तलवारीची व डावे डोळ्याचे वरचे बाजूस तिराची अशा दोन जखमा होत्या.

झुंज केलें. हाणा ! हाणा ! असें मुखें बोलोन बरोबर समशेर बहादर घेऊन पुढें जाले. आणि तीन वेळ हत्यार केलें. त्या इरेनें लोकांनीं हिंमत धरून, भाऊसाहेबांबरोबर पुढें सरसावून, शिपायगिरी बहूत केली.[८४] दुराणी व रोहिला माघारां फिरविला. अबदुल अली पळोन नदीतीरास गेलों. शर्थ जाली.

१२९. पुढें [ असें जालें. ] विठ्ठलराव शिवदेव[८६] यांणीं पेशजी गिलचे चाकर ठेविले होते. ते दोन हजार होते. त्यासमयीं त्यांस इशारतीस भगवा पटका दिला होता. तो डोईस बांधून फिरत होते. तेसमयीं विश्वासराव पडले ही खबर बुणगियांत आली. त्याजमुळें बुणगे व लष्कर गडबडलेंच होतें. गिलचे चाकर यांनीं भगवा पटका टाकून दिला, आणि बुणगियांत आवई घातली आणि लुटूं लागले. बुणग्यानें पळ काढिला. बुणगें पळतें हें पाहून विठ्ठल शिवदेव यांणींही पळ काढिला. आधींच विश्वासराव यांचें वर्तमान ऐकून दहशत खादली होती. कोणी दम धरून बुणग्यांत राहीनासें जालें. [ गिलचे चाकर यांणीं ] लुटीची आवई घातली आणि धुमाळी मांडिली.

१३०. इकडे भाऊसाहेबांकडे युद्ध होतच होतें. भाऊसाहेब यांची स्त्री पार्वतीबाई तेथें अंबारींत होतीं[८९]. अंबारीस अंबारी तटली होती. युद्धाचे धुंदींत घाबरी होऊन अवघें लक्ष पुढेंच होतें. तों एकाएकींच मुर्दा अंबारींत पाहिला. आणि बाईनें माहातास पुसलें कीं, " मुर्दा कोणाचा आहे ? " त्याणें उत्तर केलें कीं, " विश्वासरावसाहेब ठार जाले ! " खवासखान्यांत खिजमतगार

८४. "लढण्याची शर्थ केली. त्या शर्थीस उपमाच नाहीं. मर्दुमकी किती वर्णावी !" अशीं वाक्यें क० प्रतींत अधिक आहेत.

८५. वर पृष्ठ १४६ टीप ७६ पाहा. वजिरास हटविलें. खुद्द अहमदशाहा मागेंच होता, असें काशिराज म्हणतो.

८६. 'भाऊसाहेबांनीं' असें एक प्रत म्हणते. 'बुणगे' असा शब्द 'यांणीं' व 'पेशजी' यांच्यामध्यें पुणें प्रत देते.

८७. गिलचे लोकांची एक टोळी मराठ्यांच्या तोफखान्याकडे होती. त्या लोकांनीं आपल्या देशाचे लोकांबरोबर लढण्याचें नाकारून आम्हांस रजा द्यावी म्हणून भाऊंस विनंती केली, व त्याप्रमाणें त्यांस पूर्वींच फौजेंतून लावून दिलें होतें, असें ग्रांट डफ म्हणतात.

८८. 'गिलचे आले म्हणून पुकारा करून आपणच लुटूं लागले' सां० व कल्याण प्रती.

८९. "तों विश्वासरावसाहेब यांचे मुरद्याची अंबारी बाजूस होती ती फौजेचे हेलाव्या मुळें हेलावे खात खात बाईचे अंबारीशीं येऊन भिडली" असा मजकूर क० प्रतींत आहे.

होता, त्यास सांगोन तोंड उघडून पाहिलें. तों रावसाहेब मृत्यु पावले हें देखिलें. पार्वतीबाईनीं पाहून ऊर कपाळ बडविलें. शंखध्वनी केली. आणि बोलती जाली कीं, "ईश्वरा ! आम्हांस एवढें निर्वाण कां दाखविलें ? रावसाहेबां-सारिखें रत्न हरपोन गेलें !" म्हणोन बहूतच शोक करिती जाली. तों जवळ नाना फडणीस यांची मातुश्री होती तिणें शांत केली कीं, " बाई ! रडें ईश्वरें ओढूनच आणिलें आहे. एवढ्यावरच मुक्त जालां असा अर्थ नाहीं. अजूनही सर्वत्र महा अनर्थापात आहे. यांत ईश्वर पार पाडील तर बरें, नाहीं तर रडें लागलेंच आहे.[९२] तों पावेतों दम खावा. " म्हणोन शांत केली.

**१३१.** इकडे हुजरातीनें व इब्राहिमखान गाडदी याणें कडनिकड करून, एक वेळ दुराणीस मोडून त्याचे जाग्या पावेतों तुडवीत तुडवींत गेले. तेसमयीं अबदुलअली दुराणी केवळ नामर्द, यमुना-तीरानें दोन कोस पळाले. हें नजीब-खान याणें ऐकून व पाहून दातानें ओंठ चावून हवदियांतून पायउतारा जाला. तैसाच दुंदेखान रोहिला व अहमद लंगडा असे पाय उतारा जाले. आणि शिंदे होळकर हे उजवे बाजूस आहेत, ऐशी बातमी आणून, त्यांस सोडून डावे बाजूस चालोन घेतलें.[९३] आधीं तोंड समशेर बहादर याजर बसविले. तेसमयीं समशेर बहादर याणें मारामारी बहूत केली.[९४] तों फौजेनें हातच सोडिले. आंगें पाहिजे तितकी केली. आंगावर जखमाही बहूत चढल्या. परंतु फौज फुटून गेली. तैसेंच अनुक्रमें दमाजी गायकवाड यांजवरी तोंड बसविलें. त्यांणींही क्षणभर मारामारी केली. परंतु तेही बाजूस निघाले. तैसेच विठ्ठल शिवदेव व अंताजी

---

९०. 'शालजोडी तोंडावरील काढ-विली' क० प्रत.

९१. भाऊंस अपत्य नसल्यामुळें म्हणा किंवा दुसरे कांहीं कारणानें म्हणा त्यांची ममता विश्वासरावावर व माधवरावावर कांहीं विलक्षण होती. दोन्ही मुलांस कार-भारांत व मुलुखगिरींत आपणाबरोबर घेऊन, त्यांस उत्तम प्रकारें शिक्षण देऊन राज्याधिकार चालविण्यास त्यांणीं योग्य केलें होतें. पार्वतीबाईचीही ममता नानांचे मुलांवर फार होती. पुढें नारायण-रावावर तर अतोनातच बसली. मुलांचेंही वर्तन तदनुरूप दृष्टीस पडतें. विश्वास-रावाचें नानांस पत्र व भाऊंनीं त्याबद्दल दोष दिला तेव्हांची त्याची वर्तणूक पाहा.

९२. "पार पाडील तर मग रडें लाग-लेंच आहे" पु० प्र०.

९३. ह्या हकिकतींत व काशिराजाच्या वर्णनांत फारच फरक आहे.

९४. "समशेर बहादूर यानें मार बहूत देऊन तोफा त्यांजपासून पाडाव करून घेतल्या. अशी फारच मरदुमी केली—आंगावर जखमा " इ० सां० व क० प्रती.

माणकेश्वर व यशवंतराव पवार यांजवरि येऊन वर्षले. तेव्हां त्यांणींही करावयाची तितकी बहूतच केली. परंतु फौज जमून नाहीं. यास्तव सर्वांचेच उपाय राहिले. पवार यांचें मुंडमोचन करून इभ्रामखान गाडदी याजवर तोंड लाविलें.

१३२. इकडे भाऊसाहेबांकडे लढाई होतच होती. होतां होतां मारामारी खणाखणी जाहाली. येसमयीं विश्वासरावसाहेब यांचें वर्तमान ऐकून जनकोजी शिंदे व तुकोजी शिंदे यांणीं मारामारी करीत [ते] भाऊसाहेबांपाशीं आले. तों इभ्राहिमखान गाडदी याजवरि [ रोहिले ] येऊन पडले. त्याणें जिवाचा निधँडा[९५] करून तटून उभा राहिला. शिपायगिरी म्हणावी तैशी केली. कितेक गाडदी खेतांस[९६] आले. परंतु कुमक कोणाची जाली नाहीं. मग एके क्षणांत पांच हजार गाडदी ठार जाले[९७]. होते कीं नव्हते असे केले. हुजरातीचे लोक जवळ होते ते पळों लागले. गाडदी ठार झाल्यामुळें तोफखाना बंद जाला. जातीनिशीं शिकस्त त्याणें पुरती केली. जाऊन गिलचाच्या लष्करांत मिसळलें[९८]. आणि दाहा पांच नामांकित सरदार दुराणीचे मारून ठार केले. इतरांची गणतीच नाहीं. भोंवताला वेढा गिलचे यांचा पडला. इभ्रामखान यांचे आंगावरि जखमा भारी चढल्या. दुराणी पळोन गेले होते ते माघारे आले[९९]. गाडदी यांचे मुर्दाचे ढीग पडले. इभ्रामखान गाडदी याचा पुत्र व भाचा होता तो ठार जाला. खांसा इभ्रामखान गाडदीही रणांत घायाळ जाला. असें असतां लढतच होता. यत्न चालेना तेव्हां हत्यार राहिलें. मग दुराणी यांनीं धरून नेला.

१३३. हें वर्तमान भाऊसाहेबांस कळलें. चोहोंकडून प्रळय एकदांच जाला. मोठी धुंदी जाली. यशवंतराव पवारही ठार जाले. कोणास कोणी पुसेनासें जालें. जाग्यावरच इभ्रामखान गाडदी होता कीं नव्हता[१००] असें जाहालें. इकडे मल्हारराव होळकर यांचे बाजूनें[१] झुंज मातबर जालें. रेटत नाहींसें जालें, तेव्हां तेही बाजू सोडून निघाले. मग केवळ तोंड हुजरातीवर बसविलें. ते समयीं

---

९५. निधडा = निश्चय, पक्केपणा. 'निराशा' क० प्रत.

९६. खेतास येणें = प्रेतें होऊन पडणें, मरणें.

९७. 'ऐसें ऐकून दुराणी पळून गेला होता तोही माघारा आला' असें वाक्य तुं० प्रत येथें देते.

९८. यापुढें क० प्र० म्हणते "इभ्रामखान गारदी व कांहीं लोक असे गोलचागोल जाऊन गिलचाच्या लष्करांत मिसळले."

९९. पृष्ठ १४६।१४७ टीप ७६ व ८३ पाहा.

१००. 'होता तो कांहीं नाहींसा झाला' पुणें प्रत.

१. 'बाजूनें' ऐवजीं 'बाजू वरि' असा पाठ पु० व क० प्रतींचा दोन तीनदा आलेला आहे.

हुजरातीनें जितकी शर्थ करावी तितकी केली. जेथून मराठियांचें राज्य जालें ते दिवसापासून झुंजें होत आलीं; परंतु याप्रमाणें मराठे कधीं झुंजले नव्हते. भाऊसाहेब यांणीं नांवनिशीवार असाम्या हटकून घालविल्या[3]. आणि आपणही खांसा अगोदरच घोडियावर स्वार जाले होते. विश्वासराव ठार जाले, त्यापेक्षां आतां नानासाहेबांस तोंड काय दाखवावें ? म्हणोन शोकांतच होते. तों अवघा मार भाऊसाहेबांवर येऊन पडला. तरवारीची खणाखणी जाली. डुकर खळीस येतो तैसा प्रकार जाला[4]. भाऊसाहेब लोकांत गर्द जाल्यावर घोडीं मनुष्यांनीं खंदक भरला. माणसें दिशाभूल जालीं. कोणीकडे पळावयाचें हें सुचेनासें जालें. तों तिसरा प्रहर जाला.

१३४. उपरांतिक चार घटकांपर्यंत भाऊसाहेबांनीं हुजरातीनिशीं मारामार केली. परंतु डावे बाजूनें हातच सोडिले. आभाळ फाटलें. तेथें ठिगळ कोठवर लावावें ? मग भाऊसाहेब घोडियावरून पायउतारा जाले. भाऊसाहेब यांचे तोंडास हाणा ! हाणा ! हेंच करीत असतां खरस[6] आली. जातीनिशीं मोठा हिया करून बहूत झुंजले तें कोठवर लिहावें ? सरकारचे मुत्सद्दी मातबर तमाम एकीकडे कुल पळून गेले. तेसमयीं सोनजी भापकर यांस भाऊसाहेब बोलिले कीं, "सोनजीबाबा, यासमयीं निघावयाचें नव्हतें. तुमचा भरंवसा बहूत धरिला होता." तेव्हां [सोनजी] बोलिले कीं, "लोक पळतात त्यांस माघारे फिरावितों. साहेबांस टाकून आम्हीं कोठें जावें ? " असें बोलून लोक फिरवावयास म्हणोन गेले, ते तिकडेच गेले ! तेव्हां तुकोजी शिंदे म्हणो लागले कीं, "महाराज, क्षत्रधर्माची शर्थ जाली. चोहींकडून आभाळ फाटलें[7]. या उपरि निघावें यांत उत्तम आहे." तेव्हां भाऊसाहेबांनीं उत्तर केलें कीं, "तुकोजीबाबा, आतां कोणीकडे जावें ? काय तोंड नानासाहेब यांस दाखवावें ? रावसाहेबांची गत काय जाली

---

२. यापुढें क० प्रतींत "परंतु ईश्वर सहानुकूल नाहीं, तेव्हां करतात काय ! ईश्वर सहानकूल होता तर विप्रीतः सुप्रितो भवेत" असें आहे.

३. घालविल्या लढाईवर.

४. "डुकर खळीस येतो आणि खवळून उभा राहातो तसे राहोन युद्धाचा प्रसंग चालविला होता. भाऊसाहेब लोकांत गर्द होऊन राहिलेवर घोडी मनुष्यें सर्व खपलीं" अशीं वाक्यें क० प्रत देते.

५. 'दणगें जालियावर घोडीं' तुं० प्रत दणगें = गर्दी, दंगल.

६. खरस = तृषेमुळें किंवा फार बोलल्यामुळें तोंडाच्या कोंपऱ्यांस पांढरी फेंसासारखी थुंकी येते ती.

७. 'आभाळ फुटलें' असें तुं० प्रत सर्वत्र लिहिते.

ती पाहावी. आणि इभ्रामखान गाडदी यास इमान दिलें तें काय ? " असें ऐकून मागती तुकोजी शिंदे यांणीं उत्तर केलें कीं, " भाऊसाहेब, तुम्ही वांचलां तरि अवघ्यांचा सूड घ्याल. नाहीं तर तुमचे मागें अवघ्याच गोष्टी आटोपल्या. " असें ऐकून मागती भाऊसाहेब बोलिले कीं, " पुणियांत नानासाहेबांस तोंड काय म्हणोन दाखवावें ? निघावें, अशी गोष्ट घडणार नाहीं. रणाचे ठायीं ईश्वरसत्तेकरून जें घडणार असेल तें घडेल. परंतु कदापि नामोहरम व्हावयाचें नाहीं. " असें म्हणतांच तुकोजी शिंदे यांणीं घोडियावरून उडी टाकिली. आणि जातीनिशीं हत्यार केलें. तेथें मोठी मातबर मरदोमी करून, मराठी धर्माची शर्थ करून खस्त केली. तेव्हां अकस्मात गोळी लागोन ठार जाले. जरीपटकियाचे निशाणावर आधींच दाटी जाली होती. तेव्हां हत्तीवरून उतरून घोडियावर घेतलें. निशाण गुंडाळून झाडून पळों लागले. तेव्हां भाऊसाहेबांनीं शाहाजणें वाजविण्यास आज्ञा दिली.फत्ते जाली. शाहाजणें वाजतात, याजमुळें तरी लोक माघारे फिरतील, या अर्थे शाहाजणें वाजतात असें करूं लागले. परंतु ज्यांनीं पळ काढिला त्यांपैकीं कोणी माघारे फिरले नाहींत. भाऊसाहेब यांचे तोंडास खरस आली. हाणा ! मारा ! म्हणावयाचे राहिले. तोंडापुढें कोणी ओळख्या आला तरि तोंडानें मात्र हुंकार देऊन मानेचे संज्ञेनें दाखवूं लागले. अंगावरि ब्रह्मांड येऊन कोसळलें. परंतु हिंमत हरली नाहीं. भाऊसाहेब यांजप्रमाणें पराक्रमी दुसरा होणें हे असाध्य गोष्ट. जाग्यावरि हजार बाराशें मात्र उभे राहिले. चोहोंकडे एकदांच अभाळ पांढरें जालें. जिकडील तिकडे पळोन गेले[१०]. भाऊसाहेब यांजपाशीं जनकोजी शिंदे व रावसाहेब यांचे मुर्द्याचे हत्तीपाशीं शें पन्नास लोक उभे होते, तेवढे मात्र बाकी राहिले. सभोंवता वेढा पुरा पडला. युद्ध बहूत केलें. पूर्वीं युद्धांत अतिरथी, महारथी झुंजले[११], त्याप्रमाणें भाऊसाहेबीं विरथीपणें[१२] शर्थ केली. पुढें कांहीं इलाज चालेनासा

---

८. 'तुकोजी होळकर असा' धो० प्रतींचा पाठ आहे तो अर्थात चुकीचा.

९. 'गळा वाळला' 'कोरड पडली' सां० व क० प्रतींत अधिक वाक्यें आहेत.

१०. 'गेले' याजपुढें " सोनजी भापकर याणें एक वेळ उत्तर केलें कीं, ' भाऊसाहेब तुम्हीं निघावें. ' त्यासही निदानचा जाबसाल केलियावर सोनजी भापकर यांणीं रिकीबींतील पाय काढून भाऊंमागें अडासनीं [ ! ] पाय [ दिला ] आणि उभे राहिले. " असें तुंगार प्रतींत अधिक आहे.

११. 'जुने' पुणें प्रत.

१२. अतिरथी महारथी पेक्षां 'विरथी' हा अधिक असें बखरकाराचें मत दिसतें. 'वीर यांनीं' तुं० व क० प्रती.

जाला. दुराणी व नजीबखान रोहिला असे चाळीस हजार फौजेंतून दाहा बारा हजार फौजेनिशीं भाऊसाहेब यांजवर येऊन वर्षले. ते समयीं मारामार अशी जाली कीं, 'न भूतो न भविष्यति' एकदांच भोंवताले वेष्टून उभे राहिले. आंत रंवदळारंवदळ[13] क्षणभर बहूतच केली. त्यांत भाऊसाहेब व जनकोजी शिंदे यांची गत कैशी जाली, हें न कळे. उभयतां खासे कोणीं दृष्टीनें पाहिले नाहींत. गयफ[14] जाले, किंवा अस्मानांत गेले, कीं पृथ्वींत[15] गेले, हें ईश्वरी कौतुक ब्रह्मादिकांस न कळे[16]. तेथें मानवियांस काय कळेलें[17]?

१३५. इकडे मल्हारराव होळकर[18] याजवरि गुदरली. तेसमयीं आभाळास ठिगळ कोठवर लावील? उपाय राहिला. तेव्हां मग पंचवीस स्वारांनिशीं बाजू देऊन निघोन गेले. रावसाहेबांच्या मुर्याचा हत्ती व भाऊसाहेबांची बसती[19] घोडी अशीं सुजाउद्दौला याजकडे सांपडलीं.

१३६. याजवर इकडे पार्वतीबाईचे बंदोबस्तास विसाजी कृष्ण जोगदंड[20] यास पांचशें[21] धनगर नेमून देऊन रखवालीस बरोबर ठेविलें होतें. त्यास आज्ञा

---

१३. रंवदळारंवदळ = तुडवातुडव, मारामार, चेंगराचेंगर.

१४. गयफ = गैब = गुप्त.

१५. 'पाताळांत' क० प्रत.

१६. तुं० प्र० "त्यांत भाऊसाहेब यांची काय गत जाहाली हें नकळे. तैशी [च] फौज येऊन जनकोजी शिंदे यांवर पडली. तेथें बहूतच मारामार जाहाली. तों शिंदे यांची फौज झाडोन निघोन गेली. खासा भाऊसाहेब कोठें आहेत म्हणोन हुडकीत गेले. त्यांसिही फिरून देखिलें नाहीं. मग अनुक्रमें मल्हारराव होळकर यांजवर अवघीच फौज येऊन पडली."

जनकोजी तर पाडाव सांपडला होता. या तरुण, उदार व शूर सरदाराचा शेवट फारच वाईट झाला. "कांहीं दुराणी सरदारांचें एकमेकांशीं वांकडें असल्यामुळें व नजीबखानाच्या कृत्रिमानें, पैसा देऊन सुजाउद्दौला सुटका करीत असतां, जनकोजीचे तुकडे तुकडे करून त्यास पुरून टाकून, मागमूसही नाहींसा केला! भाऊंचें शिराविरहित धड सांपडलें." असें काशिराज म्हणतो.

१७. शत्रूचे हस्तगत जाहाले म्हणावे तर त्यांस ब्रह्मांडभर आनंद जाहाला असता तेंही जाहालें नाहीं. सां० प्रत. व क० प्रत.

१८. मल्हारराव तर 'बाजू सोडून निघाले' असें मागें बखरकार लिहितो. पृष्ठ १५० टीप १ पाहावी.

१९. मोडींत 'हस्ती' असें दिसतें. "भाऊसाहेब यांची खाशी घोडी बसावयाची" क० प्रत.

२०. हे जोगदंड कोठले?

२१. "आणि सरकारचे खास पागेचे बारगीर पांचशें" असें क० प्रतींत आहे.

केली होती कीं, " आम्ही झुंजून पार निघालों असें कळलें तरि तुम्हीं यांस घेऊन दिल्लीचे रोखें आमचे मागें पिछाडीस घेऊन यावें. आणि रणांत पडलों असें वर्तमान ऐकल्यावर यांस तुम्हीं जिवें मारून निघोन जावें. गिलच्यांचे हातीं भाऊसाहेब यांची स्त्री जिवंत सांपडली, असा लौकिक मात्र न होईल तें करावें." असें निश्चयरूप सांगून त्यांस रखवालीस ठेविलें होतें. तों मोड जाला. लोक पळों लागले. ते समयीं विसाजी कृष्ण व लोक यांणीं धास्त खाऊन, बाईची आस्था सोडून आपले जीव वांचविले.कोणीकडे गेले त्याचें ठिकाण नाहीं. भाऊसाहेबीं सांगितलें होतें, त्याप्रमाणें कांहींच घडलें नाहीं.[२२] तों एक घटिका दिवस राहिला. ते समयीं पार्वतीबाई अंबारींत होती, तिनें हत्ती बसवून, पायउतारा होऊन, बुणगियाचे रोखें पळूं लागली. केवळच भांबावली. घरचा पोरगा कोतवाल घोडी घेऊन उभा होता. तो "बाईसाहेब, घोडीवर बसावें" असें म्हणों लागला. परंतु तिजला घोडियावर बसावयाचें देहभान राहिलें नाहीं. त्या समयीं जानू भिंताड्या खिसमतगार मात्र एकटा जवळ राहिला होता. त्याणें हिंमत धरून सोबत दिली. तशा आकांतांत बारवेकर म्हणून मातबर मनुष्य व घोडें ही सख्त पाठाळ होतें, त्याची गांठ पडली. तेव्हां त्यास बोलिली कीं, "मी भाऊसाहेबांची स्त्री आहें. मजला घोडियावर घ्यावें." म्हणतांच तोही मनुष्य चांगला भला, तो हिंमत धरून बोलिला कीं, " बाईसाहेब, रिकिबींत पाय देऊन घोडियावर यावें. " म्हणतांच तिणें रिकिबीस पाय देऊन [त्यानें] पाठीवर घेतली. आणि तिच्याच शालजोडीनें कंबरेस पाठीमागें बळकट आंवळून बांधिली. आणि भोंवताली नजर केली तों गिलचे[२३] अवघे भोंवताले, मागें पुढें ढिगांचे ढीग देखिले. तेव्हां बाईस बोलिला कीं, "बाईसाहेब! निभावणींचें कठीण दिसतें. असो, तुमचे सुकृतें तरी पार पडलों तरि पडून जाऊं." म्हणोन त्यानें डोळे झांकून फौजेंतून घोडें[२४] घातलें. तों बाईचें पुण्य सबळ, म्हणोन अशा अरिष्टांतून पार पडली. तों दिवसही अस्तमान जाला, कोसपर्यंत गिलचे यांणीं पाठलाग केला. परंतु पाठोंळ[२५] सक्तशीर होतें म्हणून तशांतून निभावून

---

२२. हा जोगदंडाचा, भाऊंचे आज्ञेचा वगैरे मजकूर तुं० प्रतींत नाहीं.

२३. 'गिलचाचे फौजेच्या टोळ्याच्या टोळ्या देखिल्या' असें येथें क० प्रतींत वाक्य आहे.

२४. 'घोडी' असा पाठ पुणें प्रतीचा प्रथम पासून सर्वत्र आहे. कल्याण प्र० ही येथें 'घोडी' म्हणते.

२५. 'पाठवळ' क० प्रतीचा पाठ सर्वत्र असा च आहे.

गेली. नाना[२६] फडणवीस यांची मातुश्री श्रीभागीरथीचे यात्रेस जावयासि आली होती ती गिलचे यांजकडे सांपडली. तिची यात्रा सफळ जाली[२७]. नानाची स्त्री होती ती मात्र रणांतून बाहेर आलियावरि तिणें घोडी टाकून[२८] दिली. ती पायउतारा होऊन अंगावरील दागिने काढून[२९], फाटकें वस्त्र नेसून अंगास माती लावून दिल्लीच्या रोखें गेली.

१३७. दुसरें वर्तमान झुंज झाल्यावरि झुंजांतून मातबर सरदार व लहान थोर किती एक लोक आले ते पश्चिमेकडे झुंजांत तळावरी खंदकांत येऊन दाखल जाले कीं, भाऊसाहेब माघारे पळोन पूर्ववत प्रमाणें तळ बळकावून राहतील. या मागें नित्य झुंजास जात असत, तेव्हां संध्याकाळीं माघारे फिरून येईल त्याप्रमाणें येतील. म्हणोन माघारे बुणगेसुद्धां खंदकांत दाखल जाले. तों तेथील बुणगे व फौज पळत आहे, तेव्हां तेथेंही धीर धरवत नाहींसा जाला. मग निराशा जाणोन तेथून जिकडे वाट सांपडेल तिकडे पळत चालिले. ज्यांचे घोडियास जीव होता ते खंदकपार जाले. ते पाणिपत शहरांत गेले. तेथून जिकडे ज्यांस जैसा मार्ग दृष्टीस पडला तैसे निघोन गेले. कितीएक बायका वगैरे अवसान–रहित होते ते खंदकांत पडले. खंदकांतून त्यांस निघावयाचें जालें नाहीं [तीं] तेथेंच राहिलीं. गिलचे डोचकीं कापीत होते. तीं कापावयाचीं सोडून दिलीं. कोठवर कापितील ! कंटाळले. त्यांची हौस पूर्ण जाली. मोडली फौज दिल्लीच्या रोखें गेली. वरकड कोणी कुरुक्षेत्राकडे आणि आडवीं तिडवीं गेलीं. तीं कांहीं निभावलीं नाहीं [त] गिलचे यांजकडील लोक यांणीं पाणिपत शहराची बंदोबस्ती करून खंदकांतील मालमत्ता लुटूं लागले. कितीएक बायका धरून नेल्या. कितीएकांनीं जिवेंच मारिल्या. तीच गत पुरुषांची केली.

१३८. प्रातः[३०]काळच्या प्रहर दिवसानंतर झुंजास तोंड लागलें होतें तें तीन

---

२६. येथें क० प्रतीचा पाठ आहे तो असाः-"नानाफडर्णास याची स्त्री व मातोश्री अंबारींत होत्या त्या अंबारींतून उतरल्या आणि घोड्यांवर स्वार जाहाल्या"

२७. बखर लिहिणारा थट्टेबाज होता असें दिसतें. अशा प्रसंगाच्या वेळीं थट्टा करणें जरा अप्रशस्त होय. मागें पृष्ठ ११० टीप ७० पाहा. "तिची गत पुढें काय जाहली न कळे" क० प्रत.

२८. तिजला घोडीनें टाकोन घोडी उधळून गेली,' क० प्रत.

२९. 'बगलेस मारून' क० प्रत.

३०. 'या कलमा ऐवजीं क० प्रतींत पाठ जरा निराळा आहे तोः— "प्रातःकाळचे प्रहर दिवसापासून युद्ध होत होतें तें अस्तमानचे तास दिवस पर्यंत

महाराष्ट्र ग्रंथो...
११११ बुधवार पेठ,
पुणे

प्रहर हाणा ! हाणा ! मारा ! मारा ! हेंच जाहालें. पृथ्वीनें बहूत अशुद्ध प्राशन केलें. हिंदूंमध्यें* मागें याप्रमाणें युद्ध होऊन कत्तेल[३१] जाहाली नाहीं. यापुढेंही होणार नाहीं. तथापि भगवंताची करणी, कुल पृथ्वींतील लोक नेऊन त्या स्थानीं मारावें, हें कौतूक निर्माण जालें. मराठे लोक फौजांसुद्धां हटोन कि धीं म्हणोन स र दा र करीत होता ? [ ? ] त्याणें मागती अ णि खि ल्या होत्या [ ? ] आपल्या फौजां भोंवताला खंदक खणून कोणीही राहिले होते कीं काय ? उत्तम प्रकारें गांठ पडली तरि झुंज द्यावें, नाहीं तरि पळोन जावें. हा मराठी धर्म पुरातन चालत आहे. तेणेंकरूनच पृथ्वीस पलाण[३२] घातलें होतें. तें सोडून अविंध धर्माचा अविलंब केला. तेणेंकरूनच समस्त पृथ्वीचे, दाक्षिण प्रांतीचे बहूत लोक व बायका अमूप[३३] गैब जाल्या[३४]. ईश्वरसत्ता प्रमाण. त्याणें ब ई गी स[३५]

---

( मा० पृष्ठावरून पुढें चालू. )
हाणाह्मणा मारामारा हेच होऊन पृथ्वीनें मनुष्यांचें अशुद्ध बहूत प्राशन केलें. हिंदू कधीं आजपर्यंत याप्रमाणें लढले नाहींत व मोडही असा कधीं जाहाला नाहीं व कतलही अशी जाहाली नाहीं, पुढें ही होणार नाहीं. असो, भगवंताची कर्णी [ कीं ] पृथ्वींतील लोक त्या स्थळीं नेऊन मारून भूभार-हरण केलें ! मराठे लोकांची फौज [ कधीं ] हटून मेले नव्हते. आपले भोंवता खंदक खणून कोणी राहील कीं काय ! हें मराठे यांणीं कधीं केलें नव्हतें. मराठे यांच्यांशीं [ चांगले प्रकारें ] शत्रूची गांठ पडली तर झुंज द्यावें, लढण्याचा दम न निघे तर पळून जावें, याप्रमाणें मराठे यांचा पुरातन धर्म चालत आला आहे. तेणेंकरून पृथ्वीस पालण घातलें होतें. तें सोडून अविंधी धर्माचा हु धा केला; तो मराठे यांचा धर्म नव्हे. म्हणोन असें वानरतेल निघालें. आणि दक्षणप्रांतीचे पुरुष व बायका यांचे हनन जाहालें. ईश्वरी सत्ता प्रमाण, त्या प्रमाणें जाहालें."

*" हिंदू जात या प्रमाणें कधींच लढले नाहींत व असा मोडही मागें जाहाला नाहीं. याप्रमाणें ईश्वरानें भूभार हरण केला. नानासाहेब व भाऊसाहेब हे ईश्वरी अंश. अवतार धरून या कलियुगीं उभयतांनीं अशा चरित्रानें भूभार हरला." इतकेंच सां० प्रत लिहिते. पुढील मजकूर पुणें प्रतींतील आहे. तुं० प्रत असें कांहींच लिहीत नाहीं.

३१. "खेती खत्तल" पाठांतर.

३२. पलाण, पालाण, पल्याण, पल्ययणं =खोगीर.

३३. अमूप = उमाप = मोज नाहीं ज्यांचा, असंख्य (पुष्कळ) गैब=नाहींतशा, गुप्त.

३४. लढण्याची मराठी रीत सोडून फिरंग्यांची पद्धत स्वीकारल्यामुळें मराठेशाहीचा ऱ्हास झाला अशी मराठे लोकांची सर्वत्र समजूत, तिचे हे बखरकाराचे वरील उद्गार व्यंजक होत.

३५. बागीस इ बेगीस = [ ? ]

करावी. नानासाहेब व भाऊसाहेब ईश्वरी अंश; अवतार धरून कलियुगीं [३६]यांणीं चरित्र केलें.

**१३९.** यानंतर इकडे झुंज होतां होतां रात्र जाली. झुंज बंद जालें. हत्यारें राहिलीं. विश्वासराव यांच्या मुरद्याचा हत्ती अंबारीसुद्धां सुजाउद्दौला याजकडे नेला होता. ते समयीं सुजाउद्दौला याजकडील उमरावगीर गोसांवी म्हणोन सरदारी करीत होता. त्याणें [३७]मागती आणखी तीन लक्ष रुपये देऊन विश्वासराव व तुकोजी शिंदे व संताजी वाघ व यशवंतराव पवार असे चार मुरदे सोडवून आपणा[३८]कडे ब्राह्मण व मराठे मिळवून, त्यांस विधियुक्त अग्निसंस्कार करून मुरद्याचें दहन केलें आणि अस्थीही वाराणशीस रवाना केल्या.

**१४०.** वरकड मोडकी फौज नाना पुरंदरे व बाजी हरी व अंताजी माणकेश्वर व मल्हारराव होळकर असे रात्रौ दिल्लीचे सुमारें चालले.* परंतु तमाम लोकांची हिंमत हरली. [३९]गांइचे गोरे आले. रांडांनीं मारिलें तरी कोणी कोणास मिळेनासे [४०]जाले. रात्रौ दांडग्यांच्या हुलडींत अंताजी माणकेश्वर व बाजी हरी ठार जाले. त्यांचे मुरदे देखील कोणीं काढिले नाहींत. वेडावल्यासारखीं माणसें जालीं. एवढाले श्रीमंत त्याच्या गती या प्रकारच्या जाहाल्या! 'कर्मणो गहना गतिः' असें [४१]जाहालें.

**१४१.** [४२]मागें कुतुबशाहा व सैमदखान कत्तलबाज यांचे पुत्रांनीं पातशाहास अर्ज केला कीं, "आम्हांस कत्तल करण्याची आज्ञा द्यावी." असें म्हणतांच अबदुल अली बोलिला कीं, "मारलियांस मारावें, यांत भूषण काय?" असें ऐकून त्यांणीं मागती उत्तर केलें कीं, "आमचे बाप फौजेसुद्धां कुंज-

---

३६. 'उभयतांनी' क० प्रत

३७. मागें दत्ताजीचा मुरदा याणेंच सोडविला होता. मागें पृष्ठ ८६ पाहा.

३८. 'आपणाकडील!' यावरून उमरावगीरच्या पथकांत दक्षणी ब्राह्मण व मराठे होते असें दिसतें.

* "भाऊसाहेब यांची गत काय जाहाली ही यांस शुद्धच नाहीं. आपला प्राण वांचवून निघाले" हीं वाक्यें क० प्रतींत अधिक आहेत.

३९. "गाईचे गौर जाले" पुणेंप्रत. गाईचे गोरे=गाईचे गोहरे=वेडावलेले,काय करावें हें सुचेनासें झालेले,गांगरलेले.'गुरांचे गुराखी असतात तसें जाहालें.' क० प्रत.

४०. "रांडांनीं बो × त बोटें घातलीं, परंतु कोणास कोणी मिळेनासे जाले" तुं० प्रत.

४१. यापुढें तुं० प्रत म्हणतेः—"भाऊसाहेबांची स्त्री पार्वतीबाई यांची व नाना पुरंदरे यांची गांठ पडली. मग त्या बारवकरानें त्यांचे स्वाधीन केली."

४२. मागें=हे गेल्यानंतर इकडे.

पुरियांत कत्तल केले. त्यांचा सूड उगवावा लागतो." असें ऐकून अबदुल अली बोलिला कीं, "येथून विसां कोसांवरि चार घटिका कत्तल करणें. जास्ती न करणें," असें ऐकल्यावर कुतुबशाहाचे पुत्रानें सोनपतानजीक चार हजार मनुष्यांची कत्तल केली. तैसेंच समदखान कत्तलबाज याचे पुत्रानें बहादरगडानजीक येऊन पांच हजार मनुष्यांची कत्तल केली. पानपत शहरांतील दुसरे दिवशीं दरवाजे बंद करून पंधरा हजार बंदिवान धरिले; व खंदकांतीलही बंद[४३] धरिला. तेव्हां ताकीद जाली कीं, माणसांस न मारावें. माल मत्ता घेऊन सोडून द्यावें. त्याजवरून दुसरे दिवशीं कोणी मारिले नाहींत[४४]. बंद धरिला, तों वीस हजारपर्यंत आणिले. दोन दिवस लष्करांत होते. त्यास सुजाउद्दौला यानें गिलच्यास तीन लक्ष रुपये खंडणी देऊन धर्मार्थ बंद सोडवून दिले. रणांतही सुजाउद्दौला याणें शोध करून मातबर मातबर, ओळख ज्यांची निघाली, त्यांस नेऊन उत्तम गती केली. गिलच्यांचें लष्कर लुटीनें कुबेर जालें. घोड्यास कोणी पुसेनासें जालें. तेथें वरकड लूट कोण घेतो? ज्यास[४५] गाढव प्राप्त नव्हतें त्यास हत्ती प्राप्त जाला!

**१४२.** त्याजवरि इकडील पळाचें वर्तमान. कितीएक घोड्यांचे सामर्थ्येंकरून दिल्लीस पांच सात हजार जसा ज्यांस रस्ता सांपडला ते निघाले. त्यांस वाटेस दांडगियांनीं मारामार जागोजाग करून कितीएक लोकांचीं घोडीं घेऊन सोडिले, कितीएक जिवें मारिले. त्यामध्यें ज्यांच्या घोडियांस बराच जीव होता ते पांच हजार वांचून गुरुवारीं संध्याकाळीं चाळीस कोस दिल्लीस दाखल जाले. कितीएकांस दुसरा मार्ग सांपडला नाहीं ते भकोन आडरानांत पडले. ते फिरत फिरत जिकडे भगवंतें वाट दिली तिकडे गेले. ज्यांचें आयुष्य बळकट होतें ते मात्र जगले.

**१४३.** यानंतर पार्वतीबाई यांजपाशीं जानू भिंताड्या खिजमतगार होता. त्याणें व बारवेकर[४६] यानें पाठिशीं बांधून आणिल्यावर घोडें थकलें[४७]. मग

---

४३. बंद धरिला=बांधून ठेविले, अटकेंत ठेविले, कैद केले.

४४. परंतु याप्रमाणें वागणूक जाली नाहीं. दुसरें दिवशीं या धरलेल्या मराठे लोकांच्या दावणीच्या दावणी उभ्या करून, त्यांस मुठभर फुटाणें व चुळभर पाणी देऊन त्यांची दुराणी लोकांनीं मोठ्या मौजेनें कत्तल केली!! यापेक्षां जास्त क्रौर्य दाखवून विशेष कलंक कोणत्याही लोकांच्यानें लावून घेववेल काय? ग्रां० डफ.

४५. "गाढव घेण्याची ज्यास शक्ती नाहीं त्यास हत्ती प्राप्त जाला" क० प्रत.

४६. 'बारवकर' असा तुं० प्रतीचा पाठ सर्वत्र आहे.

४७. "तेव्हां जानू व वरणकर कोणी मराठा या दोघांनीं बाईस पाठीशीं बांधून चालविली. इतक्यांत पिराजीराऊत पुणतांबेकर आला." अशीं वाक्यें क० प्रतींत अधिक आहेत.

पिराजी राऊत[४८] होता त्यानें पाहातांच आपल्या घोडियावर बसवून साहीं[४९] कोसपर्यंत आणिली. पुढें त्याचा घोडाही थकला. मग त्यानेंही उतरून ठेविली. पुनः जानू भिंताड्या खिजमतगार [ याणें ] कोस आदकोस चालवीत आणिली. बळकट घोडियाचा मातबर कोणी भेटलियास त्याच्या घोड्यावर बसवी. असें करीत करीत दिल्ली अलीकडे तीन मजलांवर मल्हारराव होळकर व नाना पुरंदरे व कितीएक सरदार व पागेचे बारगीर, शिलेदार असे शेंपन्नास भेटले. त्यांमध्यें येऊन मिळाली. बळवंतराव याचा पुत्र आपाराव तोही निभावून आला. पार्वतीबाईचे चित्तांत कीं, भ्रतार दिल्लीस आला असेल. म्हणोन बहूतच आशा होती.

**१४४.** तों दिल्लीकडील मजकूर तरि बुधवारीं अष्टमीस तीन प्रहरपर्यंत लढाई होऊन मोड जालों.[५०] ते गुरुवारीं प्रातःकाळीं किती एक पळोन आले. तेथें नारो शंकर व मीरखानें[५१] लेकवळा व बाळाजी पलांडे असे सहा सातशें किलियांत होते. व बाकी हुजरातीचीं पथकें लक्ष्मणराव गावडे व[५२] हिराजी शेळके व तलखांजी बांधे व बापूजी रायाचें पथक व पर्वतराव कदम व गोविंदपंत बुंदेले यांचे पुत्र पांचशें स्वारांनिशीं असे तीन हजार होते. दिल्लीच्या किल्ल्यांत नारो शंकर होते. त्यांजपाशीं ते समयीं चाळीस लक्ष रुपये खजीना होता.

**१४५.** पार्वतीबाई दिल्ली नजीक आली तों भाऊसाहेब नाहींत म्हणोन ऐकतांच आशेची निराशा जाली.[५३] पळाचे तीन हजार जमले होते. ते बाहेर वाळवंटींत होते. तों त्यांस सर्वांस पळाचें वर्तमान कळलें. परंतु तहकीक[५४] कळेना

४८. 'पिराजी राऊत पुणतांबेकर' पाठांतर.

४९. 'सोळाकोस' सां० व क० प्रती.

५०. येथें क० प्रतीचा पाठ असा आहे "तेव्हां फौजेस पळ सुटला. त्यांपैकीं कांहीं लोक गुरुवारीं सायंकाळीं बुधवारची रात्र व गुरुवारचे चार प्रहर चालोन पळत येऊन दिल्लीस दाखल जाहाले."

५१. 'तिरखा नबाब बाळाजीपंत असे सहा सात' धो० प्र०

५२. 'बहिराजी शेळके व तुकोजी वाघ' क० प्रत.

५३. येथें क० प्रतीचा निराळा पाठ आहे: "बाईबरोबर तीन हजार स्वार नेमिले होते त्यांस पळाचें वर्तमान कीं, मोड झाला असें ऐकतांच बाईस टाकून देऊन दिल्लीचा रस्ता धरून पळाले ते दिल्लीस आले. त्यांस तहकीक बातमी लागेना. मोठे फिकीरींत पडले. भाऊसाहेब मागाहून आल्यास शब्द ठेवितील कीं, आम्हांस सोडून आलां. असें जाहाल्यास खावंदास तोंड काय दाखवावें या फिकीरीस्तव धीर धरून राहिले."

५४. तहकीक=खरी हकीकत. पक्का मजकूर.

कदाचित भाऊसाहेब दिल्लींत आले,[हे]अगोदर पळाले असें जाहालें.[तर] त्यांस तोंड दाखवावयासही जागा नाहीं, यास्तव धीर धरून राहिले. दक्षिण देशांतील लष्कराचे उद्मी कित्येक दिल्लींत जाऊन राहिले होते. त्यांस शहरचे लोक लुटूं लागले व मारूंही लागले.वाळवंटीस पथकें होतींत्यांणीं गुरुवारीं तिसरा प्रहरपर्यंत धीर धरून होते. मग इयां इयां करीत निघाले. नारो शंकर वगैरे किल्ल्यांत होते ते गुरुवारीं संध्याकाळपर्यंत धीर धरून होते. कांहीं खाजिना सरकारचा होता. तो अगोदरच कडेस काढून, बाहेरलीं पथकें व आपण एकत्र होऊन निघून गेले असते, तरि निभावून जाते. तें न जालें. संध्याकाळीं गंगोबा तात्या होळकरांचे दिवाण पळतच दिल्लींत आले. नारो शंकर यांजकडे भोजन केलें. सविस्तर वर्तमान सांगितलें. " याजउपरि ज्यास जैसा भगवंत मार्ग देईल तैसें निघोन जावें, सुधा मार्ग दिसत नाहीं, तुम्ही डोळे झांकून काय बसलां ? " असें नारो शंकर यांसि सांगितलें. आणि ते स्वार होऊन तैसेच निघून गेले. तेव्हां अवसानें यांचीं गेलीं. खजिना काढावयास अनुकूल पडलें नाहीं. दिल्लींतिल वाणी, बकाल, बायका, देखील गांव-कुटार लष्करच्या लोकांस मारूं लागले. गर्दी करून लुटूं लागले. शहरांत धूम बहूत जाली. तेव्हां जिवानिशीं मारामार करीत नारो शंकर वगैरे कुल झाडून निघाले. खाजिना जाग्यावरच राहिला. अगोदर वाळवंटीं पथकें होतीं तीं निघोन फर्दाबादेस पोंचलीं आणि जीन उतरलें. तों नाना पुरंदरे व बाळकोबा तात्या आणखी शेंपन्नास असे तेही आले. ते एकत्र होऊन तीन मजला आले. तों होळकराची व बायकांची गांठ पडली. तेथून मजल दरमजल लष्कर अकरावे दिवशीं भिंडीस* दाखल जालें.

१४५. इकडील वर्तमान.कितीकांस दिल्लीचा मार्ग सांपडला त्यांचे मागोमाग दिल्लीस[व तेथून]भिंडीवर आले. वाटेनें कितीक जिवें मारिले. कितीएकांस लुटून[५६] सोडून दिलें.दिल्लीचा मार्ग न सांपडला आणि आडमार्गें पायानें[जे]गेले ते फिरत फिरत जातां जातां तीस चाळीस हजार जमले. त्यांस पंचवीस पन्नास दांडगे मिळून घोडीं हिरोन घेईत. असा अनर्थ होऊन मातबर माणूस पायउतारा जालें. बहुतांस अन्न कोठें न मिळे. मग अवघे जमून, मथुरेस येऊन एक दिवस दम खाल्ला. तों हजारों हजार थोर थोर मनुष्य नागवे उघडे केवळ भणंग, कंगाल, अन्नरहित, वस्त्रानें रहित, कळाहीन चीलंची[५७] भाजी खात आले. जातां जाटाच्या

५५. 'गंगोबा तात्या' क० प्रत.

५६. 'लुटून' येथें कल्याण प्रतीचा ६४ वा बंद संपला. पुढील बंद तिचे गाहाळ आहेत.

* भिंड ग्वाल्हेरीच्या पूर्वेस ५३ मैल.

५७. चील=पोकळ्यासारखी एक पालेभाजी.

मुलखांत आले. तों जाट याचें भय पूर्वीं भाऊंशीं बिघडून गेला असल्यामुळें बहूत होतें. परंतु तो थोर. त्याणें हें वर्तमान ऐकून, हिंदुधर्मास भिऊन, तमाम सांडणीस्वार पाठवून आपले मुलखांत ताकीद केली, “ कोणास न छळितां ज्यास जैसें अनुकूल पडेल [तसें] त्यानें अन्न, वस्त्रें द्यावीं.” याप्रमाणें ताकीद जाली. वाटेस एक गांव मातबर होता. तेथें एका सावकारानें भिक्षेस खंडीभर उडीद वांटले. तेथें एकएकास दाहा दाहा दाणे वांटणीस आले ! मग दोन मण पिठाच्या भाकरी करून पैशा एवढा तुकडा करून वांटला. येथें माणसांस एकएक वांटणीस आला. अशी भिक्षा घातली. अंगावरि वस्त्र नाहीं. ब्राह्मणांस तो अकरा दिवस अन्न मिळालें नाहीं. त्यांत पौष मास, थंडीचे दिवस, प्रावरणास एकंदर अंगावरीच कांहीं नाहीं. मातबर होते ते दीनाप्रमाणें होऊन पंधरावे दिवशीं भरतपुरास येऊन दाखल जाले. तेथें जाटाची बायको होती. तिणें धर्म बहूत केला. जागोजाग स्वार पाठवून पळाचे लोक आणविले आणि भरतपुरास पायल्या तीस चाळीस हजार काढून सर्वत्रांस आठ रोजांचें अन्न [ व ] ब्राह्मण होते त्यांस निवडून नेऊन दूध, पेढे वगैरे मेवा मिठाया दिल्या. असें एक दिवस फराळास घालून दर ब्राह्मणास पांच पांच रुपये नक्त व एक पागोटें व एक रजई व एक धोतर व आठ रोजांचा शिधा बहूत प्रकारचा इतकें देऊन शहरांत आराम व्हावयास राहून घेतलें. आणि शहरांत ताकीद केली, “ ज्यास जसें अनुकूळ पडेल त्याणें [ तसें पळाचे लोकांस ] अन्न द्यावें. जेथें राहातील तेथें वस्तीस जागा[५८] द्यावी. कोणी छळूं नये.” अशी बहुतांस ताकीद करून, मातबर कोणी भेटला त्यास घोडा बसावयास दिला. कोणास पालखी दिली. या प्रमाणें सर्वत्रांचा समाचार करून दहा लक्ष रुपये पर्यंत खर्च केलें[५९]. तेणें करून बहुतेक लोक जगले. तेथून फिरून पुढें येतां आलीकडे वाटेस दांडगे यांणीं प्रावरणें हिरोन घेतलीं. उघडे बोडके, झडत पडत भिंडीस[६०] दाखल जाले. पार्वतीबाई व होळकर व नाना पुरंदरे असे होते तेथें सर्वत्र जमा जाले. तेथें पंधरा मुकाम जाले. तेव्हां सुजरमल्ल जाट याणें रूपराम कटारी याजसमागमें लक्ष रुपये व वस्त्रें मथुरेवर पाठवून दिली. तेथून मल्हारराव होळकर व नाना पुरंदरे व पार्वती-

५८. ‘ तेथें जागा द्यावा ’ पुणें प्रत.

५९. जाटांनीं जी मदत ह्या परम संकटाच्या वेळेस केली तिजबद्दल त्यांची वाखाणणी केली तेवढी थोडीच ! सुरजमल्लाची इतकी अवधीरणा आणि अपमान भाऊंनीं केला असतां निदानप्रसंगीं हें त्याचें वर्तन पाहून तर त्याची विशेष प्रशंसा करणें योग्य होय.

६०. ‘भडेस’ असें पु० प्रतींत आहे. ग्वालेरच्या पूर्वेस ५३ मैलांवर भिंड आहे.

बाई एक महिना ग्वालेरीस जाऊन राहिले. पळाचे लोक आले त्या सर्वत्रांस वस्त्रें व पांच रुपये खर्चीस बाईनीं दिले. व नाना पुरंदरे यांणीं तेथून बैरागी भाऊसाहेबांच्या शोधास पाठविले. परंतु भाऊसाहेबांचें कोठें ठिकाण लागलें नाहीं. घायाळ समशेर बहादर कुंभेरीस आला. तेथें सुजरमल्ल जाट याणें त्याची बहूत उठाठेव[६१] करून घोडीं व पालखी देऊन वाटेस लाविला. तों समशेर बहादर याणें "नानांस तोंड काय दाखवावें?" म्हणोन भाऊ! भाऊ! असा शोक करून [तो] निधन पावला.

१४७. यानंतर दोचौ रोजांनीं दुराणीही मागें इकडे दिल्लीस पोंचला. तेव्हां इब्रामखान गारदी रणांत घायाळ त्यांजकडे सांपडला होता. त्यास आपणांकडेस चाकरी राहावें म्हणोन रदबदली घातली. परंतु त्यास चाकरीस राहावयाचें अनुकूळ पडलें नाहीं. "भाऊसाहेब यांचें व आमचें वचनाचें इमानप्रमाण जालें आहे यास्तव अशी गोष्ट आपणाकडून कदापी घडणार नाहीं" म्हणोन साफच जाबसाल केला. ऐसें जालियावर त्याचा शिरच्छेद केला.

१४८. यावर इकडील मजकूर तरि पुण्याहून नानासाहेब पैठणावरि आले होते. तेथें आपलें लग्न[६२] केलें. आणि दादासाहेब यांजसमागमें कांहीं फौज देऊन निजामअलीच्या तोंडावरि रवाना केलें.आपण दाहा बारा हजार फौजेनिशीं कूच करून वराडांत बाळापूरच्या प्रांताच्या रोखें येऊन उतरले. तेथें जानोजी भोंसले, सेनासाहेब सुभा, हे नानासाहेब यांस येऊन भेटले. त्यांचे बहूत प्रकारें समाधान करून हिंदुस्थानांत जावयासि समागमें घेतले. पांच सात हजारांनिशीं तेही सामील होऊन समागमें चालले. नानासाहेब यांजसमागमें बाबूजी नाईक बारामतीकर व गोपाळराव गोविंद व सदाशिव रामचंद्र व विठ्ठल विश्राम व यमाजी शिवदेव व खांसा स्वारी तेलंगांव[६३], परगणे आडगांव, प्रांत वऱ्हाड, येथें दाखल जाले. तीन मुकाम तेथें जालियावर मग पौषमाशीं शुक्लपक्षीं हरि अंणाचा[६४] निधण्याचा करार करून विंध्याद्री पर्वत येथील गोंडाचा राजा आणून त्यास वस्त्रें, अलंकार, कडीं शिरपेंच बक्षीस देऊन समाधान करून चालिले. सातपुड्या पार होऊन नर्मदावरि मुकाम केला. तेथून जानोजी भोंसले व हुजराती पथकें खेचवाडीकर बेइमान जाला होता त्याच्या पारि-

---

६१. उठाठेव=आदरसत्कार, संभ्रम.

६२. नारोबानाइक वाखरे पैठणकर ह्या देशस्थ गृहस्थाच्या कन्येशीं हें लग्न झालें. ह्या बाईचें नांव राधाबाई होतें.

६३. 'तळेगांव' असेंही होईल.

६४. हे हरिअण्णा कोण!

पत्यास खेचवाडी मुलखांत पाठविले. नानासाहेब आपले फौजे सुद्धां मुकामावर होते. तेथें वर्तमान ऐकिलें कीं, पळाचे लोक उघडे बोडके आले. त्यांणीं श्रीमंतांपाशीं सर्व सविस्तर वृत्तांत निवेदन केला. ते समयीं श्रीमंतांनीं ऐकोन खेद बहूत केला. नानासाहेब यांचा निश्चय पूर्ण होता कीं, दिल्लीस आपण जाऊन गिलच्याचें पारिपत्य करावें. अशी विचारणा करून बंदोबस्त केला होता. त्यांस सौभाग्यवती गोपिकाबाई यांणीं बहूत बोध करून माघारें फिरविलें. कूच करोन मजल दरमजल उतरून बऱ्हाणपुरास दाखल जाले. इकडील ग्वाल्हेरीहूनें[६५] पार्वतीबाई व नाना पुरंदरे वगैरे श्रीमंतांस येऊन भेटले. आणि सकल वर्तमान हिंदुस्थानांतील सांगितलें. मग पुढें बऱ्हाणपुराहून श्रीमंत नानासाहेब यांणीं भाऊ! भाऊ! ऐसा शोक करीत करीत जेवतां व निजतां निजध्यास बहूतच करीत. कूच करून मजल दरमजल पुण्यास दाखल जाले. दादासाहेब निजाम अली याचा बंदोबस्त करून पुण्यास दाखल जाले. उभयतांच्या भेटी जाल्या.

१४९. नंतर दिवसेंदिवस भाऊसाहेबांच्या शोकें करून नानासाहेबांचें शरीर कृश झालें. बुद्धिभ्रंश जाला. लोकांस शिव्यागाळी करूं लागले. कारभार विपरीत होऊं लागला. पुत्रशोक व बंधुशोक [परम कठीण!] श्रीरामचंद्रजी वनवासास गेलियावर मागें राजा दशरथास रघुनाथवियोनें दुःख होऊन राम! राम! म्हणतां शोक करून प्राणत्याग केला, त्याप्रमाणें नानासाहेब भाऊसाहेबांच्या शोकें निर्धनें[६६] पावले. शके १६८३, वृषानाम संवत्सरे, ज्येष्ठ वद्य सप्तमी[६७], मंगळवासरीं देवाज्ञा जाली. वैकुंठलोकास गेले.

१५०. नानासाहेब व भाऊसाहेब अवतारी पुरुष. उभयतांप्रमाणें मनुष्यलोकीं या मागें कोठेंही जाले नाहींत आणि पुढेंही होणें कठीण. उभयतांचा ऋणानुबंध कीं एक मरतांच एकानें मरावें! पूर्वी बाजीराव साहेब मुक्त जाहालियावरि सहा महिन्यांनीं चिमाजी आपा गेले. तैसेच भाऊसाहेब गैब जाल्यावर वर्तमान नानासाहेब यांणीं ऐकतांच सहा महिन्यांतच मृत्य पावले. भाऊसाहेब मृत्य पावले हें कोणी ऐकिलें नाहीं व पाहिलें नाहीं[६८]. भगवंत इच्छे-

---

६५. 'गालेरी' असा पाठ पु० प्रतीचा सर्वत्र आहे.

६६. 'भाऊ भाऊ म्हणोन प्राण सोडिला.' तुं० प्र० 'निधानास गेले' पु० प्रत.

६७. अन्यत्र वद्य प्रतिपदा असें आढळतें. नानांचा काळ पर्वतीवर झाला.

६८. 'भगवंत सत्ते करून' पुणें प्रत. येथें पुणें प्रतीचा २०४ था बंद संपला. पुढील मजकूर शेवटपर्यंत धोपेश्वर प्रतींतून घेतला आहे.

करून त्या कहरांतून पार पडून वांचून हरएक कोठें असले तरि निर्माण होतील. बहूत भाऊ आहेत. परंतु श्रीमंत लोकांत याप्रमाणें भाऊपणा कोठें नाहीं. रामभरताची साम्यता ! !

१५१. नानासाहेब यांचें देहसार्थक यथाविधी करून, राजश्री माधवराव बल्लाळ यांसि साताऱ्यास नेऊन, मातुश्री ताराबाई साहेब व राजाराम महाराज यांसि भेटवून, त्यांजकडून मुख्यप्रधान असे शिके करवून [त्यांनीं] वस्त्रें दिलीं. आणि निरोप देऊन वाटेस लाविलें.

१५२. याप्रमाणें वर्तमान जालें. नजीबखान प्यादा होता तो फर्जी जाला व त्यानें प्यादेमात केली. याप्रमाणें ही हकिकत जाली त्याप्रमाणें विस्तार करून लिहिलें आहे. त्याची माहितगारी ते वेळचे कोणी अनुभवी असतील त्यांस मात्र ठाऊक. असा इतरांस दाखला पोंचणार नाहीं. आपण हिंदुस्थानचें आद्यंत वर्तमान लिहून द्यावें म्हणून आज्ञा केली होती. त्यास हें वर्तमान माहितगारीनेंच लिहिलें पाहिजे. त्याजवरून विचारणा करून सेवेशीं विस्तारें लिहून [पाठविलें आहे] ध्यानास आणावें आणि मनन करून मिथ्या असल्यास सोडून द्यावें आणि सत्य असेल तें जमेस धरावें, हें लिहून कळवावें असा विचार नाहीं. सेवेशीं कळावें, बहूत काय लिहिणें ? कृपालोभाची वृद्धी करावी हे विज्ञापना. ही बखर समाप्त, श्रीदत्तार्पणमस्तु, मिती ज्येष्ठ वद्य ७ शके १७८१ सिद्धार्थीनाम संवत्सरे ते दिवशीं सायंकाळीं लिहिली. लिहिणार विष्णू बापूजी निफाडकर राहणार धोपेश्वर, तालुके राजापूर, चुकली तरि क्षमा करावी हे विज्ञापना.

---


६९. ह्या संशयरूप लेखावरून ही बखर ह्या लढाईनंतर लौकरच लिहिली असावी असें चांगलें अनुमान करतां येतें.

७०. मागें पृष्ठ १ टीप १ पाहा. बखरकार मूळपदावर येतो.


७१. ही मिती अर्थात विष्णू बापूजी निफाडकर यानें केलेल्या नकलेची होय.

१४५६

पानिपतच्या युद्धांत गुंतलेल्या सैन्यांच्या युद्धपूर्व हालचालींचा नकाशा



पानिपतच्या युद्धाची सैन्य रचना (काशीराजाच्या मतें.)



भाऊसाहेबांच्या बखरींत आलेल्या

# अरबी, फारशी व तुर्की शब्दांचा कोश.

[ प्रो. माधव त्रिं. पटवर्धन, एम्. ए. ]

---

**अखत्यार** [ अ. इख्तियार اختيار + ई ] अधिकार, अखत्यार.

**अजबाब** [ अ. अस्बाब् اسباب ] सामुग्री, लवाजमा.

**अजीज** [ अ. आजिझ् عاجز ] दीन, लीन.

**अजुरदा** [ फा. आझुर्दा آزرده ] त्रस्त, कष्टी, खिन्न.

**अदबशीर** [ अ. अदब् ادب + سر सर = प्रमाणें ] नम्रतापूर्वक.

**अनीन** [ अ. इनान् عنان ] लगाम

**अन्देशा** [ फा. अन्देशा انديشه ] विचार, कल्पना, संशय.

**अबदागिऱ्या** [ फा. आफ्ताब्-गीर آفتابگير =पंखेवजा छत्र ] अबदागीर धरणारा.

**अब्रू** [ फा. आब्-रू آبرو = ( अक्षरशः ) मुखच्छबी ] कीर्ति, प्रतिष्ठा.

**अम्बारी** [ फा. इमारी عماری ] हत्तीवरचें सछत्र आसन.

**अराबा** [ अ. अराबा عرابه = गाडी तोफेची ] बातेरी.

**अर्ज** [ अ. अर्झ् عرض ] विनंति

**अर्जबेग** [ अ. अर्झ् عرض + तु. बेग् بيگ = सर्दार ] हुजूरांस अर्ज सादर करणारा.

**अलमपन्हा** [ अ. आलम् عالم = जगत् + फा. पनाह् پناه = आश्रय ] जगाचे रक्षणकर्ते.

**आवाई**-आवई-अवई [फा. आवा آوا = ध्वनि + ई ] भुमका, सांगणी.

**अवलिया** [ अ. वली ولي = साधु, अनेक व. अव्लिया اوليا ] साधु.

**असामी** [अ. इस्म् اسم = नांव, अनेक व. असामी أسامي ] थोरव्यक्ति.

**अस्तनी** [ फा. आस्तीन् آستين ] बाही.

**अस्मान्** [फा. आस्मान् آسمان ] आकाश.

**आदत्** [अ. आदत् عادت ] संवय.

**आदा** [अ. आइदा عائده ] आवक उत्पन्न.

**आब्** [फा. आब् آب ] पाणी, तेज, प्रतिष्ठा.

**आबाद**-आबादान्[फा. आबाद् آباد आबादान् آبادان ] समृद्ध

**आराम** [ फा. आराम् آرام ] स्वास्थ्य, विश्रांति, स्वस्थ.

**आरास** [ फा. आराइश् آرائش ] शृंगार.

**आं दा यंदा** [ फा. आयन्दा آينده येणारें ] चालू सालीं.

**इजारा** [ फा. इजारा اجاره ] खंड, मक्ता.

**इतबार** [ अ. इअतिबार اعتبار ] विश्वास, धीर.

**इतराजी** [ अ. इअतिराझ् اعتراض + ई ] राग, कोप, असंतुष्टता.

**इभ्रत** [ अ. इब्रत् عبارت किंवा عبرت इबारत्(!)] सांगणी, भरंवसा.

**इमान** [अ. ईमान् ايمان ] श्रद्धा, विश्वासूपणा, वचन.

**इलाज** [ अ. इलाज् علاج ] उपाय, यत्न.

**इशारत**-इशारा [अ. इशारत इशारा اشاره ] खूण, सूचना.

**उजूतवाज्** [ अ. वुझू وضو हस्तपादप्रक्षालन अ. तवाझुअ تواضع = नम्रता ] नमाज, प्रार्थना.

**उमदा** [ अ. उम्दा عمدہ ] विश्वसनीय, थोर, मातबर.

**उमर** [ अ. उम्र عمر ] आयुष्य, वय.

**उमराव** [ अमीर امیر याचें अनेकव. उमरा أمرا ] श्रेष्ठजन, अधिकारी.

**उमेद** [ फा. उमेद् أمید ] आशा, हिंमत.

**एकदील** [फा. यक्-दिल् یکدل] एकचित्त, एकमताचे, निष्ठावंत.

**एकसाला** [ फा. यक्-साला یکسالہ ] एक वर्षाचा.

**ऐवज** [ अ. इवझ् عوض = बदला ] माल, संपत्ति.

**कत्तल** [ अ. कत्ल् قتل ] हिंसा.

**कत्तलबाज** [ फा. कत्ल्-बाझ् قتل باز ] हिंसक, कत्तल करणारा.

**कनाथ** [ अ. कनात قنات] कापडी भिंत, ताडपत्रीची भिंत.

**कबिला** [ अ. कबीला قبیلہ ] कुटुंब, बायकामुलें.

**करार** [ अ. करार قرار ] ठराव, निश्चय.

**करोल** [ तु. करावुल् قراول पहारेकरी ] बंदूकस्वार.

**कर्जवाम** [ अ. कर्झ् قرض = फा. वाम् وام = ऋण ] ऋण

**कसबा** [ अ. कसबा قصبۂ ] मोठा गांव.

**कवाइत** [ अ. काइदा قاعدہ = नियम, अनेकव. कवाइद् قواعد ] युक्ति.

**कही** [ फा. कही کہی ] दाणावैरण वगैरे मिळवून आणणारी लष्करी तुकडी.

**काईम-कायम** [ अ. काइम् قایم ] उभे, स्थित, मजबूत.

**काबीज-कबज** [ अ. कब्झ् قبض = पकडणें, काबिझ् قابض = पकडणारा ] हस्तगत, स्वाधीन.

**काबील** [ अ. काबिल् قابل ] कर्तृत्ववान, कर्ता.

**कारगर-कारागर** [ फा. कार-गर کارگر कार्यसाधक, परिणामकारक, लागू.

**कारभार** [ फा. कार-उ-बार کاروبار ] व्यवस्था.

**किताबत्-किताब** [ अ. खिताब خطاب + अत् ] संबोधन, पदवी.

**किमया** [ अ. कीमिया کیمیا ] हीन धातूचें सुवर्ण बनविण्याची विद्या.

**किलाफ** [अ. खिलाफ् خلاف ] वैर, विरोध, वैषम्य, किंतु.

**किल्ला** [ अ. कल्आ قلعۂ ] गड, दुर्ग.

**किल्लेदार** [ फा. कल्अ-दार قلعہ دار ] दुर्गाधिपति.

**कुमक** [ तु. कुमक् کمک ] मदत, साहाय्यक सैन्य.

**कूच** [ फा. कोच् کوچ ] प्रयाण; कोच दर कोच = सारख्या मजला मारीत.

**कूल** [ अ. कुल्ल् کل ] सर्व.

**कैद** [अ. कैद قید ] बंधन, नियंत्रण, शिस्त, बंदिवास.

**खजानपूर** [ अ. खिझाना خزانہ = कोश + पुर پر = पूर्ण ] अखंड गंगाजळीचे प्रभु.

**खजिना** [खझीना خزینہ]राजनिधि,तिजोरी.

**खन्दक** [ अ. खन्दक् خندق < फा. कन्दा کندہ = खणलेलें ] चर, परिखा.

**ख**बर [ अ. खबर خبر ] वृत्त, बातमी, हकीगत.

**ख**माखाय्-खामखा [फा. खाह् म खाह् خواه مخواه ] तुझी इच्छा असो नसो, जरूर, निश्चयानें.

**ख**राब [ अ. खराब خراب ] हानि, नुकसानी, हानियुक्त.

**ख**स्त करणें [ फा. खास्त् خواست = ईप्सित ] 'यथास्थित पुरवणें,' पराकाष्ठा करणें.

**खा**तर [ अ. खातिर خاطر = मन ] खातरेस येणें = पसंत येणें.

**खा**तरजमा [ अ. खातिर जमूअ خاطرجمع ] मनस्वास्थ, निःशंकपणा, समाधान; खातरजमेशीं = मनापासून.

**खा**तरी = खातरजमा.

**खा**नदान [ फा. खान्दान् خاندان ] अभिजात, उच्चकुलीन.

**खा**नाजाद [ फा. खाना-झाद् خانه زاد ] घरांत जन्मलेला, दासपुत्र, दासीपुत्र.

**खा**ली [ फा. खाली خالی ] रिकामा.

**खा**वन्द [ फा. खावन्द् خاوند ] प्रभु, साहेब.

**खा**सगी [ फा. खासगी خاصگی भाववाचक नाम अ. खास्सा पासून ] खासगीचा तंबू = खाशांचा तंबू.

**खां**सा [ अ. खास्सा خاصه ] स्वतः, अभिजन, विशेषतः

**खि**जमतगार-खिसमतगार [फां. खिद्मत-गार خدمتگار ] सेवक, हुजऱ्या.

**खु**र्नीस—कुर्नीस—कुर्निसात [ तु. कानिश् کورنش अनेकव. कोर्निशात् کورنشات ] वंदन, सलाम, मुजरा.

**खु**शाल [ फा. खुश्-हाल् خوشحال ] संतुष्ट, आनंदित, सुस्थितींत.

**खु**शाली [ फा. खुश-हाली خوشحالی ] आनंदी आनंद.

**खु**शी रजावंती [ फा. खुशी-रिझा-मन्दी خوشی رضامندی ] सानंद संमति.

**खै**रात [ अ. खैरात् خیرات ] सत्क्रिया, दानधर्म.

**खो**जा [ खोजा خوجه फा. खाजा خواجه ] क्लीब, कंचुकी.

**ग**नीम—गलीम [ अ. घनीम् غنیم ] लुटारू, शत्रू, मराठ्यांस मुसलमानांनीं दिलेलें नांव.

**गं**ज [ फा. गन्ज گنج = संचय ] रास, ढीग.

**ग**यफ—गयब—गैब [ अ. घैब्—घाइब् غایب غیب ] अदृश्य, मृत.

**ग**रीब [ अ. घरीब् غریب ] गरीब, दरिद्री, निरुपद्रवी.

**ग**र्द होणें [ फा. गर्द् گرد = धूळ ] गर्दीस मिळणें, मृत होणें.

**ग**र्दी [ फा. गर्दी گردی = उत्क्रान्ति-नाश ] भाऊगर्दी = भाऊचा नाश.

**ग**हजब [ अ. घझब् غضب ] कोप, कहर, महत्संकट.

**गा**शा [ अ. घाशिया غاشیة ] खोगिरावरचें आच्छादन, बसकरणें.

**गि**र्दनवाजी [ फा. गिर्द्-नवाही گردنواحی ] शहरचा कोट व सभोंवतील भाग; त्या भागाचें आधिपत्य. नवाजी = रक्षण असा एक दुसरा अर्थ आहे.

**गु**दरणें, गुजरणें [ फा. गुझश्तन् گزشتن चें गुझर گزر हें आज्ञार्थीरूप ] जाणें, होणें, घडणें, ओढवणें.

**गुलाम** [ अ. घुलाम् غلام ] दास.
**गुस्सा** [ अ. घुस्सा غصہ ] राग, कोप.
**गैब,** गैबत [ अ. घैब् غیب घैबत् غیبۃ ] अदृश्यता, अदृश्य. गैबीचा मारा = न-दिसणारा, आडून मारा.
**गैरइतबार** [ अ. घैर غیر = इतर + इतबार اعتبار ] अविश्वास.
**गोरकपण**–गोरगपण [ फा. गोर گور = थडगें व अ. कफन् کفن = मृतवस्त्र ] व्यवस्थित मूठमाती.
**चाबूक** [ फा. चाबुक چابک ] कोरडा.
**चोपदार** [ फा. चोब چوب = काठी, दंड + दार دار ] दंडधारी, ललकारणारा.
**छबिना** [ फा. शबीना شبینہ = रात्रीसंबंधीं ] रातपहारा.
**छबिना** [ फा. सायाबान् سایہ بان ( ? ) ] छत्र, मंडप, तंबू.
**जखमी** [ अ. झख्म् زخم = वार, घाव ] घायाळ.
**जप्ती** [ अ. झब्त् ضبط = हरण + ई ] जिं-कणें, हस्तगत करणें.
**जबरदस्ती** [ फा. झबर–दस्त् زبردست = वर आहे हात ज्याचा असा, सबळ + ई ] बळ, बलात्कार, जुलूम.
**जमा** [ अ. जम्‌अ جمع ] एकीकरण, एकत्र.
**जमाखर्च** [ अ. जमअ-खर्ज-र्च جمع خرچ ] उत्पन्न व्यय, आवक जावक.
**जमात**–जमायत [ अ. जमाअत् جماعت ] जमाव ( मनुष्यांचा अगर द्रव्याचा ).
**जमादार** [ फा. जमअ-दार جمع دار ] लहा-न तुकडीवरील अधिकारी.
**जमीन** [ फा. झमीन् زمین ] भूमि, भुई.
**जरब**–जर्ब [ अ. झर्ब ضرب ] प्रहार, वार, जोर, धाक, दरारा, ठार.
**जलदी** [ अ. जल्द् جلد = द्रुत + ई ] घाई, तांतडी, द्रुतता; वेग.
**जवाहीर** [ अ. जवाहिर جواهر = रत्नें; ए. वचन जव्हर جوهر ] रत्नें.
**जहागीर** [ फा. जा-गीर جاگیر ] राजाच्या सेवेसाठीं सरदारानें जें सैन्य पदरीं ठेवा-वयाचें त्याच्या खर्चाबद्दल त्याला तोडून दिलेलें उत्पन्न अगर मुलूख; सरंजाम.
**जागा** [ फा. जाय्‌गाह् جایگاه ] स्थळ, ठिकाण.
**जाब**-जबाब [ अ. जवाब् جواب ] उत्तर.
**जाब**-साल[अ.जवाब् सुवाल جواب سوال] प्रश्नोत्तर; म्हणणें; तह.
**जामदार** [फा. जामादार جامہ دار] कपडे पुढें करणारा, कपडे वगैरे वस्तूवरील अधिकारी.
**जामदारखाना** उंची वस्त्रें, रत्नें वगैरेचा कोश; तिजोरी.
**जाया** [ अ. झाविअ ضائع ] जखमी, नष्ट.
**जासूद** [ अ. जासूस् جاسوس ] हेर, निरोप आणणारा. पोचविणारा, हलकारा.
**जास्ती** [ अ. झियादत् زيادة + ई ] आ-धिक्य, अधिक.
**जिद्द** [ अ. जिद्द् جد ] जिद्दीचा जाबसाल= निक्षून करारीपणाचें सांगणें.
**जिन्नस** [ अ. जिन्स جنس ] प्रकार, वस्तु.
**जिम्मा** [ अ. झिम्मा ذمۃ ] जबाबदारी, रक्षण. जिम्मेस = ताब्यांत.
**जिरेटोप** [ फा. झिरिह् زره = चिलखत ] चिलखती टोपी, शिरस्त्राण.

**जिलब**–जिलीब [ फा. जिलव् جلو = लगाम, पुढें ] जिलबीस = स्वारींत पुढें. जिलबीचा घोडा = शृंगारून स्वारींत हातांत धरून चालविलेला घोडा.

**जुरत** [ अ. जुर्‌अत् جرات ] धैर्य, शौर्य.

**जुलूम** [ अ. झुल्म ظلم ] बलात्कार, पीडा, गहजब.

**जेब**–जबे–जब [ अ. झब्ह् ذبح ] बळी देणें, कापणें, ठार करणें.

**जेर** [ फा. झेर् زیر = खालीं ] चीत, पराभूत, दीन, श्रांत.

**तक्त** [ फा. तख्त् تخت ] राज्यासन, सिंहासन.

**तक्षीर** [ अ. तक्सीर تقصیر ] दोष, चुकी, उणीव.

**तक्षीम** [ अ. तक्सीम् تقسیم ] वांटणी, हिस्सा, भाग.

**तङ्गचाई** [ फा. तङ्ग्‌चाय् تنگ چای ] अडचण; तंगी; टंचाई.

**तङ्गबार** [ फा. तङ्ग्‌बार् تنگ بار = सामानाचें गांठोडें ] तंगबारकरून = खोगीरवगैरे कसून.

**तजवीज** [ अ. तज्‌वीझ् تجویز ] व्यवस्था, योजना.

**तपास** [ अ. तफह्हुस तفحص ] तलास, चौकशी, शुद्धि, शोध.

**तफावत** [ अ. तफावुत् تفاوت ] अंतर.

**तमाम** [ अ. तमाम् تمام ] सर्व.

**तमाशा** [ फा. तमाशा تماشا ] देखावा, मौज, खेळ.

**तम्बी** [ अ. तम्बीह् تنبیه ] उद्बोधन, दटावणी, शिक्षा.



**तयार** [ फा. तयार تیار ] सिद्ध.

**तलबी**–तलफी [ अ. तलब् طلب – मागणी, इच्छा, ] शौकी, व्यसनी.

**तल्लास**–तलास [ अ. तलाश تلاش ] शोध, तपास.

**तवकल** [ अ. तवक्कुल् توکل ] ईश्वरावर भरंवसा.

**तसदी** [ अ. तस्दीअ تصدیع ] अडचण, त्रास, तकलीफ.

**तसलीम** [ अ. तस्लीम् تسلیم ] वंदन, नमन, सलाम.

**तहकीक** [ अ. तह्‌कीक् تحقیق ] सत्यापन; खातरीनें खरी.

**तहकूब** [ अ. तवक्कुफ् توقف ] विराम, खंड.

**ताकीद** [ अ. ताकीद् تاکید ] दृढीकरण, बंदोबस्त, कडक हुकूम.

**तागायत**-तागाईत [फा. ता-घायत् تاغایت] पर्यंत.

**ताजीम** [ अ. तअझीम् تعظیم ] बहुमान.

**ताफा** [ अ. ताइफा طائفه ] जमाव, तुकडी.

**तारीफ** [ अ. तअरीफ् تعریف ] वर्णन, स्तुति.

**तालुका** [ अ. तअल्लुका تعلقه ] प्रांत, जिल्ह्याचा भाग.

**तालेवार**-तालिवार[फा.तालिअ-वर् طالع ور] दैववान्, भाग्यशाली.

**दगा**–दगादुगा [ फा. दघा دغا ] कपट, फसवणूक, विश्वासघात.

**दङ्ग** [ फा. दङ्ग् دنگ ] विमूढ, हतबुद्ध.

**दम** [ फा. दम् دم = श्वास ] दम खा = विश्रांति घे; दमास ये = थकणें.

**द**रवाजेकरी [ फा. दर्वाझा دروازه = द्वार ] द्वाररक्षक.

**द**रोबस्त [ फा. दर्-उ-बस्त् دروبست ] सर्व, कूल.

**द**स्ताना [ फा. दस्ताना دستانہ ] हस्तत्राण.

**द**स्तूर [ फा. दस्तूर دستور ] नियम, चाल, रूढी.

**द**हशत—धास्त [ अ. दह्शत् دہشت ] भीति धाक.

**द**हा हजार [ फा. दह् हझार् دہ ہزار ] दश सहस्र.

**दा**खल [ अ. दाखिल् داخل ] प्रविष्ट, समाविष्ट, नमूद.

**दा**खला [ अ. दाखिला داخلہ ] पावती, उल्लेख, उदाहरण, अनुभव.

**दा**णादाण [ फा. दाना-दाना دانہ دانہ ] कणकण, फांकलेले, प्रकीर्ण.

**दा**रमदार [ फा. दार्-मदार् دار مدار ] करार, निश्चय, करारमदार.

**दा**रूखाना = अग्न्यास्त्र संचय; ‘ आग. ’

**दिङ्क** [ ( कदाचित ) फा. दङ्ग् دنگ ] दंग, विमूढ.

**दि**क्कत [ अ. दिक्कत् دقة = सूक्ष्मभेद, दोष आक्षेप, हरकत, शंका.

**दि**लगीर [ फा. दिल्गीर् دلگیر ] दुःखी, कष्टी.

**दि**वाण [ फा. दीवान् دیوان ] सरकारकचेरी, मुख्याधिकारी, प्रधान.

**दी**ल [ फा. दिल् دل ] हृदय.

**दु**तर्फा [ फा. दूतरफ् دوطرف ] दोहोंबाजूनें, दोन्हीकडे.

**दु**निया [ अ. दुन्-या دنیا ] इहलोक.

**दु**मची [ फा. दुम् ची دمچی ] पुच्छबंध, शेंपटी लावून जाणारा बंद.

**दु**वा [ अ. दुआ دعا ] प्रार्थना, आशीर्वाद, बे-दुवा=शाप.

**दे**खील [ अ. दाखिल् داخل ] समाविष्ट, सुद्धा, धरून.

**दौ**लत [ अ. दौलत دولة ] संपत्ति, अधिकार, राज्य.

**ध**मधमा [ फा. दम्दमा دمدمہ ] मोर्चा, चौकी, बातेरी.

**धा**स्त [ अ. दह्शत् دہشة ] भीति, दहशत.

**न**गारा [ अ. नकारा نقاره ] दुंदुभि.

**न**गारची [ फा. नकारची نقارچی ] दुंदुभि वाजविणारा.

**न**जर—नजराणा [ अ. नझ्र् نذر – फा. नझ्राना نذرانہ ] उपायन, ईश्वरापुढें अगर थोर मनुष्यापुढें ठेविलेली भेट.

**न**जर [ अ. नझर نظر ] दृष्टि.

**न**जीक [ फा. नझ्दीक् نزدیک ] जवळ, सन्निध.

**न**रद [ फा. नर्द् نرد ] सोंगटी.

**न**र्मीना [ फा. नर्मीना نرمینہ ] रेशमी उंची कापड.

**ना**काबील [ फा. ना-काबिल् ناقابل ] कर्तृत्वशून्य, नाकर्ता.

**ना**दार [ फा. ना-दार् نادار ] जवळ कांहीं नाहीं असा, गरीब, सडा.

**ना**मर्द [ फा. नामर्द् نامرد ] भ्याड.

**ना**मर्दुमी [ फा. ना-मर्दुमी نامردمی ] भ्याडपणा, शौर्याऽभाव.

**ना**मी [ फा. नामी نامی ] प्रसिद्ध, नांवाजलेले.

**नामोहरम** [ ना + अ. मह्रूम् محروم नि-राश, अकृतार्थ ] अकृतार्थ, पराभूत, नामोहरमी = अपयश, पराजय.

**नालबंदी** [ अ. नअल् نعل अश्वपादत्राण + फा. बन्दी بندی = बंधन ] नोकरीवर ठेविते वेळीं अगाऊ दिलेला पैसा.

**निखालस** [ नि + अ. खालिस् خالص शुद्ध ] शुद्ध, अगदीं.

**निखालसता**=स्वेच्छा,अंतःशुद्धि.निखालसतेनें =स्वेच्छापूर्वक, मनापासून.

**निमचा** [ फा. नीम्चा نیمچہ ] लहानशी तरवार.

**निमकहराम** [फा. नमक्-हराम् نمک حرام] दुसऱ्याचें खाल्लेलें मीठ विसरणारा, कृतघ्न.

**निमा** [ फा. नीम نیم ] अर्ध.

**निमाज** [ फा. नमाझ् نماز ] मुसलमानांची प्रार्थना.

**निशा** अक ताला वगैरे [ अ. इन् शाअ हक्क तआला انشاءحق تعالی सत्यरूप परमेश्वर इच्छील तर; हुकूमते परवर्देगार حکومت پروردگار =( जगाला ) पोसणाऱ्याचा अधिकार ( सर्वश्रेष्ठ ) ].

**निशाण** [ फा. निशान् نشان ] खूण, झेंडा.

**नुकसान-नुकसानी** [ अ. नुक्सान् نقصان ] तोटा, नाश, अहित.

**नेकजात** [ फा. नेक् – झात् نیک ذات ] उत्तमशीलाचा, अभिजात.

**नौबत** [ अ. नौबत् نوبة ] वेळ, घटिका, ठरल्या घटिकेला वाजविण्याचा नगारा.

**परगणा** [ फा. पर्गना پرگنہ ] जिल्हा, लहान प्रांत.

**परवा-पर्वा** [ फा. पर्वा پروا ] विचार, चिंता, भीति, गुमान.

**पलाण** [ फा. पालान् پالان ] खोगीर.

**पलिता** [ फा. फतीला فتیلہ ] पेटलेली वात, बत्ती, कांकडा.

**पाइक** [ फा. पैक् پیک ] जासूद, हलकारा.

**पागा** [ फा. पायगाह् پایگاه ] घोडे बांधण्याची जागा.

**पागनीस** [ नीस् < नवीस् نویس = लिही, लेखक ] पागेचा अधिकारी.

**पातशाह–पाच्छाय** [ फा. पाद्शाह् پادشاه ] राजाधिराज.

**पातशायत** [ –आयत् हा फारशींतून मराठींत आलेला भाववाचक प्रत्यय ] पातशाही.

**पायपोस** [ फा. पाय्पोश् پاپوش ] पादत्राण.

**पीलबाला** [ फा. पील् پیل = हत्ती + बाला بالا = उंची, बांधा ] हत्तीसारख्या बांध्याची ( घोडी ).

**पूल** [ फा. पुल् پل ] पाण्याच्या पलीकडे जाण्याकरितां पाणी न अडवितां बांधलेला रस्ता.

**पेच** [ फा. पेच् پیچ ] कळसूत्र, अडचण, निकड.

**पेशवा** [ फा. पेशवा پیشوا = पुढारी ] मराठेशाहींतील मुख्य प्रधान.

**पेस्तर** [ फा. पेश्तर پیشتر = अधिक पुढें ] पुढील.

**पोतनीस** [ फा. पूता پوتہ = तिजोरी + नीस् ] खजिनदार.

**पोशाख** [ फा. पोशाक् پوشاک ] वस्त्राच्छादन, कपडे.

**प्यादें** [ फा. पियादा پیادہ ] पदाति, बुद्धि-बळांतलें हलकें मोहरें.

**फकीर** [ अ. फकीर فقیر ] दरिद्री, दारिद्र्य-व्रतस्थ, मुसलमान भिक्षु.

**फजिती** [ अ. फझीहत् فضیحۃ + ई ] अप्रतिष्ठा; दुर्लौकिक.

**फत्ते**–फते [अ. फत्ह् فتح] विजय, यशस्वी.

**फर्जी** [ फा. फर्झीन् فرزین ] बुद्धिबळांतला राजा.

**फाजील** [ फाझिल् فاضل ] अधिक.

**फारिक** [ अ. फारिग् فارغ ] संपुष्टांत, फिरणें.

**फिकीर** [ अ. फिक्र فکر ] विचार, चिंतन, चिंता.

**फितूर** [ अ. फितूर् فتور = शैथिल्य, बेदिली. दंगा ] शत्रूस आनुकूल्य, 'हरामखोरी.'

**फुकरा** [अ. अनेकव. 'फकीर'चें] गरीब लोक.

**फुरसत** [ अ. फुर्सत् فرصۃ ] संधि, सवड, अवधि, रिकामा वेळ.

**फौज** ] अ. फौज् فوج ] सेना, सैन्य.

**बकाल** [ अ. बक्काल् بقّل = भाजी विक्या ]. धंदेवाला, गोरपांढरपेशा.

**बक्षीगिरी** [ फा. बख्शीगरी بخشیگری ] सेनाधिपत्य.

**बखतर**–बक्तर [फा. बग्तर् بگتر ] चिलखत.

**बगल** [ फा. बघल् بغل ] खांक, बाजू.

**बचा** [ फा. बच्चा بچہ ] पोर, मूल, बचडा = अगदीं लहान पोर.

**बन्दोबस्त** [ फा. बन्द्-उ-बस्त् بند وبست ] व्यवस्था.

**बमय** [ फा. बा با = अ. मअ مع = सह ] बमबसामान = सामानासह.

**बरकंदाज** [ फा. बर्क्-अंदाझ् برق انداز = (अक्षरशः) वीज टाकणारा ] बंदुकदार.

–**बरहुकूम** [ फा. बर हुक्म् برحکم ] –प्रमाणें

**बहादूर** [ फा. बहादुर بہادر ] शूर वीर.

**बाजत**– [ फा. बअद्-अझ् بعد از –नंतर.

**बाज** [ फा. बाझू بازو ] पक्ष, कड.

**बादशाई**–ही [ फा. बादशाही بادشاھی ] राज्य, राज्याधिकार.

**बारगीर** [ फा. बार्गीर् بارگیر ] स्वारशिपाई ज्याचा घोडा धन्यानें दिलेला असतो.

**बिचोबा** [ फा. बी. चोबा بیچوبہ ] लहान बिनखांबी तंबू.

**बिनी** [ फा. बीनी بینی ] नाक, नाकपट्टी, नासिकात्राण, अघाडी.

**बुणगा** [ फा. बुन्गाह بنگاہ ] सैन्याची पिछाडी. जींत सामुग्री बाजार वगैरे असे. बुणगे = बिनलढाऊ लोक.

**बेइमानी** [ फा. बे–ईमान् بے ایمان ] कृतघ्नता, विश्वासघात.

**बेचिराख** [फा. बे-चिराघ् بیچراغ ] दीपहीन, उध्वस्त, उजाड, वैराण.

**बेजान** [ फा. बे-जान् بیجان ] निर्जीव, मृत, ठार.

**बेदील** [ फा. बे-दिल् بیدل ] भावहीन, असंतुष्ट.

**बेदुवा** [मराठी बे = नकारार्थी + दुआ] शाप.

**बेफाम** [ फा. बे–फह्म् بے فہم ] असावध, गाफल.

**बेमर्जी** [ बे = गैर = नकारार्थी + अ. मर्झी مرضی ] नाखुशी, अप्रीति, इतराजी.

**बेमुबलक** [ अ. मब्लघ् مبلغ = संख्या ] अपरिमित, विपुल, मुबलक.

बेलदार [ फा. बेल्दार् بیل دار ] पाटी, कुदळ, पावडें घेऊन काम करणारा.

बेलाशक[अ. विलाशक्क् بلا شک ] निःशंक, निर्भयपणें, बेशक.

बेवकूब [ फा. बे-वुकूफ् بیوقوف ] अक्कल-शून्य, मूर्ख.

बेहोष [ फा. बे-हूश् بیهوش ] असावध, गाफल, मूर्ख.

बोर [ फा. बोर् بور ] काळसर तांबडा घोडा.

भिस्त [अ. विस्अत् وسعة ?] शक्ति,सामर्थ्य.

मजल [ अ. मन्झिल् منزل ] विसाव्याची जागा, सारखा केलेला प्रवास, आक्रमिलेलें अंतर, टप्पा. मजल दर मजल = सारख्या मजला मारित.

मजकूर [ अ. मझ्कूर् مذکور ] निवेदित, लिखित, बोलणें; गोष्ट; युक्ति; उपाय; विचार.

मतलब [अ. मत्लब् مطلب ] इष्ट वस्तु; हेतु; कर्तव्य, संबंध.

मतलबी = स्वार्थी.

मनसुबा–मनसोबा [ अ. मन्सूबा منصوبہ ] विचार, ठराव, युक्ति, ध्यान.

मनसुबेबाज [फा. मन्सूबा-बाझ् منصوبہ باز] युक्तिवान, मुत्सद्दी.

मना–मनाई [ अ. मनूअ منع ] प्रतिबंध.

मयत [ अ. मय्यित् میت ] मृत.

मर्जी [ अ. मर्झी مرضی ] खुशी, स्वभाव, इच्छा.

मर्दुमी–मर्दुमकी [ फा. मर्दुमी < फा. मर्दुम् مردم = मनुष्य ] पौरुष, शौर्य.

मशाल [ अ. मश् अल् مشعل ] दिवटी.

मसलत [ अ. मस्लहत् مصلحت ] योग्य विचार. उपाय, सल्ला, गोष्ट, अंगीकृत कार्य, मोहीम ; मोंगलाई मसलत = कपट-व्यवहार.

मस्करी [ अ. मस्खरा مسخرہ ] थट्टा.

महाल [ अ. महल्ल محل ] राजमंदिर.

महिना [ फा. माहीना ماہینہ ] मासिक, मासिकवृत्ति, मास.

मातबर [अ. मुअतबर معتبر] विश्वासु,थोर.

माफ [ अ. मु आफ़् معاف ] क्षान्त, क्षमा केलें गेलेलें; माफी = क्षमा.

मात–प्यादेमात [ अ. मात مات = तो मेला ] पराभव.

माफक [ अ. मुवाफिक् موافق ] योग्य.

मालियत [ अ. मालियत् مالیة ] वसूल, उत्पन्न, ऐवज.

मुकाबला [ अ. मुकाबला مقابلہ ] समोरा-समोर भेट, गांठ; संमुखीभवन.

मुक्काम [ अ. मुकाम् مقام ] वसति; वसति-स्थान.

मुजरा [ अ. मुज्रा مجرا = चालू, रूढ, पाळावयाचा नियम ] सलाम.

मुत्सद्दी [ अ. मुतसद्दी متصدی ] कर्ता; कारकून; कामगार; राजकारणी.

मुनशी [ अ. मुन्शी مُنشی ] लेखक; फारशी पत्रव्यवहार करणारा.

मुर्दा–मुडदा [ फा. मुर्दा مردہ ] मृत, शव.

मुलूख [ अ. मुल्क ملک ] देश, प्रदेश.

मुलूखगिरी [ फा. मुल्क्-गीरी ملک گیری ] प्रदेश जिंकणें.

मेजवानी [ फा. मेझ्बानी میزبانی ] आद-रातिथ्य, मेहमानी, भोजन.

मेण [ फा. मियान् ميان ] कोष, म्यान.

मेहनत [ अ. मिहनत् محنت ] श्रम, कष्ट.

मैदान [ अ. मैदान् ميدان ] विस्तीर्ण व सपाट अशी जागा.

मोर्चा [ फा. मूर्चा مورچه ] तोफा वर बसविण्याकरितां केलेला उंचवटा, धमधमा, पहारा, चौकी, तोफखान्याचें तोंड.

मोर्चेबंदी = बंदोबस्त आणि मजबुती.

मोहीम [ अ. मुहिम्म् مهم = महत्त्वाचें कार्य ] दौड, स्वारी, अंगीकृत कार्य.

मोहरा–मोहोरा [ फा. मुहूरा مهره ] मोत्याचा दाणा; मणि; मुख्य मनुष्य.

यार [ फा. यार् يار ] मित्र.

रदबदली [ अ. रद्द رد = निवर्तन, ; अ. बदल् بدل = विपर्यय ] हुकूम रद्द व्हावा अगर बदलला जावा म्हणून केलेली वकिली; मनवळवणी.

रवाना [ फा. रवाना روانه ] चालू; पाठविलेले.

रवानगी [ फा. रवानगी = चाल, गति ] पाठवणूक.

रसद–रस्त [ फा. रसद् رسد ] दारूगोळा धान्य वगैरेची सामुग्री.

रिसाला [ अ. रिसाला رساله ] घोडेस्वारांचें पथक.

रुमाल [ फा. रूमाल رومال ] तोंड पुसण्याचें फडकें; फडकें.

रूबरू–रूबेरूब [ फा. रू-ब-रू روبرو ]– समक्ष.

रोंख [ फा. रुख् رخ ] तोंड, बाजू; दृष्टि; रोंखानें = कडे.

रोज [ फा. रोझ् روز ] दिवस.

रोजमुरा [ फा. रोझ्मर्रा روزمره ] रोजी, दैनिक वेतन; वेतन.

लश्कर [ फा. लश्कर् لشكر ] सैन्य; सेना.

वकील [ अ. वकील् وكيل ] प्रतिनिधि.

वक्त-वख्त [ अ. वक्त् وقت ] काळ, वेळ.

वगैरे [ फा. वघैरा < अ. वघैरुहु وغيره ] आणि तादितर; इत्यादि; प्रभृति.

वजारत [ अ. विझारत् وزارت ] वजिरी, प्रधानकी.

वजीर [ अ. वझीर् وزير ] प्रधान.

वजीरात [ अ. वझीर् + मराठी प्रत्यय-आत् ] प्रधानकी.

शरम [ फा. शर्म् شرم ] लाज, भीति. शरम धार पाडणें = अब्रू रक्षण करणें.

शर्थ [ अ. शर्त् شرط ] प्रमाण; नियम; अट; पराकाष्ठा, शिकस्त; 'यथास्थित'.

शहरपन्हा [ फा. शह्र्-पनाह् شهرپناه ] शहररक्षक, तट, कोट.

शाबूत-शाबूद [ अ. सुबूत् ثبوت = स्थैर्य, सबळता ] धड, बळकट.

शाहजादी–शहाजादी [ मराठी स्त्री. रूप < फा. शाह्झादा شاهزاده ] राजकन्या.

शिकस्त [ फा. शिकस्त् شكست ] भग्न, पराभूत; पराकाष्ठा; कमाल.

शिकार [ फा. शिकार् شكار ] सावज, वेध्य.

शिक्केकट्यार [ अ. सिक्का سكه = छाप, मुद्रा ] अधिकारचिन्हें.

शिपाई [ फा. सिपाही سپاهى ] सैनिक.

शिपायगिरी [ फा. सिपाह्-गरी سپاهگرى ] शिपाईपेशा; क्षात्रधर्म.

शिफारस [ फा. सिफारिश् سفارش ] प्रशंसा, स्तुति.

शिरपेच [ फा. सर्पेच् سرپیچ ] पागोट्याला बांधण्याचा एक अलंकार.

शिलीक [ अ. शल्क्-शिल्क् شلق ] सरबत्ती-डागणी.

शिलेजोर [ अ. सिलह् سلح = हत्यारें; फा. झोर زور =शक्ति ] हत्याराची शक्ति.

शिलेदार [ फा. सिलह्दार् سلحدار =हत्यार-दार ] स्वतःचा घोडा ठेवून लढणारा राऊत.

शेर [ फा. शेर् شیر ] वाघ; जोरावर; समर्थ

सक्त-सखत [ फा. सख्त् سخت ] कठिण; अतिशय.

सद्दी [ अ. सअद् سعد = ग्रहांची शुभ दृष्टि; भाग्य + ई ] सद्भाग्य.

सनद [ अ. सनद् سند ] अधिकाऱ्याच्या सहीशिक्यानिशीं असलेलें हक्कपत्र.

सन्देकत ? [ अ. सदाकत् صداقت ] निष्ठा, खरी मैत्री.

सफेजंग [ फा. सफ्फेजन्ग् صف جنگ = युद्धाची फळी ] मोठी लढाई, खडें युद्ध.

सर करणें [ फा. सर् कर्दन् سرکردن ] मुख्य होणें; जिंकिणें.

सरदार [ फा. सर्दार् سردار ] अधिकारी.

सरन्जाम [ फा. सरन्जमाम् سرانجام ] शेवट; सामुग्री; लवाजमा; जहागीर.

सरनोबत [ फा. सर्नौबत् سرنوبت ] सेनापति.

सरासरी [ फा. सरासरी سراسری ] साधारणतः, मध्यमतः.

सराई [ फा. सरा-सराय् سرای ] धर्मशाळा, मुशाफरखाना.

सलाबत [ अ. सलाबत् صلابة ] मजबूती मजबूत; कठिण; धाक; दरारा.

सल्ला [ अ. सिलाह् صلاح = अ. सुल्ह् صلح ] तहाचें बोलणें; शांतता.

स्वारी [ फा. सुवार=अश्वारूढ, आरूढ ] दौड, मोहीम; बहुमानवाचक पद.

साफ [ अ. साफ् صاف ] स्वच्छ; स्पष्ट, अगदीं; बिलकूल.

सायत [ अ. साअत् ساعت ] घटिका.

साहेब [ अ. साहिब् صاحب ] प्रभु; बहुमानदर्शक पद.

सुतरनाला [ फा. शुतुर्नाल् < फा. शुतर् شتر = उंट ] उंटावरची तोफ.

सुभा [ फा. सूबा صوبہ ] प्रांत; प्रांताधिकार; प्रांताधिकारी.

सुमार [ फा. शुमार् شمار ] मोजदाद; गणना; अंदाज, सुमारें=जवळ.

सूरत [ अ. सूरत् صورة ] रूप; स्वरूप. कामाची सूरत=कामाची रूप-रेषा.

सुरू [ अ. शुरूअ شروع ] आरंभ; चालू.

सेला [ फा. सैलाब् سیلاب ] लोंढा.

सोबत [ अ. सुहूबत् صحبت ] संगत;—संगती.

हक्कहराम [ मराठी समास—निमकहराम प्रमाणें ] उपकार न ओळखणारा, कृतघ्न.

हजर—हजीर [ अ. हाझिर् حاضر ] विद्यमान्, प्रविष्ट.

हजेरी [ अ. हाझिर + ई ] विद्यमानता हजेरीची फौज=हुजूरची फौज अगर नेहमीं खडी जय्यत असलेली फौज

हमेश—हमेशा [ फा. همیشہ हमीशा ] नेहमीं, सदैव.

हर [ फा. हर् هر ] प्रत्येक.

हरामी [ फा. हरामी حرامی ] अधर्मी, पापी.

हलकारा [ फा. हर्कारा هرکاره ] हरकाम्या, पडेल तें काम करणारा; जासूद.

हलाली-हरामी [ फा. हलाली-हरामी حلالی حرامی ] न्यायऽन्याय; बरें वाईट.

हरोळी-हारोळी [ फा. हरावल् هراول +ई] सैन्याची अघाडी, बिनी.

हल्ला [ अ. हम्ला حمله ] चढाव, चढाई.

हातरोखा [ अ. रूक्आ رقعة = पत्र ] हातचें पत्र.

हिंमत [ अ. हिम्मत् همت ] महत्त्वाकांक्षा; इच्छाशक्ति; प्रयत्न.

हिंमत मर्दा मदत खुदा [ फा. हिम्मत्-इ-मर्दान् व मदद्-इ-खुदा همت مردان ومدد خدا ] इच्छा-प्रयत्न शक्ति मनुष्यांची आणि मदत ईश्वराची.

हिशेब, हिशेब [ अ. हिसाब् حساب ] गणती, गणना.

हुकूम [ अ. हुक्म् حکم ] आज्ञा, फर्मान.

हुजूर [ अ० हुझूर् حضور = विद्यमानता ]— समक्ष, बहुमानदर्शक पद.

हुशारी [ फा. हुश्यारी هشیاری ] सावधपणा; बुद्धिमत्ता.

हौदा [ अ० हौदिज् هودج ] हत्तीवरचें आसन.

के० रा. ब. काशिनाथ नारायण साने, बी. ए. यांनीं विपुल टिपांसह प्रकाशि केलेले मराठी व संस्कृत ग्रंथ खालीं नमूद के ा किंमतीस मिळतील. पैका फुली मारलेले ग्रंथ लाय न्यांसाठीं व बक्षिसांसाठीं र कारनें पसंत केलेले हेत.

# ऐतिहासिक ग्रंथ.

ग्रंथा नांव — किंमत. ट. हां. खेरीज पडेल.

कृष्णाजी अनंत सभासद विरचित शिवछत्रपतीचें चरित्र.
किंमत आणे ०१२. टपाल खर्च ०२.

* म. रा. चिटणीस-विरचित श्रीमंत संभाजी महाराज व राजाराम महाराज यांचीं चरित्रें.— किंमत आणे ०१०. ट ख. ०१॥.

* म. रा. चिटणीस-विरचित थोरले शाहू महाराज यांचें चरित्र.
किंमत आणे ०१२. ट. ख. ०२.

* पेशव्यांची बखर— किंमत रुपया १. ट. ख. ०३.

* भाऊसाहेबांची बखर— किंमत रु. १०१४. ट. ख. ०३.

* रघुनाथ यादव-विरचित पाणिपत येथील घोर संग्रामाची बखर.
किंमत आणे ० . ०१॥.

मल्हार रामराव-विरचित शककर्ते श्रीशिवछत्रपती महाराज यांचें सप्तप्रकरणात्मक चरित्र.—किंमत रु. २. ट. ख. ०४.

## संस्कृत ग्रंथ सटीक.

पुरुषोत्तमपंडित-विरचितं शिवकाव्यम्–पूर्वार्द्धः
किंमत रुपये २००. ट. ख. ०३.